शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दूरशिक्षण केंद्र

आजचा महाराष्ट्र

(१९६०-२०००)

(Maharashtra Today - 1960-2000)

(शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून)

एम. ए. भाग-१

इतिहास

HIST-210 (Optional Paper)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)

प्रथमावृत्ती : २०१८

एम. ए. भाग – १ करिता (आजचा महाराष्ट्र)

सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

प्रती : ५००

■

प्रकाशक :
डॉ. व्ही. डी. नांदवडेकर
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर – ४१६ ००४.

■

मुद्रक :
श्री. बी. पी. पाटील
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर – ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-89327-01-4

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर–४१६ ००४ (भारत)

★ दूरशिक्षण विभाग–विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सल्लागार समिती

प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

प्रा. पी. प्रकाश
अतिरिक्त सचिव-II,
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

प्रा. (डॉ.) सीमा येवले
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) भारती पाटील
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डॉ. व्ही. डी. नांदवडेकर
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

श्री. एम. ए. काकडे
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

श्री. व्ही. टी. पाटील
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

इतिहास समन्वय समिती

अध्यक्ष - **प्राचार्य डॉ. ए. एल. बेलवटकर**
मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर, जि. सांगली

- **डॉ. व्ही. आर. पाटील**
  आर्टस् कॉलेज, कोवाड,
  ता. चंदगड, जि. कोल्हापूर
- **प्रा. डॉ. नंदा पारेकर**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

अभ्यास घटकांचे लेखक

लेखक	घटक क्रमांक
प्रा. डॉ. एस. पी. शिंदे के. बी. पी. कॉलेज, पंढरपूर, जि. सोलापूर	१
प्रा. ए. डी. कोकाटे छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा	२
प्रा. श्रीधर भाऊसाहेब शिंदे मिरज महाविद्यालय, मिरज, जि. सांगली	३
डॉ. चांगदेव अरविंद बंडगर समन्वयक, दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	४

■ संपादक ■

प्रा. डॉ. एस. पी. शिंदे
इतिहास विभाग,
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,
पंढरपूर, जि. सोलापूर

प्रस्तावना

शैक्षणिक वर्ष २००७ पासून शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, यांच्या वतीने दूरशिक्षण केंद्रामार्फत बहिःस्थ विद्यार्थ्यांना दूरशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तसेच यंदाच्या वर्षापासून म्हणजे २०१७-१८ पासून अभ्यासक्रम बदललेला आहे, सत्रपद्धती राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने, एम. ए. भाग-१ इतिहास या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी ''**आजचा महाराष्ट्र**'' या विषयाचे स्वयं अध्ययनासाठी हे पुस्तक सन २०१८-१९ या वर्षात लिहिले आहे. सदर पुस्तकाच्या लेखनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पदव्युत्तर विभागात अध्ययन करणाऱ्या अनुभवी व तज्ज्ञ लेखकांकडून या विषयाच्या अभ्यासक्रमानुसार असलेल्या विविध घटकांचे लेखन करून घेण्यात आले आहे. या पुस्तकातील विविध घटक लिहिताना साधी व सोपी भाषा, संकल्पनात्मक स्पष्टता, विषयाच्या आकलनासाठी तक्ते इत्यादींचा वापर केलेला आहे. वाचक व विद्यार्थ्यांना समजेल अशी विषयाची सोपी व सुटसुटीत मांडणी करण्यात आलेली आहे. प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयं अध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे दिलेली आहेत. तसेच घटकाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द, शब्दार्थ व अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची सूची दिलेली आहे.

आजचा महाराष्ट्र या स्वयं अध्ययन साहित्यामध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती, आर्थिक विकास, शैक्षणिक विकास आणि सामाजिक चळवळी इत्यादी घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यामध्ये कांही उणिवा असल्यास वाचक व विद्यार्थ्यांनी त्या आमच्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी निश्चितपणे होईल. हे पुस्तक पदवी, पदव्युत्तर व विविध स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल असा आम्हाला विश्वास आहे. सदर पुस्तक पूर्ण करण्यासाठी घटक लेखकांनी जे परिश्रम घेतले. पुस्तक प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, दूरशिक्षण विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

■ संपादक ■

प्रा. डॉ. एस. पी. शिंदे
इतिहास विभाग,
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,
पंढरपूर, जि. सोलापूर

दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

अभ्यासमंडळ : इतिहास

अध्यक्ष – **डॉ. अवनिश पाटील**
इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती एन. डी. पारेकर**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. डी. बी. मासाळ**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **डॉ. श्रीमती संघमित्रा व्ही. सरवदे**
  आण्णासाहेब डांगे कॉलेज, हातकणंगले,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. दिपक शंकरराव जाधव**
  लाल बहादूर शास्त्री कॉलेज, सातारा
- **डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले**
  चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. एम. व्ही. जाधव**
  यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. निवासराव अधिकराव वरेकर**
  आदर्श महाविद्यालय, विटा, ता. खानापूर,
  जि. सांगली
- **डॉ. सुरेश मारूती चव्हाण**
  आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. राजश्री दिलीप निकम**
  कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु।।, शिवनगर,
  ता. कराड, जि. सातारा
- **डॉ. श्रीमती मंजिरी कामत**
  इतिहास अधिविभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
- **डॉ. चंद्रकांत अभंग**
  सचिव, भारत इतिहास संशोधक मंडळ,
  इमिनंट स्कॉलर ऑफ मराठा हिस्ट्री.
- **डॉ. अरुण भोसले**
  निवृत्त प्राध्यापक, इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. भारतभुषण माळी**
  सचिव, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद
- **डॉ. अमर आडके**
  सल्लागार, किल्ले जतन आणि संवर्धन, कोल्हापूर

अनुक्रमणिका

घटक क्रमांक	घटकाचे शीर्षक	पान क्रमांक
१.	महाराष्ट्र राज्याची निर्मिती	१
२.	आर्थिक विकास	२०
३.	शैक्षणिक विकास	४०
४.	सामाजिक चळवळी	६१

■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१७-१८ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

घटक – १

महाराष्ट्र राज्याची निर्मिती

(Formation of Maharashtra State)

१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

१.२.१ भाषावार प्रांत रचना (Linguistic Reorganization of States)

१.२.२ संयुक्त महाराष्ट्र चळवळ (Sanyukta Maharashtra Movement)

१.२.३ चळवळीतील कार्यकर्त्यांचे योगदान (Contribution of the Activists)

१.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.४ स्वयं अध्ययन प्रश्न आणि उत्तरे

१.५ सारांश

१.७ सरावासाठी स्वाध्याय

१.८ संदर्भ ग्रंथ यादी

१.० उद्दिष्टे

१. भाषावार प्रांत रचनेचा अभ्यास पाहणे.

२. संयुक्त महाराष्ट्र चळवळी बाबत माहिती घेता येईल.

३. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील घटकांची माहिती घेणे.

४. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील नेत्यांची माहिती पाहणे.

५. महाराष्ट्र अस्तित्वात येण्यासाठी जी संयुक्त महाराष्ट्र चळवळ घडून आली तिची सविस्तर माहिती घेता येईल.

६. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाचे तीव्र पडसाद पाहणे.

७. चळवळीतील यशापयश पाहणे. इत्यादी.

१.१ प्रस्तावना

महाराष्ट्राला गौरवशाली ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा लाभला आहे. शिवाजी महाराजांनी स्वराज्याची निर्मिती केली. रयतेमध्ये स्वराज्य, स्वधर्म, भाषा व स्वसंस्कृती विषयी जागृती घडवून आणली. त्यामुळे मराठी माणसात अस्मिता निर्माण झाली. इ.स. १८१८ मध्ये मराठी सत्तेचा शेवट होऊन त्यांच्या जागी ब्रिटिशांची सत्ता स्थापन झाली. ब्रिटिश काळात धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक जागृती होऊन राष्ट्रवाद वाढीस लागला. यातून राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागली. पुढे इ.स. १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले. भाषावार प्रांतरचनेची मागणी वाढीस लागली. परंतु महाराष्ट्रात ही मराठी भाषिक राज्याची मागणी करणारी 'संयुक्त महाराष्ट्र चळवळ' इ.स. १९४६ पासून सुरू झाली. १२ मे १९४६ रोजी बेळगाव येथे साहित्य संमेलन भरले. त्यामध्ये संयुक्त महाराष्ट्र चळवळीवर भर दिला. पुढे २८ जुलै १९४६ रोजी संयुक्त महाराष्ट्र परिषदेची स्थापना केली. अनेक स्थित्यंतरातून या चळवळीची वाटचाल झाली. यातून महाराष्ट्र राज्य १ मे १९६० रोजी भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वानुसार अस्तित्वात आले.

ब्रिटिशांनी त्यांच्या प्रशासकीय आणि व्यापाराच्या सोयीसाठी एकूण ११ प्रांत निर्माण केले. त्यामागे कोणताही भाषिक आधार नव्हता. सन १८८५ नंतर काँग्रेसने या प्रांताचा आधार घेत प्रांतीक काँग्रेस कमिट्यांची स्थापना केली. परंतु ती स्थापना योग्य व पुरेशी ठरणार नव्हती. यावर उपाय म्हणजे भाषिक प्रांतरचनेचा होय. भारतात विविध भाषा बोलल्या जातात. त्या आधारावर प्रमुख भाषिक लोकांचे वेगवेगळे राज्य तयार करण्याचे धोरण होय. त्याला ब्रिटिश सरकार तसेच राजकीय पक्षांनी मान्यता दिली.

संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना करून अनेक नेत्यांनी काँग्रेस आणि मध्यवर्ती सरकारावर दबाब आणण्याचा प्रयत्न करून स्वतंत्र महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीमध्ये आपली महत्त्वाची भूमिका पार पाडली. पुढे १ मे १९६० रोजी स्वतंत्र महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीची घोषणा करण्यात आली. तरीही भाषावार प्रांत रचना, संयुक्त महाराष्ट्र चळवळ व प्रमुख राजकीय चळवळी व नेत्यांची माहिती या घटकामध्ये पाहणे महत्त्वाचे आहे.

१.२ विषय विवेचन

१.२.१ राष्ट्रीय पातळीवरील भाषावार प्रांतरचना

या घटकामध्ये भारतात झालेल्या भाषिक लढ्याचा व त्या अनुषंगाने भाषावर प्रांत रचनेचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. सन १९०५ साली अखिल भारतीय काँग्रेसने ब्रिटिशांनी केलेल्या बंगालचा फाळणीस विरोध केला व भाषावार प्रांतरचनेला पाठिंबा दिला. पुढे काँग्रेसने १९०८ साली बिहारमध्ये व १९१७ साली सिंध, तसेच आंध्रमध्ये स्वतंत्र प्रांतिक कमिट्या स्थापन केल्या. सन १९१३ पासून तेलगू जनतेने आंध्र प्रदेशाच्या मागणीसाठी सभा घेण्यास सुरुवात केली होती. पुढे १९१६ पासून कानडी लोकांनी 'विधी वर्धक संघ' व 'कर्नाटक एकीकरण सभा' स्थापन करून स्वतंत्र कर्नाटकाची राज्याची मागणी सुरू केली होती.

राष्ट्रीय काँग्रेसच्या १९२१ साली झालेल्या नागपूर अधिवेशनात महात्मा गांधीजीनी स्वतःच काँग्रेसने

भाषावार प्रांतरचना करावी हे तत्त्व मान्य असल्याचा ठराव मांडला. या नव्या घटनेनुसार २१ प्रांतिक समित्या व मुंबई तसेच दिल्ली शहरासाठी स्वतंत्र समित्या निर्माण केल्या. त्यामुळे प्रांतोप्रांतीचे लोक भाषिक आकर्षणामुळे काँग्रेसमध्ये मोठ्या प्रमाणात सामील झाले. निरनिराळ्या प्रांतात भाषेच्या आधारावर निरनिराळ्या संघटना अस्तित्वात आल्या. वरील घटनेमुळे भाषावर प्रांतरचना ही संकल्पना पुढे अस्तित्वात आली. पंडित जवाहरलाल नेहरू यांचा भाषावार प्रांतरचनेस पाठिंबा होता. कन्या इंदिरा गांधी यांना लिहिलेल्या पत्रात त्यांनी भाषावार प्रांतरचनेचा पुरस्कार केलेला आहे. १९२८ मध्ये नेहरू रिपोर्ट भाषेवर आधारित प्रांताची पुनर्रचना करण्याची शिफारस केली होती. काँग्रेसने स्वातंत्र्य मिळेपर्यंत भाषावर प्रांतरचनेचा आग्रह धरलेला दिसून येतो. १९३७ साली कलकत्ता काँग्रेसमध्ये मुंबई व मद्रास प्रांतामध्ये कर्नाटक व आंध्र निर्माण करण्यासंबंधी चर्चा झाली. सन १९३८ मध्ये काँग्रेस वर्कींग कमिटीने आपण सत्तेवर आल्यास भाषावार प्रांतरचना करू असे आश्वासन दिले. १९४५-४६ च्या निवडणूक जाहीरनाम्यामध्येही काँग्रेसने भाषावर प्रांतरचनेचा पुनरुच्चार केला. परंतु स्वातंत्र्य प्राप्तीनंतर काँग्रेसच्या धोरणात बदल होत गेला. घटनासमितीतील 'ड्राफ्टींग कमिटी'ने भाषावार प्रांत आयोगाची स्थापना न्या. एस. के. दार यांच्या अध्यक्षतेखाली केली. भाषावार प्रांत रचनेचा प्रश्न सोडविण्यासाठी पंडित नेहरूंनी दार कमिशन नेमले.

दार कमिशन १९४७

या दार कमिशनचे अध्यक्ष - एस. के. दार. सदस्य (१) श्री. पन्नालाल, (२) श्री. जगत नारायण लाल. या आयोगाने भारतभर दौरा केला. १००० निवेदने स्वीकारली. ७०० लोकांच्या मुलाखती घेतल्या आणि डिसेंबर, १९४८ मध्ये आपला अहवाल सादर केला.

१. भाषिक आधारावर प्रांताची निर्मिती करणे राष्ट्रहिताच्या दृष्टीने योग्य नाही. हा प्रश्न तातडीने हाताळण्याची गरज नाही.

२. सध्या देशापुढे अन्नटंचाई, संरक्षण, चलन वाढ, पुनर्वसन या निकडीच्या समस्या आहेत.

३. मुंबई, मद्रास या शहराचा प्रश्न भाषेच्या आधारावर नाही तर लोकांचे हितसंबंध पाहून सोडवावा.

४. मुंबई वेगळी ठेवावी.

या अहवालावर मल्याळी, तेलगू, मराठी आणि कन्नड नेत्यांनी व जनतेने तीव्र प्रतिक्रिया दिल्या. दार कमिशनने हा प्रश्न लांबणीवर टाकण्याची सूचना केली.

या अहवालावर अखिल भारतीय काँग्रेसच्या जयपूर अधिवेशनात सर्वच नेत्यांनी टीका केली. त्यामुळे या प्रश्नाचा विचार करण्यासाठी जवाहरलाल नेहरू व वल्लभभाई पटेल आणि पट्टाभिस्तिनारामय्या यांची समिती नेमण्यात आली.

जे. व्ही. पी. समिती (त्रिसदस्य समिती) : २९ डिसेंबर १९४८

जे. व्ही. पी. समितीच्या अहवालात देशांतगर्त व जागतिक फाळणीनंतर देशाच्या परिस्थितीचा विचार

करता भाषावार प्रांतरचनेच्या प्रश्नाचा फेरविचार केला पाहिजे. देशाचे संरक्षण महत्त्वाचे आहे. जातीयवाद, प्रांतीकवाद या फुटीर प्रवृत्तींना उत्तेजन देता कामा नये. भाषा ही माणसांना एकत्र आणते. तशीच ती अन्यभाषिकांपासून वेगळे करते. भाषावार प्रांतरचना प्रश्न दक्षिणेत आहे. लोकांच्या तीव्र भावना लक्षात घेऊन लोकशाही सरकारला त्याची दखल घ्यावी लागेल. अन्य प्रांताच्या मागण्यांपेक्षा आंध्र प्रांत निर्मितीच्या मागणीसाठी लोकांचा अधिक पाठिंबा आहे. या समितीने खालील प्रमाणे अहवाल तयार केला.

१. आंध्रप्रदेश निर्माण करावयाचा झाल्यास तेलगू भाषिकांनी मद्रासवर हक्क सांगू नये.

२. महाराष्ट्रात मुंबईचा समावेश केला जाणार नाही.

३. वऱ्हाड–नागपूर भागातील लोक महाराष्ट्रात जायचे की नाही हे स्वतःच ठरवतीत.

४. कर्नाटक राज्याची निर्मिती अडचणी संपताच केली जाईल.

या अहवालावर तीव्र प्रतिक्रिया होऊ लागल्या. महाराष्ट्रात मुंबईसह महाराष्ट्र झाला पाहिजे यासाठी आंदोलनाची तयारी केली जाऊ लागली. आंध्रातही तीव्र भावना प्रकट झाल्या.

तेलगू भाषिकांच्या आंध्रप्रदेश या राज्यासाठी पोट्टीश्रीरामलू यांनी उपोषणाला सुरुवात केली. त्याचाही सरकारवर काही परिणाम झाला नाही. उपोषणाच्या ५२ व्या दिवशी पंडित नेहरूंनी लोकसभेत निवेदन केले की, ''तेलगू भाषिकांनी मद्रास शहरावरचा हक्क सोडला तर आंध्र निर्मितीसाठी मी योग्य पावले उचलीन.'' शेवटी उपोषणाच्या ५८ व्या दिवशी पोट्टीश्रीरामलूंचे निधन झाले. आंध्रात आगडोंब उसळला. शेवटी नाईलाजाने पंडित नेहरूंना आंध्रची निर्मिती करावी लागली.

या नंतर भारत सरकारने सीमा आयोग नेमणार असल्याची घोषणा केली व २२ डिसेंबर १९५३ मध्ये न्या. फाजल अली यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय आयोग नेमण्यात आला.

१. अध्यक्ष – सय्यद फाजल अली

२. सदस्य – हृदयनाथ कुंजरू

३. सदस्य – के. एम. पण्णीकर

राज्यपुनर्रचना आयोग (फाजलअली कमिशन)

फाजल अली कमिशनने भाषावार प्रांतरचनेच्या संदर्भात जो अहवाल दिला यामध्ये १४ राज्ये आणि ६ केंद्रशासित प्रदेश निर्माण करण्यात आले.

राज्ये : १६

१. आंध्रप्रदेश	५. जम्मू–काश्मिर	९. म्हैसूर	१३. उत्तर प्रदेश
२. आसाम	६. केरळ	१०. ओरिसा	१४. पश्चिम बंगाल
३. बिहार	७. मध्यप्रदेश	११. पंजाब	
४. मुंबई	८. मद्रास	१२. राजस्थान	

केंद्रशासित प्रदेश : ६

१. अंदमान-निकोबार २. दिल्ली ३. हिमाचल प्रदेश

४. लक्षद्वीप ५. मणिपूर ६. त्रिपूरा

वरील प्रांतरचना करताना मराठी व गुजराथी भाषिकांचे मिळून मुंबई राज्य करण्यात आले. या विरोधात भाषिक प्रदेशातील लोकांच्यात असंतोष निर्माण झाला. परिणामी मराठी भाषिकांनी संयुक्त महाराष्ट्राची मागणी केली व गुजराथी भाषिकांनी मध्यगुजराथची मागणी केली. पर्याय म्हणून मुंबईला वेगळी काढण्याचा प्रयत्न केंद्राने केला. जनआंदोलनामुळे १ मे १९६० रोजी मुंबईसह स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची निर्मिती करण्यात आली व वेगळे गुजराथ हे १५ वे राज्य म्हणून निर्माण करण्यात आले. १९६३ मध्ये नागालँड राज्याची निर्मिती करण्यात आली. एप्रिल १९६६ मध्ये पंजाब सुभ्याच्या पुनर्रचनेसाठी शहा कमिशनची नेमणूक केली. त्यांनी पंजाब व हरियाना ही वेगळी राज्ये निर्माण केली. या दोन्ही राज्याची राजधानी चंदीगढ करण्यात आली. सन १९६९ मध्ये आसाममधून वेगळ्या मेघालय राज्याची निर्मिती करण्यात आली. सन १९७१ मध्ये हिमाचल प्रदेशाला स्वतंत्र राज्याचा दर्जा देण्यात आला. त्रिपुरा व मणिपूर ही नवी राज्ये निर्माण करण्यात आली. १९७५ मध्ये सिक्कीमला राज्याचा दर्जा देण्यात आला. १९८६ मध्ये मिझोरामला राज्याचा दर्जा देण्यात आला. १९८७ मध्ये अरुणाचल प्रदेश व गोवा यांना राज्याचा दर्जा देण्यात आला. सन २००० साली छत्तीसगड, उत्तरांचल, झारखंड या तीन राज्यांची निर्मिती करण्यात आली. १९९२ ला दिल्लीचा राजधानीचे शहर म्हणून वेगळा दर्जा देण्यात आला. अशाप्रकारे भारतात २९ राज्ये आणि ७ केंद्रशासित प्रदेश आहेत.

स्वयं अध्ययन प्रश्न १

(अ) योग्य पर्याय निवडा.

१. बेळगांव साहित्य संमेलन ..... साली भरले होते.

(अ) १९४० (ब) १९४६ (क) १९५० (ड) १९५२

२. महात्मा गांधीनी ..... अधिवेशनात भाषावर प्रांतरचनेचा पुरस्कार केला.

(अ) कानपूर (ब) नागपूर (क) मुंबई (ड) बेळगांव

३. संयुक्त महाराष्ट्र परिषदेची स्थापना ..... साली झाली.

(अ) १९४६ (ब) १९४७ (क) १९४८ (ड) १९४९

४. दार कमिशनची स्थापना ..... साली झाली.

(अ) १९४५ (ब) १९४६ (क) १९४७ (ड) १९४८

५. पोटीश्रीरामलू यांनी ..... राज्यनिर्मितीसाठी आत्मबलिदान दिले.

(अ) महाराष्ट्र (ब) आंध्र (क) कर्नाटक (ड) मध्य प्रदेश

(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.

१. राष्ट्रीय काँग्रेसचे १९२१ रोजी अधिवेशन कोठे भरले होते ?

२. दार कमिशनचे अध्यक्ष कोण होते ?

३. जे. व्ही. पी. समिती केंव्हा नेमली होती ?

४. फाजलअली आयोग केंव्हा नेमला ?

५. दार कमिशनने अहवाल केंव्हा सादर केला ?

१.२.३ संयुक्त महाराष्ट्र चळवळ (Sanyukta Maharashtra Movement)

भाषावार प्रांतरचना झाली पाहिजे आणि मराठी बोलणाऱ्या भाषिकांचे एक वेगळे राज्य व्हावे या मागणीसाठी २० व्या शतकात महाराष्ट्रात जे आंदोलन उभे राहिले ते आंदोलन म्हणजे 'संयुक्त महाराष्ट्र चळवळ' होय.

या मध्ये सर्व जातीधर्माचे लोक सहभागी झाले. केंद्र व राज्य सरकारने फुटीरतेचे कारण सांगून व राष्ट्रीय एकात्मतेला धोका आहे असे म्हणून ही चळवळ दडपण्याचा प्रयत्न केला. यातून महाराष्ट्रात १०६ हुतात्मे झाले. शेकडो आबालवृद्ध जखमी झाले. तरी ही लोकांनी अहिंसात्मक मार्गाने ही चळवळ चालू ठेवली. भारतातील अन्य प्रांतात भाषावार प्रांत ही पद्धत मान्य केली गेली. मात्र त्याल अपवाद मराठी आणि तेलगू भाषिक एक चळवळ जशी तीव्र होत गेली तसे केंद्र व राज्य सरकारने नरमाईचे धोरण स्वीकारले. पुढे १ मे १९६० रोजी मुंबईसहीत संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. मात्र अनेक मराठी भाषिक प्रदेश सक्तीने बहुमत असतानाही कर्नाटकात कोंबण्यात आले. डांग, उंबरगावचा आदिवासी मराठी प्रदेश गुजराथला आंदण देण्यात आला. त्यामुळे आजही संयुक्त महाराष्ट्र आंदोलन जनता आणि न्यायालय या पातळीवर चालूच आहे.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी

यशवंतराव चव्हाण आपल्या 'ऋणानुबंध' मध्ये लिहितात की 'मराठी भाषिकांच्या एकीकरणाची ओढ साहित्य संमेलनातून निर्माण झाली.' १९०८ च्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात चिंतामणराव वैद्य यांनी एकीकरणाचा उल्लेख प्रथम केला. सन १९११ साली इंग्रज सरकारने बंगालची फाळणी रद्द केली. त्या संदर्भात भाषा व राष्ट्रीयत्व या शीर्षकाखाली 'केसरी'मध्ये न. चिं. केळकर यांनी लिहिले की, 'मराठी भाषा बोलणाऱ्यांनी सर्व लोकसंख्या एका अमलाखाली असावी' तसेच लोकमान्य टिळकांनी १९१५ साली भाषावार प्रांतरचनेची मागणी केली होती. १९३८ च्या अखेरीस मुंबई येथे भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनात मागणी झाली की, वऱ्हाडसह महाराष्ट्राचा एकभाषी प्रांत बनवावा आणि पुढे निजाम व पोर्तुगीज यांची सत्ता नष्ट झाल्यावर मराठवाडा आणि गोवा हे प्रदेश सामील करावेत. सन १९३९ च्या नगर येथील साहित्य संमेलनात ठराव पास झाला की, सर्व मराठी भाषा प्रदेशांचा मिळून एक प्रांत बनवावा आणि त्याला 'संयुक्त महाराष्ट्र' असे नाव द्यावे असा ठराव केला.

सन १९४० मध्ये रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली 'संयुक्त महाराष्ट्र सभा' ही संघटना स्थापन केली. पुढे १९४१ साली डॉ. केदार यांच्या नेतृत्वाखाली 'महाराष्ट्र एकीकरण परिषद' भरली. या मध्ये सर्व मराठी भाषिकांचा एकच प्रांत करावा असे ठरले.

ऑगस्ट १९४० रोजी श्री. रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली महाविदर्भ सभेची स्थापना झाली. १२ जुलै १९४२ रोजी श्री. ग. त्र्यं. माडखोलकरांनी महात्मा गांधीजींशी संयुक्त महाराष्ट्राविषयी पत्रव्यवहार केला. तेंव्हा महात्मा गांधीजीनी संयुक्त महाराष्ट्राच्या कल्पनेस पाठिंबा व्यक्त केला होता. परंतु मुंबई महाराष्ट्रात करण्यास मात्र विरोध दाखविला. ३० व ३१ मे १९४३ साली मुंबई येथे मराठी पत्रकार परिषद ज. स. करंदीकर यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. यामध्ये दोन ठराव मांडण्यात आले. यामध्ये – (१) स्वतंत्र विदर्भ राज्याच्या मागणीचा पुनरुच्चार करण्यात आला. (२) संयुक्त महाराष्ट्र सभेने मागणी केलेली संपूर्ण महाराष्ट्राच्या मागणीचा ठराव मान्य करण्यात आला.

१९४६ च्या बेळगांव येथील साहित्य संमेलन १२ मे १९४६ रोजी ग. त्र्यं. माडखोलकरांच्या अध्यक्षतेखाली साहित्य संमेलन भरले होते. त्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मिती संदर्भात महत्त्वपूर्ण भूमिका मांडली. संयुक्त महाराष्ट्राच्या इतिहासातील ही फार महत्त्वाची घटना होय.

संयुक्त महाराष्ट्र परिषद

२८ जुलै १९४६ रोजी श्री. शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे महाराष्ट्र एकीकरण परिषद भरली. या एकीकरण परिषदेत मराठी भाषिक प्रांतिक निर्मितीसाठी कार्य करणाऱ्या 'संयुक्त महाराष्ट्र परिषदे'ची स्थापना करण्यात आली. सन १९४६ पासून सन १९५५ पर्यंत परिषदेने कार्य केले. २८ सप्टेंबर, १९४६ रोजी पुण्यात समितीच्या सभेत घटना मंजूर झाली. १५ डिसेंबर १९४६ रोजी निवडणुका घेऊन घटनेप्रमाणे ४४ प्रतिनिधींची निवड झाली. यामध्ये मुंबईचे श्री. शं. नवरे, एस. ए. डांगे व त्र्यं. वि. पर्वते ही मंडळी होती. १३ व १४ एप्रिल १९४७ रोजी जळगावला परिषद प्रतिनिधींचे संकल्पित अधिवेशन भरले. या अधिवेशनात परिषदेची कार्यकारिणी निश्चित केली. शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे कार्य जोमाने सुरू झाले. ग. त्र्य. माडखोलकर, केशवराव जेधे, द. वा. पोतदार, श्री. शं. नवरे, दा. वि. गोखले, वसंतराव नाईक, सौ. प्रतिमा ओक, पूनमचंद रांका इत्यादींनी मोठ्या शक्तीने संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाचे नेतृत्व केले. या परिषदेत १९५५ पर्यंत लढा महाराष्ट्रात चालू होता.

दार कमिशन (१९४७)

घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनाही भाषावार प्रांतरचनेबद्दल सहानुभूती होती. म्हणून त्यांनी दार कमिशन नेमले. १७ जून १९४७ मध्ये न्यायाधीश एस. के. दार यांच्या अध्यक्षतेखाली 'दार कमिशन'ची स्थापना झाली. भाषावार प्रांतरचना करावी की नाही ? भाषावार प्रांतरचना करताना कोणते व कसे प्रांत बनवावेत याबाबत चौकशी करून आपला अहवाल सादर करावा. १६ व १७ ऑक्टोबर १९४८ असे दोन दिवस परिषदेने दादर येथे अधिवेशन घेतले. त्या विराट सभेत ठराव संमत केला की, 'मराठी भाषिकांचा संयुक्त महाराष्ट्र' असा

सलग प्रांत बनवावा आणि ताबडतोब अमलात आणवा. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व्हावा, अशी ठाम मागणी केली. १० डिसेंबर १९४८ रोजी दार कमिशनचा अहवाल प्रसिद्ध झाला. या अहवालात कमिशनने म्हटले की, 'भाषिक राज्ये निर्माण करण्याची योग्य वेळ अद्याप आलेली नाही. भाषावार प्रांतरचनाही भारताच्या ऐक्यास व एकात्मतेस मारक ठरेल'. दार कमिशनच्या अहवालावर तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. महाराष्ट्रात मोठा प्रक्षोभ निर्माण झाला.

अकोला करार (८ ऑगस्ट, १९४७)

दार कमिशनपुढे मराठी भाषिक प्रांतरचनेची मागणी एकमुखाने स्पष्ट व अचूकपणाने मांडण्यासाठी निवडक कार्यकर्त्यांची अकोला येथे बैठक झाली. या मध्ये शंकरराव देव, मा. सां. कन्नमवार, रामराव देशमुख, धनंजयराव गाडगीळ, पूनमचंद रांका, द. वा. पोतदार, ग. त्र्य. माडखोलकर, प्रमिला ओक, दा. वि. गोखले, पंढरीनाथ पाटील व प. गां. देशमुख इत्यादी मान्यवरांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. विदर्भातील नेत्यांच्या मनात महाराष्ट्र एकीकरणाबाबत विश्वास निर्माण व्हावा. त्यासाठी ८ ऑगस्ट, १९४७ रोजी अकोला करार संमत झाला.

अकोला करारातील कलमे –

१. संयुक्त महाराष्ट्र म्हणून एक प्रांत करून त्यामध्ये मध्यप्रांत वऱ्हाडमधील मराठी भाषा बोलणाऱ्या प्रदेशाचा व दुसरा महाराष्ट्राचा असे उपप्रांत ठेवावेत.

२. प्रत्येक उपप्रांताला स्वतंत्र कायदेमंडळ व मंत्रिमंडळ असावे. त्यांच्याकडे आवश्यक खाती ठेवण्यात यावीत.

३. सर्व प्रांतासाठी एक गव्हर्नर व एक डेप्युटी गव्हर्नर असावा. त्यांची निवडणूक संबंधीत प्रांतातून घ्यावी.

४. कायदेमंडळात लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधी असावेत.

५. उपप्रांताच्या निवडणुका स्वतंत्रपणे घ्याव्यात.

६. उपप्रांतासाठी उच्च न्यायालये स्वतंत्र असावीत.

७. विशिष्ट बाबीसाठी संपूर्ण प्रांताचे खास न्यायालय असावे.

७. प्रांतासाठी एक पब्लिक सर्व्हिस कमिशन असावे.

अकोला बैठकीत वरील ठरावाप्रमाणेच असे ठरले की, संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती करणे अशक्य झाल्यास महाविदर्भ हा स्वतंत्र प्रांत निर्माण करण्याचे प्रयत्न करावेत.

जे. व्ही. पी. समिती (२९ डिसेंबर, १९४८)

जयपूर येथे २९ डिसेंबर १९४८ रोजी राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन भरले. या अधिवेशनात दार कमिशनचा अहवाल नाकारण्यात आला. नव्या समस्या लक्षात घेऊन शिफारशी करण्यासाठी पं. जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल व पट्टभिसिताराम यांची समिती नेमण्यात आली. या समितीने तीन महिने अभ्यास करून

५ एप्रिल १९४९ रोजी आपला अहवाल प्रसिद्ध केला. यामध्ये या समितीने पुढील शिफारशी केल्या. (१) भाषावार प्रांतरचना काँग्रेसला तत्त्वतः मान्य पण ही योग्य वेळ नाही. (२) मराठी भाषिकांचा महाराष्ट्र यथावकाश बनेल पण त्यात मुंबईचा समावेश नसेल. (३) केवळ वऱ्हाडचा वेगळा प्रांत होणार नाही.

या शिफारशी निर्णयात्मक व स्पष्ट नव्हत्या. शिफारशीमध्ये मुंबई महाराष्ट्रात नसेल हे स्पष्टपणे नमूद केले होते. या अहवालाविरुद्ध महाराष्ट्रभर फार तीव्र प्रतिक्रिया उभारल्या.

नोव्हेंबर १९४९ रोजी आचार्य प्र. के. अत्रे व भंडारी यांनी मुंबई महापालिकेत 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा' ठराव मांडला. तो ५० विरुद्ध ३५ मतानी मंजूर झाला. १९५२ च्या अखेरीस आंध्र राज्याची निर्मिती झाली. त्यामुळे मराठी भाषिकांनाही आशा वाटू लागली. सप्टेंबर १९५३ मध्ये यशवंतराव मोहिते यांनी मुंबई विधानसभेपुढे संयुक्त महाराष्ट्राचा ठराव मांडला. परंतु मोरारजी देसाई यांनी या ठरावाला विरोध केला व यशवंतराव मोहिते यांचा प्रयत्न असफल झाला.

नागपूर करार (२८ सप्टेंबर १९५३)

अकोला करार रद्द करून त्याच्या ऐवजी संयुक्त महाराष्ट्रात येऊ पाहणाऱ्या विभागांना समान दर्जा देणारा करार निर्माण करण्याची गरज संयुक्त महाराष्ट्रवादी नेत्यांना वाटत होती. या काळात भाऊसाहेब हिरे यांनी महाविदर्भवादी मराठवाडा व संयुक्त महाराष्ट्रवादी नेत्यांशी सतत संपर्क ठेवून २६ डिसेंबर १९५३ रोजी तीन विभागातील नेत्यांची नागपूर येथे दोन वेळा चर्चा करून २८ सप्टेंबर १९५३ रोजी नागपूर करार अस्तित्वात आला. त्याच्या तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत –

१. मराठी भाषिक मुलूखाच्या निरनिराळ्या विभागात राहणाऱ्या आम्ही लोकांनी एक राज्य व्हावे यासाठी खालील निर्णय घेतले आहेत.

२. मुंबई, मध्यप्रदेश व हैद्राबाद राज्यातील सर्व सलग मराठी भाषीक प्रदेशाचे हे राज्य बनावे. मुंबई त्याची राजधानी असेल.

३. शासन व विकास कार्यासाठी या राज्याचे महाविदर्भ व मराठवाडा उर्वरीत भाग असे तीन घटक असतील.

४. प्रत्येक घटकावरील खर्च लोकसंख्येच्या प्रमाणात होईल. अविकसित मराठवाड्याकडे विशेष लक्ष दिले जाईल व त्याचा वार्षिक अहवाल असेल.

५. लोकसंख्येनुसार प्रत्येक घटकाला शासनात स्थान असेल.

६. सर्व प्रकारच्या शिक्षण व्यवस्थेत लोकसंख्येच्या प्रमाणात सवलती दिल्या जातील.

७. उच्च न्यायालयाचे मुख्य केंद्र मुंबई असेल दुसरे स्थान नागपूर असेल. नोकरवर्गात विदर्भ मराठवाड्याला योग्य प्रतिनिधीत्व असेल.

८. सरकारी नोकर भरतीत लोकसंख्येच्या प्रमाणात स्थान असेल.

९. विकेंद्रीकरणावर भर राहील.

१०. नागपूरला दरवर्षी विधानसभेचे किमान १ अधिवेशन होईल.

११. सर्व सलग मराठी प्रदेश नव्या राज्यात समाविष्ट होण्यासाठी खेडे हा घटक मानला जाई.

नागपूर करारावर तीन विभागातील खालील नेत्यांनी सह्या केल्या.

१. पश्चिम महाराष्ट्र : भाऊसाहेब हिरे, यशवंतराव चव्हाण, नाना कुंटे व देवकीनंदन नारायण

२. **महाविदर्भ** : रामराव देशमुख, गोपाळराव खेडकर, रा. कृ. पाटील, शेषराव वानखेडे, पंजाबराव देशमुख

३. **मराठवाडा** : देवासिंग चौहान, लक्ष्मणराव भाटकर आणि सौ. प्रभावतीदेवी जकातदार.

या कराराच्या चर्चेसाठी धनंजयराव गाडगीळ, द. वा. पोतदार व दा. वि. गोखले यांचा सहभाग होता. परंतु त्यांच्या सह्या घेतल्या नाहीत. या नागपूर करारानुसार विदर्भ, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र या ३ विभागांना सर्व दृष्टीने समान न्याय, विकासाची समान संधी व मागासलेल्यांसाठी विशेष सवलत दिली जाईल अशी हमी देण्यात आली. या करारामुळे महाराष्ट्र राज्य निर्माण होण्यास मदत झाली.

या नागपूर कराराला मुंबई काँग्रेसचे नेते स. का. पाटील यांनी विरोध केला. पुढे पंडित जवाहरलाल नेहरू यांनी लोकसभेत 'फाजलअली कशिमनची' १९५३ रोजी घोषणा केली. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्र परिषदेला चालना मिळत गेली.

संयुक्त महाराष्ट्र मागणीसाठी विविध निवेदने फाजलअली कमिशनला सादर केली. या समितीने अभ्यास करून २६७ पानांचा आपला अहवाल १० ऑक्टोबर १९५५ रोजी शासनाला सादर केला. हा अहवाल म्हणजे मराठी भाषिकांवरील वज्राघात ठरला. जनतेचा अपेक्षाभंग ठरला. जनतेत महाराष्ट्रभर संतापाचा उद्रेक झाला.

त्रिराज्याचा प्रस्ताव

मराठी लोकांचा हा तीव्र विरोध पाहून काँग्रेस वर्किंग कमिटीने ८ नोव्हेंबर १९५५ रोजी नवीन असा त्रिराज्याचा ठराव पास केला.

(अ) संपूर्ण गुजराथी भाषिकांचे राज्य असावे.

(ब) मुंबई शहर व उपनगरे यांचे १६० चौ. किमी. विस्ताराचे स्वतंत्र राज्य असावे.

(क) मराठवाड्यात महाराष्ट्र राज्य असावे.

महाराष्ट्र जनतेने काँग्रेसचा हा ठराव साफ नाकारला. त्याच्या विरोधात १४ नोव्हेंबर रोजी कृती समितीची स्थापना केली. महाराष्ट्र काँग्रेसने आपले प्रांतिक धोरण घोषित केले. त्या अगोदर पुणे येथे १७ नोव्हेंबर १९५५ रोजी महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसची सभा झाली. त्यामध्ये १४ तास चर्चा झाली आणि निर्णय घेण्यात आला.

१. राज्य पुनर्रचना समितीने लहान द्विभाषिक बदलून त्यात वऱ्हाड व मराठवाडा समाविष्ट करावा.

२. तीन राज्ये केल्यास मुंबईचे स्वतंत्र राज्य राष्ट्र-हिताचे होणार नाही.

या त्रिराज्याच्या प्रस्तावानंतर संपूर्ण महाराष्ट्र संयुक्त महाराष्ट्र चळवळीने मोठे उग्र आंदोलन सुरू केले. त्यामध्ये शेतकरी, कामगार, कष्टकरी अनेक राजकीय पक्ष व त्यांचे नेते यांनी मोठा सहभाग घेऊन आंदोलनाची धार अत्यंत तीव्र केली. यामध्ये साहित्यकांचे हे योगदान खूप मोठे होते. त्यामध्ये शाहीर अमर शेख व अण्णाभाऊ साठे यांचा सहभाग होता. त्यामुळे खऱ्या अर्थाने आंदोलनास सुरुवात झाली.

स्वयं अध्ययन प्रश्न २

(अ) योग्य पर्याय निवडा.

१. ..... यांच्या अध्यक्षतेखाली 'संयुक्त महाराष्ट्र सभा' ही संघटना स्थापन केली.
(अ) रामराव देशमुख (ब) द. वा. पोतदार (क) शंकरराव मोरे (ड) नाना पाटील

२. श्री. शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली २८ जुलै, १९४६ रोजी ..... येथे महाराष्ट्र एकीकरण परिषद भरली.
(अ) पुणे (ब) नागपूर (क) अकोला (ड) मुंबई

३. नागपूर करार ..... रोजी अस्तित्वात आला.
(अ) २८ सप्टेंबर १९५३ (ब) २८ सप्टेंबर १९५४
(क) २८ सप्टेंबर १९५५ (ड) २८ सप्टेंबर १९५६

४. अकोला करार ..... साली झाला.
(अ) १९४७ (ब) १९४८ (क) १९४९ (ड) १९५०

५. फाजलअली कमिशनची घोषणा ..... यांनी केली.
(अ) यशवंतराव चव्हाण (ब) पंडित नेहरू
(क) प्र. के. अत्रे (ड) शंकरराव मोरे

(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.

१. 'ऋणानुबंध' हा ग्रंथ कोणी लिहिला ?

२. महात्मा गांधीजींशी संयुक्त महाराष्ट्राविषयी पत्रव्यवहार कोणी केला ?

३. दार कमिशन केंव्हा नेमले ?

४. जे. व्ही. पी. समितीची स्थापना केंव्हा झाली ?

५. नागपूर कराराला कोणत्या काँग्रेस नेत्यांनी विरोध केला ?

१.२.३ चळवळीतील कार्यकर्त्यांचे योगदान (Contribution of the Activists)

संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या शेवटच्या टप्प्यात आंदोलने, सभा व मोर्चे सुरू झाले. तरीही भारत सरकारने या चळवळीकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. या चळवळीला मोरारजी देसाई, स. का. पाटील यांनी प्रथमपासून विरोध केल्याचे दिसून येतो, परंतु जनतेच्या रेट्याने हे आंदोलन यशस्वी करण्यात आले.

जन आंदोलन

काँग्रेस वर्कींग कमिटीने त्रिराज्य योजना मांडली. याला संपूर्ण महाराष्ट्रातून तीव्र विरोध सुरू झाला. १८ नोव्हेंबर १९५५ रोजी मुख्यमंत्री मोरारजी देसाई त्रिराज्य योजना मंजुरीसाठी विधानसभेत मांडणार होते. त्या विरोधात सेनापती बापट यांनी प्रचंड मोठा मोर्चा विधानसभेवर काढला. त्याच दिवशी सायंकाळी कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांनी ५०,००० हजार लोकांची सभा मुंबईत कामगार मैदानात घेतली व त्रिराज्य कल्पना फेटाळली व २१ नोव्हेंबर १९५५ रोजी मोरारजी देसाई व स. का. पाटील यांनी मुंबईच्या चौपाटीवर सभा घेतली व त्यावेळी लोकांनी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे अशा घोषणा दिल्या. परंतु मोरारजी देसाई यांनी 'हिंसक मार्गांचा वापर केल्यास मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही असे सांगितले. स. का. पाटील यांनी 'आकाशात चंद्र तारे आहेत तोपर्यंत मुंबई महाराष्ट्रालाही मिळणार नाही' अशी घोषणा केली. परिणामी चप्पल, दगड, गोटे यांचा मारा करून त्यांची ही सभा लोकांनी उधळून लावली.

आंदोलनावर गोळीबार

२१ नोव्हेंबर १९५५ रोजी आंदोलकांनी कामगारांचा संप घडवून आणला. लोक ओव्हल मैदानावर जमू लागले. पोलीस बंदोबस्त कडक होता. मोरारजी देसाई सरकारने जमावबंदी आदेश मांडला. आदेशभंग केल्याबद्दल पोलिसांनी प्रथम लाठीमार केला. अश्रूधूर सोडला. नंतर जमावावर गोळीबार केला. त्यात १५ आंदोलक हुतात्मा झाले व सुमारे ३०० लोक जखमी झाले. ४०० पेक्षा जास्त लोकांना अटक झाली. तोपर्यंत विधानसभेतील कामकाज संपवून एस. एम. जोशी, नौशेर भरूचा व अमूल देसाई हे नेते दंगलीच्या ठिकाणी आले. त्यांनी लोकांना चौपाटीवर एकत्र केले. याचा निषेध म्हणून पा. वा. गाडगीळ यांनी विधान परिषद सदस्यत्वाचा राजीनामा दिला. इतर १०० काँग्रेस आमदारांनीही राजीनामे देण्याचे ठरविले. पण त्यामध्ये यशवंतराव चव्हाण, मालोजीराजे निंबाळकर व गणपतराव तपासे इत्यादींचा समावेश नव्हता. दुसऱ्या दिवशी त्रिराज्याचा प्रस्ताव मंजूर न होताच विधानसभा तहकूब झाली. राज्यभर आंदोलनाचा प्रसार झाला.

पंडित नेहरूंचा प्रस्ताव (१६ जानेवारी. १९५६)

त्रिराज्याचा ठराव बारगळल्या नंतर राज्यात तीव्र संघर्ष सुरू झाला. त्यात पंडित नेहरूनी १६ जानेवारी १९५६ रोजी राज्य पुनर्रचनेसंबंधीचा भारत सरकारचा निर्णय आकाशवाणीवरून सर्वांना ऐकविण्यात आला. पंडित नेहरूंनी राज्य पुनर्रचनेसंबंधी निर्णय घोषीत केला. हा निर्णय पुढीलप्रमाणे आहे.

१. मुंबई केंद्रशासित असेल.

२. विदर्भासह संपूर्ण मराठी भाषीक महाराष्ट्र राज्य असेल.

३. वेगळे गुजराथ राज्य.

या निर्णयामुळे जनतेत प्रक्षोभ वाडला. लोक रस्त्यावर उतरले. मोरारजी सरकारने जनतेवर पुन्हा गोळीबार केला. मुंबईत ठाकूरद्वार येथे दोन हजाराच्या जमावावर गोळीबार करण्यात आला. त्यात १० लोक मारले गेले. पुढील चार दिवस पोलीस लोकांवर लाठीहल्ला व गोळीबार करत होते. त्यात ६७ लोक ठार झाले. १७ जानेवारीस बेळगावात गोळीबार झाला. त्यात ५ लोक ठार झाले. नागपूर, कोल्हापूर व इतर भागातही आंदोलकांवर गोळीबार करण्यात आला. कोल्हापुरात शंकरराव मोरस्करांचा बळी गेला. एकूण १०६ लोक हुतात्मे झाले. अशा परिस्थितीत पुण्यात सर्व विरोधी पक्षांतर्फे संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना करण्यात आली. तिचे अध्यक्षपद केशवराव जेधे यांना देण्यात आले. यावेळी शंकरराव देवांनी संयुक्त महाराष्ट्र परिषद बरखास्त केला. श्रीपाद डांगे, एस. एम. जोशी, दत्ता देशमुख, माधवराव बागल, प्रबोधनकार के. सी. ठाकरे, दाजीबा देसाई, बा. र. सुखठणकर, भगवान सुर्यवंशी, प्र. के. अत्रे, यशवंतराव मोहिते, लालजी पेंडसे, अहिल्या रांगणेकर इत्यादी शेकडो लोकांनी महाराष्ट्रभर व दिल्लीत यासाठी जनजागृती केली. चळवळीच्या प्रचाराचे कार्य प्रबोधन, मराठा, नवा काळ, सकाळ, नवयुग, प्रभात व इतर अनेक वृत्तपत्रांनी प्रामाणिकपणे केले. ''मुंबई, विदर्भ, मराठवाडा, बेळगाव, कारवार, निपाणीसह महाराष्ट्र निर्माण झाला पाहिजे' अशा समितीने घोषणा दिली. महाराष्ट्रात आंदोलने तीव्र झाली. १२ हजार आंदोलकांना अनेक ठिकाणी पकडण्यात आले. २७ जुलै, १९५६ रोजी समितीने दिल्ली येथे मोठा मोर्चा काढला. भाई डांगे, नाथ पै, डॉ. भूपेश गुप्ता यांनी संसदेत प्रभावीपणे बाजू मांडली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका

भाषावार प्रांतरचना करावयाचा निर्णय झाल्यास संयुक्त महाराष्ट्रात उपप्रांत निर्माण न करता एक भाषा एकच प्रांत करावा असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे म्हणणे होते. मुंबई शहर हा महाराष्ट्राचा अविभाज्य भाग असल्यामुळे त्याचा समावेश संयुक्त महाराष्ट्रात केला जावा असा त्यांचा आग्रह होता. स्वातंत्र्योत्तर काळात १९४८ साली नेमण्यात आलेल्या दार आयोगाला डॉ. आंबेडकर यांनी जे निवेदन सादर केले होते त्यामध्ये त्यांची भूमिका स्पष्ट होते.

संयुक्त महाराष्ट्र आंदोलनातील स्त्रियांचे योगदान

१० ऑक्टोबर १९५५ रोजी पुनर्रचना आयोगाने द्विभाषक विशाल मुंबई राज्याची घोषणा केली. त्याची तीव्र प्रतिक्रिया उमटली. मुंबईत कामगार आणि मध्यम वर्ग अन्यायाच्या जाणिवेने रस्त्यावर उतरला. मृणाल गोरे, तारा रेड्डी, अहिल्या रांगणेकर, प्रमिला दंडवते, सुधा काळदाते, अनुताई लिमये या स्त्री-नेत्या पुढे आल्या. सरकारच्या त्रिराज्य योजनेविरुद्ध १८ नोव्हेंबर, १९५५ रोजी निघालेल्या मोर्चात सेनापती बापट, आचार्य प्र. के. अत्रे, लालजी पेंडसे, मधु दंडवते इत्यादींना अटक करून भायखळा तुरुंगात नेले ही बातमी कळताच

लोकांमध्ये प्रचंड अस्वस्थता पसरली. यावेळी स्त्रियांचीही सत्याग्रही तुकडी आवेशाने पुढे आली. अनेकांना अटक झाली. त्यात तारा रेड्डी, प्रमोदिनी तायशेट्टे, सुनंदा देसाई, निर्मला कुलकर्णी इत्यादी होत्या. महाराष्ट्राच्या विविध भागांतून स्त्रिया आंदोलनात उतरल्या. कोल्हापुरात विमलाबाई बागल, बकुळाबाई खांडेकर आणि जयश्री साळुंखे, अंबुताई शिंदे, शकुंतला चौगुले, कमला तिवले, आशालता पाटील तसेच साताऱ्यात नाना पाटील यांच्या आई गोजराबाई आणि मुलगी हौसाबाई, हेमलता पाटील, कोंडाबाई, विठाबाई व हारूताई या सर्वांना अटक करून पोलिसांनी रात्री गावाच्या बाहेर सोडून दिले. कराडमध्ये मंगलाबाई पवार व सुपते गावातून १०० बैलगाड्यातून ५००-६०० स्त्रियांनी मोर्चा काढला. यावेळी अंजली पाटील. प्रेमलाकाकी चव्हाण, शालन पाटील यांची भाषणे झाली. दिल्लीत सत्याग्रहात २५० स्त्रिया होत्या. या शिवाय अन्नपूर्णा भांडारकर, माई एरंडे, पार्वतीबाई वैद्य, कमल डोके, शांता रानडे, कमल भागवत, अंबुताई टिळेकर अशा अनेक लढाऊ स्त्रियांचे योगदान होते.

द्विभाषिक राज्यनिर्मिती

काँग्रेस व्यतिरिक्त अन्य सर्व पक्षाच्या नेत्यांनी व जनतेने संयुक्त महाराष्ट्र चळवळ अखंडितपणे सुरू ठेवली होती. या सर्व पार्श्वभूमीवर केंद्रातील नेत्यांनी विशाल द्विभाषिक राज्य निर्माण करण्याचे ठरविले. पं. नेहरूंनी मोरारजी देसाईनाही द्विभाषिकासाठी राजी केले. शंकरराव देवानी यापूर्वीच या योजनेला मान्यता दिली होती. काकासाहेब गाडगीळ, देवगिरीकर आणि यशवंतराव चव्हाण यांचा विशाल द्विभाषिक राज्याला विरोध होता. परंतु काँग्रेस श्रेष्ठी व पक्षशिस्त या नावाखाली त्यांना गप्प बसावे लागले. शेवटी ५ ऑगस्ट १९५६ रोजी दिल्लीत भरलेल्या काँग्रेस कार्यकारिणीत विशाल द्विभाषिक मुंबई राज्याचा प्रस्ताव संमत झाला व १ नोव्हेंबर १९५६ रोजी गुजरातसह विशाल द्विभाषिक मुंबई राज्य अस्तित्वात आले. या राज्याचे मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांची निवड झाली.

विशाल द्विभाषिक मुंबई राज्याची घोषणा होताच त्याविरुद्ध मोर्चे काढणे व सत्याग्रह करण्या ऐवजी १९५७ मध्ये होणाऱ्या निवडणुकीत जनतेचा कौल घ्यावा असा निर्णय संयुक्त महाराष्ट्र समितीच्या नेत्यांनी घेतला व ते निवडणुकीच्या तयारीला लागले. समितीच्या वतीने प्रचाराचे काम आचार्य प्र. के. अत्रे, एस.एम. जोशी व कॉ. एस. ए. डांगे इत्यादीनी केले. या निवडणुकीत पश्चिम महाराष्ट्रात समितीला फार मोठे यश मिळाले. मुंबईसह महाराष्ट्रात काँग्रेसला १३६ जागा मिळाल्या व समितीला १२८ जागा मिळाल्या. गुजरातमध्ये मात्र काँग्रेसला चांगले बहुमत मिळाले. महागुजराथ परिषदेला १३२ पैकी फक्त ३३ जागा मिळाल्या. त्यामुळे काँग्रेसने द्विभाषिक मुंबई राज्यात एकूण २३५ जागा मिळवून निर्विवाद बहुमत मिळविले. १२ एप्रिल १९५७ ला यशवंतराव चव्हाण दुसऱ्यांदा द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले.

प्रतापगडावर मोर्चा (३० नोव्हेंबर १९५७)

प्रतापगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंच्या हस्ते ३० नोव्हेंबर १९५७ रोजी झाले. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी मुद्दाम नेहरूंना त्यासाठी

आणण्याचे नियोजन केले. महाराष्ट्रातील परिस्थिती त्यांना समजावी तसेच १९५७ च्या निवडणुकीत काँग्रेसला आलेल्या अपयशातून पक्षाला सावरणे असे त्यांचे उद्देश होते. त्यावेळी नेहरूंच्या समोर मराठी भाषिकांच्या मागणीचे दर्शन घडविणे उग्र निदर्शने करण्याचे समितीने ठरविले. त्यासाठी पूर्व नियोजन करून माधवराव बागल यांच्या नेतृत्वाखाली प्रतापगडावर प्रचंड मोठा मोर्चा काढला. पसरणी घाट व पोलादपूर जवळ समितीने तीव्र निदर्शने केली. नेहरूंना मराठी भाषिकांच्या भावनांनी आणि एकूण परिस्थितीची जाणीव करून देण्यात समिती यशस्वी झाली. त्या नंतरही समितीने आपले आंदोलन चालू ठेवले.

२३ ऑगस्ट १९५८ रोजी औरंगाबाद येथे द्विभाषिकाचा फेरविचार करण्याचे समितीने मान्य केले. ऑक्टोबरमध्ये यशवंतराव चव्हाण यांनी पक्षश्रेष्ठी बरोबर हैद्राबाद येथे चर्चा केली. १ नोव्हेंबर १९५८ रोजी माधवराव बागलांच्या नेतृत्वाखाली मोठा मोर्चा संसदेवर काढला. १९ डिसेंबरला दुसरा मोठा मोर्चा काढला. १८ जानेवारी १९५९ पासून सीमा लढा समितीने 'करबंदी' चळवळ सुरू केली. नोव्हेंबर १९५९ मध्ये मोरारजी विरुद्ध आदिवासींचा मोर्चा काढला.

संयुक्त महाराष्ट्र राज्याची निर्मिती (१ मे १९६०)

६ सप्टेंबर १९५९ रोजी काँग्रेस वर्कींग कमिटीची बैठक झाली. त्या बैठकीत द्विभाषिक मुंबई राज्याच्या प्रश्नावर विचार झाला. वर्किंग कमिटीने तत्कालीन काँग्रेस अध्यक्ष श्रीमती इंदिरा गांधीनी काँग्रेस वर्कींग कमिटीच्या ५ सदस्यांशी विचारविनिमय करून २९ सप्टेंबर पर्यंत अहवाल द्यावा असा अधिकार त्यांना देण्यात आला होता. यशवंतराव चव्हाण यांनी द्विभाषिक मुंबई राज्याच्या विभाजनाची आवश्यकता त्यांना सांगितली. त्यानंतर श्रीमती इंदिरा गांधीनी चंदिगढ येथील काँग्रेस अधिवेशनात द्विभाषिक मुंबई राज्याचा प्रश्न उपस्थित केला. चर्चे नंतर महाराष्ट्राचा हा प्रश्न सोडविण्यासाठी काँग्रेस वर्किंग कमिटीच्या ९ सदस्यांची समिती नेमली. या समितीने अभ्यास दौरे करून जानेवारी १९६० मध्ये द्विभाषिक मुंबईसह महाराष्ट्र व गुजरात अशा दोन स्वतंत्र राज्याची शिफारस केली. पुढील काळात राज्याच्या सीमारेषा आखणे व वित्तीय प्रश्न सोडविणे याबाबत चर्चा झाली. वादविवाद ही झाले. परंतु मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र होत असल्याने महाराष्ट्रातील नेत्यांनी सामोपचाराची भूमिका घेतली. त्यामुळे डांगचा काहीभाग गुजराथला द्यावा लागला. केंद्राने राज्यपुनर्रचनेसाठी आर्थिक मदत म्हणून महाराष्ट्र व गुजराथला प्रत्येकी ५० कोटी रुपये द्यावेत व गुजरातने आपली राजधानी कोठे करावी ते ठरवावे. हा सर्व तोडगा एप्रिल १९६० रोजी भारतीय संसदेत मांडण्यात आला. संसदेने द्विभाषिक मुंबई राज्याचे विभाजन करून शिक्कामोर्तब केले व महाराष्ट्र व गुजरात अशी राज्ये अस्तित्वात आली. १ मे १९६० रोजी नवे महाराष्ट्र राज्य निर्माण झाले.

महाराष्ट्र राज्याची रचना

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. त्यावेळी ४ प्रमुख भाग व २६ जिल्हे महाराष्ट्रात समाविष्ट केले. त्यांची विभागणी पुढीलप्रमाणे आहे :

१. मुंबई विभाग : बृहन्मुंबई, ठाणे, कुलाबा, रत्नागिरी, नाशिक, धुळे, जळगांव

२. पुणे विभाग : पुणे, अहमदनगर, सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर

३. नागपूर विभाग : नागपूर, वर्धा, चंद्रपूर, भंडारा, यवतमाळ, अमरावती, बुलढाणा, अकोला.

४. औरंगाबाद विभाग : औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, उस्मानाबाद.

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाला असला तरीही बेळगांव, कारवार, निपाणी, भालकी व डांगचा समावेश महाराष्ट्रात झाला नाही. त्यामुळे सीमा भागातील लोक नाराज होते. तो सीमा लढा आजही चालू आहे.

२७ एप्रिल १९६० पासून संयुक्त महाराष्ट्र राज्यनिर्मितीचा सोहळा सुरू झाला होता. मुंबईच्या शिवाजी पार्कवर पंडित नेहरूंच्या हस्ते १ मे १९६० रोजी (कामगार दिनी) महाराष्ट्र राज्याची घोषणा केली. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी जनतेला 'देशावर प्रेम करावे आणि स्वराज्य आपला मंत्र मानावे' असा संदेश दिला. १५ वर्षांच्या प्रदीर्घ चळवळीनंतर मराठी माणसाचे स्वप्न पूर्ण झाले. महाराष्ट्रात २६ जिल्हे व २२९ तालुके समाविष्ट करण्यात आले. महाराष्ट्रात पहिले मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांनी जबाबदारी स्वीकारली व खऱ्या अर्थाने मुंबईसह महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली.

स्वयं अध्ययन प्रश्न ३

(अ) योग्य पर्याय निवडा.

१. संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना ..... साली झाली.
   (अ) १९५६ (ब) १९५७ (क) १९५८ (ड) १९५९

२. द्विभाषिक राज्याची निर्मिती ..... रोजी झाली.
   (अ) १ नोव्हेंबर १९५५ (ब) १ नोव्हेंबर १९५६
   (क) १ नोव्हेंबर १९५७ (ड) १ नोव्हेंबर १९५८

३. १९५७ रोजी महाराष्ट्रात झालेल्या निवडणूकीत संयुक्त महाराष्ट्र समितीला..... जागा मिळाल्या होत्या.
   (अ) १२६ (ब) १२७ (क) १२८ (ड) १२९

४. द्विभाषिक मुंबई राज्याचे शेवटचे मुख्यमंत्री ..... होते.
   (अ) यशवंतराव चव्हाण (ब) मोरारजी देसाई (क) बाळासाहेब खेर (ड) वसंतदादा पाटील

५. प्रतापगडावर शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण ..... यांच्या हस्ते झाले.
   (अ) डॉ. राजेंद्र प्रसाद (ब) पंडित नेहरू (क) सरदार पटेल (ड) इंदिरा गांधी

(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.

१. त्रिराज्य योजनेविरुद्ध विधानसभेवर कोणाच्या नेतृत्वाखाली मोर्चा निघाला ?

२. मुंबईच्या चौपाटीवर २० नोव्हेंबर १९५५ रोजी कोणी सभा घेतली ?

३. प्रतापगडावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण केंव्हा झाले ?

४. संयुक्त महाराष्ट्र राज्याची निर्मिती केंव्हा झाली ?

५. संयुक्त महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री कोण होते ?

१.४ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

स्वयं अध्ययन प्रश्न–१

(अ) योग्य पर्याय निवडा.

१. १९४६	२. नागपूर	३. १९४६
४. १९४७	५. आंध्र	

(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.

१. नागपूर	२. एस. के. दार	३. १९४८
४. १९५३	५. १९४८	

स्वयं अध्ययन प्रश्न–२

(अ) योग्य पर्याय निवडा.

१. रामराव देशमुख	२. मुंबई	३. २८ सप्टेंबर १९५३
४. १९४७	५. पंडित नेहरू	

(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.

१. यशवंतराव चव्हाण	२. श्री. ग. त्र्य. माडखोलकर	३. १९४७
४. १९४८	५. स. का. पाटील	

स्वयं अध्ययन प्रश्न–३

(अ) योग्य पर्याय निवडा.

१. १९५६	२. १ नोव्हेंबर १९५६	३. १२८
४. यशवंतराव चव्हाण	५. पंडित नेहरू	

(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.

१. सेनापती वसंत बापट　　२. मोरारजी देसाई व स. का. पाटील

३. ३० नोव्हेंबर १९५७　　४. १ मे १९६०　　५. यशवंतराव चव्हाण

१.५ सारांश

स्वातंत्र्यपूर्व काळात काँग्रेसने या देशात भाषेच्या आधारावर प्रांत रचना असावी अशी भूमिका घेतलेली दिसते. जनतेची तशा प्रकारची मागणी होती. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मात्र काँग्रेसने भाषावार प्रांत रचनेस विरोध केला. स्वातंत्र्योत्तर काळात देशापुढे इतर अनेक समस्या असल्याने राज्य पुनर्रचनेचा प्रश्न पुढे ढकललेला दिसतो. त्यामुळे भाषावार प्रांतरचनेसाठी महाराष्ट्र व आंध्र प्रदेश इत्यादी राज्यात चळवळी सुरू झालेल्या दिसून येतात. मराठी भाषा बोलणाऱ्यांचे एक वेगळे महाराष्ट्र असावे असे सर्व मराठी जनतेला वाटत होते. त्या मागणीला केंद्र सत्तेने डावल्यानंतर महाराष्ट्रात मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे या मागणीसाठी उग्र आंदोलन झाले.

ती संयुक्त महाराष्ट्र चळवळ या नावाने ओळखली जाते. या चळवळीत कामगार, कष्टकरी, शेतकरी, साहित्यिक व राजकीय पुढारी यांचा ही समावेश मोठा होता. या चळवळीच्या काळात दार कमिशन, जे. व्ही. पी. समिती, राज्य पुनर्रचनेचा आयोग (फाजल अली कमिशन) नेमला गेला. पुढे पं. नेहरूंना छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतापगडावरील पुतळ्याच्या अनावरणास बोलावून मराठी भाषेबाबतची भावना उग्र कशी आहे त्यांना दाखविण्यात आले. तसेच १९५७ च्या निवडणुकीत काँग्रेसला महाराष्ट्रात अपयश आले म्हणून नेहरू मुंबईस संयुक्त महाराष्ट्र निर्मितीस पाठिंबा दिला. या आंदोलनात १०६ लोक हुतात्मे झालेले दिसून येतात. शंकरराव देव, केशवराव जेधे, एस. एस. जोशी, कॉ. एस. ए. डांगे, आचार्य प्र. के. अत्रे, माधवराव बागल, सेनापती बापट, यशवंतराव मोहिते इत्यादी शेकडो नेत्यांनी या आंदोलनात सहभाग घेतला व शेवटी १ मे १९६० रोजी मुंबईसह महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. या महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण होते.

१.६ सरावासाठी स्वाध्याय

(अ) खालील प्रश्नांची उत्तरे सविस्तर द्या.

१. भाषावार प्रांतरचनेच्या आंदोलनाविषयी माहिती द्या.

२. संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा सविस्तर आढावा घ्या.

३. संयुक्त महाराष्ट्र समितीचे कार्य सांगा.

४. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील स्त्रियांच्या सहभागाविषयी माहिती द्या.

(ब) टिपा लिहा.

१. संयुक्त महाराष्ट्र परिषद १९४६

२. दार आयोग

३. जे. व्ही. पी. समिती

४. नागपूर

५. अकोला करार

६. द्विभाषिक मुंबई राज्य

७. यशवंतराव चव्हाण

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, (१८१८ ते १८६०) प्रा. के. जी. गव्हाणे व डॉ. एस. पी. शिंदे

२. महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास डॉ. एस. पी. शिंदे व डॉ. किशोर गव्हाणे

३. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास – डॉ. बी. एन. सरदेसाई

४. भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास – डॉ. किशोर गव्हाणे, डॉ. एस. पी. शिंदे

५. १९ व्या शतकातील महाराष्ट्र – खंड १ ते ३ – य. दि. फडके

६. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास – गाठाळ एस. एस.

७. महाराष्ट्रातील समाज-सुधारणेचा इतिहास – भिडे व एन. डी. पाटील

८. आधुनिक महाराष्ट्र – दूरशिक्षण विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २०१५.

९. लोकराज्य – मार्च, २००२.

१०. महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास – डॉ. विकास कदम-डॉ. एस. पी. शिंदे.

११. आधुनिक भारताचा इतिहास – डॉ. विकास कदम-डॉ. एस. पी. शिंदे.

❋❋❋

घटक – २

आर्थिक विकास

(xxxx)

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ कृषी आणि सहकार चळवळ

२.२.२ औद्योगिक विकास

२.२.३ व्यापार आणि वाणिज्य

२.३ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे

२.४ सारांश

२.५ सरावासाठी स्वाध्याय

२.६ संदर्भग्रंथ

२.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास

* महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर कृषी क्षेत्रात झालेले बदल व सहकार चळवळीचा कसा विकास होत गेला याचा अभ्यास करता येईल.

* सन १९६० ते २००० या काळात महाराष्ट्रात घडून आलेल्या औद्योगिक विकासाची माहिती घेणे.

* महाराष्ट्र राज्याच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिलेल्या व्यक्तींच्या कार्याचा अभ्यास करता येईल.

* महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर महाराष्ट्राच्या व्यापार आणि वाणिज्य क्षेत्रातील स्थितीचा अभ्यास करता येईल.

२.१ प्रास्ताविक

महाराष्ट्राला प्राचीन ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. महाराष्ट्रात मौर्य, राष्ट्रकूट, शिलाहार, वाकाटक, सातवाहन, यादव, मुघल, निजाम इ. राज्यकर्त्यांनी राज्य केल्याचे दिसते. महाराष्ट्र ही जशी संतांची भूमी आहे तशी ती पराक्रमी योद्ध्यांचीही भूमी आहे. या पराक्रमी योद्ध्यांपैकी छत्रपती शिवाजी महाराजांनी १७ व्या शतकात स्वतंत्र अशा हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. परंतु सन १८१८ मध्ये अकार्यक्षम अशा दुसऱ्या बाजीराव पेशव्याचा पराभव इंग्रजांनी केला व महाराष्ट्रावर ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता निर्माण झाली. ब्रिटिशांच्या काळात महाराष्ट्रात 'बॉम्बे' राज्याचा एक भाग समजला जात होता. भारतीय स्वातंत्र्य चळवळीला यश येऊन शेवटी १५ ऑगस्ट १९१७ रोजी ब्रिटिशांच्या अंमलाखालून भारत स्वतंत्र झाला. भारताच्या या स्वातंत्र्य-चळवळीत अनेक स्वातंत्र्यसेनानी या महाराष्ट्राने दिले. स्वातंत्र्योत्तर काळात जनमताच्या आग्रहामुळे सन १९५३ पासून भारतात भाषेच्या आधारावर राज्यनिर्मितीस सुरुवात झाली. मे १९४६ मध्ये महाराष्ट्र व गुजरात या दोन्हींचे मिळून एक द्वैभाषिक राज्य निर्माण झाले. महाराष्ट्राला भाषेच्या आधारावरती स्वतंत्र राज्याचा दर्जा मिळावा यासाठी येथील जनतेला बराच संघर्ष करावा लागला. कारण तत्कालीन भारत सरकारचा यास विरोध होता. यातूनच संयुक्त महाराष्ट्र चळवळ उभी राहिली व या लढ्यातून शेवटी १ मे १९६० मध्ये महाराष्ट्राला स्वतंत्र राज्याचा दर्जा मिळाला. मराठी भाषिकांचे स्वतंत्र असे महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले तरी त्याला प्रगतीच्या दिशेने घेऊन जाणे सोपे काम नव्हते. महाराष्ट्राच्या सुदैवाने सुरुवातीच्या कालखंडात यशवंतराव चव्हाणांसारखे कार्यकुशल, प्रगल्भ व नेतृत्व महाराष्ट्रास लाभल्याने महाराष्ट्राला सर्वच क्षेत्रातील प्रगतीसाठी चांगला पाया निर्माण झाला. चव्हाणांनी शेती, उद्योग, साहित्य, नाट्य, संस्कृती या क्षेत्रांच्या विकासासाठी सर्जनशीलतेने संस्थात्मक निर्मिती केली. यशवंतरावांनंतर त्यांची ही परंपरा पुढे आलेल्यांपैकी काही मुख्यमंत्र्यांनीही काही प्रमाणात चालविली. त्यामध्ये प्रामुख्याने वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील, शरद पवार ही नावे मुख्यत्वे दिसतात. म्हणूनच आज भारतातील विकसित राज्यांपैकी महाराष्ट्र हे एक असून औद्योगिकदृष्ट्या ते देशात अग्रेसर राज्य म्हणून ओळखले जाते.

२.२ विषय विवेचन

२.२.१ कृषी आणि सहकार चळवळ

महाराष्ट्राचे भौगोलिक स्थान, क्षेत्रफळ व विभाग

महाराष्ट्र राज्याचे भौगोलिक क्षेत्रफळ ३०७७१३ चौ.कि.मी. असून पश्चिमेला ७२० कि.मी. लांबीचा खूप मोठा समुद्रकिनारा लाभलेला आहे. महाराष्ट्र राज्य ५.८° उत्तर ते २२.१° उत्तर या अक्षवृत्तात तर ७२.६° पूर्व ते ८०.९° पूर्व रेखावृत्तात स्थित आहे. भारताच्या द्विकल्पीय पठाराचा एक भाग समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्रातील पठारी प्रदेशाला 'दख्खनचे पठार' असे म्हटले जाते. महाराष्ट्राचा बराच प्रदेश गोदावरी, नर्मदा, कृष्णा, भीमा, वैनगंगा, इंद्रायणी, पूर्णा, मूळा, कोयना, पंचगंगा, प्रवरा, सिंदफणा, कुंडलिका, सूर्या, वैतरणा, पाताळगंगा, सावित्री, वसिष्ठी, पवना, धोड, कुकडी, सीना, नीरा, तेरेखोल यासह इतरही नद्यांनी समृद्ध केला आहे. (महाराष्ट्राचा नकाशा)

महाराष्ट्र राज्याच्या पूर्वेला छत्तीसगड, दक्षिणेला कर्नाटक, उत्तरेला मध्यप्रदेश, तर आग्नेय दिशेला आंध्र प्रदेश, नैर्ऋत्येला गोवा व वायव्येला गुजरात ही राज्ये आहेत. महाराष्ट्रात सध्या एकूण ३६ जिल्हे असून महसूलदृष्ट्या राज्याची विभागणी सहा (कोकण, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर) प्रभागामध्ये करण्यात आली आहे.

महाराष्ट्राची पीकरचना

महाराष्ट्र राज्य औद्योगिकदृष्ट्या पुढारलेले राज्य असले तरी शेतीवर अवलंबून असणाऱ्यांची संख्याही जास्त आहे. भौगोलिकदृष्ट्या महाराष्ट्रात वैविध्य आढळते. एखाद्या प्रदेशातील विविध पिकांच्या लागवडीखाली किती क्षेत्र आहे यावरून त्या प्रदेशातील पीकरचना लक्षात येते. पीक रचनेमुळे अन्नधान्यांखाली क्षेत्र व बिगर अन्नधान्यांखालील क्षेत्राची माहिती मिळते. पीकरचनेवरून वेगवेगळ्या पिकांचे धारण क्षेत्र कळून येण्यास मदत होते. पीकरचनेच्या अभ्यासावरून शासनास धोरणे ठरविता येतात. पीकरचनेवरून राज्यातील किंवा देशातील पिकांची टक्केवारी काढता येते. प्रत्येक प्रदेशातील सामा, आर्थिक व नैसर्गिक घटकांचा परिणाम पीकचनेवर होतो. खालील तक्त्यावरून आपणास महाराष्ट्रातील पीकरचनेची कल्पना येईल.

महाराष्ट्रातील पीक पद्धती

अ.क्र.	पीक/वर्ष	१९६०-६१	१९७१-७१	१९८०-८१	१९९०-९१	२०००-०१
१.	तांदूळ	१३००	१३५२	१४५९	१५९७	१५१२
२.	गहू	९०७	८१२	१०६३	८६७	७५४
३.	ज्वारी	६२८४	५७०३	६४६९	६३००	५०९४
४.	बाजरी	१६३५	२०३९	१५३४	१९४०	१८००
५.	सर्व तृणधान्ये	१०६०६	१०३२०	१००७६	१११३६	९८२४
६.	सर्व कडधान्ये	१८६८	१७१८	१७८०	२८२६	२५५९
७.	तेलबिया	११८६८	१७१८	१७८०	२८२६	२५५९
८.	कापूस	२५००	२७५०	२५५०	२७२१	३०७७
९.	ऊस	१०५	२०४	३१९	५३६	६८७

संदर्भ : कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

महाराष्ट्रातील शेतीच्या कमी उत्पादकतेची कारणे

महाराष्ट्रातील प्रमुख पिकांची दर हेक्टरी उत्पादकता इतर प्रगत देशांच्या तुलनेत बरीच कमी असल्याचे आढळते. महाराष्ट्रातील शेतीची उत्पादकता कमी असण्याचे एक महवाचे कारण म्हणजे महाराष्ट्रातील दारिद्र्य होय. याशिवाय खालील कारणांमुळे महाराष्ट्रातील कृषीची उत्पादकता कमी आढळते.

१. वार्षिक पर्जन्य : महाराष्ट्रात जून ते सप्टेंबर हा चार महिन्यांचा काावधी पावसाळ्याचा कालखंड मानला जातो. तोही नियमित पडत नाही. त्यामुळे शेतीत पेरलेले बियाणे वाया जाते. शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागते व आर्थिक नुकसान सोसावे लागते. पावसाच्या लहरीपणामुळे व जलसिंचनाच्या सुविधा नसलेल्या ठिकाणी व्यापारी व नगदी पिकांचे उत्पादन घेता येत नाही यामुळे कृषी उत्पादकतेवर प्रतिकूल परिणाम होतो.

२. लोकसंख्या वाढ : महाराष्ट्राची लोकसंख्या सतत वाढताना दिसत आहे. परंतु भूमी मात्र तेवढीच आहे. धारणा क्षेत्राचेही सतत विभाजन होत आहे. त्यामुळे मोठ्या धारण क्षेत्राचे फायदे कमी होत गेले. वाढत्या लोकसंख्येच्या गरजांची पूर्ती सिमित शेतीतून करणे अवघड होत आहे. लोकसंख्येच्या तुलनेत साधनसामग्री वाढत नसल्याने कृषी उत्पादकता कमी होत आहे.

३. कमी धारण क्षेत्र : महाराष्ट्राच्या वाढत्या लोकसंख्येमुळे राज्यात भूधारण क्षेत्राचा आकार सतत कमी होत आहे. त्यामुळे यंत्राधारीत शेती करता येत नाही. याचा परिणाम कृषी क्षेत्राच्या उत्पादकतेवर होत आहे.

४. नैसर्गिक संकटे : महाराष्ट्राच्या कृषी उत्पादकतेवर परिणाम करणारा महत्त्वपूर्ण घटक म्हणजे नैसर्गिक संकटे होय. कधी पिकांच्या प्रथामिक अवस्थेत किंवा अंतिम टप्प्यात शेतकऱ्यांना पूर, भूकंप, दुष्काळ, गारपीट यासारख्या नैसर्गिक संकटांचा सामना करावा लागतो. कधी हवामानाची अनुकूलता लाभलीच तर पिकांवर विविध प्रकारचे रोग, अळ्या, टोळधाडींमुळे पिकांचे फळधारणेच्या काळात अतोनात नुकसान होते. या सर्व संकटांमुळे कृषी क्षेत्राची उत्पादकता कमी होते.

५. जलसिंचनाच्या अपुऱ्या सुविधा : जलसिंगचनाच्या पुरेशा पिकांची लागवड करता येते. कोरडवाहू शेतीचे रूपांतर बागायती शेतीत करता येते व उत्पादनात वाढ करता येते. परंतु कृषीसाठी नेमक्या या जलसिंचनाच्या सुविधा अपुऱ्या असतील तर कृषी उत्पादन घटते.

६. अपुरा वित्तपुरवठा : महाराष्ट्रातील लोकांची उत्पन्न कमी असल्याने त्यांची गुंतवणूकही कमी दिसते. त्यामुळे महाराष्ट्रातील शेतकरी शेतीसाठी आवश्यक असणारी खते, अवजारे, बी-बियाणे, औषधे घेऊ शकत नाही. अशा वेळी सरकारमार्फत, शेतकऱ्यांना वित्त पुरवठा होणे गरजेचे असते. परंतु नेमके वित्तपुरवठ्याच्या अपुऱ्या सुविधांमुळे कृषीची उत्पादकता कमी होते.

७. सुधारित बी-बियाणे, खते, औषधांचा तुटवडा : कृषी उत्पादनात भरघोस वाढ होण्यासाठी मुबलक प्रमाणात सुधारित बी-बियाणे, खते व कृषीसाठी आवश्यक असणारी औषधे शेतकऱ्यांना उपलब्ध असणे आवश्यक असते. परंतु नेमके लागवडीच्या हंगामापूर्वी या वस्तूंचा तुटवडा जाणवतो. व्यापारी वर्गाकडून या वस्तूंची कृत्रिम टंचाई निर्माण केली जाते. त्यामुळे शेतकरी त्याच्याकडे उपलब्ध असलेली जुनीच बी-बियाणे वापरतो. खतांच्या मात्रा कमी व त्यातही अनियमितता येते. या सर्वांचा परिणाम म्हणजे शेतीची उत्पादकता घटते.

कृषी उत्पादकता वाढविण्यासाठी उपाययोजना

वाढत्या लोकसंख्येच्या अन्नधान्य व इतर गरजा भागविण्यासाठी कृषी क्षेत्राचे उत्पादन वाढविणे गरजेचे बनले आहे. जमीन मात्र तेवढीच असून लोकसंख्या मात्र वाढतच आहे. त्यामुळे कृषीची उत्पादकता वाढविण्यासाठी खालील उपाययोजना राबविता येतील.

१. कृषी क्षेत्रात नवीन संशोधन : कृषीची उत्पादकता वाढण्यासाठी कृषी क्षेत्रात नवनवीन शोध लागण्याची गरज असते. यामध्ये बियाण्यांचे नवीन सुधारित वाण, भुईमूग टोकण यंत्र, नवीन किटकनाशके, नवीन शेतीपूरक अवजारे यांचा समावेश होतो. फक्त कृषी क्षेत्रातील संशोधनात वाढ झाली तरी त्याचा शेतकऱ्यांमार्फत प्रसार होणे गरजेचे असते. त्यामुळे सुधारित वाण व आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांना मिळून कृषी उत्पादकता वाढण्यास मदत होईल.

२. जलसिंचन सुविधात वाढ : भौगोलिकदृष्ट्या महाराष्ट्र राज्यात विविधता आढळून येते. कोकणपट्टी सोडल्यास महाराष्ट्राच्या इतर भागात पावसाचे प्रमाण अपुरे असल्याने पावसावर अवलंबून असलेल्या कोरडवाहू शेतीच्या समस्या गंभीर आहेत. राज्यात सिंचनाची सोय असलेल्या जमिनीचे प्रमाण १९६० सालच्या ६.५% पासून १६.४% इतके वाढले असले तरी मान्सूनवरील अवलंबन कमी करण्यास ते पुरेसे नाही. कोरडवाहू शेतीतून वर्षाकाठी एकच पीक काढता येते. त्यामुळे कृषी क्षेत्राच्या विकासासाठी जलसिंचन सुविधांचा जास्तीत जास्त विकास होणे गरजेचे आहे. राज्यात कृषी क्षेत्रासाठी पाण्याचा स्रोत म्हणून विहिरी, तलाव, शेततळी, कालवे, धरणे यांचा विकास करण्यात आला व आधुनिक जलसिंचन तंत्रज्ञान (तुषार, सिंचन, ठिबक सिंचन) इ.चा वापर शेतकऱ्यांनी केला तर कृषी उत्पादकता वाढू शकेल.

३. शासकीय कृषी वित्तपुरवटा : शेतकऱ्यांना लागवडीच्या हंगामात पैशाची गरज असते. अशा वेळी आर्थिक सहाय्यता मिळविण्याचा तो प्रयत्न करतो. शासकीय पतपुरवठ्यातील विलंब व किचकट प्रक्रियेमुळे तो खाजगी किंवा कुठल्याही मार्गाने पैशाची व्यवस्था करण्याचा प्रयत्न करतो. खासगी क्षेत्रात व्याजाचा दर जास्त असल्यामुळे शेतकरी तोट्यात जातो. जर शासनाकडून शेतकऱ्यांना विनाविलंब व सुलभरित्या गरजेच्या वेळी वित्तपुरवठा होऊ शकला तर कृषी उत्पादकता वाढू शकेल.

४. सुधारित खते, बियाणे व किटकनाशकांचा वापर : बियाण्यांचे सुधारित वाण, योग्य खते व पिकांवर रोग पडल्यानंतर योग्य औषधांचा वापर केल्यास शेती उत्पादनात वाढ होऊ शकते. कित्येकदा व्यापाऱ्यांकडून खत व बियाण्यांचा कृत्रिम तुटवडा निर्माण केला जातो. अशा वेळी शेतकऱ्यास स्वस्त प्रमाणात खते व बियाण्यांचा पुरवठा झाल्यास कृषी उत्पादनात वाढ होण्यास मदत मिळते.

५. सुयोग्य विक्री व्यवस्था : नैसर्गिक व इतर संकटांचा सामना करून शेतकरी अतिशय कष्टाने कृषीतून उत्पादन घेत असतो. परंतु जेव्हा तो आपला माल विक्रीसाठी बाजारात आणतो त्यावेळी बऱ्याचवेळा त्याच्या उत्पादनखर्चाएवढाही पैसा त्यास मिळणे दुरापास्त होते. दलालांकडून प्रामुख्याने शेतकऱ्यांची हानी होते. जर कृषी माल विक्रीची शासनामार्फत सुयोग्य व्यवस्था झाली तर शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा चांगला मोबदला मिळेल.

महाराष्ट्रातील शेती विकासासाठीचे शासकीय कार्यक्रम

कृषीक्षेत्राचा व पर्यायाने शेतकऱ्यांचा विकास व्हावा यासाठी शासनामार्फत कार्यक्रम किंवा योजना कार्यान्वित केल्या जातात. त्यातील काही कार्यक्रमांची माहिती खालीलप्रमाणे सांगता येईल.

१. अवर्षणप्रवण क्षेत्र कार्यक्रम : सन १९७३ मध्ये दुष्काळग्रस्त भागातील लोकांसाठी हा कार्यक्रम सुरू झाला. याद्वारे जमिनीची वाढती धूप थांबविण्यासाठी पाण्याचे नियोजन करणे, वनीकरण व मृदसंधारण विकास घडवून आणण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले.

२. रोजगार हमी योजना : राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी सन १९७२ ही योजना सुरू करण्यात आली. ग्रामीण भागातील लोकांना रोजगाराची शाश्वती देऊन या योजनेच्या माध्यमातून उत्पादक कामे राबविली. उदा. जलसंधारण योजना, रस्तेबांधणी, जमिनीची बांधबंदिस्ती तर शेती विकासाला मदत होऊन गरिबी हटविण्यास मदत होईल हा या योजनेचा हेतू होता. या योजनेचा केवळ राष्ट्रीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवर कौतुक झाले व भारतातील इतर राज्यांनी या योजनेचा अवलंब करावा अशी शिफारस केली गेली.

३. एकात्मिक विकास कार्यक्रम : या कार्यक्रमाची सुरुवात इ.स. १९७०-७१ मध्ये करण्यात आली. या कार्यक्रमाचे मुख्य उद्देश म्हणजे दुष्काळी परिस्थितीत टिकाव धरू शकणाऱ्या व कमी कालावधीत जास्त उत्पादन देणाऱ्या वाणांची लागवड, शेतकऱ्यांना खते व औषधांचे वाटप, जलसिंचनाच्या स्रोतामध्ये वाढ करून कोरडवाहू क्षेत्राला फायदेशीर ठरणाऱ्या तंत्राचा विकास व विस्तार करणे होय.

४. सधन शेती जिल्हा कार्यक्रम : सन १९६०-६१ मध्ये हा कार्यक्रम सुरू करण्यात आला. हा याचा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमासाठी देशातील १६ जिल्हे निवडून तेथे पाणी व्यवस्थापन, पायाभूत सुविधांचा विकास, वित्तपुरवठा इ. वर भर दिला जातो.

महाराष्ट्रातील सहकार चळवळ

२०व्या शतकात भारतातील लोकसंख्येत खूप मोठ्या प्रमाणात वाढ झाली. सन १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला. परंतु वाढत्या लोकसंख्येमुळे देशापुढे अनेक समस्या निर्माण झाल्या होत्या. नियोजनबद्ध पद्धतीने देशाचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी सरकारने पंचवार्षिक योजनांची सुरुवात केली.

सहकाराचा अर्थ व उद्दिष्टे : भारताच्या सामाजिक विकासाच्या प्रवाहातील एक घटक म्हणजे 'सहकार' होय. सहकार ही एक व्यापक स्वरूपाची संकल्पना आहे. सामाजिक हिताच्या साधनांपैकी सहकार हे एक महत्त्वाचे साधन असून त्यातून सामाजिक कल्याणात वाढ करणे शक्य होते.

सहकाराची उद्दिष्टे : सहकाराची प्रामुख्याने खालील उद्दिष्टे सांगता येतील.

i) दुर्बलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणे.

ii) लोकांच्या सामाजिक व आर्थिक हितांची जपणूक करणे.

iii) ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण करणे.

iv) एकूणच सामाजिक व आर्थिक कल्याणात वाढ घडवून आणणे.

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा विकास

जगात सहकारी चळवळीचा उदय १९व्या शतकाच्या सुरुवातीला इंग्लंडमध्ये आला. भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात १८९२ मध्ये फ्रेडरिक निकोलसन यांनी सहकारी चळवळ सुरू करण्याची शिफारस केली होती. त्यानंतर भारतात १९०४ मध्ये सहकारी चळचळीची सुरुवात झाली. देशात सर्वात प्रथम महाराष्ट्रात सहकार चळवळीचा पाया रोवला गेला.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या कालखंडात १९१८ मध्ये मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा कायद्यांनुसार सहकार हा विषय केंद्र शासनाकडून प्रांतिक सरकारकडे सोपविण्यात आला. तत्कालीन मुंबई सरकारने सन १९२५ मध्ये सहकारविषयक कायदा संमत केला होता. महाराष्ट्रात सहकारी चळवळीच्या विकासासाठी सरैय्या समिती (१९४४), सन १९४६ मध्ये गाडगीळ समिती व सन १९४८ मध्ये नावटी समिती स्थापन केली होती. त्यांनी केलेल्या शिफारशींची सरकारला मदत झाली. देशातील पहिला सहकारी साखर कारखाना महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यात 'प्रवरानगर' येथे १९४९ मध्ये सुरू झाला. महाराष्ट्र राज्याच्या या सहकार चळवळीत अनेक व्यक्तींनी योगदान दिले आहे. यात प्रामुख्याने पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील, धनंजयराव गाडगीळ, वैकुंठभाई मेहता यांचा समावेश होतो. याशिवाय तात्यासाहेब कोरे, रत्नाप्पा कुंभार, वसंतदादा पाटील, यशवंतराव मोहिते, शंकरराव मोहिते-पाटील, शरद पवार, शंकरराव काळे व शंकरराव कोल्हे यांनीही सहकाराला एक प्रकारचे तेज प्राप्त करून दिले.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या आंदोलनानंतर १ मे १९६० रोजी मराठी भाषिक राज्याची म्हणजे महाराष्ट्राची निर्मिती झाली. यशवंतराव चव्हाणांच्या रूपाने राज्याला दूरदृष्टीचा नेता पहिला मुख्यमंत्री म्हणून लाभला. त्यांनी सहकार व पंचायत राज्य यांच्या माध्यमातून राज्यात लोकशाही समाजवाद स्थापन करण्याची घोषणा केली. परंतु १९६२ सालच्या चिनी आक्रमणानंतर चव्हाण संरक्षणमंत्री म्हणून दिल्लीला गेले व महाराष्ट्राचे नेतृत्व दादासाहेब कन्नमवार व नंतर बरीच वर्षे वसंतराव नाईक यांनी केले.

खऱ्या अर्थाने सहकाराची नेत्रदीपक प्रगती या काळात झाली. या काळात महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांनी संपूर्ण भारतातील जनतेचे लक्ष वेधून घेतले. महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यात 'प्रवरानगर' येथे १९४९ साली भारतातील पहिला सहकारी साखर कारखाना पद्मश्री विठ्ठलराव विखे-पाटील व धनंजयराव गाडगीळ यांच्या प्रयत्नामुळे उभारला गेला. नंतर १९५५-५६ साली कोपरगावजवळ कोळपेवाडी येथे गणपतराव औताडे यांनी दुसरा सहकारी साखर कारखाना उभारला आणि त्यानंतर हा-हा म्हणता महाराष्ट्राच्या बहुतेक भागात सहकारी साखर कारखान्यांचे जाळेच पसरले. १९८० सालापर्यंत महाराष्ट्रात साखर कारखान्यांची संख्या शंभरावर जाऊन पोहोचली. सन १९८८ साली महाराष्ट्राने साखर निर्मितीच्या बाबतीत उत्तर प्रदेशाला मागे टाकून देशात पहिला क्रमांक पटकावला.

महाराष्ट्रात फक्त सहकारातून साखर कारखानेच नव्हे तर सहकारी सूतगिरण्या, सहकारी कुक्कुटपालन संस्था, सहकारी दूध उत्पादन संस्था, सहकारी खरेदी-विक्री संघ, शेतीमालावर प्रक्रिया करणाऱ्या इतर सहकारी संस्था यांचे जाळेच उभे राहिले. सहकार चळवळीच्या या विकासामुळे राज्याच्या ग्रामीण भागात आर्थिक समृद्धी आली. साधारणपणे **१९६० ते १९८०** या दोन दशकात राज्यात सहकाराच्या माध्यमातून प्रवरानगर, वारणानगर, कोपरगाव, इचलकरंजी, सांगली इ. ठिकाणी शेती, शिक्षण, उद्योगधंदे या क्षेत्रात अनेक धाडसी, प्रयोगशील व जनताभिमुख नेत्यांमुळे प्रचंड विकास झाला. या नेत्यांनी आपल्या भागाचा सर्वांगीण विकास घडवून आणला व ग्रामीण भागाचा कायापालट केला. यामुळेच या दोन दशकांना महाराष्ट्रातील **सहकाराचा सुवर्णकाळ** असे म्हणतात.

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे मूल्यमापन

आज जगात सर्वत्र उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण यांचे वारे जोरात वाहत आहेत. ते थांबवणे आपल्या हातात नसले तरी त्यामुळे आता सहकाराचे युग संपले आहेत असा निष्कर्ष काढणे चुकीचे होईल. महाराष्ट्राचा बाबतीत बोलायचे झाल्यास सहकारी चळवळीमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेत खूप चांगले बदल घडून आले. एकूणच सहकारी चळवळीमुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात सामाजिक व आर्थिक विकास घडून येण्यास मोठा हातभार लागला.

सहकार चळवळीचे महाराष्ट्रातील यश

१. रोजगार निर्मिती : महाराष्ट्रात १९६० नंतर सहकारी संस्थांचा विकास मोठ्या प्रमाणात झाला. त्यामुळे लोकांना मिळणाऱ्या रोजगारातही वाढ झाली. विविध प्रकारच्या कृषी प्रक्रिया सहकारी संस्था, सहकारी सूतगिरण्या, सहकारी दूध उत्पादन संस्था, सहकारी खरेदी-विक्री संघ, औद्योगिक सहकारी संस्था स्थापन झाल्यामुळे लोकांना ग्रामीण भागात रोजगार निर्माण झाला.

२. ग्रामीण भागातून नेतृत्वाचा उदय : सहकारी संस्थांचा विस्तार ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे ग्रामीण भागातून कर्तबगार व्यक्तींचे नेतृत्व पुढे आले.

३. राज्याच्या विकासाला हातभार : महाराष्ट्राच्या निर्मितीपासून सहकारी संस्थांचा विस्तार वेगवेगळ्या क्षेत्रात उदा. सहकारी औद्योगिक संस्था, सहकारी पतपुरवठा संस्था, साखर कारखाने, सूतगिरण्या इ. विस्तार झाला व त्यात मोठ्या प्रमाणात आर्थिक गुंतवणूक होत गेली. त्यामुळे आपोआपच राज्याच्या विकासाला हातभार लागला.

४. ग्रामीण भागात आर्थिक समृद्धी : राज्यातील सहकारी व पूरक उद्योगामुळे ग्रामीण भागात आर्थिक समृद्धी आली. यामुळे ग्रामीण भागात शाळा, कॉलेजेस व विद्यार्थी वसतिगृहे मोठ्या प्रमाणात निघू लागली. नवे व पक्के रस्ते झाल्यामुळे वाहतूक व दळणवळण सुलभ झाले. त्यामुळे आपोआपच ग्रामीण भाग समृद्ध झाला.

५. राहणीमान स्तरात वाढ : ग्रामीण भागातील लोकांना सहकाराच्या विकासामुळे साखर उद्योग विणकाम, मच्छिमारी, दूध पुरवठा, सूतकताई व पणन व्यवसायांतून मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध झाला. रोजगारामुळे लोकांच्या उत्पन्नात वाढ झाली. खरेदीशक्ती वाढली व भौतिक सुख-सुविधांमुळे लोकांचा राहणीमानाचा स्तर उंचावण्यास मदत झाली.

याशिवाय राज्यातील सहकार चळवळीमुळे सहकारी विपणन संस्था स्थापन झाल्या. त्यामुळे कृषी माल विक्रीतील दलालांचे उच्चाटन होण्यास मदत झाली. राज्यातील सहकार चळवळीचे यश जरी ठळकपणे नजरेत भरण्यासारखे असले तरी सहकाराचा सुवर्णकाळ (१९६० ते १९८०) संपल्यानंतर यात काही उणिवा किंवा रोष निर्माण होऊ लागले. त्यामुळे हळूहळू सहकार चळवळीला उतरती कळा येऊ लागली. सहकार चळवळीत प्रामुख्याने सरकारी व राजकीय हस्तक्षेप, घराणेशाहीचा उदय, भ्रष्टाचार, सदोष व्यवस्थापन ह्या उणिवा किंवा दोष निर्माण झाले.

असे जरी असले तरी महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर ज्या सहकार चळवळीचा विकास व विस्तार येथे झाला. त्यामुळे ग्रामीण भागाचा कायापालट घडून आला हे सत्य नाकारता येणार नाही.

स्वयं अध्ययन प्रश्न १

(अ) योग्य पर्याय निवडा.

१. ..... या सुधारणा कायद्यानुसार सहकार हा विषय केंद्र शासनाकडून प्रांतिक सरकारकडे सोपविण्यात आला.

(अ) मोर्ले-मिंटो (ब) माँटेग्यू-चेम्सफर्ड

(क) रौलेट (ड) १९३५ चा भारत कायदा

२. देशातील पहिला सहकारी साखर कारखाना महाराष्ट्राच्या ..... या जिल्ह्यात सुरू झाला.

(अ) पुणे (ब) सोलापूर (क) कोल्हापूर (ड) अहमदनगर

३. सन १९८८ पर्यंत ..... हे राज्य देशात साखर निर्मितीत प्रथम क्रमाकांवर होते.

(अ) महाराष्ट्र (ब) उत्तर प्रदेश (क) पंजाब (ड) तामिळनाडू

४. महाराष्ट्र राज्याची निर्मिती ..... या दिवशी झाली.

(अ) १ मे १९५६ (ब) १५ ऑगस्ट १९४७

(क) २६ जानेवारी १९६० (ड) १ ते १९६०

(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.

१. महाराष्ट्राला किती कि.मी. लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे ?

२. महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री होण्याचा मान कोणास मिळाला ?

३. दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी महाराष्ट्रात १९७२ मध्ये कोणती योजना सुरू करण्यात आली ?

४. एकात्मिक विकास कार्यक्रम कोणत्या वर्षी सुरू करण्यात आला ?

२.२.२ औद्योगिक विकास

अर्थ व पार्श्वभूमी

कुठल्याही राज्याच्या किंवा देशाच्या आर्थिक विकासासाठी औद्योगिकीकरणाची अतिशय गरज असते. औद्योगिकीकरणात विशिष्ट यंत्रांच्या साहाय्याने कच्च्या मालावर प्रक्रिया करून त्याचे उपभोग्य व भांडवली वस्तूंमध्ये रूपांतर केले जाते. औद्योगिकीकरणाच्या या प्रक्रियेत जमीन, श्रम, भांडवल व संयोजक या उत्पादन घटकांचा जास्तीत जास्त वापर करण्याचा प्रयत्न केला जातो. औद्योगिकीकरणामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होते. त्यामुळे बेरोजगारी कमी होण्यास मदत होते.

प्राचीन काळापासून महाराष्ट्रात अनेक उद्योग चालत आले आहेत. कापड उद्योग, धातूची भांडी, लाकडी सामान, तेल, साबण, कागद वगैरे उद्योग विखुरले होते. महाराष्ट्राच्या पैठण, तेर, मुरूड, जंजिरा, वेंगुर्ले, मुंबई, पुणे, वसई येथे बाजारपेठा होत्या. यातील काही ठिकाणी औद्योगिक केंद्रांचा विकास झाल्याचे दिसते.

महाराष्ट्रातील औद्योगिकीकरण : आज महाराष्ट्र औद्योगिकदृष्ट्या भारतातले अग्रगण्य राज्य मानले जाते. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी कृषि-औद्योगिक धोरणाचा पुरस्कार केला. स्वातंत्र्यानंतर भारताने स्वीकारलेल्या संमिश्र अर्थव्यवस्थेच्या धोरणानुसार देशातील खाजगी उद्योगांना विविध प्रकारे उत्तेजन मिळू लागले. वाहतूक व बँकिंगच्या चांगल्या सोयी व औद्योगिक कलहाचे प्रमाण कमी असल्याने मुंबई-पुणे-नाशिक या त्रिकोणात नवनवे उद्योग मोठ्या प्रमाणावर उभे राहिले. राज्य निर्मितीच्या वेळी फक्त कापड उद्योग हाच महाराष्ट्रात प्रमुख उद्योग होता. पुढील काळात नवनवीन उद्योगांची सुरुवात झाली व विकास होत गेला. यामुळे राज्याच्या औद्योगिकीकरणात भर पडत गेली. आज राज्यात वस्त्रोद्योगाशिवाय कागदनिर्मिती, मुलभूत रसायने व रासायनिक पदार्थ, कातडी वस्तू, तंबाखू व संबंधित वस्तू, यंत्रसामुग्री, काचेच्या वस्तू व इतर अनेक उद्योगांचा विकास झाल्याचे दिसून येते. त्याशिवाय आज महाराष्ट्रात विविध ठिकाणी मोठमोठे औद्योगिक प्रकल्प उभे राहिल्याचे दिसते.

महाराष्ट्राची औद्योगिक प्रगती घडून येण्याची मुख्य कारणे म्हणजे कुशल कामगारांची उपलब्धता, सरकारी धोरणांची अनुकूलता, श्रमशक्तीची उपलब्धता, आधुनिक तंत्रज्ञानाची मदत ही होय. याशिवाय राज्यात उद्योगांसाठी लागणारा विपुल कच्चा माल, खनिज पदार्थांची (कोळसा, मँगनीज, लोह इ.) उपलब्धता वीज

इत्यादीमुळे राज्याची औद्योगिक प्रगती होत गेली. आज राज्यात टाटा, बिर्ला, अंबानी, गरवारे, किर्लोस्कर, गोदरेज, मफतलाल, सिंघानिया व इतर काही उद्योगसमूह कार्यरत असल्याने राज्याच्या औद्योगिक विकासाला गती मिळाली आहे.

महाराष्ट्रातील कारखाने त्यातील श्रमशक्ती

आज उद्योगक्षेत्रात आघाडींवरील राज्यांपैकी एक म्हणून महाराष्ट्राचा देशात उल्लेख केला जातो. १५ ते ६० वर्षे वयोगटातील जे स्त्री-पुरुष अर्थोत्पादक काम करतात त्यांना आर्थिकदृष्ट्या क्रियाशील मानले जाते. एकूण लोकसंख्येपैकी ४०% स्त्री-पुरुषांचा या विभागात समावेश होतो.

महाराष्ट्रातील कार्यरत कारखाने व त्यातील रोजगार :

रोजगार (हजारांत)

वर्ष	बाब	५० पेक्षा कमी कामगार असलेले	५० पेक्षा अधिक कामगार असलेले	एकूण कारखाने
१९६१	कारखाने	६१०१	२१३२	८२३३
	रोजगार	१२०	६६७	७८७
१९७१	कारखाने	७१९७	३०४४	१०२४१
	रोजगार	१३८	८६०	९९८
१९८१	कारखाने	१३३९२	३२०२	१६५९४
	रोजगार	२०३	९८९	११९२
१९९१	कारखाने	२०८८२	३२३७	२४११९
	रोजगार	२५४	९१४	११६९
२००१	कारखाने	२४३७०	३९५४	२८३२४
	रोजगार	३०८	८९३	१२०१

संदर्भ : औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य मधून.

वरील तक्त्यात वर्ष १९६१ ते २००१ या कालावधीतील महाराष्ट्रात कार्यरत असणारे कारखाने व त्यातील रोजगाराची स्थिती दर्शविली आहे.

महाराष्ट्रातील प्रमुख उद्योग

महाराष्ट्रात १९६० ते २००० या चाळीस वर्षांच्या कालखंडात काही उद्योगांचे महत्त्व वाढले, तर काहींचे कमी झाले. या काळात चामडे आणि चामडी वस्तू, लाकूड उद्योग व हिरे व दागिने हे तीन उद्योग क्रमाक्रमाने महत्त्वपूर्ण बनू लागले. देशाच्या निर्यातीत त्यांचा वाटा महत्त्वाचा बनला. चामड्यांच्या वस्तूबाबत तामिळनाडू, उत्तर प्रदेश व महाराष्ट्र यांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. हिऱ्यांना पैलू पाडणारे कसबी कलाकार संख्येने कमी आहेत. हिऱ्यांना पैलू पाडण्याचे काम मुख्यत्वे मुंबई व सुरत येथे होते. परदेशात या वस्तूंच्या वाढत्या मागणीमुळे या उद्योगांना चालना मिळाली आहे. रसायने, यंत्रे व मोटारवाहने या उद्योगांना लागणारा कच्चा माल इतर राज्ये वा परदेशातून आणावा लागतो. सागरी वाहतूक, बँकींग व वीज या सेवांची उपलब्धता आणि विक्रीची सोय यामुळे हे तीन उद्योग महाराष्ट्रात वाढले आहेत.

महाराष्ट्रात १९७० च्या दशकात सिमेंटचे कारखाने नव्याने सुरू झाले. लक्ष्मणराव किर्लोस्करांनी शेतीची अवजारे बनविण्याचा पहिला उपक्रम औंध संस्थानात सुरू केला. त्यांनी बनविलला लोखंडी नांगर देशभरात लोकप्रिय झाला. पिकांसाठीचे मळणीयंत्र नागपूरकडील उद्योजकांनी बनविले. विहिरीतून पाणी उपसण्यासाठी डिझेल इंजिनांचे कारखाने कोल्हापूर, पुणे, औरंगाबाद, जळगांव या भागात सुरू झाले. याच काळात इलेक्ट्रिक पंपांचे उत्पादन पुणे, ठाणे, नागपूर, नांदेड व औरंगाबाद या भागात सुरू झाले. तंबाखू उत्पादनात विडी, सिगारेट व गुटखा यांचे उत्पादन वाढले आहेत. १९७० च्या दशकापासून साखर उद्योगाचा एक भाग म्हणून दारू निर्मिती उद्योग सुरू झाला. १९८५ पासून माहिती-तंत्रज्ञान हे क्षेत्र विकसित झाले. संगणकासाठी लागणाऱ्या वस्तू (हार्डवेअर व सॉफ्टवेअर) तयार करण्याचा उद्योग सुरू झाला. त्यासाठी मुंबई, पुणे, औरंगाबाद, नाशिक, सातारा, कोल्हापूर, अहमदनगर इ. ठिकाणी 'इन्फोटेक पार्क' उभारण्याची योजना महाराष्ट्र सरकारने आखली आहे.

महाराष्ट्रातील प्रमुख औद्योगिक संस्था : औद्योगिकीकरणामुळे आर्थिक विकास घडून येण्यास मदत मिळते. देशाच्या औद्योगिक विकासासाठी काही संस्थांची निर्मिती केली जाते. या संस्था नवीन उद्योगांना मार्गदर्शनाबरोबरच चालना देतात.

महाराष्ट्रात खालील औद्योगिक संस्थांच्या माध्यमातून औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेला मोठा हातभार लावला आहे.

१. **महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ** (MIDC - Maharashtra Industrial Development Corporation)

महाराष्ट्र शासनाने १ ऑगस्ट १९६२ रोजी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना केली. या महामंडळाचे मुख्य कार्यालय मुंबई येथे आहे.

महामंडळाची कार्ये

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ खालील प्रकारची कार्ये करते.

१. औद्योगिक क्षेत्राचा विकास घडवून आणणे.

२. जिल्हा पातळीवर औद्योगिक केंद्राचा विकास घडवून आणणे.

३. राज्यातील सर्व तालुक्यांत लघु औद्योगिक क्षेत्रे स्थापन करणे.

४. लघुउद्योजकांना गाळे उपलब्ध करून देणे.

५. उद्योजकांना विकसित भूखंड तसेच रस्ते, पाणी, वीज व इतर पायाभूत सुविधांची उपलब्धता करून देणे.

६. औद्योगिक कर्मचाऱ्यांसाठी घरे निर्माण करणे.

७. सागरी किनाऱ्यांलगत औद्योगिक क्षेत्राची निर्मिती करणे.

८. पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रांचा विकास करणे.

२. महाराष्ट्र राज्य औद्योगिक व गुंतवणूक महामंडळ (SICOM - State Industrial and Investment Corporation of Maharashtra)

औद्योगिकदृष्ट्या मागासलेल्या भागांतही चांगल्या दर्जाच्या उद्योगांची उभारणी व्हावी या हेतूने महाराष्ट्र शासनाने ३१ मार्च १९६६ या दिवशी महाराष्ट्र राज्य औद्योगिक व गुंतवणूक महामंडळाची स्थापना केली. या महामंडळाचे मुख्य कार्यालय मुंबई येथे असून नागपूर, पुणे व औरंगाबाद या ठिकाणी विभागीय कार्यालये आहेत.

सिकॉमची कार्ये

१. राज्यातील मोठ्या व मध्यम उद्योगांना दीर्घ मुदतीचे आर्थिक साहाय्य करणे.

२. विविध विभागीय विकास महामंडळे तसेच जिल्हा उद्योग केंद्रामार्फत उद्योगांसाठी एकत्रित प्रोत्साहन योजना राबविणे.

३. विशेषतः कमी विकसित भागात औद्योगिक केंद्राचा विकास करणे.

४. अनिवासी भारतीयांनी देशात अल्पविकसित भागांत उद्योग स्थापनेसाठी विशेष योजना राबविणे.

३. महाराष्ट्र राज्य वित्त महामंडळ
(MSFC - Maharashtra State Financial Corporation)

महाराष्ट्र राज्य वित्त महामंडळाची सुरुवात १ एप्रिल १९६२ पासून झाली. या महामंडळाचे मुख्यालय मुंबई येथे आहे. या महामंडळाला राज्य सरकार, रिझर्व्ह बँक व औद्योगिक विकास बँकेकडून कर्ज मिळते. या महामंडळाच्या ९ विभागीय कचेऱ्या, ३ क्षेत्रीय कचेऱ्या व २० शाखा कचेऱ्या आहेत.

कार्ये

महाराष्ट्र राज्य वित्त महामंडळाची कार्ये पुढीलप्रमाणे आहेत –

१. मागासलेल्या भागांचा औद्योगिक विकास घडविण्यासाठी लघु व मध्यम उद्योगांना वित्तपुरवठा करणे.

२. विविध स्वरूपाच्या कर्ज योजना राबविणे.

३. अविकसित भागांतील उद्योगांना विविध सवलतींचा लाभ मिळवून देणे.

४. महामंडळाच्या कार्यकक्षेतील आजारी उद्योगांचे पुनर्वसन, यांत्रिकीकरण व आधुनिकीकरणासाठी आर्थिक मदत करणे.

४. महाराष्ट्रातील लघुउद्योग

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासून लघुउद्योगांचा विकास झाल्याचे दिसते. राज्याच्या अर्थव्यवस्थेत लघु उद्योगांना खूप महत्त्व आहे. महाराष्ट्राच्या लोकसंख्येचा खूप मोठा भाग ग्रामीण भागात राहात असल्याने तेथे लघुउद्योग व कुटिरोद्योगांचा विकास झाल्याचे दिसून येते. लघु व कुटिरोद्योगांतून रोजगारनिर्मिती होत असल्याने बेकारी कमी होण्यास मदत होते. हे उद्योग कमी भांडवलात सुरू करता येतात. त्यासाठी कच्चा मालही सहज मिळतो. यांतून तयार झालेल्या वस्तूंना स्थानिक बाजारपेठही सहज उपलब्ध होते. लघुउद्योगांमध्ये धातूच्या वस्तू, यंत्रांचे सुटे भाग, दुग्ध व्यवसायाशी निगडीत उद्योग, फायबरच्या वस्तू निर्मिती व इतरही छोट्या यांत्रिक कारखान्यांचा समावेश होतो. कुटिरोद्योगांत पादत्राणे, लाकडी व मातीची खेळणी, मातीच्या वस्तू यांचा समावेश होतो. महाराष्ट्रात लघु व कुटिरोद्योगांचे अनेक फायदे झालेले असले तरी या उद्योगांसमारे काही अडचणीही दिसत आहेत. ह्या अडचणी किंवा समस्या दूर व्हाव्यात या हेतूने राज्य सरकारने महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ (स्थापना १९६२), महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ व जिल्हा उद्योग केंद्र (स्थापना – १९७८) यांची स्थापना केली. यामुळे महाराष्ट्राचा ग्रामीण भागाचा औद्योगिक विकास घडून येण्यास हातभार लावला.

महाराष्ट्राचे औद्योगिक धोरण

महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासासाठी सरकारने नेहमीच विविध धोरणांची आखणी केली. १९९१ मध्ये भारताने नवे औद्योगिक धोरण स्वीकारले त्याचा महाराष्ट्रावर चांगला परिणाम झाला. आज भारतात महाराष्ट्र राज्य औद्योगिकदृष्ट्या प्रगत राज्यांमध्ये मोडते. महाराष्ट्राच्या औद्योगिक प्रगतीसाठी सरकारतर्फे जी निरनिराळी औद्योगिक धोरणे राबविली ती खालीलप्रमाणे सांगता येतील.

१. १९८१ चे औद्योगिक धोरण

नेहरू सरकारने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून नियोजनबद्ध पद्धतीने भारताचा आर्थिक विकास घडवून आणण्याचे ठरविले. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेनुसार १९५६ मध्ये जे औद्योगिक धोरण राबविण्यात आले त्यात थोडा बदल करून १९८१ मध्ये महाराष्ट्रात औद्योगिक धोरण राबविण्यात आले.

वैशिष्ट्ये : या धोरणाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतील.

१. अविकसित भागांत उद्योगांचा विकास करणे.

२. लघु व कुटिरोद्योगांत वाढ करणे.

३. कृषीवर आधारित उद्योगांमध्ये वाढ करणे.

४. औद्योगिक क्षेत्रात अधिक प्रमाणात आधुनिक तंत्राचा वापर करणे.

५. स्वयंरोजगार निर्मितीसाठी विशेष प्रयत्न करणे.

सन १९९१ मध्ये भारताने नवे औद्योगिक धोरण स्वीकारले व खऱ्या अर्थाने भारताच्या औद्योगिक विकासपर्वाला सुरुवात झाली. या धोरणाअंतर्गत जागतिकीकरण, उदारीकरण व खासगीकरणाचा पुरस्कार करण्यात आला. भारताच्या १९९१ च्या औद्योगिक धोरणावर आधारित महाराष्ट्रात १९९३ साली नवीन औद्योगिक धोरण आखण्यात आले.

वैशिष्ट्ये

१. लघुउद्योगांसाठी असलेल्या सवलतीत वाढ करणे व लघुउद्योगांच्या विकासासाठी उत्तेजन देणे.

२. निर्यातप्रधान उद्योगांवर भर देणे.

३. उद्योगांसाठी आवश्यक पायाभूत सोयीसुविधांचा विस्तार करणे.

४. औद्योगिक क्षेत्रासाठी लागणाऱ्या जागेच्या खरेदी प्रक्रियेत सुटसुटीतपणा आणणे.

३. १९९६ चे औद्योगिक धोरण

महाराष्ट्र राज्यातील उद्योग, व्यापार व वाणिज्य या क्षेत्रामंध्ये अधिक सुलभता व पारदर्शकता यावी या उद्देशाने हे धोरण राबविण्यात आले.

वैशिष्ट्ये

१. औद्यागिक क्षेत्रात उदारीकरणाचा अवलंब करणे.

२. औद्योगिक विकासाच्या कामात खासगी क्षेत्राचा सहभाग वाढविणे.

३. महाराष्ट्रात नऊ ठिकाणी विशेष पायाभूत सुविधांसह औद्योगिक नागरी संकुले विकसित करणे. (विकसित करण्यात येणारी औद्योगिक नागरी संकुले इंदापूर (पुणे), सिन्नर (नाशिक), बुटीबोरी (नागपूर), नांदगाव पेठ (अमरावती), कुशनूर (नांदेड), वाळूज-शेद्रा (औरंगाबाद), कागल हातकणंगले (कोल्हापूर), निवळी फाटा (रत्नागिरी), महाड (रायगड).

४. कृषी प्रक्रिया उद्योगांसाठी स्वतंत्र धोरणाची आखणी करणे.

५. महाराष्ट्रातील मत्स्य व्यवसायाला चालना देण्यासाठी मत्स्य केंद्राची स्थापना करणे.

स्वयं अध्ययन प्रश्न २

(अ) योग्य पर्याय निवडा.

१. ..... यांनी शेतीची अवजारे बनविण्याचा पहिला उपक्रम औंध संस्थानात सुरू केला.

(अ) विठ्ठलराव विखे-पाटील (ब) लक्ष्मणराव किर्लोस्कर

(क) धनंजयराव गाडगीळ (ड) मुकेश अंबानी

२. महाराष्ट्र राज्य औद्योगिक व गुंतवणूक महामंडळाचे मुख्य कार्यालय ..... येथे आहे.

(अ) दिल्ली (ब) पुणे (क) मुंबई (ड) नागपूर

३. महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाची स्थापना ..... या वर्षी झाली.

(अ) १९४७ (ब) १९६० (क) १९६२ (ड) १९९१

४. महाराष्ट्र राज्य वित्त महामंडळाची सुरुवात ..... पासून झाली.

(अ) १ एप्रिल १९६२ (ब) २ ऑक्टोबर १९६२

(क) १५ ऑगस्ट १९६३ (ड) २६ जानेवारी १९६३

(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.

१. स्वातंत्र्यानंतर भारताने कोणत्या स्वरूपाच्या अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला ?

२. महाराष्ट्रातील प्रमुख उद्योगसमूहांची नावे सांगा.

३. महाराष्ट्रात हिऱ्याना पैलू पाडण्याचे काम मुख्यत्वे कोणत्या शहरात चालते ?

४. कोणत्या वयोगटातील स्त्री-पुरुषांना आर्थिकदृष्ट्या क्रियाशील मानले जाते ?

❋❋❋

घटक – ३

शैक्षणिक विकास

(Educational Growth)

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

३.२.१ शासनाचे शैक्षणिक धोरण

३.२.२ प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण

३.२.३ उच्च आणि तांत्रिक शिक्षण

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.७ सरावासाठी स्वाध्याय

३.८ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

३.० उद्दिष्टे

या घटकात आपल्याला लक्षात येईल की,

१. शासनाचे शैक्षणिक धोरण कसे होते.

२. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाचा विकास कसा झाला.

३. उच्च आणि तंत्रशिक्षणाचा विकास कसा झाला याची माहिती घेता येईल.

३.१ प्रस्तावना

ब्रिटिशांच्या आगमनानंतर इंग्रजी शिक्षण देणाऱ्या शाळा भारतात सुरू झाल्या. मुंबई नेटिव्ह शिक्षण संस्थेने आपले कार्य इ.स. १९४० पर्यंत यशस्वीपणे चालू ठेवले होते. त्यानंतर ब्रिटिश शासनाने एक शिक्षण मंडळ

नेमले. या मंडळाने पाठ्यपुस्तके तयार करणे व प्रसिद्ध करणे ही कामे केली. व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्था सुद्धा या मंडळाने सुरू केल्या. इंग्रजी शिक्षण देणाऱ्या शाळा स्थापन करण्यावर भर दिला व शाळांचे पर्यवेक्षण व अध्यापन यांचे भारतीयकरण केले. मंडळाच्या कार्याचे हे तीन वैशिष्ट्यपूर्ण पैलू आहेत. ईस्ट इंडिया कंपनीच्या १९ जुलै १८५४ च्या वुडच्या खलित्यानुसार मुंबईचा शिक्षण विभाग अस्तित्वात आला. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाला सुरुवात झाली. १८८३-८४ मध्ये शिक्षण स्थानिक स्वराज्य संस्थांच्याकडे सुपूर्द केले. तत्पूर्वी १८८२ मध्ये हंटर कमिशनने शिक्षणाच्या बाबतीतला आपला अहवाल दिला. त्यामध्ये उच्च शिक्षणाबाबतच्या कार्यक्षेत्राचा समावेश नव्हता. सन १९०४ मध्ये 'भारतीय विद्यापीठ कायदा' झाला आणि उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात काम करण्याची गरज निर्माण झाली. तांत्रिक शिक्षण विद्यार्थ्यांना देण्याची आवश्यकता भासू लागली. यातून शिक्षणाचा विकास हळूहळू होत गेला.

३.२ विषय विवेचन

३.२.१ शासनाचे शैक्षणिक धोरण

(अ) प्राथमिक शिक्षण

महाराष्ट्र राज्य शैक्षणिकदृष्ट्या पुढारलेले समजले जाते. साक्षरतेच्या बाबतीत महाराष्ट्राचा क्रमांक केरळच्या खालोखाल लागतो. १ एप्रिल १९४९ पासून प्राथमिक शिक्षण अधिनियम अंमलात आले. त्यानुसार प्राथमिक शिक्षणाची योजना व त्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद करण्याची जबाबदारी जिल्हा शिक्षण मंडळे व अधिकृत नगरपालिका शिक्षणमंडळे यांच्याकडे सोपविण्यात आली. त्यानुसार १ मे, १९६२ रोजी महाराष्ट्र शासनाने जिल्हा परिषदांची स्थापना केली व शिक्षणाच्या अनेक योजना त्यांच्याकडे सुपूर्द केल्या. राज्यातील प्राथमिक शिक्षणाचे प्रशासन, निरीक्षण आणि पर्यवेक्षण त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. प्राथमिक शिक्षणासाठी मिळणाऱ्या अनुदानातून करण्यात येते. प्राथमिक शिक्षणाचे सर्वसाधारण नियंत्रण आणि पर्यवेक्षण या बाबतीत शासन जबाबदार राहील असे ठरले. यामध्ये अभ्यासक्रम तयार करणे, पाठ्यपुस्तकांना मान्यता देणे आणि सक्तीच्या शिक्षणाची अंमलबजावणी यांचा समावेश होता. मराठवाडा आणि विदर्भ या भागात ६ ते ९ वयोगटातील मुलांसाठी सक्तीचे शिक्षण १९६५ मध्ये सुरू करण्यात आले. १९६०-६१ पर्यंत शिक्षणाचा जुना आकृतिबंध मुंबई राज्यात चालू होता. जिल्हा परिषदेच्या स्थापनेनंतर एकसंघ आकृतीबंध तयार करण्यात आला. यासाठी जिल्हानिहाय शिक्षण निरीक्षक नियुक्त करण्यात आले. प्रत्येक जिल्हा परिषदे मध्ये वर्ग-१ चा अधिकारी प्रमुख शिक्षणाधिकारी म्हणून प्रत्येक जिल्ह्यात काम करण्याचे धोरण शासनाने ठरविले व त्याप्रमाणे अंमलबजावणी झाली. हे अधिकारी प्राथमिक शिक्षणाचे नियंत्रण आणि तपासणी ही कामे तसेच त्यांच्यावरती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नियंत्रण ठेवले.

(ब) माध्यमिक शिक्षण

भारतातील शिक्षण पद्धतीचा सर्वंकष अभ्यास करण्यासाठी केंद्र शासनाने डॉ. डी. एस. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली एक शिक्षण आयोग नियुक्त केला. या आयोगाचे संगठन १९६४ मध्ये झाले. या आयोगाच्या

शिफारसी मान्य करून केंद्र शासनाने १९६८ साली राष्ट्रीय शैक्षणिक धोरण निश्चित केले. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने १९६८ साली श्वेतपत्रिका प्रसिद्ध केली. या आराखड्यावर राज्यात चर्चा होऊन १९७० मध्ये शासनाने महाराष्ट्रातील शिक्षणाच्या पुनर्रचनेसाठी धोरणविषयक निवेदन प्रसिद्ध केले. यामध्ये तीन उद्दिष्टांवरती भर देण्यात आला.

१. शिक्षण ही विद्याविषयक उच्च साधना आहे. या साधनेमुळे मानवाला सत्य, उत्कृष्टता यांच्या सिद्धीसाठी स्फूर्ती मिळते.

२. व्यक्तीमधील अंतस्थ शक्तीचे प्रगट होण्यास तसेच विकास होण्यास शिक्षण मदत करते.

३. लोकांचे जीवन व गरजा यांच्याशी शिक्षणाचा योग्य समन्वय साधला जातो.

या उद्दिष्टांवरती आधारित शिक्षणाच्या नवीन धोरणात पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली.

१. प्रचलित शिक्षणपद्धतीत परिवर्तन करून शिक्षणाचा जनतेचे जीवन, दर्जा, आकांक्षा यांच्याशी संबंध स्थापित करणे.

२. शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे.

३. विविध क्षेत्रांतील गुणवत्तेचा शोध घेणे व विकास करणे.

४. शिक्षणाची समान संधी अधिक प्रमाणात निर्माण करण्याच्या दृष्टीने सर्व स्तरांवर व सर्व शाखांतील सोयीमध्ये वाढ करणे.

या उद्दिष्टांना अनुसरून मुलां करिता मोफत शिक्षण, शिष्यवृत्त्या, पुस्तकपेढी, फी सवलत, शासकीय विद्यानिकेतने, आदिवासी विद्यार्थ्यांकरिता विद्यावेतन यासारख्या योजना शासनाने हाती घेतल्या. याशिवाय पुढील घटकांचेही धोरण शासनाने ठरविले.

१. विद्यार्थ्यांच्या संख्येच्या प्रमाणात शाळा उघडणे.

२. शाळांना तुकड्या वाढवून देणे.

३. शिक्षकांकरिता निवृत्तीवेतन

४. अंशदाय भविष्यनिर्वाह निधी.

५. भविष्यनिर्वाह निधी पथके

६. अंध-अपंग व्यक्तींना विशेष वाहनभत्ता

७. सेवाशर्ती अधिनियम

८. शाळा इमारतीच्या बांधकामाकरिता अनुदान

९. चांगल्या इमारतीच्या बांधकामाकरिता अनुदान

१०. अनुदानातील बदल

माध्यमिक शाळांचे व्यवस्थापन व प्रशासन

महाराष्ट्रात माध्यमिक शिक्षणाचे कार्य मुख्यत्वेकरून खाजगी शिक्षण संस्थांकडे होते. महानगरपालिका, नगरपालिका इत्यादी स्थानिक स्वराज्य संस्था गरजेनुसार आपल्या कार्यक्षेत्रात माध्यमिक शाळा चालवितात. महाराष्ट्र राज्याच्या स्थापने नंतर मे १९६२ मध्ये सर्व विभागातील शासकीय शाळा जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित करण्यात आल्या. महाराष्ट्रामध्ये पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा या तीन विभागात भिन्न अभ्यासक्रम व वर्गक्रम अस्तित्वात असल्यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या. हा दोष दूर करण्यासाठी १९७२-७३ मध्ये १०+२+३ हा समान अभ्यासक्रम राज्यात टप्प्याटप्प्याने सुरू झाला. या अभ्यासक्रमानुसार इयत्ता १० वी ची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च १९७५ आणि उच्च माध्यमिक शाळांत परीक्षा मार्च १९७७ मध्ये घेण्यात आली.

(क) उच्च शिक्षण

महाराष्ट्र राज्याच्या स्थापने नंतर माध्यमिक शिक्षणाचा प्रसार वेगाने झाला. त्यामुळे महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढली. सध्याच्या तांत्रिक व वैज्ञानिक प्रगतीच्या युगात उच्च घेण्याचा कल विद्यार्थ्यामध्ये वाढत आहे. यासाठी विद्यार्थ्यांसाठी सुयोग्य व कार्यक्षम अध्यापनाची व्यवस्था करणे व विद्यापीठ कायद्यानुसार महाविद्यालयांना भाग पडत असे.

१. विद्यापीठे : सन १९६०-६१ साली महाराष्ट्रामध्ये एकूण ५ विद्यापीठे होती. १९६२-६३ मध्ये विद्यार्थी संख्या लक्षात घेऊन कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठ तर १९८३-८४ मध्ये अमरावती विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. सन १९७४ पूर्वी प्रत्येक विद्यापीठासाठी स्वतंत्र कायदा होता. परंतु १९७८ पासून यु.जी.सी. म्हणजे युनिव्हर्सिटी एज्युकेशन ॲक्ट अन्वये राज्यांतील सर्व विद्यापीठे समान कायद्याच्या अंमलाखाली आणली गेली व त्यांना स्वायत्ततेचा दर्जा देण्यात आला. ही सर्व विद्यापीठे केंद्र व राज्य शासनाच्या आर्थिक मदतीने आपआपला कारभार चालवीत आहेत. कला, विज्ञान, वाणिज्य, विधी शिक्षण, अभियांत्रिकी व वैधिक या विद्याशाखांद्वारे विद्यापीठातील शैक्षणिक कार्य चालते. सन १९८१-८२ पासून सर्व विद्यापीठातील शिक्षण आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वेतनावरील खर्चाचा भार शासनाने सांभाळला आहे. इतर खर्च मात्र विद्यापीठांनी स्वतःच्या उत्पन्नातून भागवावा.

२. महाविद्यालये : महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेवेळी म्हणजे सन १९६० साली राज्यात कला, शास्त्र, वाणिज्य, विधी शिक्षण या शाखांचे शिक्षण देणारी ११७ महाविद्यालये होती. पुढे मात्र विनाअनुदान तत्त्वावरती महाविद्यालये सुरू करण्याची परवानगी शासनाने दिली. १९६० साली महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्यांची संख्या ९२००० होती. पढे १९८५-८६ मध्ये ती ६ लाख ९८ हजार झाली. १९८५-८६ सालापासून अनुदान तत्त्वावरती महाविद्यालयांना मान्यता देण्याचा विचार सुरू झाला. विद्यापीठ अनुदान मंडळाच्या शिफारशीनुसार विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालये यातील प्राचार्य, प्राध्यापक, ग्रंथपाल, शारीरिक शिक्षण विभागाचे शिक्षक पदांच्या वेतनश्रेण १९६० पासून आणि नंतर सुधारित वेतनश्रेणी व नियमावली १९७४ च्या कायद्यान्वये करण्यात

आली. विद्यापीठ अनुदान मंडळ विद्यापीठाच्या नवीन शैक्षणिक धोरणास मंजुरी देते. तसेच अनुदानही देते. उच्च शिक्षणामध्ये पदवी व पदव्युत्तर शिक्षण, डॉक्टरेट आणि त्यानंतरचे संशोधन कार्य यांचा समावेश होतो. महाराष्ट्राच्या सर्व विद्यापीठांमधून यासंबंधीची व्यवस्था करण्यात आली आहे.

स्वयं अध्ययन प्रश्न–१

(अ) योग्य पर्याय निवडा.

१. डॉ. डी. एस. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली ..... साली आयोग नेमण्यात आला.

(अ) १९६४ (ब) १९६६ (क) १९६८ (ड) १९७२

२. १९७२–७३ मध्ये ..... हा समान अभ्यासक्रम राज्यात टप्प्याटप्प्याने सुरू झाला.

(अ) १०+२+३ (ब) १०+३+२

(क) १२+२+३ (ड) १०+१+१

३. १८५४ मध्ये..... यांनी शिक्षणाबाबत नवी भूमिका मांडली.

(अ) वूड (ब) लॉर्ड वेलस्ली

(क) कॉर्नवालीस (ड) हंटर

४. हंटर आयोगाने ..... शिक्षणाबाबत आपल्या शिफारशी सांगितल्या.

(अ) उच्च शिक्षण (ब) प्राथमिक शिक्षण

(क) माध्यमिक शिक्षण (ड) तंत्रशिक्षण

५. ..... याने भारतीय विद्यापीठ आयोगाची स्थापना केली.

(अ) लॉर्ड कर्झन (ब) लॉर्ड डलहौसी

(क) लॉर्ड वेलस्ली (ड) लॉर्ड रिपन

(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.

१. साक्षरतेच्या बाबतीत महाराष्ट्राचा क्रमांक कोणत्या राज्याच्या खालोखाल लागतो ?

२. कोणत्या साली जिल्हा परिषदेची स्थापना झाली ?

३. कोणत्या साली शाळांना व शिक्षकांना पुरस्कार देण्याचे सुरू केले ?

४. प्राथमिक शिक्षणाचा अधिनियम कोणत्या साली अंमलात आला ?

५. वयाच्या कोणत्या वयापर्यंत सर्व मुला–मुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले ?

३.२.२ प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण

(अ) प्राथमिक शिक्षण : १ एप्रिल १९४९ पासून प्राथमिक शिक्षण अधिनियम अंमलात आला. १ मे १९६२ रोजी जिल्हा परिषदेची स्थापना झाली. शिक्षण, लोककल्याण, लोकविकास, संस्कृती-संक्रमणाचे साधन असल्यामुळे शिक्षण हे जिल्हा परिषद आणि पंचायत समिती यांच्याकडे सोपविले गेले.

भारतीय राज्यघटनेतील तरतुदीनुसार वयाच्या १४ वर्षांपर्यंतच्या सर्व मुलामुलींना सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण देणे कायद्याने बंधनकारक केले गेले. पण हे उद्दिष्ट अद्यापही साध्य होऊ शकले नाही असे असले तरी प्राथमिक शिक्षणाचा विस्तार झपाट्याने झाल्याने दिसून येईल. प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत योजना आखताना पुढील तत्त्वे डोळ्यासमोर ठेवण्यात आली आहेत.

१. प्राथमिक शिक्षणावर लक्ष केंद्रीत करणे.

२. शैक्षणिकदृष्ट्या विकसित भागापेक्षा अविकसित भागाकडे अधिक लक्ष देणे.

३. शैक्षणिक वाढीबरोबर शैक्षणिक गुणवत्तेकडे लक्ष देणे.

४. औपचारीक शिक्षणाबरोबर अनौपचारिक शिक्षणावर भर देणे.

५. पुस्तकी शिक्षणापेक्षा कार्यानुभव शिक्षणावर भर देणे.

६. शिक्षकांच्या सेवापूर्व शिक्षणा बरोबर सातत्याने चालणाऱ्या सेवांतर्गत प्रशिक्षणावर लक्ष देणे.

७. वर्षाच्या शेवटी मूल्यमापन करण्यापेक्षा अंतर्गत मूल्यमापन करणे.

प्राथमिक शिक्षणाच्या संख्यात्मक आणि गुणात्मक वाढीसाठी केलेले प्रयत्न

१. पुस्तक पेढी योजना : ग्रामीण, आदिवासी व डोंगराळ भागातील दारिद्र्यरेषेखाली जीवन कंठीत असलेल्या कुटुंबातील शाळेत जाणाऱ्या मुलांना क्रमिक पुस्तके व शैक्षणिक साहित्य उपलब्ध होत नाही, परिणामी त्यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणावर गळती होते. हा गळती स्थगितीचा बिकट प्रश्न सोडविण्यासाठी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती, भटक्या जमाती व समाजातील दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देण्याकरिता शासनाने १९७६ पासून पुस्तकपेढीची योजना हाती घेतली आहे. सुरुवातीला १ ते ४ या वर्गासाठी सध्या ती १०वी च्या वर्गांनाही लागू केली आहे. पुस्तकांचे संच दर ३ वर्षांनी बदलून नवीन संच देण्यात येतात.

२. बालवाड्या उघडणे : शिक्षणाचे सार्वत्रीकरण व्हावे आणि मुले शाळेत रमावीत यासाठी पार्श्वभूमी तयार करण्याच्या हेतूने ज्या गावची लोकसंख्या २०० ते ५०० पर्यंत आहे अशा गावातून एक-शिक्षकी शाळांमधून बालवाड्या उघडण्याचे ठरविण्यात आले. या योजनेची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१. मुलांना शाळेची परिस्थिती अवगत करून देणे.

२. त्यांना चांगल्या व आरोग्यकारक सवयी लावणे.

३. खेळाच्या माध्यमांतून ज्ञानेंद्रियांचा विकास करणे.

४. मुक्त हालचाली, खेळ, मनोरंजनाचे कार्यक्रम याद्वारे त्यांना कृतिशील बनविणे.

५. परिणामी विद्यार्थ्यांची गळती कमी करून त्यांचे शाळेत टिकून राहण्याचे प्रमाण वाढविणे.

३. अनुसूचित जाती–जमातीच्या विद्यार्थ्यांना विशेष सवलती

या विद्यार्थ्यांच्या नियमित उपस्थितीला प्रोत्साहन देण्यासाठी अनुसूचित जाती–जमातीच्या मुला–मुलींना गणवेशाचे संच, लेखनसाहित्य मोफत पुरविले जाते. तसेच आदिवासी भागातील मुला–मुलींनाही अशा प्रकारच्या विशेष सवलती दिल्या जातात. कारण त्यांच्यातील गळती व स्थगितीचे प्रमाण कमी व्हावे.

४. शिक्षकांसाठी निवासस्थाने बांधणे

आदिवासी भागात व डोंगराळ भागात काम करणाऱ्या शिक्षकांना राहण्यासाठी जागा मिळणे फार कठीण जाते. त्यामुळे अशा भागात नेमणूक झालेले शिक्षक तिकडे जाण्यास फारसे उत्सुक नसतात. परिणामी मुलांच्या शिक्षणाची हेळसांड हेते. या योजनेनुसार तसेच निवासस्थानाची सोय केली जाते व मुलांची सोय केली जाते.

५. आदर्श शिक्षकांना पुरस्कार

ग्रामीण भागातील शिक्षकांना उत्तेजन मिळावे म्हणून १९८३–८४ पासून शिक्षकांना, शाळेला पुरस्कार देण्याची योजना राबविली गेली. शिक्षकांनी ग्रामीण भागात चांगले कार्य करावे हा यामागील मुख्य उद्देश होता.

६. नवीन प्राथमिक शाळा उघडणे

सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करणे व प्रत्येक मुलाला आपल्या राहण्याच्या ठिकाणापासून चालत जाणे शक्य होईल, इतक्या अंतरावर शिक्षणाची सोय करून देणे या योजनेनुसार नवीन प्राथमिक शाळा उघडल्या गेल्या.

*** शैक्षणिक गुणवत्ता वाढीच्या योजना**

प्राथमिक शिक्षणामध्ये संख्यात्मक वाढीबरोबरच शैक्षणिक गुणवत्ता वाढीचा योजना राबविल्या गेल्या. त्या खालीलप्रमाणे –

१. शाळा तपासणीचे स्वरूप बदलणे.

२. शिक्षकांवरील इतर कामाचा बोजा कमी करणे.

३. शाळा समूह योजनेअंतर्गत शाळांचा एकाकीपणा दूर करणे.

४. यशस्वीरित्या काम करणाऱ्या शाळा व शिक्षक यांना प्रोत्साहन

५. उपयुक्त पुस्तकांची निर्मिती

६. शैक्षणिक साधननिर्मिती

७. प्राथमिक शिक्षकांचे संयुक्त मंडळ

८. स्थगिती आणि गळती संबंधी काही प्रतिबंधात्मक उपाययोजना

९. शिक्षकांचे प्रशिक्षण

१०. पत्रद्वारा प्रशिक्षण योजना

इ. योजनांद्वारे प्राथमिक शिक्षणामध्ये संख्यात्मक वाढी बरोबर शैक्षणिक गुणवत्ता वाढीचा योजना राबविल्या गेल्या.

(ब) माध्यमिक शिक्षण : माध्यमिक शिक्षणाच्या विकासासाठी योजना आलेल्या पुढीलप्रमाणे – यामध्ये (१) माध्यमिक शाळांचे व्यवस्थापन, (२) माध्यमिक शाळा संहिता या दोन मुद्द्यांचा अभ्यास मागे केला आहे.

माध्यमिक शिक्षण म्हणजे कुमारावस्थेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी दिले जाणारे सर्वसामान्य तांत्रिक, व्यावसायिक अगर विशेष शिक्षण होय. महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळ कायदा XLI (1965)

*** माध्यमिक शिक्षणाचा विकास**

माध्यमिक शिक्षणाचा विकास पाहताना स्वातंत्र्यपूर्वक आणि स्वातंत्र्योत्तर काळ असा पहावा लागेल.

(अ) स्वातंत्र्यपूर्वकाळ

स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजांनी भारतात सुरू केलेले शिक्षण हे कारकून तयार करणे व ते त्यांच्या प्रशासनासाठी वापरणे इतकेच उद्दिष्ट ठेवून ब्रिटिशांनी शिक्षण व्यवस्था भारतात राबविली. यासंदर्भात लॉर्ड मेकॉले म्हणतो, ''इंग्रजी शिक्षण घेतल्यामुळेच या देशामध्ये असा एक वर्ग निर्माण होईल की जो रक्त व वर्णाने भारतीय असेल, परंतु आवड, विचार, नैतिकता आणि विद्वत्ता या बाबतीत तो पूर्णपणे इंग्रज झालेला असेल.

१. वुडचा खलिता (१८५४)

१८५४ मध्ये वूडने शिक्षणाबाबत नवीन भूमिका मांडली –

१. शिक्षणाची जबाबदारी कंपनीची आहे.

२. इंग्रजी भाषेप्रमाणे इतर भाषांनाही अभ्यासक्रमात स्थान द्यावे.

३. मुंबई, मद्रास येथे विद्यापीठांची स्थापना करावी.

४. माध्यमिक शळांना सरकारी अनुदान द्यावे.

५. शिक्षक–प्रशिक्षणाचा प्रयत्न जाणीवपूर्वक करावा.

६. व्यावसायिक व स्त्री शिक्षणाची शिफारस केली.

यामुळे इंग्रजी शिक्षणाचे एक नवे युग निर्माण झाले.

२. हंटर आयोग (१८८२)

१८८२ साली झालेल्या हंटर आयोगाने माध्यमिक शिक्षणाबाबत खालील शिफारशी सुचविल्या.

१. माध्यमिक शिक्षणाची जबाबदारी भारतीयांवर सोपवावी.

२. त्यांना फक्त सहाय्यता अनुदान द्यावे.

३. सरकारी–माध्यमिक शाळांची जबाबदारी शासनाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांच्याकडे द्यावी.

४. प्रत्येक जिल्ह्यासाठी एक हायस्कूल असावे.

५. साहित्य आणि व्यावसायिक असा दोन प्रकारचा अभ्यासक्रम असावा.

६. शिक्षणाचे माध्यम इंग्रजी तसेच देशी भाषेतही असावे.

३. भारतीय विद्यापीठ आयोग (१९०२)

गव्हर्नर जनरल लॉर्ड कर्झन याने या आयोगाची स्थापना केली. यातील शिफारसी खालीलप्रमाणे आहेत –

१. माध्यमिक शिक्षणाचा गुणात्मक विकास व्हावा.

२. शाळा मान्यतेचे नियम कडक केले जावेत.

३. शासनाची मान्यता घेतल्या शिवाय शाळा सुरू करू नये.

४. अनुदानाचे नियम पूर्वीपेक्षा कडक करण्यात आले.

५. शिष्यवृत्तीची सोय करण्यात आली.

४. हरटाँग समिती (१९२९)

यातील शिफारसी खालीलप्रमाणे होत्या :

१. अभ्यासक्रम जीवनोपयोगी असावा.

२. ऐच्छिक विषयांचा समावेश असावा.

३. प्रशिक्षण विद्यालयांचा दर्जा सुधारावा.

४. सेवाशर्ती व वेतनामध्ये सुधारणा करावी.

५. सप्रु समिती (१९३४)

या समितीने पुढील शिफारशी केल्या.

१. अभ्यासक्रमांची सुविधा माध्यमिक स्तरावर असावी.

२. व्यावसायिक शिक्षणाची सुरुवात इ. ९वी पासून करावी.

३. माध्यमिक शिक्षण ६ वर्षांचे असावे.

४. इंटरमिजिएट रद्द करणे.

५. विद्यापीठ बदली ३ वर्षाची असावी.

६. वर्धा योजना (१९३३)

महात्मा गांधीजींनी ही योजना सांगितली. यामध्ये शिक्षण हे व्यवसायावर आधारित असावे असे सांगितले गेले.

७. सार्जंट अहवाल (१९४४)

१. माध्यमिक शिक्षण ६ वर्षांचे असावे.

२. विद्यार्थी पात्रतेनुसार हायस्कूल प्रवेश द्यावा.

३. ५० टक्के विद्यार्थ्यांना मोफत व ५० टक्के विद्यार्थ्यांना शुल्काधारित शिक्षण द्यावे.

४. तांत्रिक हायस्कूल आणि विद्ववत हायस्कूल असे दोन प्रकार असावेत.

५. व्यावसायिक शिक्षणाला महत्त्व द्यावे.

(ब) स्वातंत्र्योत्तर काळ

१. मुदलीयार आयोग

या आयोगाने पुढील शिफारशी सुचविल्या.

१. माध्यमिक शिक्षण सात वर्षांचे असावे.

२. यातील मुलांचा वयोगट ११ ते १७ वर्षांचा असावा.

३. पदवी शिक्षण तीन वर्षांचे असावे.

४. सरकारने बहुद्देशीय शाळा स्थापन कराव्यात.

५. ग्रामीण शाळामध्ये कृषीकाम, बागकाम, पशुपालन इ.चे शिक्षण द्यावे.

६. मोठ्या शहरात तंत्रनिकेतने उभारावीत.

७. मुलींच्या शाळा स्थापन कराव्यात.

८. नैतिक शिक्षणाची अंमलबजावणी करावी.

९. वस्तुनिष्ठ प्रश्नांची संख्या जास्त ठेवावी.

१०. शिक्षकांसाठी निवृत्तीवेतन, भविष्यनिर्वाह निधीची योजना असावी.

११. शिक्षणाचे माध्यम मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषेत असावे.

२. कोठारी आयोग (१९६४-६६)

या आयोगाने सुचविलेल्या शिफारशी पुढीलप्रमाणे -

१. प्राथमिक शिक्षण पहिली ते सातवीपर्यंत दिले जावे.

२. माध्यमिक शिक्षण आठवी ते दहावी पर्यंत दिले जावे.

३. उच्च माध्यमिक शिक्षण २ वर्षाचे म्हणजे ११ वी व १२ वी पर्यंत असावे.

४. उच्च शिक्षण किंवा पदवी शिक्षण तीन वर्षांचे असावे.

५. शाळेत प्रवेश घेताना मुलाचे वय ६ वर्षांपेक्षा कमी नसावे.

६. माध्यमिक शाळांची सोय चांगल्या ठिकाणी असावी.

७. व्यावसायिक शिक्षणाची सोय १९८५ पर्यंत ५०% व्हावी.

८. मुलींच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न करावेत.

९. सहशिक्षण देणाऱ्या शाळा सुरू कराव्यात.

१०. त्रीभाषा सुगावा अवलंब करावा. (मराठी + इंग्रजी + हिंदी)

११. १० + २ + ३ असा नवा आकृतीबंध असावा.

१२. शिष्यवृत्तीमध्ये वाढ करावी.

३. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९८६)

या नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार -

१. शिक्षकांचा दर्जा सुधारावा.

२. शैक्षणिक संधीची समानता असावी.

३. त्रिभाषा सूत्र अवलंबिले जावे.

४. कृषी व उद्योग धंद्याचे शिक्षण दिले जावे.

४. ईश्वरभाई समिती (१९७७)

१. घटनेप्रमाणे आदर्श नागरिक घडविण्याचे शिक्षण द्यावे.

२. शिक्षणाची समान संधी

३. समाजोपयोगी, सामाजिक बांधिलकी जपणारे शिक्षण द्यावे.

४. दहावी परीक्षेसाठी सात पेक्षा जास्त विषय असू नयेत.

५. राममूर्ती आयोग (१९९०)

राममूर्ती आयोगाने खालील शिफारशी सुचविल्या.

१. महिलांचे शिक्षण यावर भर देणेत आला.

२. मुला-मुलींचे गळती रोखण्यासाठी ठोस उपाय.

३. परीक्षा पद्धतीमध्ये सुधारणा सुचविल्या.

स्वयं अध्ययन प्रश्न-२

(अ) योग्य पर्याय निवडा.

१. १९६० साली महाराष्ट्रामध्ये ..... विद्यापीठे होती.

(अ) २ (ब) ३ (क) ५ (ड) ११

२. वूडच्या अहवालानुसार भारतात सुरुवातीला ..... विद्यापीठे स्थापन झाली.

(अ) ३ (ब) ४ (क) ५ (ड) ६

३. १९०४ साली ..... कायदा पास झाला.

(अ) भारतीय विद्यापीठ कायदा (ब) इंडियन एज्युकेशन कमिशन

(क) विद्यापीठ समिती (ड) सप्रू कायदा

४. तज्ज्ञ प्राध्यापकांची कमतरता ही ..... शिक्षणाची समस्या आहे.

(अ) उच्च शिक्षण (ब) प्राथमिक शिक्षण

(क) माध्यमिक शिक्षण (ड) तंत्रशिक्षण

५. महाराष्ट्रामध्ये ..... कृषी विद्यापीठे आहेत.

(अ) ३ (ब) ४ (क) ३ (ड) ६

(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.

१. महात्मा गांधीजींनी शिक्षण हे व्यवसायावर आधारित असावे हे कोणत्या योजनेत सांगितले ?

२. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण कोणत्या साली सुरू झाले ?

३. राममूर्ती आयोगाने कोणत्या शिक्षणावरती भर दिला ?

४. माध्यमिक शिक्षणाची जबाबदारी भारतीयांवर सोपवावी असे कोणत्या आयोगाने सुचविले ?

५. शासनाच्या मान्यतेशिवाय शाळा सुरू करू नयेत असे कोणता आयोग म्हणतो ?

३.२.३ उच्च आणि तांत्रिक शिक्षण

❊ उच्च शिक्षण

ब्रिटिश काळात आजच्या विद्यापीठीय शिक्षणाच्या संकल्पनेनुसार उच्च किंवा विद्यापीठीय शिक्षणाचा पाया घातला गेला. १८५३ मध्ये हाऊस ऑफ कॉमन्सची एक समिती भारतातील शैक्षणिक विकासाचा आढावा घेण्यासाठी नेमली गेली या समितीच्या वृत्तांतावर आधारित चार्ल्स वुडने यासंबंधीचा अहवाल लिहिला. त्यास वुडचा अहवाल म्हणतात. या अहवालातील तरतुदीनुसार भारतातील प्रत्येक प्रांतात शिक्षण खाते सुरू करण्यात यावे आणि कलकत्ता, मुंबई व मद्रास येथे विद्यापीठे स्थापन करण्यात यावीत या अहवालाचा परिणाम म्हणून कलकत्ता, मुंबई व मद्रास येथे लंडन विद्यापीठाच्या धर्तीवर विद्यापीठे स्थापन झाली आणि भारतात उच्च शिक्षणाचा पाया ब्रिटिशांनी घातला. १९८६ साली तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर झाले. या धोरणात उच्च शिक्षणाबाबत महत्त्वपूर्ण निर्णय झाले. त्यामध्ये उच्च शिक्षणात सर्वांना समान संधी, शिक्षणाच्या गुणात्मक विकासावर भर तर मुक्त विद्यापीठ प्रणाली इ. गोष्टींवर भर देण्यात आला.

❊ उच्च शिक्षणाच्या विकासातील टप्पे

१. स्वातंत्र्यपूर्व काळातील उच्च शिक्षण

१. १८५४ च्या वुडच्या खलित्याने भारतात विद्यापीठीय शिक्षणाचा पाया घातला गेला. त्यानुसार लंडन विद्यापीठाच्या धर्तीवर मुंबई, कलकत्ता व मद्रास येथे विद्यापीठांची स्थापना करण्यात आली. परीक्षा घेणे, पदव्या बहाल करणे ही कामे विद्यापीठाकडे बहाल केली गेली. कला, कायदा, अभियांत्रिकी, वैद्यकशास्त्र इ. विषयाच्या परीक्षा घेऊन विद्यापीठे पदव्या बहाल करीत असत. सन १८५७ मध्ये महाविद्यालयांची संख्या २७ होती तर १८८२ मध्ये ती ७२ वर गेली.

२. १८८२ मध्ये इंडियन एज्युकेशन कमिशनची स्थापना झाली. या कमिशनने उच्च शिक्षणाबाबत ज्या शिफारशी केल्या त्यामुळे उच्च शिक्षणाच्या प्रसाराला गती मिळाली. सन १८८२ मध्ये पंजाब विद्यापीठाची तर इ.स. १८८७ मध्ये अलाहाबाद विद्यापीठाची स्थापना झाली. १९ व्या शतकाच्या शेवटी भारतात उच्च शिक्षण देणारी एकूण ५ विद्यापीठे होती.

३. १९०२ मध्ये ग. ज. लॉर्ड कर्झनने विद्यापीठ आयोगाची नियुक्ती केली. यानुसार विद्यापीठाच्या प्रशासनाची पुनर्रचना करणे, सलग्न महाविद्यालयांवर विद्यापीठामार्फत कडक व पद्धतशीर पर्यवेक्षण करणे व सलग्नीकरणाच्या अधिक काटेकोर पद्धतीचा अवलंब करणे. १९०२ मध्ये महाविद्यालयांची संख्या जवळजवळ १४५ वर गेली.

४. १९०४ साली इंडियन युनिव्हर्सिटी ॲक्ट पास झाला. या कायद्यानुसार भारतातील ५ विद्यापीठांच्या प्रशासनाची पुनर्मांडणी करण्यात आली. महाविद्यालयांवरती कडक नियंत्रण आले. परिणामी १९१२ मध्ये महाविद्यालयांची संख्या १४५ वरून १४० वर आली. मात्र विद्यार्थी संख्येत वाढ झाली. नंतर मात्र बनारस

विद्यापीठ (१९१७), पाटणा विद्यापीठ (१९१७), उस्मानिया विद्यापीठ (१९१८), ढाक्का, अलिगड व लखनौ विद्यापीठ (१९२०) स्थापन झाली. १९२१ मध्ये विद्यापीठांची संख्या १२ वर गेली. ही सर्व विद्यापीठे वसतीगृहयुक्त होती.

५. १९१९ च्या माँटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा कायद्यानुसार शिक्षण खाते प्रांतिक सरकारच्या ताब्यात आले. या काळात राष्ट्रीय आंदोलनाचा जोर वाढत होता. त्यामुळे राष्ट्रीय विचारांचा पुरस्कार करणारी विद्यापीठे निघाली.

६. बॅरीस्टर जयकर समितीची निर्मिती १९४२ मध्ये झाली. त्यांनी पुणे विद्यापीठाच्या स्थापनेसाठी शिफारस केली. विद्यापीठांची संख्या १५ वरून १७ झाली. तर महाविद्यालयांची संख्या २३ वरून ४२ वर गेली. तसेच अभियांत्रिकी महाविद्यालयांची संख्या ६ वरून १६ वर गेली.

२. स्वातंत्र्योत्तर काळातील उच्च शिक्षण

फाळणीनंतर देशात १९ विद्यापीठे होती. स्वातंत्र्योत्तर काळात इ.स. १९४८ मध्ये डॉ. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठ आयोगाची नियुक्ती झाली. स्वातंत्र्योत्तर काळातील लोकांच्या गरजांचा विचार करून तयार झालेला हा पहिला अहवाल. देशाच्या औद्योगिक प्रगतीसाठी तांत्रिक व विज्ञान महाविद्यालये मोठ्या संख्येन सुरू करावीत अशी शिफारस या आयोगाने केली. या आयोगाच्या शिफारशीनुसार इ.स. १९५६ मध्ये विद्यापीठ अनुदान मंडळाची स्थापना करण्यात आली. १९७१-७२ मध्ये विद्यापीठांची संख्या ९५ झाली. याशिवाय १२ संस्थांना १९६६ मध्ये विद्यापीठाचा दर्जा अर्पण करण्यात आला. १९६४ मध्ये कोठारी आयोगाची नियुक्ती करण्यात आली. या आयोगाने स्वातंत्र्योत्तर काळातील विद्यापीठ शिक्षणाची उद्दिष्टे प्रथमच सुस्पष्ट मांडली. ती पुढीलप्रमाणे -

(अ) नव्या ज्ञानाचे शोधन व संवर्धन

(ब) जीवनाच्या सर्व क्षेत्रात समर्थ नेतृत्व उपलब्ध करून देणे.

(क) विविध व्यवसायासाठी सामाजिक उद्दिष्टांची जाणीव असलेले संपन्न व्यक्तिमत्त्वाचे प्रशिक्षित स्त्री-पुरुष देणे.

(ड) शिक्षण प्रसाराद्वारा सामाजिक व सांस्कृतिक विषमता कमी करून समता व सामाजिक न्याय यांचा विकास करणे.

(इ) व्यक्ती आणि समाज यांना 'सुंदर जीवन' जगता येण्यासाठी आवश्यक मूल्ये व वृत्ती बनविणे.

*** नवीन शैक्षणिक धोरण १९८६**

इ.स. १९८६ मध्ये उच्च शिक्षणाचा आशय व शैक्षणिक प्रक्रिया यांचा पुनर्विचार करण्यात आला. केंद्र शासनाच्या धोरणविषयक मसुद्यामध्ये (परिशिष्ट ५) उच्च शिक्षणाची चर्चा केली आहे, त्यामध्ये खालील अपेक्षा व्यक्त केल्या आहेत.

१. उच्च शिक्षणचा विकास राष्ट्रीय गरजा पूर्ण करण्याच्या संदर्भात व्हावा. उच्च शिक्षणाच्या संधी सर्वांना उपलब्ध व्हाव्यात.

२. देश स्वावलंबी होण्यासाठी उच्च शिक्षणाची गुणवत्ता जागतिक पातळीवर उच्च श्रेणीची व दर्जाची असणे जरुरीचे आहे.

३. उच्च शिक्षण संस्थातून विकसित केले जाणारे ज्ञान हे अर्थपूर्ण व सामाजिक गरजांशी सुसंवादी असावे.

४. विद्यार्थ्यांमध्ये मूल्ये, अभिवृत्ते व इतर सामाजिक गुण रुजविणे हे देखील उच्च शिक्षणाचे अंग असावे.

वरील अपेक्षांच्या संदर्भात अनेक शिफारशी केल्या गेल्या. त्यापैकी महत्त्वाच्या खालीलप्रमाणे :

(अ) परीक्षा पद्धतीत सुधारणा करावी.

(ब) केंद्रीय विद्यापीठ अनुदान मंडळाची स्थापना करावी.

(क) प्राध्यापकांचे पगार केंद्र व राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांपेक्षा कमी असू नयेत.

(ड) अध्यापनाच्या क्षेत्रात अत्युत्कृष्ट प्रज्ञेच्या व्यक्तीची निवड व्हावी.

(इ) पदवीपूर्व अध्यापन प्रादेशिक भाषेतून करावे.

*** उच्च शिक्षणातील समस्या**

१. वाढत्या लोकसंख्येमुळे शिक्षणाची वाढती गरज

२. शिक्षणासाठी इमारतींचा अभाव

३. साहित्यसंदर्भाचा अभाव

४. तज्ञ प्राध्यापकांची कमतरता

५. शिक्षणावरील खर्चासाठी आर्थिक पुरवठ्याचा अभाव

६. अभ्यासक्रमाची पुनर्रचना नाही.

७. मूल्यमापन पद्धती मध्ये विसंगती

८. व्यावसायिक निश्चितता नाही

९. बेकारीचे वाढते प्रमाण

१०. कामाचे दिवस कमी

११. नापास व गळतीचे प्रमाण जास्त

१२. विद्यापीठांना स्वायत्तता नाही

१३. दर्जेदार संशोधनाचा अभाव

*** महाराष्ट्रातील विद्यापीठे**

महाराष्ट्रामध्ये उच्च शिक्षणाची गंगा घरोघरी पोहोचविण्यासाठी अनेक विद्यापीठे आज कार्यरत आहेत ती खालीलप्रमाणे :

१. नागपूर विद्यापीठ (१९२३)

२. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे (१९४८)

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद (१९५६)

४. मुंबई विद्यापीठ, मुंबई (१८५७)

५. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

६. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (१९६२)

७. स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

८. श्रीमती नाथिबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई

९. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर (२००४)

१०. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे

११. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

१२. गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

१३. कवी कुलगुरू कालीदास संस्कृत विद्यापीठ

१४. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

१५. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

याशिवाय ४ कृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे आणि खाजगी विद्यापीठे वेगळी आहेत.

*** तांत्रिक शिक्षण**

आधुनिक काळात विज्ञानाचा व्यावहारीक उपयोग करून समाजोपयोगी व्यवसायांचे तंत्रज्ञान देणाऱ्या शिक्षणाला तांत्रिक शिक्षण म्हणतात. तंत्रज्ञानाबरोबर मानव्यविद्येचे सर्वसाधारण ज्ञानही आधुनिक तांत्रिक शिक्षणक्रमात समाविष्ट असते. देशाच्या अर्थव्यवस्थेत उद्योगधंद्यातील उत्पादनाला महत्त्व असते. उत्पादनाचा दर्जा चांगला ठेवण्यास व उत्पादनाचा वेग वाढविण्यास आधुनिक उत्पादन तंत्राचा उपयोग करावा लागतो. विविध

व्यवसायांचे तंत्रज्ञान तर आवश्यक असतेच परंतु विज्ञान आणि तांत्रिक शाखांतील मूलतत्त्वे यांची माहिती असणे आवश्यक असते. उद्योग-धंद्यात साधारणतः तीन स्तरांवरील तंत्रज्ञानाची जरूरी असते. ते तीन स्तर पुढीलप्रमाणे : (१) कुशल कामगार (२) पर्यवेक्षक (३) उत्पादन तज्ञ, अभिकल्पक आणि व्यवस्थापन तज्ञ या तीनही स्तरावरील शिक्षणाची ध्येये विभिन्न असतात.

स्वातंत्र्यपूर्वकाळापासूनच भारतात उद्योगधंद्याच्या निर्मितीला सुरुवात झाली. यासाठी भारतीय उद्योगपतीनी ही उद्योगधंद्याच्या तांत्रिक शिक्षणाच्या चळवळीना खतपाणी घातले. १८४७ ते १८५८ मध्ये ४ अभियांत्रिकी महाविद्यालये निघाली. रुडकी (१८४७), पुणे (१८५४), कलकत्ता (१८५६), मद्रास (१८५८) ही महाविद्यालये स्थानिक विद्यापीठांना सलग्न करण्यात आली. १८८७ साली मुंबईला व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिट्यूट चालू झाली. येथे पदवीपर्यंतचे शिक्षण दिले जात होते. १९०७ साली बेंगलोर येथे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सची स्थापना केली. येथे पदव्युत्तर शिक्षणाची सोय केली गेली. १९१७ साली बनारस विद्यापीठाची स्थापना झाली. तेथेही विविध महाविद्यालयामधून तांत्रिक शिक्षणाची सुरुवात झाली. १९४७ साली पदवी शिक्षण देणाऱ्या ३८ व पदविका शिक्षण देणाऱ्या ५३ संस्था होत्या. त्यामधून १२७० तंत्रज्ञ पदवी व १४४० तंत्रज्ञपदविका घेऊन बाहेर पडले. १९६० पर्यंत पदवी शिक्षण देणाऱ्या १०२ संस्था व पदविका शिक्षण देणाऱ्या १९५ संस्था स्थापन झाल्या. त्यामधून ५७०० पदवीधर व ७९७० पदविकाधारक बाहेर पडले. १९४६ साली भारत सरकारने उच्च शिक्षणाकरिता एक समिती नेमली. त्यानुसार खरगपूर (१९५१), मुंबई (१९५८), कानपूर व मद्रास (१९५९), नवी दिल्ली (१९६१) येथे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी नावाच्या ५ संस्था स्थापन केल्या गेल्या.

स्वातंत्र्यानंतर तांत्रिक शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयांची संख्या झपाट्याने वाढली. १९६० नंतर औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची वाढ वेगाने झाली. १९७० साली भारतात अशा ३५६ संस्था होत्या. त्यामध्ये ९८,६७७ विद्यार्थी शिक्षण घेत होते.

महाराष्ट्रामधील काही संस्था तांत्रिक शिक्षणाचे काम करीत होत्या. १९६० साली मुंबई येथे ०२ आणि पुणे, सांगली, कराड, नागपूर येथे प्रत्येकी ०१ अशी ०६ अभियांत्रिकी महाविद्यालये स्थापन झाली. तर ११ तंत्रनिकेतने होती. १९७० मध्ये ही संख्या ९ महाविद्यालये व २५ तंत्रनिकेतने निर्माण झाली. मुंबई येथे नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ट्रेनिंग इन इंडस्ट्रियल इंजिनिअरिंग स्थापन केले.

*** तांत्रिक महाविद्यालये**

भारतात ५ प्रकारची तांत्रिक महाविद्यालये आहेत.

(अ) इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बिर्ला इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड सायन्स (पिलानी) आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (बंगलोर) या स्वायत्ता संस्था असून त्यांना विद्यापीठाची श्रेणी लोकसभेच्या कायद्यान्वये दिलेली आहे.

(आ) प्रादेशिक अभियांत्रिकी महाविद्यालये ही महाविद्यालये स्वायत्ता संस्था असून स्थानिक विद्यापीठला संलग्न असतात.

(इ) राज्य सरकार आणि खाजगी संस्थांनी चालविलेली महाविद्यालये ही सर्व स्थानिक विद्यापीठाला सलग्न असतात.

(ई) स्वतंत्र तांत्रिक विद्यापीठ रुडकी विद्यापीठात अभियांत्रिकी पदवी परीक्षांचे शिक्षण दिले जाते.

(ड) विद्यापीठातील स्वतंत्र विभाग उदा. मुंबई विद्यापीठाचे डिपार्टमेंट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, नागपूर विद्यापीठाची लक्ष्मीनारायण इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी.

*** पदव्युत्तर शिक्षण व संशोधन :**

भारतामध्ये ५ ठिकाणी पदव्युत्तर शिक्षण व संशोधन देणाऱ्या संस्था आहेत.

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बिर्ला इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अॅन्ड सायन्स तसेच राष्ट्रीय प्रयोगशाळा इ. मधून पदव्युत्तर शिक्षण व संशोधन सुरू आहे.

*** भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद** (All India Council of Technical Education)

ही सर्वोच्च संस्था तांत्रिक शिक्षणाच्या गुणवत्तेचे व नियंत्रणाचे कार्य करते. ही संस्था १९४६ साली स्थापन झाली असून ती खालीलप्रमाणे कार्य करते.

१. तांत्रिक शिक्षणाचा विकास करणे व त्यास व्यावसायिकता देणे.

२. केंद्र व राज्याच्या नियोजनात समन्वय साधणे.

३. सध्याच्या शिक्षण व्यवस्थेतील दोष दूर करणे.

४. शुल्क आकारण्याचे निकष ठरविणे.

५. तंत्रशिक्षणाला फंड पुरविणे.

६. शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता यांचे नियोजन करणे.

या क्षेत्रातील शिक्षणाची प्रचंड मागणी लक्षात घेता शासनाने नवीन खाजगी शिक्षण क्षेत्रांना मान्यता दिली आहे. तरीही या क्षेत्रातील विद्यार्थ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यावर काही उपाययोजना –

*** उपाययोजना**

१. कुशल तंत्रज्ञानाचा पुरवठा करणे.

२. अभ्यासक्रमाचा समन्वय साधणे.

३. मनुष्यबळाची कल्पना देणारी यंत्रणा देणे.

४. निरंतर शिक्षणास प्रोत्साहन देणे.

५. शालेय स्तरापासून Technology चे ज्ञान देणे.

६. सामाजिकदृष्ट्या वंचितांना संधी व दुर्बलांना संधी देणे.

७. तज्ञ शिक्षकांची नेमणूक करणे.

८. स्वयंरोजगार प्रशिक्षणास उत्तेजन देणे.

९. अभ्यासक्रमाची पुनर्रचना करणे.

१०. वसतिगृहांची निर्मिती करणे.

११. स्वायत्ततेचे धोरण अवलंबिणे.

१२. प्रशिक्षित शिक्षकांच्या नियुक्ती करणे.

स्वयं अध्ययन प्रश्न–३

(अ) योग्य पर्याय निवडा.

१. भारतात उच्च शिक्षणाचा पाया यांनी घातला.

(अ) ब्रिटिश (ब) डच (क) फ्रेंच (ड) पोर्तुगीज

२. ..... साली इंडियन एज्युकेशन कमिशनची स्थापना झाली.

(अ) १८८० (ब) १८८१ (क) १८८२ (ड) १८८३

३. ..... साली इंडियन युनिव्हर्सिटी ॲक्ट पास झाला.

(अ) १९०१ (ब) १९०२ (क) १९०३ (ड) १९०४

४. नागपूर विद्यापीठाची स्थापना ..... साली झाली.

(अ) १९२१ (ब) १९२२ (क) १९२३ (ड) १९२४

५. १८४७ ते १८५८ या काळात ..... अभियांत्रिकी महाविद्यालये होती.

(अ) २ (ब) ३ (क) ४ (ड) ५

(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.

१. १८४७ ते १८५७ दरम्यान किती अभियांत्रिकी महाविद्यालये स्थापन झाली ?

२. बनारस विद्यापीठाची स्थापना केव्हा झाली ?

३. १९६० साली महाराष्ट्रामध्ये किती अभियांत्रिक महाविद्यालये होती ?

४. तांत्रिक शिक्षणावरती कोणती सर्वोच्च संस्था लक्ष ठेवते ?

५. स्वतंत्र तांत्रिक विद्यापीठ कोठे आहे ?

३.३ सारांश

अशा प्रकारे महाविद्यालयांमधून, विद्यापीठांमधून हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. उच्च शिक्षणामुळे अनेक क्षेत्रात विद्यार्थी नाव कमवत आहेत. वंचित घटकापर्यंत हे शिक्षण जाऊन पोहोचत आहे यामुळे उद्याचा भारत प्रगतिशील होत आहे.

३.४ पारिभाषिक शब्द : शब्दार्थ

१. Co-Education : सहशिक्षण

२. NCERT : नॅशनल कौन्सिल फॉर एज्युकेशन रिसर्च अॅन्ड ट्रेनिंग

३. IT : माहिती तंत्रज्ञान

४. आकृतीबंध : संरचना

३.५ स्वयंअध्ययन प्रश्नाची उत्तरे–१

(अ) योग्य पर्याय निवडा.

१. १९६४	२. १०+२+३	३. अ–वूड
४. क – माध्यमिक शिक्षण	५. अ – लॉर्ड कर्झन	

(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.

१. केरळ	२. १ मे, १९६२	३. १९८३–८४
४. १ एप्रिल १९४९	५. १४ वर्षे	

स्वयंअध्ययन प्रश्नाची उत्तरे–२

(अ) योग्य पर्याय निवडा.

१. क–५	२. ब–४	३. अ–भारतीय विद्यापीठ कायदा
४. अ–उच्च शिक्षण	५. ब–४	

(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.

१. वर्धा योजना	२. १९८६	३. महिलांचे शिक्षण
४. हंटर आयोग	५. भारतीय विद्यापीठ आयोग	

स्वयंअध्ययन प्रश्नाची उत्तरे–३

(अ) योग्य पर्याय निवडा.

१. ब्रिटिश　　२. १८८२　　३. १९०४

४. १९२३　　५. ४

(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.

१. ४ महाविद्यालये　　२. १९१७ साली

३. ०६ अभियांत्रिकी महाविद्यालये　　४. भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद

५. रुडकी

३.६ सरावासाठी स्वाध्याय

१. भारतातील प्राथमिक शिक्षणाचा विकास कसा होत गेला ते सांगा.

२. माध्यमिक शिक्षणाच्या विकासातील टप्पे स्पष्ट करा.

३. भारतातील उच्च शिक्षणाच्या विकासाचा आढावा घ्या.

४. भारतीय तांत्रिक शिक्षणाची वाढ कशी झाली ते सांगा.

५. भारतातील शैक्षणिक व प्रशासकीय धोरण स्पष्ट करा.

३.७ संदर्भ पुस्तके

१. महाराष्ट्रातील शिक्षणाचा विकास – महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे (१९६०–१९८५)

२. Educational Development in Maharashtra State - Maharashtra Educational and Social Welfare Dept. Maharashtra (1950 to 1966)

३. गटकळ रंजना (२००७), भारतीय शिक्षणाचा विकास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

४. जाधव–भोसले सरपोतदार (२००७) माध्यमिक आणि उच्च–माध्यमिक शिक्षणाचा विकास, प्राजक्त प्रकाशन, नाशिक.

५. दुनाखे अरविंद (२००६), भारतीय शिक्षण पद्धती व माध्यमिक शिक्षण, नित्यनूतन प्रकाशन, पुणे.

६. वास्कर आनंद, वास्कर उषा (१९९९) भारतीय शिक्षणाचे बहुजनीकरंग, नूतन प्रकाशन, पुणे.

७. आधुनिक भारत – डॉ. विकास कदम, डॉ. एस. पी. शिंदे, डॉ. आर. एन. रासकर.

घटक – ४

सामाजिक चळवळी

(ZZZZ)

४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ अभ्यास विषयाची मांडणी

४.२.१ महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या चळवळी

४.२.२ महाराष्ट्रातील कामगारांच्या चळवळी

४.२.३ महाराष्ट्रातील दलित चळवळी

४.२.४ महाराष्ट्रातील आदिवासींच्या चळवळी

४.३ स्वयं अध्ययन प्रश्न

४.४ सारांश

४.५ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

४.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर

- स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील शेतकऱ्यांच्या चळवळीचे स्वरूप जाणून घेता येईल.
- भारतातील कामगार चळवळीची पार्श्वभूमी स्पष्ट करता येईल.
- कामगार संघटनांच्या चळवळीची माहिती प्राप्त होईल.
- दलित चळवळीची कारणे व महाराष्ट्रातील दलित चळवळीची माहिती करून घेता येईल.
- महाराष्ट्रातील आदिवासी चळवळीची माहिती सांगता येईल.

४.१ प्रस्तावना

संपूर्ण भारतामध्ये कमी-अधिक प्रमाणात सर्व समाजामध्ये विविध प्रकारच्या चळवळी उदयाला आल्या. महाराष्ट्राच्या दृष्टीने विचार करता सरंजामशाही काळापासून सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक तसेच राजकीय हेतूने प्रेरित अशा अनेक चळवळी घडून आल्या आहेत. चळवळी ह्या कधी संघटनात्मक तर काही असंघटनात्मक स्वरूपाच्या घडत असतात. सर्व माणसे समान आहेत. सर्वांना सारख्या प्रमाणात जीवन जगण्याचा मुक्तपणे संचार करण्याचा अधिकार आहे. अशी नैसर्गिक स्थिती असताना जेव्हा एक व्यक्ती व समूहाद्वारे दुसरी व्यक्ती वा समूहांना सारख्या प्रमाणात जगण्याचे अधिकार हिरावून घेतले जातात, तेव्हा व्यक्ती अथवा समूह चळवळी करतात. प्रस्तुत प्रकरणामध्ये महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या चळवळी, कामगारांच्या चळवळी व आदिवासींच्या चळवळीचा अभ्यास करण्यात येणार आहे.

४.२ अभ्यास विषयाची मांडणी

४.२.१ शेतकऱ्यांच्या चळवळींची पार्श्वभूमी

महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीचा इतिहास पाहिल्यास त्याची वैचारिक पार्श्वभूमी इ.स. १८८३ साली महात्मा फुले यांच्या विचारात आढळते. फुले यांच्या 'शेतकऱ्याचा आसूड' या पुस्तकात शेतकऱ्यांची अवनति आणि सावकार, जमीनदार यांच्याकडून होणारे अमानुष शोषण याचे चित्र पहायला मिळते. कर्जातच जन्मणाऱ्या, जगणाऱ्या आणि मरणाऱ्या शेतकऱ्याची स्थिती सुधारण्यासाठी वैज्ञानिक आणि वैज्ञानिक आणि तांत्रिक आधार देऊन त्यांचा विकास करण्याची कल्पना फुले यांनी मांडली. फुले यांच्यानंतर वासुदेव बळवंत फडके यांनी शेतकऱ्यांना आपल्या शोषणाच्या विरोधात बंड करण्यास प्रवृत्त केले. मात्र त्यानंतर सुमारे ७४ वर्षे शेतकऱ्यांच्या चळवळी आढळत नाहीत. त्यांचा फारसा कोणी विचारही केलेला दिसत नाही. दि. १३ जून १९४९ रोजी केशवराव जेधे यांनी शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली आणि त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचा प्रयत्न केला. यामध्ये त्यांना फारसे यश आले नाही. स्वातंत्र्यानंतरच्या काळात भारतात शेतकऱ्यांची आंदोलने झालेली आढळतात. अशा अनेक आंदोलनामध्ये डाव्या पक्षांचा आणि प्रामुख्याने साम्यवादी पक्षाचा पुढाकार दिसून येतो. यामध्ये तेभागा हे बंगालमधील आंदोलन, तेलंगणामधील शेतकरी उठाव (इ.स. १९४६) आणि वारली आदिवासींचे आंदोलन ही महत्त्वाची म्हणावयास पाहिजेत. नंतरच्या काळात जमीनदारी निर्मूलन, कमाल जमीन धारणा कायदा, कसेल त्याची जमीन या तत्त्वावर कुळकायदे हे एकापाठोपाठ एक संमत झाले. तसेच इ.स. १९५१ मध्ये पहिली पंचवार्षिक योजना सुरू झाली. यामध्ये शेती विकासाला प्राधान्य देण्यात आले. इ.स. १९५२ मध्ये सर्वांगीण ग्रामीण विकासासाठी सामूहिक विकास योजना सुरू झाल्या आणि शेतकऱ्यांना शेती, जोडधंदा, आणि इतर संलग्न प्रश्न यांच्यासाठी सर्व मदत साधने आणि सल्ला देण्याची सुरुवात झाली. लहान धरणे, बंधारे यांच्याद्वारे पाणी पुरवठा होऊ लागला. तसेच सिंचनासाठी डिझेल व विजेवर चालणारे पंप पुरविण्यात आले. शेतकऱ्यांसाठी सहकारी तत्त्वावर पतपुरवठा आणि ग्रामीण खरेदी-विक्री संस्थाही सुरू करण्यात आल्या. मात्र असे असले तरी निवडक सधन शेतकरी सोडल्यास इतर

शेतकऱ्यांच्या परिस्थितीत फारसा फरक पडला नाही. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे शेतकऱ्यांचा कर्जबाजारी-पणाही कमी झाला नाही. परिणामतः २१व्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत आणि नंतरही महाराष्ट्रात आणि प्रामुख्याने विदर्भात शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या सुरूच राहिल्या आहेत.

शेतकऱ्यांच्या आंदोलनाचा अभ्यास केल्यास यामध्ये पहिला प्रमुख मुद्दा म्हणजे 'संघटना'चा होता. भारतात मिल कामगार तसेच अन्य कारखान्यातील कामगारांच्या प्रभावी संघटना बनल्या, परंतु शेतकरी आणि शेतमजुरांची अशा प्रभावी संघटना नव्हत्या. शेतकरी आणि शेतमजूर संघटित झाला नव्हता. साम्यवादी पक्षाच्या राजकीय प्रेरणेतून लहान-मोठी शेतकऱ्यांची आंदोलने झाली असली तरी त्याचे शेतकऱ्यांचे समान हितसंबंधावर संघटन होऊ शकले नाही. उत्तर प्रदेशात महेंद्रसिंह टिकाईत यांनी शेतकऱ्यांचे आंदोलन चालविले तर महाराष्ट्रात शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली इ.स. १९७८-७९ च्या मध्यामध्ये शेतकरी संघटना ही महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची संघटना स्थापन झाली. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळालाच पाहिजे ही त्यांची प्रमुख मागणी होती. १८ एप्रिल १९८८ ला महाराष्ट्रातील जळगाव येथे शेतकरी संघटनेद्वारे आयोजित विशाल रॅलीमध्ये महाराष्ट्र, गुजरात आणि मध्यप्रदेशातून हजारो शेतकरी सहभागी झाले होते. त्यापाठोपाठ कोल्हापूर येथे २ ऑक्टोबर, १९८८ रोजी रॅली काढण्यात आली. सरकारद्वारा साखरेच्या वितरणाच्या धोरणास विरोध करण्यासाठी आणि कापूस उत्पादकांच्या हितसंबंधाच्या विरुद्ध कपडानीति सरकारने स्वीकारल्याबद्दल तीव्र चळवळ करण्यात आली. त्याचबरोबर शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यासाठी तीव्र आंदोलनाची घोषणा करण्यात आली. दुष्काळामुळे दोन लाख शेतकरी दिवाळखोर होण्याची शक्यता होती. या चळवळीचा परिणाम म्हणजे महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी २१७ कोटी रुपयांच्या शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची घोषणा केली. त्याचा लाभ एक ३७ लाख शेतकऱ्यांना झाला. शरद जोशी यांनी शेतकरी संघटनेची निर्मिती एक दबाव गट किंवा हितसंबधाचा गट या दृष्टीने केली होती. या दबाब गटाद्वारे त्यांनी शेतकऱ्यांची मागण्याही मान्य करून घेतल्या. परंतु शेतीला आधुनिक आणि व्यावसायिक दृष्टीने लाभदायी बनवायचे असेल तर आपण निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी आपली सत्तेमध्ये भागीदारी असली पाहिजे असा त्यांचा दृष्टीकोण होता. कारण सत्तेच्या पाठिंब्याशिवाय शेतकऱ्यांना त्यांच्या मालाचे लाभदायक योग्य मूल मिळणार नाही असे त्यांचे मत होते. महेंद्रसिंह टिकाईत यांना मात्र राजकारणाचा या चळवळीत प्रवेश होऊ देऊ नये असे मत होते.

शेतकरी संघटनेने संघटित शेतकऱ्यांच्या द्वारे महाराष्ट्रात अनेक चळवळी घडवून आणल्या. मार्च १९८१ मध्ये निपाणी येथे तंबाखू उत्पादक शेतकऱ्यांचे आंदोलन घडवून आणले. व्यापारी व सावकारांकडून तंबाखू उत्पादकांची होणारी गळचेपी थांबविण्यासाठी हे आंदोलन होते. नाशिक विभागात पिंपळगाव बसवंत येथे २० सप्टेंबर १९८१ रोजी कांदा, ऊस उत्पादकांचे आंदोलन घडवून आणण्यात आले. कारखानदाराप्रमाणे शेती उत्पादनाचा भाव ठरविताना शेतकऱ्याला असावा अशी त्यांची मागणी होती. विदर्भामध्ये कापूस उत्पादकांना कापसाचा योग्य भाव मिळावा म्हणून चळवळी उभारण्यात आल्या. यामुळे सरकारला कापसाचा भाव बदलणे भाग पडले. त्या आंदोलनाच्या काळात काही शेतकऱ्यांनी आमदार, खासदार, मंत्री यांनी गावामध्ये प्रवेशबंदी केली होती. इ.स. १९८२ मध्ये खानदेशात दूध भावासाठी आंदोलन चालविण्यात आले. परिणामतः सरकारला

दुधाला योग्य भाव देणे भाग पडले. सटाणा, लासलगाव, परभणी, पुणे येथे शेतकरी संघटनेची मोठी अधिवेशने झाली. त्यातून शेतकरी वर्गामध्ये प्रचंड जाणीव-जागृती झाली. आपल्यातूनच गेलेले व आपणच निवडून दिलेले लोकप्रतिनिधी आपली कशी वंचना करतात हे शेतकऱ्यांच्या लक्षात आले. शरद जोशींनी या क्षेत्रामध्ये 'इंडिया विरुद्ध भारत' असा सिद्धांत मांडून ग्रामीण व शहरी भागातील विसंगती स्पष्टपणे मांडली. कृषि मालाला रास्त भाव आणि सर्व शेतकऱ्यांची समान मागणी ही त्यांची मुख्य तत्त्वे होती. शेतकरी संघटना आणि त्यांच्या चळवळी यांच्याबाबत सविस्तर माहिती पुढे दिली आहे.

(क) डाव्या पक्षांची आंदोलने

१९६० नंतरच्या काळातील महाराष्ट्रातील गरीब शेतकरी व शेतमजुरांचया संघटित चळवळी प्रामुख्याने आदिवासी भागामध्ये झालेल्या दिसतात. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या किसान सभेने महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील डहाणू, तलासरी, जव्हार, मोखाडा, शहापूर आणि वाडा या तालुक्यांमध्ये तसेच जवळच्या नाशिक जिल्ह्यातील आदिवासी भागामध्ये आणि धुळे जिल्ह्यातील साक्री आणि नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर तालुक्यांमध्ये आदिवासी शेतकऱ्यांमध्ये काम सुरू केले. त्यांनी आदिवासींच्या वेगवेगळ्या प्रश्नांसाठी लढे उभे केले. आदिवासींच्या सावकार आणि जमीनदारांनी बळकावलेल्या जमिनी परत मिळविणे, खुल्या जंगल जमिनीची लागवड सुरू करणे, गवत कापणे, जंगल काम इत्यादींसाठीच्या मजुरीचे व शेतमजुरीचे दर वाढविणे यासाठी लढे उभारण्यात आले. याबरोबरच आदिवासींच्या कर्जमुक्तीसाठी तसेच त्यांना शेतीसाठी लागणाऱ्या सोयी-सुविधा मिळवून देण्यासाठीही त्यांनी अनेक आंदोलने केली. त्यावेळी आदिवासींच्या वेठबिगारीचा प्रश्न मोठा होता. हा प्रश्न सोडविण्यासाठीही संघटनेने प्रयत्न केले.

१. भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या किसान सभेचे कार्य

भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या किसान सभेचे कार्य प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, तसेच नाशिक व अहमदनगर जिल्ह्यांमध्ये मराठवाड्यातील औरंगाबाद, बीड व नांदेड जिल्ह्यांमध्ये किसान सभेने कार्य केलेले आहे. १९७० मध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या किसान सभेने व शेतमजूर संघाने 'जमीन बळकाव' मोहिमेत भाग घेतला. महाराष्ट्रातील ५० हजार गरीब शेतकरी व शेतमजूर या आंदोलनात सहभागी झाले होते. इ.स. १९७२ मध्ये जमीन धारणेची कमाल मर्यादा खाली आणण्याची व अतिरिक्त जमिनीचे वाटप करण्याच्या मागणीसाठी किसान सभेने आंदोलन केले. १९७२ मध्ये दुष्काळाने अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी दुष्काळ निवारणाची कामे सुरू करण्याचा आणि रोजगार पुरविण्याच्या मागण्या घेऊन भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, लालनिशाण पक्ष, शेतकरी कामगार पक्ष व समाजवादी पक्ष यांनी एकत्र येऊन महाराष्ट्रात सर्वत्र आंदोलने उभारली. हे लढे जवळ-जवळ नऊ महिने चालले. आपापल्या जातीधर्मांना विसरून एकत्र येऊन लढलेले शेतकरी १९७३ साली पावसाळा सुरू झाल्यावर घरोघर परतले व आपापल्याला जातींच्या कोशात पुन्हा बुडून गेले. यामुळे शेतकऱ्यांना आंदोलनासाठी प्रवृत्त करण्याचे काम किती जिकीरीचे आहे हे डाव्या पक्षांच्या लक्षात आले.

१९७३ पासून इतरही काही प्रश्नांवर डाव्या पक्षांनी आंदोलने उभारली. यामध्ये रोजगार हमी योजनेची कामे सुरू करणे. कर्जपुरवठा, गरीबांसाठी घरे व शेतीमालाला रास्त भाव इत्यादी मागण्यांचा समावेश होतो. परंतु अशाप्रकारच्या चळवळीचे काम सातत्याने फारच कमी भागांमध्ये झाले. १९७० च्या दशकाच्या अखेरीपर्यंत भारतीय कम्युनिस्ट पक्ष व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष यांच्या किसान सभांनी काम चालू ठेवलेले असले तरी त्यांचा प्रभाव बराच कमी झालेला दिसून येत होता.

२. शेतकरी कामगार पक्षाचे कार्य

स्वतःला 'डावा' म्हणवून घेणारा महाराष्ट्रातील आणखी एक पक्ष म्हणजे शेतकरी कामगार पक्ष (शेकाप) होय. १९४८ साली काँग्रेस पूर्वाश्रमींच्या ब्राह्मणेतर पक्षाच्या नेत्यांनी काँग्रेसच्या विशेषकरून शेतीविषयक धोरणांबद्दलच्या असंतोषामुळे पक्षातून बाहेर पडून हा नवा पक्ष स्थापन केला. केशवराव जेधे, शंकरराव मोरे, दत्ता देशमुख हे या पक्षाचे प्रमुख नेते होते. कर्जमाफी, शेतसारा कमी करणे यासारख्या त्यांच्या मागण्या तत्कालीन काँग्रेसच्या मुख्यमंत्र्यांनी मंजूर केल्या नव्हत्या. पक्ष स्थापनेनंतर या नेत्यानी फारवर्ड ब्लॉक, समाजवादी गट आणि कम्युनिस्ट यांच्याशी संवाद साधण्याचे आणि त्यांच्या सामील होण्याचे अयशस्वी प्रयत्न केले.

शेकापच्या वतीने दाभाडी येथे १९५० मध्ये आयोजित अधिवेशनात एक जाहीरनामा संमत करण्यात आला. याला 'दाभाडी प्रबंध' असे म्हणले जाते. या १५ कलमी कार्यक्रमात जमीन सुधारणा, शेतमजुरांना पुरेसे जीवन वेतन, सावकारी नष्ट करणे, उत्पादन खर्च व नफा धरून धान्याच्या किंमती ठरविणे, शेती व्यवसायाला कर्ज पुरवठ्याची सोय करणे इत्यादी शेातीविषयक मागण्या करण्यात आल्या होत्या. या पक्षाने आंतरराष्ट्रीय साम्यवादी चळवळीचे नेतृत्व मान्य केले होते. १९५२ मध्ये झालेल्या निवडणुकीत शेकापला अपयश आल्यानंतर जेधे व इतर काही नेते पक्ष सोडून पुन्हा काँग्रेसमध्ये गेले. नंतर पक्षाचा जोर कमी झाला तरी बहुजन समाजामध्ये पक्षाला चांगला पाठिंबा राहिला.

मराठवाडा, खानदेश, कुलाबा जिल्हा (सध्याचा रायगड जिल्हा) आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये शेकापचे शेतकरी संघ आहेत. १९७० नंतर त्यांनी मराठवाडा व कोल्हापूर, सांगली या भागांमध्ये शेतमजूर संघटनाही स्थापन केल्या. मजुरीच्या प्रश्नावर शेतमजुरांची संघटना बांधली जाऊ शकत नाही अशी शेकापची भूमिका आहे. त्याचे कारण ते असे सांगतात की, शेतमजुरांमध्ये अनुसूचित जाती व सवर्ण हिंदू अशा दोन्ही जाती असल्यामुळे श्रीमंत शेतकरी जातीच्या आधारे त्यांच्यात फूट पाडतात. अशी फूट टाळण्यासाठी शेकापने रोजगार हमी योजनेखाली शेतमजुरांना काम ही मागणी लावून धरली आहे. त्यांच्या मते या मागणीसाठी शेतमजूर एकजूट होऊन काम करतात. तसेच रोजगार हमी योजनेतील मजुरांची पातळी इतरत्र असणाऱ्या शेतमजुरीची पातळीही उंच ठेवते. या गोष्टींचा शेतमजुरांना फायदा होतो.

शेतकरी कामगार पक्षाची एक प्रमुख मागणी शेतकऱ्यांच्या मालाला रास्त भाव मिळाला पाहिजे अशी आहे. ही मागणी जोराने लावून धरणारा हा पहिला राजकीय पक्ष आहे. शेतीच्या उत्पादनाचा खर्च, मजुरी व शेतकऱ्याचा नफा धरून शेतमालाची किंमत ठरविली पाहिजे. तरच अंतर्गत बाजारपेठा वाढून शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारेल असे त्यांचे मत आहे. शेतमालाच्या खरेदी-विक्रीतील दलाल हटविले तर शेतकरी व ग्राहक

या दोघांचा फायदा होईल असेही शेकापच्या जाहीरनाम्यात म्हटले आहे. या मागणीभोवतीच शेकापने आपली मुख्य आंदोलने उभी केली.

१९८० नंतर शेकापने महाराष्ट्रात काही भागात खंडकरी शेतकऱ्यांच्या शासकीय योजनांखाली सरकारी कब्जात जाणाऱ्या जमिनींच्यासाठी योग्य मोबदला मिळावा यासाठी मोठी आंदोलने केली. ही आंदोलने प्रामुख्याने रायगड जिल्ह्यात करण्यात आली आहेत.

३. लाल निशाण पक्षाचे कार्य

१९४२ मध्ये कम्युनिस्ट पक्षातून बाहेर पडून एस. के. लिमये व त्यांच्या सहकाऱ्यांनी 'नवजीवन संघटना' स्थापन केली. यानंतर १९४८ मध्ये ते शेकापमध्ये सामील झाले. यानंतर त्यांच्यामध्ये मतभेद होऊन १९५१ मध्ये दत्ता देशमुख व त्यांच्या सहकाऱ्यांनी कामगार- 'किसान पक्ष' स्थापन केला. या पक्षाला १९६४ पासून 'लाल निशाण पक्ष' नाव मिळाले.

लालनिशाण पक्षाच्या विचारांनुसार स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या काळात शेतकरी वर्गाच्या एकजुटी घडवून आणण्याचे जे धोरण स्वीकारले होते ते अयोग्य होते. शेतमजुरांची त्यांच्या विशिष्ट मागण्यांसाठी संघटना बांधली पाहिजे. लालनिशाण पक्षाने आपल्या तत्त्वानुसार गावपातळीवर कोतवालांची संघटना तसेच जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांची संघटना बांधली.

१९७० मध्ये शेतमजुरांमध्ये संघटन करण्यासाठी लालनिशाण पक्षाने अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालुक्यातील पहिली भूमिहीन मजुरांची परिषद घेतली. या परिषदेला भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि समाजवादी पक्षांचा पाठिंबा मिळाला होता. या परिषदेत दुष्काळ निर्मूलनाच्या प्रश्नाची चर्चा करण्यात आली. त्यानंतर शासकीय शेती व ऊसाच्या शेतांवर काम करणाऱ्या मजुरांना संघटित करण्यास सुरुवात करण्यात आली. या शेतमजुरांच्या कामाचे तास, सुट्ट्या आणि किमान वेतनाच्या प्रश्नासाठी लालनिशाण पक्षाने आंदोलने केली.

(ख) समाजवादी पक्षाची शेतकरी-शेतमजूर पंचायत

समाजवादी पक्षाची शेतकरी-शेतमजूर पंचायत या संघटनेची स्थापना १९६९ साली करण्यात आली. या संघटनेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत :

१. सरकारी पडीक जमिनीचे आणि जंगल जमिनीचे भूमिहीनांमध्ये वाटप. (२) कमाल जमीनधारणा कायद्याची अंमलबजावणी आणि अतिरिक्त जमिनीचे फेरवाटप. (३) शेतीच्या साधनांचा छोट्या शेतकऱ्यांना पुरवठा. (४) शेतमजुरांना जीवनवेतन. (५) दलित-आदिवासी शेतकरी-शेतमजुरांना सामाजिक न्याय (६) ग्रामीण भागातील दुर्बल घटकांनाही विकासाचा फायदा मिळेल अशा रीतीने शेतीची पुनर्रचना.

शेतकरी-शेतमजूर पंचायतीने प्रामुख्याने शेतकऱ्यांना जमिनीसंदर्भातील कायदेविषयक गोष्टीत मदत करणे व शेतमजुरांच्या जीवनवेतनाचा प्रश्न उचलून धरणे अशी कामे केली आहेत.

(ग) डाव्या विचारसरणीच्य संघटनांच्या चळवळी

१. शहाद्याची श्रमिक संघटनेची चळवळ

१९७० च्या नंतरची महाराष्ट्रातील ही एक महत्त्वाची शेतकऱ्यांची चळवळ आहे. तत्कालीन धुळे जिल्ह्यातील शहादा तालुक्यातील (आता शहादा तालुका नंदुरबार जिल्ह्यातील आहे.) भिल्ल शेतकरी शेतमजुरांनी संघटित होऊन एकजुटीने अन्यायाचा प्रतिकार केला आणि त्यांनी प्रभावीपणे आपल्या मागणी मांडल्या. या प्रतिकारामागील संघटितपणा व उत्स्फूर्तता यामुळे या चळवळीचे महत्त्व आहे.

ब्रिटिश काळात धुळे जिल्ह्यात स्थायिक झालेल्या शेती करणाऱ्या गुजर व लेवा पाटील जातीच्या लोकांनी सारावसुलीचे काम स्वतःकडे घेतले. या कामात त्यांना पैसा आणि राजकीय सत्ता मिळाली. त्याच्या जोरावर त्यांनी आदिवासी शेतकऱ्यांना भरमसाठ कर्जे देऊन नंतर फेड न झाल्याने कारण देऊन त्यांच्या जमिनी बळकावल्या. या परिस्थितीमुळे आदिवासी गरीब झाले व स्वतःच्याच जमिनीवर शेतमजूर म्हणून काम करू लागले. पुढे रेल्वे आली आणि व्यापार वाढला. या धनिक गुजर जमिनदारांनी त्या भागात कापूस व ऊसाची लागवड सुरू केली आणि स्वतःचा व्यापारही सुरू केला. अशा प्रकारे तेच सावकार, जमीनदार, मध्यस्थ व व्यापारीही झाले. त्यांच्या शेतात काम करणारे भिल्ल आदिवासी हे सालदार किंवा कुळ म्हणून काम करीत असत. पण प्रत्यक्षात अनेकदा हा वेठबिगारीचाच प्रकार असे. वेगवेगळ्या मार्गांनी जमीनदारांनी आदिवासींच्या जमिनी स्वतःच्या घशात घातल्या. हरित क्रांतीनंतर ऊसाची शेती वाढविण्यासाठी हे जमिनी बळकावणे आणि शेतमजुरांची पिळवणूक करण्याचे प्रकार वाढत गेले. आदिवासी स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांमुळे अखेर या अन्यायाचा प्रतिकार सुरू झाला.

सुरुवातीचा प्रतिकार हा बराचसा व्यक्तिगत स्वरूपाचा होता. सुरुवातीला अंबरसिंग सुरतवंती या नेत्याने आदिवासींना संघटित करून कायद्याच्या मार्गाने त्यांना न्याय मिळवून देण्याचा असफल प्रयत्न केला. त्यावेळी भिल्ल लोकांवर अत्याचार झाले तरी जमीनदारांशी हातमिळवणी असणारे पोलीस त्यांच्यावर कारवाई करीत नसत. राजकारणीही या प्रश्नाकडे दुर्लक्षच करीत असत. म्हणून अशा व्यक्तिगत प्रतिकाराऐवजी संघटित प्रतिकाराची गरज असल्याचे ध्यानात घेऊन अंबरसिंगानी जानेवारी १९७२ मध्ये शहाद्याला शेतकऱ्यांची 'भूमुक्ती' परिषद बोलावली. भिल्ल आदिवासी सेवामंडळ, भूमिहीन शेतमजूर व गरीब शेतकरी संघटना (लालनिशाण पक्ष) यांच्या संयुक्त विद्यामाने ही परिषद भरविली होती. या आघाडीने अंबरसिंगांच्या नेतृत्वाखाली 'श्रमिक संघटना' या संघटनेची स्थापना केली. या संघटनेच्या कार्यक्रमात खालील गोष्टींचा अंतर्भाव होता :

१. न्यायाने आदिवासी शेतकऱ्यांच्या मालकीच्या असणाऱ्या जमिनी ताब्यात घेणे.

२. रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी सरकारवर दडपण आणणे.

३. १९४७ सालानंतर झालेल्या आदिवासींच्या जमिनींचे हस्तांतरण रद्दबातल करणे.

४. आदिवासींची सरकारी संस्थांची कर्जे माफ करून घेणे.

५. सरकारने शेतमजुरांसाठी किमान वेतन निश्चित करावे यासाठी प्रयत्न करणे.

या कार्यक्रमाची अंमलबजावणी श्रमिक संघटनेने सुरू केल्यावर जमीनदारांनी आदिवासींना ताब्यात घेतलेल्या जमिनींवरून हुसकावण्याचे प्रयत्न केले. पण वृत्तपत्रांमध्ये त्याचा गाजावाजा होऊन लोकमत संघटित होत आहे असे दिसताच त्यांनी आपल्या पद्धती बदलल्या.

सुरुवातीच्या काळात श्रमिक संघटनेने शेतकऱ्यांना कोर्टात त्यांच हक्कांसाठी लढण्यास मदत करून त्यांच्या जमिनी परत मिळवून दिल्या. तसेच मार्च १९७२ मध्ये झालेल्या राज्य विधानसभेच्या निवडणुकांवर संघटितपणे बहिष्कार टाकून आदिवासींनी आपला निषेध प्रभावीपणे व्यक्त केला. मार्च १९७२ मध्ये शहाद्यांमध्ये झालेल्या शेतकरी मेळाव्यात सालदारांच्या उत्पन्नात वाढ करण्याची, त्यांना सुट्टी मिळण्याची व त्यांचे कामाचे तास नियंत्रित करण्याची मागणी करण्यात आली. या मागणीसाठी सालदार वर्षभरासाठी ठेवलेले शेतमजूर संपावर गेले. त्यांच्यापाठोपाठच खंडकरी व रोजंदारीवर काम करणारे मजूरही संपावर गेले. या दगडपशाहीमुळे शेवटी जमीनदारांना सालदारांच्या मागण्य मान्य कराव्या लागल्या. श्रमिक संघटनेची ही दुसरी मागणी होती. जंगलाखाली नसणारी शेतमजमीन भूमिहीनांना लागवडीसाठी मिळावी ही मागणी तत्त्वतः मान्य करूनही प्रत्यक्षात जमीन ताब्यात घेण्यास गेलेल्या आदिवासींना पोलिसांनी हाकलले व अटक केली.

एक वर्षाच्या आतच श्रमिक संघटनेने मोठ्या प्रमाणात गरीब शेतकरी व भूमिहीनांना संघटित केले. या सर्व चळवळीत त्रियांनी अत्यंत लढाऊ भूमिकेने सहभाग घेतला होता.

१९७३ मध्ये त्या भागातील एक मोठ्या जमीनदाराची मोठी खाजगी सशस्त्र सेना उभारण्याचा बेत उघडकीला आला. मार्क्सवादी कार्यकर्त्यांना त्याविरुद्ध उघड निषेध केला व अखेर सरकारला अशा प्रकारच्या दलावर बंदी घालावी लागली.

१९७४ साली अंबरसिंगांचे निधन झाले. त्यांच्या निधनानंतरही संघटनेने कॉ. कुमार शिराळकरांच्या नेतृत्वाखाली संघटनेने आपले कार्य जोरात चालू ठेवले. जमीनदारांनी जरी तत्त्वतः शेतमजुरांच्या मागण्या मान्य केल्या तरी कुठेही त्याची अंमलबजावणी केली नाही. अखेर एप्रिल १९७४ मध्ये शेतमजुरांनी संप केला. त्यामुळे संघटना आणि जमीनदारांमधील संघर्ष वाढत गेला. गुजरांनी संघटनेवर बंदी आणावी अशी मागणी केली. पण ही मागणी मान्य झाली नाही. ही चळवळ अजूनही सुरू आहे. पण ती इतर ठिकाणी विस्तारलेली नाही. श्रमिक संघटना आता मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षात विलीन झालेली आहे.

२. पालघर तालुक्यातील भूमिसेना आंदोलन

ठाणे जिल्ह्यातील पालघर तालुक्यांमधील वारली आदिवासी शेतकऱ्यांची संघटना 'भूमिसेना' या अराजकीय पक्षीय संघटनेने (१९७०) तयार केली. आदिल नावाच्या आदिवासी नेत्याच्या नेतृत्वाखाली आदिवासींनी उत्स्फूर्तपणे सावकार व जमीनदारांच्या लढ्यामध्ये भाग घेतला. लढ्याच्या सुरुवातीच्या टप्प्यात आदिवासींनी शेतात जाऊन उभी पिके कापून स्वतःच्या ताब्यात घेण्याचा धडाका सुरू केला. ही शेते आदिवासींचीच होती व ती सावकारांनी लबाडीने स्वतःच्या ताब्यात घेतलेली होती. भूमिसेनेने या जमिनीच्या गैरव्यवहारांबाबत स्थानिक प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे तक्रारी नोंदविल्या होत्या. पण त्याची दखल घेतली जात नव्हती. आदिवासींनी सुरू केलेल्या या पीक कापण्याच्या आंदोलनामुळे अधिकाऱ्यांना या तक्रारीकडे लक्ष द्यावे

लागले. मात्र त्याचबरोबर पोलिसांनी भूमिसेनेच्या कार्यकर्त्यांना अटकही केली. आदिवासींचे पीक कापण्याचे सत्र तरीही चालूच होते. अशाप्रकारे ताब्यात घेतलेले धान्य एकत्र करून आदिवासींनी त्याचे सामूहिक वाटप केले. तसेच त्यांनी धान्य पेढी चालविली.

स्थानिक प्रशासकीय अधिकाऱ्याने जमिनींच्या या प्रकरणात लक्ष घालून जवळ-जवळ ८०० प्रकरणे सोडविली. त्यामुळे आदिवासींनी जमिनी परत मिळाल्या. परंतु जमिनी मिळाल्या तरी त्या कसण्याची समस्या होती. आदिवासींकडे बैल, अवजारे, बियाणे नव्हती. तसेच त्यासाठी त्यांच्याकडे पैसेही नव्हते. त्यामुळे काही आदिवासींना परत जमिनी भाडेपट्ट्याने द्याव्या लागल्या किंवा सावकारांच्याच दारात जावे लागले.

ही समस्या सोडविण्यासाठी भूमिसेनेच्या नेत्यांनी शहरातील काही सामाजिक कार्यकर्ते व हितचिंतकाच्या सल्ल्याने आदिवासींसाठी बँकेकडून कर्ज उभा केले. मात्र अव्यवस्थित कारभार व हिशेब आणि योजनेच्या अभावामुळे हा सर्व प्रयोग फसला गेला. आदिवासींना स्वतःच्या पायावर उभे करण्याची योजना बारगळली गेली.

तरीही भूमिसेना यातून सावरली. आदिवासींमध्ये राजकीय जाणीव निर्माण करण्याचे आणि वर्गलढा चालू ठेवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य भूमिसेनेने चालूच ठेवले आहे. सावकार व श्रीमंत शेतकऱ्यांविरुद्ध शेतमजूर व गरीब शेतकऱ्यांना भूमिसेना संघटत करून त्यांचे प्रश्न सोडवत आहे. त्यांनी ऐन हंगामामध्ये शेतमजुरांचे संप घडवून आणले. तसेच तहसीलदारांकडे कायदेशीर नोटिसा पाठवूनही जेव्हा किमान वेतनाबद्दल काही हालचाल होईना तेव्हा संपकरी शेतमजुरांचा संप चालू ठेवण्यासाठी, त्यांच्या वेतनासाठी पर्यायी मार्ग निवडला. आदिवासींनी काम नाकारले. त्यांनी जंगलात जाऊन लाकूड तोडून अनेक मैल भारे डोक्यावर नेऊन शहरांमध्ये विकले. जंगलखात्याच्या अधिकाऱ्यांनी तक्रारी केल्या तेव्हा भूमिसेनेने उत्तर दिले की, प्रत्येक आदिवासीला स्वतःच्या डोक्यावरून नेता येईल इतके सरपण नेण्याची परवानगी आहे. तसेच ग्रामपंचायतींना या सर्व प्रश्नांची माहिती दिली. या सर्वांतून दडपण निर्माण होऊन सावकार व जमिनदारांनी शेतमजुरांची वाढीव मजुरीची मागणी मान्य केली.

शेतमजुरांना वेठबिगारीतून मुक्त करण्यासाठी भूमिसेनेने खूप प्रयत्न केले. त्याचप्रमाणे आदिवासींना पर्यायी काम मिळवून देण्यासाठी रोजगार हमी योजनेखाली काम सुरू करावे या मागणीसाठी आंदोलनेही केली. ही सर्व आंदोलने करताना भूमिसेनेच्या कार्यकर्त्यांना व आदिवासींना जमीनदारांच्या गुंडाकडून होणाऱ्या अत्याचारांना मोठ्या प्रमाणात सामोरे जावे लागले. आदिवासीसाठी भूमिसेनेचे हे कार्य आजही या भागात सुरूच आहे.

३. डावे पक्ष व संघटनांनी चालविलेल्या आंदोलनांची वैशिष्ट्ये

१. डावे पक्ष व संघटनांनी प्रामुख्याने गरीब शेतकरी व शेतमजूर या वर्गांना संघटित करण्याचा व त्यांच्या मागण्या मांडण्याचा प्रयत्न केला.

२. डाव्यांच्या विचारप्रणालीप्रमाणे शेतीच्या वर्गातील श्रीमंत शेतकरी-जमीनदार व गरीब शेतकरी, शेतमजूर व आदिवासी शेतमजूर यांच्या हितसंबंधामध्ये मूलतः विरोध असल्यामुळे वर्ग-संघर्ष त्यांनी अपरिहार्य मानला.

३. शेतमजुरांची संघटना बांधणे, त्यांच्याती जाती-धर्म, इत्यादींच्या अंतर्विरोधामुळे कठीण असल्याने, डाव्या पक्षांच्या संघटना कार्याला बऱ्याच मर्यादा पडल्या. काही विशिष्ट भागांमध्ये आणि विशिष्ट काळातच त्यांची आंदोलने प्रभावी झाली.

डाव्या पक्ष आणि संघटनांनी मुख्यतः खालील मागण्यांसाठी आंदोलने केली.

(अ) जमीन-सुधारणा प्रभावीपणे अंमलात आणणे. 'कसेल त्याची जमीन' या तत्त्वानुसार कुळांना जमिनींची मालकी मिळावी. तसेच कमाल जमीनधारणा कायद्याने जमीन मालकाचे केंद्रीकरण नष्ट करून अतिरिक्त जमिनींची भूमिहींनांमध्ये वाटप व्हावे.

(आ) शेतमजुरांना किमान वेतन-जीवन वेतन मिळावे किंवा मजुरी वाढवून मिळावी.

(इ) जिथे काम नाही अशा ठिकाणी शासनाने रोजगार हमी योजना सुरू करावी.

(ई) दुष्काळी वर्षांमध्ये दुष्काळी कामे सुरू करावी. तसेच दुष्काळ निवारणाचे कार्य शासनाने करावे.

(उ) शेतमजुरांच्या कामाचे तास नियंत्रित करून त्यांना योग्य सुट्ट्या मिळाव्यात.

(ऊ) आदिवासी शेतकरी व शेतमजुरांवर सावकारांकडून होणारा अन्याय दूर व्हावा. त्यांच्या लबाडीने बळकावलेल्या जमिनी त्यांना परत मिळाव्यात.

(ए) आदिवासी तसेच गरीब शेतकरी शेतमजुरांना कर्जपुरवठा केला जावा.

(ए) शेतीमालाला रास्त भाव मिळावा.

(ओ) वेठबिगारी नष्ट करून वेठबिगारांचे पुनर्वसन करावे.

(घ) शेतकरी संघटनेची चळवळ

१. शेतकरी संघटना

महाराष्ट्रातील समकालीन शेतकरी आंदोलनामधील सर्वात प्रभावी आणि व्यापक प्रमाणावरील चळवळ शेतकरी संघटनेने उभी केली. या चळवळीने शेतकरी आंदोलनाचे स्वरूप बदलले तसेच मागण्याही बदलल्या. या चळवळीची वैचारिक भूमिकाही अगोदरच्या डाव्या पक्ष व संघटनांच्या वैचारिक भूमिकेपेक्षा वेगळी आहे. या चळवळीमध्ये महाराष्ट्रातील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाला व महाराष्ट्राच्या राजकारणात शेतकरी संघटना एक राजकीय शक्ती बनली. याच काळात म्हणजे १९७० च्या दशकाच्या अखेरीपासून देशाच्या इतर भागांमध्येही अशाच स्वरूपाच्या शेतकरी चळवळी उभ्या राहत होत्या. शेतकरी संघटनेच्या चळवळीचे त्यांच्याशी संघटनात्मक व वैचारिक नाते होते. शेतकरी संघटनेने प्रयत्नपूर्वक शेतकरी आंदोलनाला देशव्यापी स्वरूप देण्याचाही प्रयत्न केला. या प्रकारच्या आंदोलनांचा देशाच्या एकंदर आर्थिक व राजकीय धोरणांवर दूरगामी परिणाम झाला.

१९७८ साली पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात शरद जोशी यांनी ही संघटना बांधायला सुरुवात केली. मार्च १९८० मध्ये शेतकरी संघटनेने शरद जोशींच्या नेतृत्वाखाली कांद्याच्या भावासाठी पहिले महत्त्वाचे आंदोलन केले. त्यासाठी 'रास्ता रोको' आंदोलनाचे तंत्र वापरले. या आंदोलनामुळे संपूर्ण देशाचे लक्ष या शेतकरी संघटनेकडे व तिच्या मागण्यांकडे वेधले गेले. कांद्याच्या पाठोपाठ संघटनेने ऊसाच्या भावाचा प्रश्न उचलला. या दोन्ही आंदोलनांमध्ये शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. 'रास्ता रोको' व 'रेल रोको'च्या तंत्रात राष्ट्रीय महामार्ग व रेल्वे बंद पाडल्यामुळे मोठी खळबळ उडाली. आंदोलनात शेतकरी जमिनी मागत नव्हते. शेतमजुरी वाढविण्याचीही मागणी करत नव्हते; तर ते आपल्य शेती उत्पादनाचा भाव वाढवून मागत होते. शरद जोशींनी या मागणीला संघटनेचा 'एक कलमी कार्यक्रम' असे म्हटले आहे. हा विचार व त्यामागे उभी राहिलेली शेतकऱ्यांची शक्ती हे या आंदोलनाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

२. शेतकरी संघटनेची वैचारिक भूमिका

शेतकरी संघटनेच्या विचारांमधील प्रमुख मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत :

१. इंडिया विरुद्ध भारत : देशातील प्रगत औद्योगिक शहरी क्षेत्र व अप्रगत शेतीचे ग्रामीण क्षेत्र यांच्यात खूप असमतोल आहे. हा असमतोल प्रथम साम्राज्यवादी ब्रिटिश सत्तेने भारतातील शेतीचे जे शोषण केले त्यातून निर्माण झाला. ब्रिटिशांच्या शोषणामुळे शेतीप्रधान आणि ग्रामीण भाग दरिद्री झाले. ही शोषणाची परंपरा चालूच राहिली; त्यामुळे शेतकरी अधिकच कंगाल झाले आणि शेतप्रधान दरिद्री ग्रामीण भाग विरुद्ध उद्योगप्रधान शहरी भाग असे देशाचे दोन भाग पडले. या क्षेत्राला जोशी 'इंडिया' म्हणतात आणि ग्रामीण शेतीप्रधान क्षेत्राला 'भारत' म्हणतात. शेतीचे हे शोषण शेतीमालाचा उत्पादन खर्चही भरून न येणाऱ्या किंमती दिल्यामुळे होते.

२. शेतीमालाला रास्त भाव : शेतीमालाचा उत्पादन खर्च योग्य पद्धतीने काढून त्यात शेतकऱ्याचा वाजवी नफा धरून मगच रास्तभाव ठरविला पाहिजे असा भाव न मिळाल्यामुळेच शेती व्यवसाय तोट्यात जातो आणि शेतकरी दरिद्री होतो. म्हणजेच, शेतकऱ्याचे व पर्यायाने देशाचे दारिद्र्य दूर करण्यासाठी शेतीमालाला रास्त भाव देणे हा एकच आणि सोपा उपाय आहे.

३. ही मागणी सर्व शेतकरी वर्गासाठी असलेली मागणी आहे. छोट्या-मोठ्या शेतकऱ्यांपासून शेतमजुरांपर्यंत सर्वांचे याबाबतीत हितसंबंध एकच आहे. किंबहुना शेती क्षेत्रातील 'वर्ग' ही संकल्पना शेतकरी संघटनेच्या मते गैरलागू आहे. त्यांची घोषणा आहे 'शेतकरी तितुका एक एक'.

शेतकऱ्यांच्या या मागण्या विशेषतः रास्त भावाची मागणी सरकारकडे करायची आहे. शेतीमालाच्या उत्पादनाचा खर्च भरून येईल असे भाव हमी-किंमत त्यासाठी जाहीर करायला शासनाला भाग पाडणे हे संघटनेच्या आंदोलनाचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी वेगवेगळ्या शेतीमालाच्या किंमतीसाठी संघटनेने वेळोवेळी आंदोलन केले. त्यांचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे :

३. आंदोलने

१. कांदा आंदोलन (मार्च १९८०)

फेब्रुवारी १९८० मध्ये चाकणच्या बाजारातील कांद्याचे भाव घसरले. त्यामुळे शेतकरी संघटनेने भाव वाढवून देण्याची मागणी केली. त्यासाठी शेतकऱ्यांनी १ मार्च, १९८० रोजी चाकण येथे 'रास्ता रोको' आंदोलन केले. १० मार्च रोजी शेतकऱ्यांनी आपल्या बैलगाड्या घेऊन येऊन चाकण येथे पुणे-नाशिक महामार्ग अडवून धरण्याचा सत्याग्रह केला. अखेर १५ मार्च रोजी शासनाने नाफेड या सरकारी खरेदी-विक्री संस्थेतर्फे कांदा खरेदीची योजना जाहीर केली. पण बहुतांशी मागण्या मान्य झाल्यामुळे शेतकरी संघटनेने आंदोलन मागे घेतले. शरद जोशींनी उपोषण थांबविले. परंतु पुन्हा एप्रिलमध्ये शासनाने कांदा खरेदी बंद केल्यामुळे आंदोलन पुन्हा सुरू झाले. शासनाने पुन्हा कांदा खरेदीची घोषणा केल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. याचप्रकारचे आंदोलन नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील पिंपळगाव बसवंत येथे झाले.

२. ऊस आंदोलन – नाशिक जिल्हा (ऑगस्ट ते नोव्हेंबर १९८०)

नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी शेतकरी संघटनेच्या नेत्यांच्या नेतृत्वाखाली ऊसाचा भाव ३०० रु. प्रतिटन मिळावा या मागणीसाठी आंदोलनाची तयारी केली. त्यासाठी साखर कारखान्यांना त्या गळिताच्या हंगामात ऊस न देण्याचा ठराव करण्यात आला. साखर कारखाना महासंघाचे श्री. माधवराव बोरस्ते यांनी शेतकऱ्यांच्या या मागणीला पाठिंबा दिला होता. पण इतर कारखान्यांनी मात्र शेतकऱ्यांवर दडपण आणण्याचा प्रयत्न सुरू केला. परंतु शेतकऱ्यांनी निर्धाराने लढा चालविला. त्यांनी ऊस शेतातच ठेवून बांधावर बसून राहण्याचा मार्ग स्वीकारला. सरकारने शेतकऱ्यांवर दडपण आणण्यासाठी उसाच्या पिकासाठी आवश्यक पाणीपुरवठा व वीजपुरवठा बंद केला. तेव्हा १० नोव्हेंबर रोजी नाशिक, धुळे व नगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी रास्ता रोको आंदोलन सुरू केले. तसेच खेरवाडी 'रेल रोको' आंदोलन सुरू केले. शेतकऱ्यांची ही आंदोलने शांततामय मार्गाने सुरू असतानाच पोलिसांनी खेरवाडी येथील आंदोलन शेतकऱ्यांवर १० नोव्हेंबर रोजी लाठीमार व गोळीबार केला. त्यात दोन शेतकरी मरण पावले तसेच अनेक जण जखमी झाले. शेतकरी नेत्यांसह अनेकांना अटक करण्यात आली. १३ नोव्हेंबर रोजी आंदोलन २-३ दिवस स्थगित करण्यात आले. पण तरीही सरकारची शेतकऱ्यांवरील दडपशाही चालूच राहिली. तेव्हा शरद जोशींनी तुरुंगात उपोषण सुरू केले. २० नोव्हेंबरला कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी चक्का जाम आंदोलन करून ऊसाच्या आंदोलनाला पाठिंबा दिला. त्यात हजारो शेतकऱ्यांनी स्वतःला अटक करवून घेतली. २४ नोव्हेंबरला शरद जोशींनी उपोषण सोडले. २७ नोव्हेंबरला महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी ऊसाला ३०० रु. प्रतिक्विंटल भाव देण्याची घोषणा केली. कापसाच्या भावातही वाढ जाहीर करण्यात आली. त्यानंतर आंदोलन स्थगित झाले.

१. तंबाखू आंदोलन : निपाणी (कर्नाटक) (मार्च १९८१)

निपाणी येथील तंबाखू उत्पादन शेतकऱ्यांच्या व्यापाऱ्यांकडून होणाऱ्या लुटीविरुद्ध शेतकरी संघटनेने निपाणी येथे आंदोलन सुरू केले. आंदोलनापूर्वीच सरकारला आंदोलनाची सूचना देऊन विचारविनिमयासाठी

मुदतही दिलेली होती. परंतु सरकारने या मागण्यांकडे दुर्लक्ष केले. १४ मार्च १९८१ रोजी शरद जोशींच्या नेतृत्वाखाली ५० हजार शेतकऱ्यांनी पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको केला. हे रास्ता रोको तब्बल २३ दिवस चालले. शेतकऱ्यांनी जिथे रस्ता अडवला होता तिथे तंबू ठोकून एक 'आंदोलन नगर'च उभारले होते. हा शांततामय सत्याग्रह मोडून काढण्यासाठी ६ एप्रिलला कर्नाटक शासनाने नेत्यांना आणि ८००० आंदोलक स्त्री-पुरुषांना अटक केली आणि उरलेल्या इतर हजारो आंदोलकांवर अश्रुधूर व लाठीमार करून आंदोलन मोडून काढण्याचा प्रयत्न केला. बेछूट गोळीबार केला. त्यात १२ शेतकरी मरण पावले. परंतु २० एप्रिलला कर्नाटक सरकारने शेतकऱ्यांच्या तंबाखूची खरेदी-विक्री प्रक्रिया करण्यासाठी एक सहकारी संस्था स्थापन करण्याचा निर्णय जाहीर केला आणि एकपरीने आंदोलक शेतकऱ्यांची मागणी मान्य करण्यात आली.

या आंदोलनातही मुख्य मागणी तंबाखूला उत्पादन खर्चावर आधारित भाव द्यावा हीच होती. परंतु आंदोलनाचे लक्ष्य फक्त सरकार नसून व्यापारीही होते.

(४) दूध आंदोलन (जून १९८२)

२२ एप्रिल १९८२ रोजी धुळ्यात भरलेल्या शेतकरी संघटनेच्या मेळाव्यात दूध आंदोलनाची हाक देण्यात आली. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांच्या विरोधी असलेल्या शासकीय धोरणास हाणून पाडण्यासाठी म्हणून 'कर्जमुक्ती' 'स्वदेशी' या चळवळी हाती घेण्याचे ठरविले. संघटनेने मागणी केल्याप्रमाणे दुधाचे भाव वाढवून मिळणार नाहीत असे शासनाकडून उत्तर येताच २८ जून १९८२ रोजी दूध आंदोलन सुरू करण्यात आले. मात्र नाशिक, पुणे, सातारा, सांगली, धुळे इत्यादी जिल्ह्यांतील थोडाफार प्रतिसाद वगळता इतरत्र हे आंदोलन पूर्णतः फसले; शेतकरी संघटनेने ते मान्य करून आंदोलन मागे घेतले. दूध आंदोलनाचा दुसरा टप्पा मे १९८३ मध्ये धुळे जिल्ह्यात सुरू करण्यात आला. दुधाच्या भावात वाढ न करण्याच्या शासनाच्या धोरणाच्या निषेधार्थ शासनाचा विरोध असूनही धुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या कचेरीवर गायीगुरांसह मोर्चा नेण्यात आला. पोलिसांनी या मोर्चावर जबर लाठीहल्ला करून तो उधळून लावला.

(५) पंढरपूर-'विठोबाला साकडे'' मेळावा (१६ नोव्हेंबर १९८३)

पंढरपूरच्या मेळाव्यात ६०-६५ हजार शेतकऱ्यांनी 'शेतीमालाला रास्त भाव' या मागणीबरोबरच कृषिमूल्य आयोगाच्या बरखास्तीचीही मागणी केली. तसेच १९८४ हे शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्यवर्ष आहे असे घोषित करून परभणीला संघटनेचे दुसरे अधिवेशन घेण्याचा निर्णय घेतला गेला.

(६) परभणी अधिवेशन (फेब्रुवारी १९८४)

परभणी अधिवेशनास महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागांतील शेतकरी व इतर राज्यांतील प्रतिनिधीसुद्धा हजर होते. संघटनेच्या पुढील आंदोलनाचे कार्यक्रम या अधिवेशनात जाहीर झाले. त्यात पुढारी व कर्जवसुली अधिकाऱ्यांना गावात घेण्यास मनाई करणारा 'गावबंदी' कार्यक्रम, कृत्रिम धाग्याचे कापड वापरणे बंद करणे, ट्रॅक्टर, इंजिन, इलेक्ट्रिक मोटर इत्यादी वस्तू निदान वर्षभर खरेदी न करणे असे आदेश देण्यात आले. त्याप्रमाणे कृषिमूल्य बरखास्तीचा निर्णय घेण्यात आला.

(७) चंदीगडच्या राजभवनावर पिकेटिंग (मार्च १९८४)

पंजाबमधील भारतीय किसान युनियनच्या आंदोलनात महाराष्ट्रातील १५०० शेतकऱ्यांनी चंदीगडला जाऊ भाग घेतला. पुढे जुलैमध्ये झालेल्या पंजाब शेतकऱ्यांच्या सत्याग्रहात शरद जोशींनी भाग घेतला तेव्हा त्यांना अटक झाली. त्याची प्रतिक्रिया महाराष्ट्रात उमटली. शेतकरी संघटनेने शेतकऱ्यांनी ठिकाणी मोर्चे काढून जेलभरो आंदोलन केले.

यानंतर १९८४ सालात संघटनेने कार्यकर्त्यांच्या बैठकीत संघटनेच्या कार्यकारिणीची रचना केली. ठिकठिकाणी प्रचारफेरी, प्रचारयात्रा काढून शेतकरी संघटनेचा विचार अधिकाधिक लोकांपर्यंत नेण्याचा प्रयत्न केला. ऑक्टोबर १९८४ मध्ये कपाशी उत्पादक शेतकऱ्यांचा मेळावा घेऊन त्यांच्या अडचणींवर विचार करण्यात आला. डिसेंबर १९८४ च्या लोकसभा निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर शेतकरी संघटनेला आपले राजकीय पक्षांबाबतचे धोरण ठरवावे लागले. संघटनेने काँग्रेसेतर पक्षांच्या उमेदवारांना पाठिंबा दिला. त्यातील फार थोडे उमेदवार निवडून आले. काँग्रेस उमेदवारांच्या मताधिक्क्यात घट झाली. संघटनेने आपली राजकीय शक्ती त्या पद्धतीने दाखवून दिली. १९८५ मध्येही महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांमध्ये विरोधी पक्षाच्या आघाडीला पाठिंबा देण्याचा व शेतीमालाला भाव व मुद्यावर प्रचार करण्याचा निर्णय घेऊन तो राबविण्यात आला. कृषिमूल्य आयोगाच्या बरखास्तीची मागणी हा ही प्रचाराचा एक मुद्दा होता. त्यामुळे काँग्रेस (आय) नेत्यांनाही भाषणांमध्ये शेतीमालाला रास्त भाव या मागणीला पाठिंबा द्यावा लागला. पंतप्रधान राजीव गांधी यांनी कृषिमूल्य आयोगाचे नाव बदलून कृषी उत्पादन खर्च आयोग असे ठेवल्याची घोषणा केली.

यानंतर संघटनेने शेतमजूर, महिला इत्यादी आघाड्यांवर काम करण्याचा निर्णय घेतला. यानंतरचा शेतकरी संघटनेचा भर हा कापूस प्रश्नावर राहिला.

(९) कापूस आंदोलन : पहिला टप्पा

कृत्रिम धाग्यांच्या कापडांवर बहिष्कार टाकून त्यांची होळी करण्याचे कार्यक्रम शेतकरी संघटनेने जागोजागी केले. तसेच ऊस-उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी राहुरी येथे ऊस उत्पादकांचा मेळावा घेण्यात आला. तसेच दुष्काळी भागातील मजुरांना काम मिळावे यासाठी धुळे जिल्ह्यात राजकीय पक्षांबरोबर परिषद घेण्यात आली. शेतमजुरांसाठी रोजगार हमी योजनेखाली काम मागणे, दुष्काळी कामे सुरू करण्याची मागणी इत्यादींसाठीही शेतकरी संघटनेने काही कार्यकर्ते मराठवाड्यात काम करत होते. १९८६ साली सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यात अनुक्रमे ज्वारी परिषदे आंबेजोगाई येथे घेण्यात आली तर कपास किसान संमेलन अकोल्यात भरविण्यात आले.

(१०) महिला अधिवेशन – चांदवड : ९, १० नोव्हेंबर, १९८६

कापसाच्या आंदोलनाशिवाय संघटनेने आयोजित केलेला दुसरा महत्त्वाचा कार्यक्रम म्हणजे चांदवड येथील महिला अधिवेशन होय. शेतकरी चळवळीत शेतकरी स्त्रियांचा सहभाग असणेही खूप महत्त्वाचे असल्याचे शरद जोशींनी ओळखले. म्हणून त्यांनी अत्यंत नियोजनपूर्वक प्रचंड असा महिला मेळावा घेतला. या अधिवेशनास शेतकरी स्त्रियांच्या बरोबरीने शहरातील स्त्रियांमध्ये काम करणाऱ्या आणि स्त्रियांच्या प्रश्नांसंबंधी

विचार करणाऱ्या महिलाही उपस्थित होत्या. या महिलांना अधिवेशनात काही ठराव पास केले. त्यात शेतात काम करणाऱ्या स्त्रियांच्या वेतनासंबंधी मागण्या होत्या. तसेच पाण्याचा प्रश्न सोडविण्याचीही मागणी होती. रोजगार हमी योजनेत सरकारने स्त्रियांना माती वाहणे, खडी फोडणे यांसारख्या कामांऐवजी वेगळ्या स्वरूपाची कामे द्यावीत अशी महत्त्वाची मागणी करण्यात आली. मुलींचे शिक्षण तसेच सामाजिक असुरक्षितता ठराव करण्यात आले. त्याचप्रमाणे जिल्हा परिषदा आणि ग्रामपंचायतींच्या निवडणुकीत फक्त स्त्रियांनाच उमेदवार म्हणून उभे करण्याचा महत्त्वपूर्ण ठराव करण्यात आला. अधिवेशनानंतर या ठरावाच्या अनुषंगाने शेतकरी महिला आघाडी व इतर स्त्री संघटना व स्त्री कार्यकर्त्यांची मिळून 'समग्र महिला आघाडी' उभी करण्यासाठी शेतकरी संघटनेने पुढाकार घेतला.

(१०) कापूस आंदोलन (नोव्हेंबर-डिसेंबर १९८६)

महिला अधिवेशनानंतर संघटनेने परत आली शक्ती कापूस आंदोलनावर एकत्रित करण्यास सुरुवात केली. २३ नोव्हेंबर रोजी विदर्भातील नागपूर, चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ, अमरावती, अकोला, बुलढाणा व मराठवाड्यातील परभणी व नांदेड या जिल्ह्यांमध्ये शेतकरी संघटनेने रास्ता रोको आंदोलन केले. यापुढच्या टप्प्यात कृत्रिम धाग्यांची वस्त्रे घालणाऱ्या प्रवाशांना अडविणे व त्यांच्या कपड्यांवर संघटनेचा शिक्का मारणे असा कार्यक्रम ठरविण्यात आला तसेच रेल रोकोचाही निर्णय घेण्यात आला. त्यातील ८-१० आंदोलकांना अटक करण्यात आली. शासनाने हे आंदोलन मोडून काढण्याचा प्रयत्न केला.

कापूस आंदोलनाचा पुढचा टप्पा लोकांना कृत्रिम धाग्याच्या वस्त्राच्या खरेदी-विक्रीपासून परावृत्त करण्यासाठी दुकानांसमोर पिकेटिंग करणे हा होता. १५ तारखेचे आंदोलन १६ तारखेवर पुढे ढकलण्यात आले. पण हे आंदोलन सुरू होण्यापूर्वीच शासनाने शेतकरी मागत असलेली कापसाची किंमत मान्य केली. तसेच एकाधिकार कापूस खरेदी योजना व निर्यातवाढ यासंबंधीच्या संघटनेच्या मागण्याही मान्य करण्यात आल्या.

(११) कर्जमुक्ती आंदोलन (१९८८-८९)

'शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतीमालाला हमीभाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांची लूट होते. असा तुटीचा धंदा करण्यासाठी शासन जे कर्ज देते त्याची परतफेड होणे जवळजवळ अशक्यच असते. म्हणून शेतकऱ्यांनी या कर्जातून नादारी घोषित करून मुक्त व्हावे' असा विचार कर्जमुक्ती आंदोलनामागे होता. हे आंदोलन रस्त्यात न लढता न्यायालयात वकिलांच्या मदतीने लढायचे होते. शेतकरी संघटनेने गावोगावी शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचे अर्ज वाटून ते भरून घेऊन न्यायालयात दाखल केले व कर्जवसुलीवर स्थगिती आणली. ही न्यायालयीन लढाई बराच दीर्घकाळ चालली होती. दरम्यान केंद्र सरकारे व नंतर राज्य सरकारने कर्जमाफीची योजना मंजूर केली.

(१२) शेतकरी संघटनेच्या आंदोलनाची वैशिष्ट्ये व मूल्यमापन

१. शेतकरी संघटनेच्या आंदोलनाची व्याप्ती इतरांच्या आंदोलनापेक्षा अधिक मोठी होती.

२. या आंदोलनामध्ये आदिवासी व शेतमजूर वर्गांचा सहभाग फारसा नव्हता.

३. ही आंदोलने मुख्यतः ऊस, कापूस, तंबाखू, कांदा यासारख्या नगदी पिकांच्या भावाच्या संबंधात झाली व त्या पिकांशी संबंधित म्हणजे मध्यम व मोठा शेतकरी आंदोलनांचा आधारस्तंभ होता.

४. ही बहुतेक आंदोलने शासनाविरुद्ध करण्यात आली आणि आंदोलनांच्या शेवटी शासनाबरोबर बोलणी होऊन तडजोडीने मिटविण्यात आली.

५. आंदोलनाचा जोर प्रामुख्याने नाशिक, अहमदनगर, धुळे, जळगांव, मराठवाड्यातील परभणी, नांदेड, लातूर व पुणे जिल्ह्यांच्या काही भागात होता. कोकण व दक्षिण महाराष्ट्रातील सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर या भागांमधये आंदोलनांना फारसा प्रतिसाद मिळाला नाही. याचे कारण म्हणजे या भागात कापसाचा प्रश्न नहीच. पण ऊसाच्या बाबतीत परंपरागतरित्या काँग्रेस पक्षाच्या प्रभावाखालील सहकारी संस्थांचे या भागाच्या राजकारणावर जसे वर्चस्व आहे तसे ते उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, नगर जिल्ह्यात नाही. त्या जिल्ह्यांमधील राजकारणात नेहमीच काँग्रेसला विरोध करण्याची परंपरा राहिली आहे. तसेच स्वातंत्र्यपूर्व काळातील व नंतरच्या शेतकरी चळवळींची परंपरा या भागांमध्ये असल्यामुळे कदाचित शेतकरी संघटनेला येथे अधिक प्रतिसाद मिळाला.

६. शेतकरी संघटनेच्या चळवळीत आंदोलनाची नवनवी तंत्रे सतत वापरली गेली. या चळवळीत नेहमीच महात्मा गांधीप्रणित शांततामय सत्यग्रहाचा मार्ग चोखाळला गेला. नवीन कल्पना लढवून लोकांना आंदोलनात सहभागी होण्यास उद्युक्त करण्यात आले.

७. ''शेतकऱ्यांमध्ये वर्ग नाहीतच आणि असले तरी त्यांच्या हितसंबंधात अंतर्विरोध नाहीत'' असे म्हणून संघटनेने सर्व शेतकऱ्यांना एका छत्राखाली आणून आघाडी करण्याचा प्रयत्न केला. संघटनेचे बळ वाढविण्याचा हा सोपा मार्ग होता. प्रत्यक्षात संघटनेने शेतीमालाला भाव वाढवून घेऊन मोठ्या व मध्यम शेतकऱ्यांचाच फायदा साधला. लहान शेतकऱ्यांसाठी ही मागणी फायदेशीर नव्हती. कारण हरित क्रांतीचा फायदा घेऊन आधुनिक तंत्र वापरून व कर्ज काढून शेत करणारे शेतकरी मुख्यतः श्रीमंत व मध्यम वर्गातीलच होते. तसेच नगदी पिके घेणरा शेतकरीच बाजारपेठेसाठी माल पिकवतो. त्यामुळे वाढीव भावांचा फायदा त्यालाच होतो. छोटा शेतकरी–ज्याचे प्रमाण एकूण शेतकऱ्यांमध्ये जास्त आहे हा स्वतःच्या पोटासाठीच प्रामुख्याने धान्य पिकवतो. शेतकरी संघटनेने ज्वारी, तांदूळ, बाजारी यांसारख्या पिकांसाठी आंदोलने केली नाहीत. मात्र ती करण्याचे बेत वेळोवेळी करून याही शेतकऱ्यांना आंदोलनात ठेवले. प्रत्यक्षात मात्र अशी आंदोलने झाली नाहीत.

८. आंदोलनाच्या प्रचारासाठी शेतकरी संघटनेने धार्मिक व सांस्कृतिक परंपरांचा मोठ्या हुशारीने वापर केला. उदा. 'इडा पिडा टळो, बळीचे राज्य येवो' हे शेतकरी दिवाळीला म्हणत असलेले वाक्य घोषणवाक्य करून संघटनेने त्याला नवा अर्थ दिला. 'बळी म्हणजे शेतकऱ्यांचा राजा. त्याला पाताळात गाडला. तो वर येईल तेव्हा म्हणजेच शेतकऱ्यांचे राज्य येईल तेव्हा खरे सुराज्य निर्माण होईल' हे कल्पित आदर्श त्यासंदर्भात तयार केले गेले. तसेच पंढरपूरच्या विठोबाला वारी करणाऱ्या भक्तप्रमाणे एकादशीच्याच दिवशी 'साकडे' घालण्याचा कार्यक्रम आखला. इतिहासाचा नवा अर्थ लावून 'शिवाजी हा शेतकऱ्यांचा राजा होता' हे सांगितले.

९. भारताच्या इतर राज्यांमधील शेतकरी चळवळींबरोबर समन्वय साधून अखिल भारतीय पातळीवर शेतकऱ्यांची चळवळ उभी करून देशाच्या राजकारणात शेतकरी हा एक महत्त्वाचा घटक शेतकरी संघटनेने तयार केला. १९८९ साली जेव्हा व्ही. पी. सिंग यांच्या नेतृत्वाखाली सत्तेवर आले तेव्हा शेतीविषयक धोरणांमध्ये लक्षणीय फरक घडून आला. शेतकरी संघटना व व्ही. पी. सिंग यांच्या निवडणूक युती झाली होती. तसेच व्ही. पी. सिंग यांनी शरद जोशी यांचीच शेतीविषयक धोरण निश्चित करणाऱ्या समितीवर नेमणूक करून शेतकऱ्यांचे हितसंबंध राखले जातील अशी व्यवस्था केली.

१०. शेतकरी संघटनेच्या चळवळीचे सुरुवातीच्या काळातील आकर्षण वेगळे होते. स्वघोषित अराजकीय रूप हळूहळू बदलले. ''आपण निवडणुकीच्या राजकारणापासून दूर राहणार'' हे संघटनेचे धोरण होते. ते पुढे अर्थातच बदलले. ही संघटना राजकीय बनली. तसेच राजकीय पक्षांच्या जडणघडण व तोडमोडीतही तिने सक्रीय भाग घेतला.

११. शेतकरी संघटनेचे एक लक्षणीय यश म्हणजे मोठ्या प्रमाणात तिने महिलांची आघाडी बांधून त्यांना आंदोलनात सहभागी करून घेतले. शेतकऱ्यांचा प्रश्न हा शेतकरी स्त्रियांचाही प्रश्न आहे ही महत्त्वाची भूमिका मांडून शेतकरी संघटनेने त्या दृष्टीने जी कृती केली ती ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची ठरते.

१२. शेतकरी संघटनेने जातीयता व जमातवाद याच्या संदर्भात ठामपणे पुरोगामी भूमिका घेतलेली दिसून येते. विशेषतः संघटनेने १९८४ नंतर जातीयवादाचा संघटनेच्या कार्याला होऊ शकणारा धोका जाणवून त्याविरुद्ध आघाडी उभारली. जातीयवादी संघटना व चळवळी या शेतकरी संघटनेसारख्या अर्थवादी चळवळींना मारक असतात. म्हणून त्यांचा निश्चयपूर्वक मुकाबला केला पाहिजे ही पुरोगामी भूमिका शेतकरी संघटनेने घेतली. या भूमिकेचा महाराष्ट्राच्या पक्षीय राजकारणावरही महत्त्वपूर्ण परिणाम झाला.

(च) स्वाभिमानी शेतकरी संघटना

खासदार राजू शेट्टी यांनी ऊस आणि दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या कच्च्या मालाला योग्य दर मिळावा यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटना स्थापन केली. महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर इत्यादी जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना उत्पादन खर्च भागून त्यामध्ये त्यांना थोडाफार फायदा राहील अशाप्रकारच्या ऊसाला दर मिळाला पाहिजे यासाठी या चळवळीच्या माध्यमातून प्रयत्न सुरू केला. महाराष्ट्र सरकारने उत्पादन खर्चावर आधारित ऊसाला हमीभाव निश्चित न केल्यामुळे आणि साखर सम्राटांची ऊसाच्या दराबाबतची मनमानी यामुळे शेतकरी कर्जबाजारी बनले. राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली स्वाभिमानी शेतकरी संघटनेने कारखाना स्थळांवर तसेच प्रशासकीय कचेऱ्यांवर मोर्च्यांने जाऊन आंदोलने केली. साखर सम्राटांकडून शेतकऱ्यांचे शोषण केले जाते यासंबंधी शेतकऱ्यांना जागृत करण्यासाठी त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी परिषदा घेतल्या. कार्यकर्ते निर्माछण केले आणि ऊसाला रास्त दर मिळवून दिला. ऊस आंदोलनाबराबेरच त्यांनी दूध आंदोलन करून दूध संघातील पदाधिकारी, संचालक दुधावरची मलई कशी हडप करतात हे शेतकऱ्यांना पटवन दिले. त्यासाठी त्यांना दुधाचे टेंपो अडवून आंदोलन केले. महाराष्ट्रातील शेतकरी ऊस अणि दूध उत्पादन करून

आपले सर्वसाधारण जीवन जगतो. त्या शेतकऱ्यांना चांगल्या प्रकारे जगण्याचा अधिकार मिळावा यासाठी त्यांनी प्रयत्न केले. शेती मालाचा उत्पादन खर्च भागून शेतकरी कर्जमुक्त व्हावा यासाठी त्यांनी शेतकऱ्यांची मोठी चळवळ उभारली. याचाच परिणाम म्हणून दूध व ऊसाच्या किंमतीमध्ये सातत्याने वाढ होत गेलेली आहे.

४.२.२ महाराष्ट्रातील कामगारांच्या चळवळी

४.१ प्रस्तावना

भारत हा शेतीप्रधान देश आहे. त्यामुळे येथे शेती आणि शेतकऱ्यांचे प्रश्न नेहमीच महत्त्वाचे राहिले आहेत. आधुनिक काळात कारखानादारीच्या वाढीनंतर कामगार घटक लक्षावधीच्या संख्येत निर्माण झाला आहे. त्यामुळे त्याच्या व्यक्तिगत प्रश्नांपेक्षा सामूहिक स्वरूपाचे प्रश्न, समान प्रश्न सोडविण्यासाठी संघटित होऊन एकत्रितपणे प्रयत्न सुरू झाले. यातून कामगार हित, कामगार कल्याण आणि सर्वांगीण प्रगतीची उद्दिष्टे साध्य करावयाची होती. त्यामुळे अशा लढ्यालाच चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले.

युरोपमध्ये औद्योगिक क्रांती घडून आली. कारखानदारी वाढत गेली. अठराव्या शतकाच्या मध्यापासून उत्पादन वाढले. परंतु मालकांकडून कामगारांचे शोषण होऊ लागले. कामगार विपन्नावस्थेत एक विषम समाज घटक ठरले. त्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले. त्यामुळे कामगारांना न्याय मिळावा, त्यांचे शोषण बंद होऊन त्यांना योग्य मोबदला मिळावा, सोयी सवलती मिळाव्यात, त्यांची सर्वांगीण प्रगती व्हावी इत्यादी कारणांमुळे सामूहिक प्रयत्नांतून कामगार चळवळी निर्माण झाल्या. अठराव्या शतकाच्या दोन-तीन दशकांत हे प्रश्न व त्याविषयीची जागृती दिसू लागली. आज युरोपच नव्हे तर जगभर या कामगार संघटनांचे प्रबळ अस्तित्व दिसून येते. कामगारांच्या हितासाठी कार्ल मार्क्सने जगातील सर्व कामगारांना एक होण्याचे, रक्तरंजित क्रांतीसाठी तयार होण्याचे आवाहन केले. साम्यवादी तत्त्वज्ञान मार्क्स-एंजेल्समुळे जगाला एका वेगळ्या वळणाकडे घेऊन जाणारे ठरले. साम्यवादाचा हा लढा भांडवलशाहीविरुद्ध जगाला दोन विचारप्रवाहात विभागणारा ठरला. रशियात कामगार क्रांती घडून आली. रशियाने साम्यवादाचा स्वीकार केला. चीन, इंडोचायनाचे देश, आग्नेय, आशिया आणि हळूहळू जगभर साम्यवादाचा विस्तार झाला. श्रम करणाऱ्या कामगाराला उत्पादन व नफ्यात वाटा मिळाला पाहिजे, त्याचे जीवन मालकाप्रमाणे सुख-समृद्धीचे असावे, इत्यादी बाबी पाहता आज हा स्वतंत्र अभ्यास विषय बनत आहे. आंतरराष्ट्रीय संघटना म्हणून कामगार संघटना (ILO अंतर्गत) काम करत आहेत. त्यांना योग्य वेतन द्यावे, मानवीय वागणूक द्यावी, मनोरंजन व कामाच्या तासांच्या मर्यादा, अतिरिक्त कामाचा मोबदला, आरोग्य, जोखीम, विमा, कुटुंबाचे हित इत्यादी अनेक प्रश्न सोडवून या चळवळीने कामगारांना सुखी व समृद्ध करण्याचा प्रयत्न केला.

४.२ विषय विवेचन

४.२.१ भारतातील कामगार चळवळ : पार्श्वभूमी

इंग्रज भारतामध्ये राज्यकर्ते बनले. त्यांच्यासोबत व्यापार आणि आर्थिक यंत्रणाही स्थिरावली गेली.

औद्योगिक क्रांतीच्या विकासामुळे देशात कामगार आणि कारखानदारीची वाढ होऊ लागली. येथील उद्योग व व्यापारावर ब्रिटिशांनी नियंत्रण ठेवले. एकोणिसाव्या शतकात या औद्योगिक स्वरूपाच्या विकासासोबत उत्पादन वाढीस गती मिळाली आणि कामगारांचे प्रश्न गंभीर झाले. ब्रिटिशांनी शेतकऱ्यांची पिळवणूक केली. त्यांनी उद्योग व कारखाने सुरू करून त्यांच्या रगजा पूर्ण करून घेण्याचा अटोकाट प्रयत्न केला. त्यामुळे भारतात कारखानदारीचा जन्म झाला. हळू-हळू तिचा विस्तार होत गेला. १८५३ मध्ये आगगाडी निर्मितीचा पहिला कारखाना उभा राहिला. कामगार वर्गाचेही बीजारोपण झाले. १८५४ मध्ये नानाभाई कावसजी या पारशी व्यक्तीने मुंबई येथे आधुनिक स्वरूपाचा वस्त्रोद्योग सुरू केला. मुंबईचे हवामान कापड उद्योगासाठी अनुकूल असल्यामुळे येथे हा उद्योग स्थिरावला ? टाटा यांनी नागपूर येथे 'एक्सप्रेस मिल' स्थापन केली. पहिल्या महायुद्धापर्यंत भारतभर हा व्यवसाय सुरू होऊन २७४ कापड गिरण्या सुरू झाल्या. एका मुंबई शहरात १५० कापड गिरण्या सुरू झाल्या. देशात खजिनाच्या उपलब्धतेमुळे लोखंड व पोलाद कारखाने उभे राहिले. धातू उद्योग, कोळसा, अभ्रक, मँगनीज उद्योगाची प्रगती झाली. 'कमी खर्चात जास्त नफा' या तत्त्वामुळे मालकांचा फायदा आणि कामगारांवर अन्याय होऊ लागला. त्याला वाचा फोडण्याचे काम सुधारकांनी केले. भारतीय कामगारांना परकीय कामगारांबद्दल माहिती देणे, त्यांच्यात परिवर्तन घडवून आणणे इत्यादी कार्यात अखिल भारतीय स्तरावर लाला लजपतराय, जोसेफ बॅप्टिस्टा, नारायण जोशी, दिवाण चिमणलाल यांनी प्रभावी कार्य केले. महाराष्ट्रामध्ये टिळक, बॅप्टिस्टाप्रमाणे नारायण मेघाजी लोखंडे यांनी कामगारांचे प्रभावीपणे नेतृत्व केले. सदाशिवराव केळकर, एस. एस. जोशी, नारायण मल्हार जोशी, स्वामी रामानंद तीर्थ इत्यादींनी कार्य केले.

१८८५ साली परिवर्तन घडवून कामगार कल्याणासाठी धडपड करण्यात नारायण मेघाजी लोखंडे यांचे प्रयत्न महत्त्वपूर्ण ठरले. देशादेशीच्या मजुरांची स्थिती व दुःखे यांची माहिती मिळू लागली. समस्या सोडविण्यासाठी संप हा प्रभावी उपाय असल्यामुळे १९व्या शतकात १८८५ च्या सुमारास जी.आय.पी. रेल्वेच्या सिग्नल खात्याच्या कामगारांनी संप केला. त्यांनी काम बंद करून मागण्या मान्य करवून मालकांना वठणीवर आणण्यात यश मिळविले. १९०५ साली वंगभंग चळवळीतून आगगाडी कारखाना, कापड गिरण्या आणि सरकार छापखान्यातील कामगारांनी संप केले. १९०८ मध्ये टिळकांच्या अटकेच्या निषेधार्थ कामगरांनी संप केला. १९१८ मध्ये हजारो कामगारांनी संपाचे हत्यार उपसत संपावर गेले. धर्मानंद कोसांबीची मार्क्सवर झालेली व्याख्याने परिणामकारक ठरली. टिळकांच्या अटकेविरुद्ध झालेल्या संपाला राजकीय महत्त्व होते. तसेच रौलेट ॲक्ट विरोधात केलेल्या संपाला राजकीय महत्त्व प्राप्त झाले. १९२० मध्ये 'ऑल इंडिया ट्रेड युनियन' स्थापन झाली. त्याचे मुंबईत पहिले अधिवेशन झाले. त्याचे अध्यक्ष लाला लजपतराय होते. १९२४ मध्ये चित्तरंजन दास आणि १९२६ मध्ये गिरी यांनी अधिवेशनाचे अध्यक्षपद भूषविले. समाजवादाचा उदय होऊन १९२९ मध्ये काँग्रेसने समाजवादाचा स्वीकार केला. यानंतर लोकशाही समाजवादाची वाटचाल सुरू झाली. १९२९ मध्ये अहमदाबाद येथे कामगारांनी संप केले. महात्मा गांधी यांनी कामगारांना मार्गदर्शन केले. शेतकरी कामगार पक्षाने प्रयत्न केले. अशा गतिमान झालेल्या या भारतीय कामगार चळवळीचा महाराष्ट्रातील उदय आणि विकास येथे पाहूया.

४.२.२ कामगार चळवळीचा प्रारंभ होण्याची कारणे

महाराष्ट्रात कामगार चळवळीचा जन्म मुंबईमध्ये झाला. नंतर येथून तिचा इतर ठिकाणी विस्तार होत गेला. त्यामागे काही कारणे घडली. ती पुढीलप्रमाणे सांगता येतील.

(अ) फॅक्टरी ॲक्ट

फॅक्टरी ॲक्टचा संबंध मँचेस्टर (इंग्लंड) व मुंबई येथील कापड गिरणी मालकांच्या स्वार्थाशी जडलेला होता. मुंबईतील कापड गिरण्यांच्या स्थापनेमुळे मँचेस्टरच्या कापड उद्योगास धोका निर्माण झाला; आणि अशातच मुंबईच्या वातावरणाला आवर घालण्याचे ठरले. मुंबईची सुरू झालेली भरभराट अडचणीत आणण्याचा प्रयत्न सुरू झाला व फॅक्टरी ॲक्ट लागू करण्याची सूचना मुंबई सरकारला मिळाली.

(आ) रॉयल मिलमधील संदर्भ

मि. ब्राऊनने स्त्रियांची व १२ वर्षांखालील बालकांची पिळवणूक केली म्हणून मुंबई सरकारला फॅक्टरी ॲक्ट लागू करण्याचे कळविण्यात आले. हा कायदा लागू करण्यामागे खऱ्या अर्थाने उदार विचार नसून वेगळाच हेतू होता.

(इ) बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशन

मुंबई येथील मिल मालकांनी एकत्र संघटन केले. त्यातूनच 'बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशन'चा जन्म झाला. फॅक्टरी ॲक्ट लागू होणार या भीतीतूनच ही संघटना निर्माण करण्यात आली. यामागे कामगारांचे हित महत्त्वाचे नसून कारखानदारांचे स्वहित व स्वार्थ ही मुख्य भावना होती.

(ई) मँचेस्टरचा वाढता दबाव व बदलते वातावरण

नॉटच्या अध्यक्षतेत फॅक्टरी ॲक्ट बनविण्यासाठी कमिशन नियुक्त करण्यात आले. त्यामध्ये गिरणी मालकांचे प्रतिनिधी म्हणून मिबाल थेल, सर मंगलदास नथुभाय, मॅक्सवेल, मोरारजी गोकुळदास, दिनशॉ पॉटर हे होते. सर्वसामान्यांचे प्रतिनिधी म्हणून डॉ. ब्लानी व रावसाहेब विश्वनाथ मंडलिक यांचा समावेश होता. या सर्वांनी फॅक्टरी ॲक्टच्या विरोधात भूमिका घेतली तसे त्यांनी सरकारला कळविले.

(उ) मंदीचा फटका

१९७९-८० मध्ये उद्योगांना मंदीचा फटका बसला. त्यामुळे सर्व गिरणी मालक व व्यवसायांचे मालक त्रासून गेले. मजुरी कमी झाली. कामही मिळेना. आठवड्यातून दोन-तीन दिवस गिरण्या बंद ठेवल्या जाऊ लागल्या. मंदीमुळे डबघाईला आलेल्या उद्योगांमुळे कामगारांचे हाल सुरू झाले. यामुळे कामगार चळवळ उभी राहण्यास हातभार लागला.

(ऊ) कायद्याच्या बाजूने व विरोधात वृत्तपत्रांमधून जनमत उमटले

फॅक्टरी ॲक्टविषयी वृत्तपत्रांमधून बरीच चर्चा झाली. काहींनी या कायद्याच्या बाजूने मते मांडली तर

काहींनी विरोधात मते मांडली. 'नेटिव्ह ओपिनियन' व 'राफ्त गोफ्तर' या कायद्याच्या विरोधात लेखन केले. 'जमे जमशेद'नेही विरोधी भूमिकेतून लिहिले. 'इंदुप्रकाश'ने फॅक्टरी ॲक्ट लागू केला पाहिजे असे मत मांडले. त्यामुळे शिक्षितांचे मत सरकारसमोर व सर्वांसमोर सादर केले. अशातच सरकारने 'फॅक्टरी ॲक्ट' लागू केल्याची घोषणा केली.

४.२.३ कामगार चळवळींची उद्दिष्टे

कामगार चळवळ पूर्णपणे समजून घेण्यासाठी कामगार चळवळीचा उद्दिष्टात्मक, रचनात्मक, कार्यात्मक दृष्टीकोनातून विचार करून कामगार चळवळी का व कशा निर्माण झाल्या हे समजून घेणे गरजेचे आहे. मानवाच्या संघटित प्रयत्नांचे अनेक जीवनानुभव असतात. ते जमेस धरून कामगार क्षेत्रात उतरलेल्या नेत्यांना व कार्यकर्त्यांना स्वतःची स्थिती, राहणीमानाचा दर्जा यांचा विचार करण्याची प्रेरणा लाभते. श्रम हा समाज जीवनातील स्थायी, क्रियाशील व मानवी घटक आहे. तो उत्पादन प्रक्रियेचा सक्रिय घटक आहे. श्रम हे साठवून ठेवता येत नाही म्हणून त्याची सौदा करण्याची शक्ती कमी असते. श्रम विकता येतात. श्रमिकांची गतिशीलता कमी असते. अशा मर्यादांमुळेच श्रमाचे सर्वत्र शोषण होते. यामुळे या चळवळीची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे सांगता येतील :

(अ) कामगार चळवळींची उद्दिष्टे

१. कामगारांचे जीवनमान सुधारणे

२. कामगारांना संरक्षण मिळवून देणे.

३. कामगारांचे होणारे शोषण थांबविणे.

४. कामगारांना माणूस म्हणून जगता यावे यासाठी प्रयत्न करणे.

५. कामगारांना आर्थिक वेतन, सोयी व भत्ते इत्यादी प्राप्त करून देणे.

६. कामगारांचे सामाजिक, सांस्कृतिक व आरोग्य इत्यादी प्रश्न सोडवून त्यांना योग्य दर्जा मिळवून देणे.

७. कामगारांना जागतिक चळवळीशी व मजुरांशी जोडून ठेवणे.

८. व्यवस्थापन व शासनात योग्य सहभाग मिळवून देणे, या उद्दिष्टांनी कामगार संघ व कामगार चळवळ कार्य करताना दिसून येतात.

याआधारे विविध स्तरांमधील कामगारांचे संघ, कामगारांच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन चालणाऱ्या चळवळी कधी राजकीय पक्षांच्या तर कधी स्वतंत्र स्वरूपात अस्तित्वात येतात. त्यांना आपण वरील उद्दिष्टांचे फलित म्हणू शकतो.

४.२.४ महाराष्ट्रातील कामगार चळवळींचा प्रारंभ

भारतीय कामगार जगतात मुंबई नगरीतील परिवर्तनांचा वाटा महत्त्वाचा आहे. यासाठी १८७५ मध्ये मुंबई

नगरीने पहिला सामान्य व असंघटित प्रयत्न केला. सोराबजींच्या नेतृत्वाखाली कायदा व्हावा म्हणून आवाज उठविण्यात आला. कामगारांना संघटित करून पहिला संघटनात्मक प्रयत्न १८९० मध्ये मुंबई येथून नारायण मेघाजी लोखंडे यांनी केला. 'बॉम्बे मिल हँडस् असोसिएशन'च्या उभारणीमुळे ही चळवळ जन्मास आली. मनोहर कदम यांनी लिहिलेल्या 'नारायण मेघाजी लोखंडे यांचे चरित्र' या ग्रंथात प्रो. दिनेश चक्रवर्तींनी लिहिले आहे की, एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या २० वर्षांत भारतात कामगार चळवळीस सुरुवात झाली. १८९० साली कामगार वर्गामध्ये खऱ्या अर्थाने जाणीव निर्माण झाली. यावेळी भारतीय कामगार अशिक्षित व अडाणी होते. त्यांच्यात जातिभेद व भाषाभेद होता. गावातून जाऊन राहणारे हे नवखे कामगार होते. त्यांना इंग्रजी येत नव्हते. संघटन बनविण्याचे तंत्र त्यांना अवगत नव्हते. आपली नेमकी भूमिका काय आहे हेही माहीत नव्हते. कामगार विश्वाबाहेरचे (आऊट साइडर्स) म्हणजे डॉक्टर, वकील व राजकीय पुढारी त्यांचे संघ बनवून जबाबदारी घेत. म्हणून त्यांना 'आऊट साइडर्स' नाव पडले. तरी कामगारांसाठी ते बाहेरचे नसायचे. ते काम संघ कायद्यान्वये सन्मान्य सभासद म्हणून निवडून येत.

(अ) नारायण मेघाजी लोखंडे

ब्रिटिश काळामध्ये झालेल्या मुंबईच्या औद्योगिक विकासामुळे महाराष्ट्रातील मुंबई प्रांतात कामगार चळवळीने मूळ धरले. या चळवळीला आकार देण्यात नारायण मेघाजी लोखंडे सर्वात आघाडीवर होते. महाराष्ट्राप्रमाणेच देशभरातील चळवळींतही त्यांचे नाव या चळवळीच्या उभारणीसाठी अग्रदूत म्हणून घेतले जाते. त्यांचे मूळ गाव पुणे जिल्ह्यातील कव्हेरसर (तालुका खेड) हे होते. त्यांचा जन्म १८४८ मध्ये ठाणे येथे झाला. तेथेच ते मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाले. १८७० पर्यंत रेल्वे लोकामोटिव्ह खात्यात कारकून व नंतर पोस्ट विभागात त्यांनी नोकरी केली.

सुरुवातीच्या काळात १८७० पासूनच नारायण लोखंडे यांनी बहुजन समाजाचे अज्ञान, चालीरीती, शिक्षणाची आवश्यकता याविषयी स्फूट लेखन केले. पूर्वीची नोकरी सोडून ते मांडवीच्या मिलमध्ये स्टोअरकीपर बनले. ब्राह्मणेतरांचे प्रथम वृत्तपत्र (१८७७) 'दीनबंधू'चे ते संपादक होते. या मिलच्या नोकरीद्वारे त्यांना कामगारांचे जीवन जवळून पाहण्याची व अनुभवण्याची संधी मिळाली. त्यावेळी कावसजी दावर यांची १८५४ पासून चालणारी पहिली कापड गिरणी मुंबईत होती. नंतर या गिरण्यांची संख्या सतत वाढत गेली. मुंबईच्या कापड गिरण्यांचा कारभार पाहण्यात मॅनेजिंग एजन्टस्ना महत्त्व होते. मॅनेजर दैनंदिन कामकाज व व्यवस्थापन सांभाळत. विविध खात्यांचे मास्टर्स व असिस्टंट कार्डिंग, विव्हिंग आणि स्पिनिंगची कामे पाहत. त्यांच्या हाताखाली जॉबर्स, व सुपरवायझर्स असत. त्यांचा कामगारांशी संपर्क असे. गिरणीत नोकरी मिळवून देणारा 'जॉबर' हा महत्त्वाचा घटक असून त्या कामासाठी तो 'बक्षीस किंवा दस्तुरी' घेत असे. दोन ते पाच रुपये इतकी रक्कम स्त्री-पुरुष त्यास देत. हा प्रकार चांगला नव्हता. तो बंद करण्याचे प्रयत्न 'बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशन'ने केला. परंतु त्यात त्यांना यश आले नाही. १९३३ मध्ये हे थांबले. पण तोपर्यंत 'जॉबर्स' हे कामगारांचे शोषण करतच होते. नवी गिरणी निघाली की अशिक्षित, अकुशल कामगार काम मागत. सशक्त पण कोवळ्या वयाच्या मुलांना संधी मिळायची. पाच ते सात वर्षाच्या मुलांनाही कामात गुंतवले जाई. गिरण्या

वाढल्या तशी कामगारांची संख्याही वाढत गेली. गिरणी मालकांचे उत्पादन व नफा प्रचंड वाढला पण कामगारांची वेतनवाढ फारच कमी झाली.

कामगार जीवनाच्या समस्या वाढतच होत्या. भरतीत जातीचा विचार होत असे. जॉबर आपल्या जातीची माणसे कामासाठी आणत असे. 'युनायटेड स्पिनिंग अँड विव्हिंग मिल'चे उदाहरण पाहिले तर असे दिसून येते की, या मिलमध्ये मागासवर्गीयांना कामावर घेत नसत. कारण यात विव्हिंग विभागात सर्व विभागांपेक्षा जास्त वेतन होते. कामाच्या तासाविषयी शोषण चालत असे. सूर्योदयाच्या उजेडापासून सूर्यास्त व पूर्ण अंधार होईपर्यंत हिवाळ्यात १२ ते १३ आणि उन्हाळ्यात १३ ते १४ तास काम करून घेत. उशीर केला की कामगारांच्या वेतनातून कपात केली जात असे.

अशा सर्व परिस्थितीमुळे कामगारांचे जीवन हलाखीचे बनले होते. लोखंडे यांनी १८८४ मध्ये ५५०० कामगार उघड्यावर गिरणीबाहेर झोपत अशी नोंद केली आहे. कामगारांच्या कामाचे वेळापत्रक व काम अनिश्चित होते. ९० ते १०० अंश उष्णतेत, कोंदट वातावरणात काम करावे लागत असे. हिंदू सणाच्या वेळी अर्धा दिवस काम बंद राही बाकी सुट्ट्या नसत. 'बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशन'चे १६ नियम दिखाऊ होते. कारण ते पाळलेच जात नसत. या परिस्थितीमुळे नारायण मेघाजी लोखंडे यांना कामगार जीवनासाठी चळवळ हाती घेण्यास प्रेरित केले. यासोबत फॅक्टरी व चळवळीच्या प्रारंभाचाही आपण अभ्यास केला. या सर्व बाबींतून कामगार चळवळीची सुरुवात झाली व तिचा हळूहळू विस्तारत गेली.

(आ) लोखंड यांचे संघटनात्मक व जागृती कार्य

फॅक्टरी ॲक्ट आणि कामगार चळवळीची सुरुवात याविषयी आपण माहिती जाणून घेतली. १९८१ मध्ये 'फॅक्टरी ॲक्ट' लागू करण्याची शिफारस करण्यात आली. लोखंडे यांनी 'इंडियन स्पेक्टेटर' व 'राफ्त गोफ्तर' या दोन पत्रांमधून कामगारांसाठी संघटना असावी अशी गरज व्यक्त केली. त्यांनी 'दिनबंधू'मधूनही कामगारांची दुःखे स्पष्टपणे मांडण्याचा प्रयत्न केला. यासोबत त्यांनी भारतातील पहिली कामगार संघटना 'बॉम्बे मिल हँड असोसिएशन' या नावाने स्थापन केली. त्यांच्या या संघटनात्मक कार्याला रघू भिकाजी, गेनू बाबाजी, नारायण सुकौजी यांसारख्या जॉबर्सनी मदत केली. हे खूप उल्लेखनीय आहे. या दरम्यान सत्यशोधक समाज बहुजनांसाठी झटत होता. त्यामार्फत रघू कोरगांवकर, कृ. स. केळुसकर, रामचंद्र शिंदे, नारायण पवार इत्यादींनी कामगार चळवळीत आपला सहभाग नोंदवला.

लोखंडे एकीकडे गिरणी-कारखाने, त्यातील कामगार जीवन यांतील वस्तुस्थितीचा अभ्यास करत तर दुसरीकडे शासकीय कायदेशीर बाजूंचाही अभ्यास करत. १८८१ च्या फॅक्टरी ॲक्टचा अभ्यास करून त्यातील अपूर्णता त्यांनी सर्वांसमोर मांडल्या. त्यात त्यांनी काही अपेक्षित सुधारणाही सुचविल्या. २२ व २३ सप्टेंबर, १८८४ रोजी परळ तसेच भायखळा येथे सभा घेऊन कामगारांमध्ये जागृती केली.

(इ) फॅक्टरी कमिशनला सादर केलेल्या मागण्या

कामगारांचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळवून वरील सभांमध्ये त्यांनी ठराव पास केले. त्यात करण्यात आलेल्या

पुढील मागण्या त्यांनी फॅक्टरी कमशिनचे अध्यक्ष डब्ल्यू. बी. मूलक यांना सादर केल्या.

१. गिरणी कामगारांनी रविवारी पूर्ण दिवस विश्रांती द्यावी.

२. दुपारी अर्धा तास कामगारांना सुट्टी असावी.

३. सकाळी ६.३० पासून सुर्यास्तापर्यंत काम व्हावे.

४. कामगारांना महिन्याच्या १५ तारखेपर्यंत वेतन द्यावे.

५. कामावर कामगाराला दुखापत झाली तर तो बरा होईपर्यंत त्याला पूर्ण पगार द्यावा. कामावर कामगाराचा मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबाला पेन्शन दिली जावी.

मुंबईतील मागण्यांवर विचार चालू असतानाच कामगारांनी १८८५ मध्ये दोन गिरण्यांमध्ये पगार कपात व पगारास नकार या कारणास्तव संप केला.

कुर्ल्याच्या स्वदेशी मिलमध्ये १८८७ मध्ये संप झाला. याला टाटांनी उत्तरेतून मजूर आणून अयशस्वी शह दिला. स्त्रिया सणासुदीला कामावर येत नाहीत म्हणून मालकांची नाराजी होती. फॅक्टरी ॲक्टप्रमाणे काही बदल करता यावेत म्हणून लोखंडे यांनी ३ जून १८८९ रोजी मुंबई सरकारला पत्राद्वारे कायदा करण्याची विनंती केली. प्रारंभी रविवारच्या सुट्टीस कामगारांचा विरोध झाला. कारण ख्रिश्चनांचा चर्चचा आणि हिंदूंचाही खंडोबा व कुलस्वामिनीचा हा वार होता. ब्रिटिशांचाही सोयीचा हाच वार होता. शेवटी रविवारची आठवडी सुट्टी कामगारांना लोखंडे यांच्या सभेतील मार्गदर्शनानंतर १० जून १८९० मध्ये मान्य झाली. हा चळवळीचा फार मोठा विजय होता. त्यामुळे लोखंडे यांची कामगार जीवनाशी जवळीक वाढली. त्यामुळे कामगारांचे विविध प्रश्न ओळखून त्यांना त्याची सोडवणूक करण्यात यश आले.

(ई) १८९२ चा फॅक्टरी ॲक्ट

संपूर्ण जगभर कामगार पुरुषांचेच नव्हे तर स्त्रियांचे व बालकांचेही प्रश्न चर्चेत आले. १८९० मध्ये बर्लिन परिषदेमध्ये याची चर्चा झाली. कारण ही आंतरराष्ट्रीय परिषद होती. मँचेस्टर चेंबर ऑफ कॉमर्सने भारतीय कापड गिरणी उद्योगातील सुधारणा तात्काळ लागू करण्याची मागणी केली. पण याला गिरणी मालक संघाचा विरोध झाला. यासाठी मेजर लेथब्रीजच्या अध्यक्षतेखाली सरकारने कमिशन नेमले. यात भारतीय सदस्यांचाही समावेश करण्यात आला होता. या कमिशनने विविध कामगार संघटना, गिरणी मालक संघटना यांना भेटी देऊन त्यांची मते जाणून घेतली. त्यानंतर नवा फॅक्टरी ॲक्ट मान्य झाला. हाच तो १८९२ चा लागू झालेला कायदा होय.

१८९२ ला लागू झालेल्या फॅक्टरी ॲक्टमधील तरतूदी

१. फॅक्टरीची व्याख्या : जेथे ५० किंवा त्यापेक्षा जास्त कामगार चार महिने वा अधिक काळ काम करतात अशी उत्पादनाची जागा.

२. कामाचे तास : स्त्रियांसाठी ११, दुपारी १ ते १.३० दरम्यान अर्धा तास विश्रांती.

३. स्त्री कामगारांना सकाळी ६ पूर्वी कामावर बोलवू नये. सायंकाळी ६.३० नंतर कामासाठी थांबवू नये.

४. मुलाचे वय १४ वर्षे वयापर्यंत मानावे. (क) वयोमर्यादा ९ ते १४ वर्षे (ख) मुलांना ५.१५ ते सकाळी ८.३० पर्यंत काम करून शाळेत हजर रहावे. (इ) दुपारी १२.३० ते ३.४५ काम करून घरी जावे. (ई) दुसऱ्या पाळीतील मुलांनी ८.३० ते १२ सकाळी गिरणीत काम करावे, नंतर ३.४५ पर्यंत शाळा करून पुन्हा ३.४५ ते सायं. ६.४५ गिरणीत काम करावे. इत्यादी. दोन्ही पाळीतील मुलांना साडे सहा तासांपेक्षा जास्त काम देऊ नये.

५. सर्व गिरण्यांत १२ ते २ दरम्यान अर्धा तास मध्यंतर व आठवडी एक तास सुट्टी रविवारी ठेवावी.

६. कामाच्या ठिकाणी पाणी पुरवठा, सांडपाणी, स्वच्छता व हवा पाण्याची पुरेशी सोय असावी. या कामासाठी स्थानिक शासनाने पुढाकार घ्यावा.

या देशातील स्थानिक कामगार चळवळ या कायद्याने फलिभूत झाली. यासाठी लोखंडे यांचे फार सहकार्य लाभले होते. सरकारने १८९१ चा गिरणी मालक संघाचा कायदा झाल्यावर त्यांचा सत्कार करून गौरव केला.

(उ) रॉयल कमिशन आणि लोखंडे यांची साक्ष

१८९१ मध्ये 'रॉयल कमिशन ऑन लेबर'ची स्थापना झाली. त्यात तीन समित्या बनविण्यात आल्या. त्यांनी कामगार संघटना, मालकांची संघटना यांबरोबर चर्चा केली. कमिशनसमोर लोखंडे यांची साक्ष महत्त्वाची होती. त्यातील काही महत्त्वपूर्ण मुद्दे पुढीलप्रमाणे :

१. कामगारांना सुट्टीच्या दिवशी अर्धा दिवस काम करावे लागते.

२. त्या अर्ध्या दिवसाच्या कामाचा मोबदला मिळत नाही.

३. चूक झाली म्हणून कामावरून कमी करणे, पगार गोठवणे चुकीचे आहे.

४. पगार दोन किंवा त्यापेक्षा जास्त महिन्यांनी दिला जातो.

५. गिरणीतील एजंट वा मॅनेजर नको असेल त्या कामगारास कधीही काढतात.

६. त्याविरुद्ध जाब विचारण्याची सोय नाही.

या साक्षींधारे भावी कायदे करण्यास मदत झाली. लोकमान्य टिळक, महात्मा फुले, भालेकर यांच्याशी आपल्या प्रतिभा सामर्थ्याने लोखंडे यांनी वाद केले व स्वमत टिकविले. १८९३ च्या हिंदू-मुस्लीम दंग्यात त्यांनी घेतलेल्या उत्कृष्ट भूमिकेमुळे सरकारने त्यांना १८९५ मध्ये 'रावबहादूर' पदवी बहाल करून त्यांचा गौरव केला. १८९२-९३ मध्ये लोखंडे यांनी निर्माण केलेल्या चैतन्यामुळे मुंबई कामगार संप यशस्वी झाला.

फेब्रुवारी १८९७ मध्ये वयाच्या ४९व्या वर्षी प्लेगमुळे लोखंडे मृत्यू पावले.

४.२.५ विसाव्या शतकातील कामगार चळवळ

राजकीय स्वातंत्र्याच्या चळवळीमुळे घडणाऱ्या विविध घटनांचे परिणाम कामगार चळवळीवर होणे अनिवार्य होते. बंगालची फाळणी झाली. तिचे पडसाद देशभर उमटले. संपूर्ण देशात देशप्रेम उफाळून आले होते. कामगारांच्या जीवनाशी याचा संबंध फार कमी होता. पण कामगारांनीही संप केला. त्यांनी कामाचे तास कमी करण्याची मागणी केली. पोस्ट खात्यातही त्याचे परिणाम उमटले. त्यात संघटन उदयास आले. १९०७ मध्ये 'बॉम्बे पोस्टल युनियन' ही संघटना स्थापन करण्यात आली. राजकीय क्षेत्रात बंगालच्या फाळणीप्रमाणे देशव्यापी परिणाम करणारी दुसरी घटना म्हणजे १९०८ मध्ये लोकमान्य टिळकांना झालेली अटक होय. कामगार वर्ग पेटून उठला. महाराष्ट्राच्या व राष्ट्राच्या अस्मितेचा हुंकार सर्वत्र जाणवला. टिळकांना झालेली ६ वर्षाची शिक्षा संपूर्ण देशात कामगारांना अस्वस्थ करणारी ठरली. देशव्यापी संपात महाराष्ट्राने सहा दिवस संप करून आपला वाटा नोंदवला. १९०८ मध्ये श्री. स्मिथ यांच्या अध्यक्षतेखाली कामगारांचे प्रश्न समजून व सोडवून त्यांना शांत ठेवण्यासाठी कमिशन नियुक्त केले. सर्व परिस्थिती अभ्यासून कमिशनने अहवाल सादर केला. विसाव्या शतकाचे पहिले दशक संपण्यापूर्वीच १९१० मध्ये (१) कामगार हितवर्धक सभा, मुंबई आणि (२) सोशल सर्व्हिस लीगची स्थापना होऊन या चळवळीला गती आली.

(आ) दुसरे दशक

स्मिथ कमिशनने आपला अहवाल सरकारला सादर केला. त्यावर विचार होऊन १९११ चा फॅक्टरी ॲक्ट तयार झाला. त्यातील प्रमुख मुद्दे पुढीलप्रमाणे –

१. वर्षातून चार महिन्यांपेक्षा कमी काळ चालणाऱ्या कारखान्यांनाही कायदा लागू असेल.

२. कामगारांना वयाचा दाखला अनिवार्य असेल.

३. कापड गिरणीत मुलांना सहा तास काम द्यावे.

४. स्त्रियांना रात्री काम देऊ नये.

५. पुरुषांसाठी कापड गिरणीत १२ तास काम असेल. वेळ पहाटे ५ ते सायंकाळी ७ दरम्यान असेल. शिफ्टसाठी हा नियम असेल.

६. अपघात, स्वच्छता, उजेड या संदर्भातील नियम कारखान्यांना लागू असतील.

जागतिक स्तरावर पहिले महायुद्ध सुरू झाले. याच दरम्यान रशियन राज्यक्रांतीने कार्ल मार्क्सच्या 'जगातील कामगारांनो एक व्हा' या साम्यवादी घोषणेने प्रभावित केले. अनुसूयाबेन यांनी अहमदाबाद येथे गांधीजींच्या मार्गदर्शनाखाली कामगारांचा एक संघ स्थापन केला. १९१८ यांनी पी. बी. वाडिया यांनी 'मद्रास लेबर युनियन' बनवली. राष्ट्रीय स्तरावरही कामगार चळवळीने गती घेतली. १९२० साला ची All India Trade Union Corroration ची स्थापना झाली. याचे अध्यक्ष म्हणून लाला लजपतराय यांनी नेतृत्व केले.

हा काळ राजकीय धामधुमीचा होता. स्वातंत्र्य लढा तीव्र बनत चालला होता. स्वाभाविकच लढाऊ कामगार चळवळीला पाठिंबा मिळाला. कामगार चळवळीतील इतर विचार मागे पडू लागले. कामगार संघटनांनी राजकारणात भाग घेऊ नये असे मत होते. पण परकीय जुलमी सत्तेच्या कारभारामुळे हा विचार मागे पडू लागला. ऑल इंडिया ट्रेड युनियन स्थापन झाली. तेव्हाचा काळ हा खूप राष्ट्रीय धामधुमीचा होता. याच दरम्यान झालेला जालियनवाला बाग हत्याकांड ही देशाला चिंतेत टाकणारी घटना होती. तसेच खिलाफत चळवळ, होमरूल चळवळ, मोपल्यांचे बंड, ब्रिटिश युवराजांच्या भेटीवर टाकलेला बहिष्कार या घटना घडल्या. या घटनांच्या परिणामांमुळे परस्परांना प्रभावित केले. यातून क्रांतिकारक चळवळ वाढत गेली. संपांना राजकीय स्वरूप येऊ लागले. युवराजाच्या भारत भेटीवर बहिष्कार म्हणून एन. डब्ल्यू. रेल्वेच्या कामगारांनी संप केला. काँग्रेसच्या बहिष्काराच्या व असहकाराच्या चळवळीला पाठिंबा देणारे व दडपशाहीचा निषेध करण्यासाठी संपही केले. जगभर साम्राज्यशाहीचा व भांडवलशाहीचा धिक्कार करणाऱ्या घोषणा कामगार देत होते.

कामगार चळवळीत राजकारण आणू नये असे महात्मा गांधी यांचे मत होते. तर लाला लजपतराय यांसारखे पुढारी 'संघटित कामगार हाच भांडवलशाही व साम्राज्यशाहीवर उतारा आहे' असे मानत असे. परंतु सी. आर. दास यांचे म्हणणे होते की, 'राष्ट्रीय चळवळीत व कामगारांच्या चळवळीत झगडा येण्याचे कारण नाही. स्वराज्य जनतेसाठी आहे.'

(इ) तिसरे दशक

ना. म. जोशी यांनी १९२१ मध्ये कामगार संघांना कायदेशीर मान्यता मिळवून देण्याच्या संदर्भात एक विधेयक मांडले. पण ते संमत होऊ शकले नाही. त्यामुळे देशात विविध संघटनांना एकत्र आणण्याची गरज निर्माण झाली. त्यातूनच 'अखिल भारतीय ट्रेड युनियन'चा जन्म झाला. १९२२ मध्ये सर्व प्रांतीय संघटनांना एकत्र आणण्यासाठी फेडरेशन स्थापन झाले. आंतरराष्ट्रीय श्रमसंस्थेत देशाच्या एका संघटनेमुळे सहभाग शक्य झाला. १९२२ मध्ये फॅक्टरी ॲक्ट मान्य झाला. या कायद्यामुळे –

१. यांत्रिक शक्ती वापरणाऱ्या आणि २० पेक्षा जास्त कामगार असणाऱ्या कारखान्यांना हा कायदा लागू करण्यात आला.

२. प्रांताना गरज वाटली तर १० पेक्षा जास्त कामगार असणाऱ्या व यांत्रिक शक्ती वापरणाऱ्या कारखान्यांनाही हा कायदा लागू करता येईल.

३. १२ वर्षांखालील मुलांना कामावर घेऊ नये.

४. आठवडी ६० व दर दिवशी ११ तास (स्त्री व पुरुषांसाठी) काम असावे.

५. स्वच्छता, हवा, प्रकाश या तरतुदी निरीक्षणार्थ इन्स्पेक्टर ठेवणे कारखान्याची जबाबदारी असेल.

१९२२ मध्ये रेल्वे कर्मचाऱ्यांनी 'अखिल भारतीय रेल्वे कर्मचारी संघा'ची स्थापना केली. १९२६ मध्ये कामगार संघटनांना कायदेशीर मान्यता मिळाली. त्यामुळे नोंदणी झालेल्या संस्थांची संख्या वाढली. देशात

साम्यवादी विचारप्रवाहाचा प्रभाव वाढत होता. १९२६ पासून साम्यवाद्यांनी कामगार संघटनांवर आपली पकड निर्माण करण्याचा प्रयत्न चालू केला. त्यापूर्वी काँग्रेसची पकड जास्त प्रभावी होती. १९२७ मध्ये मुंबईमध्ये वेगळ्या 'गिरणी कामगार संघा'ची स्थापना करण्यात आली. यातील सभासद संख्या ५४,००० झाली. १९२८ मध्ये श्रीपाद अमृत डांगे गिरणी कामगार युनियनचे काम करीत होते. भास्कर जाधवांना मुंबईत डांगेचे (एक ब्राह्मण) नेतृत्व नको होते. काही काळ जवळकर दिनकररावांनी डांगेना विरोध केला. १९२८ संप मुंबईत सहा महिने सुरू राहिला. १९२९ मध्ये कम्युनिस्टांनी नागपूर अधिवेशनात दोन ठराव संमत करून घेतले. त्यामध्ये एक म्हणजे रॉयल कमिशनवर बहिष्कार व दुसरा म्हणजे मास्कोमधील तिसरी आंतरराष्ट्रीय संलग्नता होय. या सोबत ट्रेड युनियनवर साम्यवादाचा प्रभाव वाढला. परिणामी कम्युनिस्टेतर पुढारी गिरी, जोशी, बखले, दिवाण, चिमणलाल, दिवाण, शिवराम यांनी 'नॅशनल ट्रेड युनियन फेडरेशन'ची स्थापना केली. दोन्ही संघटनांत तीव्र मतभेद निर्माण झाले. त्यामुळे 'ऑल इंडिया रेड ट्रेड युनियन काँग्रेस' हा डाव्या पक्षाची संघटना तर 'नॅशनल ट्रेड युनियन फेडरेशन' अशा दोन संघटना १९२९ मध्ये अस्तित्वात आल्या. मि. व्हिटलेच्या अध्यक्षतेत एक कमिशन भारत मंत्र्याने तयार केले. या लेबर कमिशनने अभ्यास करून शिफारशी केल्या.

(ई) चौथे दशक (१९४० ते १९४७)

मि. व्हिटले यांच्या कमिशनने दिलेल्या अहवालाच्या आधारे १९३४ चा 'फॅक्टरी ॲक्ट' तयार करण्यात आला. या कायद्याने कारखान्यांचे 'कायमचे व हंगामी' असे दोन भाग करण्यात आले.

पहिल्या दर्जातील कारखान्यांसाठी कामाचे तास १० व आठवडी तास ५४ ठरले. दुसऱ्या (हंगामी) कारखान्यात ११ तास व आठवडी तास ६० हे प्रमाण ठरले. तसेच मुलांसाठी ५ तास काम देण्याचे ठरले. १५ ते १७ वयोगट वेगळा करण्यात आला. कारखान्यांनी प्रौढ कामगारांना सतत १३ तास व मुलांना ७.३० तास काम देऊ नये. मालकांनी कारखान्यात योग्य ते हवामान राखावे. इन्स्पेक्टर ठेवावा. प्रथमोपचाराची व्यवस्था, स्त्रियांसाठी स्वतंत्र खोली, कामगारांसाठी विश्रांतीगृहे कारखाना आणि गिरणी मालकांनी करावीत. अशा विविध बंधनामुळे सुधारणा अपेक्षित होत्या.

भारतात एकीकडे कामगार सुधारणांचे कायदे हळूहळू सोयी उपलब्ध करून कामगार जीवनाचा दर्जा पूर्वीपेक्षा सुधारण्याचा प्रयत्न करत होते तर दुसरीकडे देशभर शेतकरी-कामगार संघटनांचे जाणे विणले जावे यासाठी प्रयत्न सुरू होता. १९३४ पर्यंत कम्युनिस्ट पक्षाला काँग्रेसच्या मंत्रिमंडळाच्या काळात (१९३७) थोडी सूट मिळाली होती. आता ते बेकायदेशीर ठरल्यामुळे पूर्णतः नेस्तनाबूत करण्याचा प्रयत्न झाला. ही बंदी १९४२ पर्यंत राहिली. दुसऱ्या महायुद्धामुळे काँग्रेसने सत्तात्याग करताच साम्यवाद्यांना धारेवर धरण्यात आले. या काळात मोठ्या संख्येतील कैदी हे साम्यवादी व त्यांचे सहकारी हाते. १९३८ मध्ये 'नॅशनल ट्रेड युनियन फेडरेशन' व 'ऑल इंडिया रेड ट्रेड युनियन कॉग्रेस' हे 'एसआयटीयुसी' मध्ये समाविष्ट झाले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात सरकारला कामगारांचा पाठिंबा हवा होता. म्हणून कामगारांच्या मागण्या मान्य करण्यासाठी त्यांनी कारखानदारांना भाग पाडले होते.

१९३६ मध्ये भूमिहीन, गरीब कुळे, शेतकरी आणि कामगार यांच्या अडीअडचणी दूर करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. हा राजकीय पक्ष होता. या पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. लेखक प्रो. मो. नि. ठोके यांच्या 'आधुनिक महाराष्ट्राचे उद्‌गाते' या ग्रंथात हा जाहरीनामा देण्यात आलेला आहे.

या पक्षामार्फत कामगारांच्या हिताचे कायदे व्हावेत, जनतेत उत्पादन शक्ती आणि कार्यक्षमता वाढावी म्हणून प्रयत्न केले जातील. नवीन धंदे सुरू करण्यात येतील. ज्या कुळांची मालकांकडून पिळवणूक होते ती पिळवणूक थांबविण्यासाठी प्रयत्न केले जातील. भूमिहीन, मजूर, कामगार यांच्या हितासाठी हा पक्ष प्रयत्न करणार आहे.' त्यांनी १९३७ मध्ये निवडणुका लढवून मिळालेल्या १७ जागांवरील उमेदवारांना सहकार्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुंबईतून निवडून आले. शेतकरी, कामगार यांच्या संघटना बांधून व निवडलेल्या १३ उमेदवारांमार्फत विधिमंडळातही त्यांनी प्रभावी काम केले.

१९४२ च्या 'छोडो भारत' आंदोलन प्रसंगी इंग्रजांना कामगारांचे सहकार्य हवे होते. त्यांना 'छोडो भारत' आंदोलनापासून दूर न्यावयाचे होते. गव्हर्नर जनरले बाबासाहेबांना कार्यकारी मंडळात मजूर मंत्री नेमले. बाबासाहेबांनी महात्मा गांधीजींच्या 'करेंगे या मरेंगे' या घोषणेचा धिक्कार करून १३ नोव्हेंबर १९४२ रोजी मुंबई आकाशवाणीवर 'भारतीय मजूर पक्ष आणि महायुद्ध' या विषयावर भाषण दिले. त्यामध्ये त्यांनी लोकशाही पक्षाचा विजय झाला तर स्वातंत्र्य व नवीन समाजरचना लाभेल. स्वातंत्र्यासोबत योग्य राज्यघटना व समाजरचनासुद्धा यावी. कामगारांनी आपली संपूर्ण शक्ती एकवटून 'छोडो भारत' ही मागणी करण्यापेक्षा नवीन भारताची मागणी करावी. हिंसेला शरण जाऊन मिळालेली शांतता ही खरी शांतता नव्हे, ती आत्महत्या होय असे वक्तव्य केले. (आधुनिक महाराष्ट्राचे उद्‌गाते – प्रा. मो. नि. ठोके)

१९४६ मध्ये केशवराव जेधे, भाऊसाहेब राऊत, तुळशीदास जाधव, शंकरराव मोरे यांनी पुढाकार घेऊन काँग्रेस अंतर्गत शेतकरी कामगार संघ स्थापन केला. या संघाच्या कामात क्रांतिसिंह नाना पाटील, दत्ता देशमुख, व्यंकटराव पवार, पी. के. सावंत, रा. भ. नलावडे, यशवंतराव चव्हाण, के. डी. पाटील यांनीही भाग घेतला. खेर मंत्रिमंडळाने ज्याप्रमाणे शेतकरी कामगार संघाची दखल घ्यायला हवी होती; तशी ती दखल घेतली नाही. पुढे वरील सदस्यांनी काँग्रेस सोडून स्वतंत्र पक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेतला.

(उ) स्वातंत्र्योत्तरकालीन संदर्भ

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रेरणेतून 'इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेस'ची स्थापना करण्यात आली. खूप कमी काळामध्ये या संघटनेने आपला प्रभाव देशभर निर्माण केला. आंतरराष्ट्रीय संस्थेत प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार 'आयटक' ऐवजी 'इंटक'ने मिळविला.

१. शेतकरी कामगार पक्ष : महाराष्ट्रातील बदलत्या राजकारणाने कलाटणी घेतली. १३ जून, १९४८ मध्ये यापूर्वी दिलेल्या नेत्यांनी 'शेतकरी कामगार पक्ष' (शेकाप)ची स्थापन केली. केशवराव जेधे, शंकरराव मोरे यांनी पक्ष स्थापनेची घोषणा केली. १९४८ मध्ये सोलापूर येथे पक्षाचे पहिले अधिवेशन झाले. 'जनसत्ता' हे

मुखपत्र फेब्रुवारी १९४९ मध्ये सुरू झाले. केशवरावांनी याचा प्रचार पुणे, कोल्हापूर, बेळगांव या भागात केला. नाना पाटील व काकासाहेब वाघ यांनी त्यांना मदत दिली. दाभाडी अधिवेशन होऊन 'दाभाडी प्रबंध' तयार झाला. त्यात पक्षाचे धोरण मांडण्यात आलेले आहे. मात्र नवजीवन संघटनेला या पक्षात घ्यावे अथवा नाही यावरून वाद होऊन दत्ता देशमुख व नाना पाटील वेगळे झाले. त्यांनी कामगार-किसान पक्ष बनवला. शेकापचे मराठवाड्यातील नेते नरसिंगराव काटीकर व नंतर भाई उद्धवराव पाटील यांनी समर्थपणे विसाव्या शतकाच्या दशकापर्यंत चालू ठेवले. कामगारांसाठी त्यांनी केलेले कार्य महाराष्ट्र पातळीवर लक्षात ठेवण्याजोगे आहे. एन. डी. पाटील, घोडके, खपले, धोंडगे यांची नावेही या पक्ष कार्यात उल्लेखनीय आहेत.

(२) १९४८ चा राज्य कामगार विमा कायदा

१९४८ चा राज्य कामगार कायदा हा जम्मू काश्मीर सोडून भारतभर लागू करण्यात आला. ४०० रुपयांपर्यंत दरमहा पगारापर्यंतची मिळकत असणाऱ्यांना याचा फायदा मिळणार होता. दुखापत, बाळंतपण, आजारपण यामुळे कामास असमर्थ असणाऱ्यांना वैद्यकीय फायदे (अवलंबिताना) व इतर असे पाच फायदे मिळतील. कामगाराने फायदा घेताना मजुरीच्या प्रमाणात विशिष्ट दराप्रमाणे रक्कम भरावी. योजना व्यवस्थापन एका विमा कार्पोरेशनकडे असेल. केंद्रीय मजूर मंत्री कार्पोरेशनचे पदसिद्ध अध्यक्ष मानले जातील. तसेच १२ व्यक्तींचे कार्यकारी मंडळ अंमलबजावणीसाठी नेमण्यात येईल. कामगारांना स्वातंत्र्योत्तर काळात पूर्वीपेक्षा सुरक्षित जीवन लाभावे असा प्रयत्न या कायद्याने करण्यात आला.

(३) इतर काही संदर्भ

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काँग्रेसमधून बाहेर पडलेल्या समाजवाद्यांनी 'हिंद मजदूर पंचायत' ही कामगार संघटना स्थापन केली. मानवेंद्रनाथ रॉय यांच्या 'इंडियन फेडरेशन ऑफ लेबर'चे यात विलीनीकरण झाले. 'आयटक' व 'हिंदी मजदूर सभा' यातून बाहेर पडलेल्यांनी 'युनायटेड ट्रेड युनियन काँग्रेस'या संघटनेची बांधणी केली. जनसंघवादी लोकांनी १९५५ मध्ये 'भारतीय मजदूर संघ' बनविला. देश पातळीवर कामगार हितासाठी भारतीय मजदूर संघ, हिंद मजदूर सभा, आयटक, इंटक इत्यादी संघटना होत्या. या सर्व प्रमुख संघटनांची कार्यालये महाराष्ट्रात कामगारांच्या संघटनांचे काम करून महत्त्वाची कामगिरी करीत आहेत. १९९३-९४ पर्यंतची आकडेवारी पाहता शेती, जंगल, मत्स्य, खाण, उत्पादन, बांधकाम, वाहतूक, वीज, गॅस, पाणी, उद्योग, सिंचन, साखर, कारखाने, एस. टी. व इतर क्षेत्रांत कामगारांचे संघ आहेत. महाराष्ट्रात ३६४९ नोंदणीकृत कामगार संघटना असून ३९,८१,००० एवढे कामगार त्यांचे सदस्य आहेत. नोंदणी नसलेल्याही अनेक संघटना आहेत. त्यातूनही हजारो कामगारांना एकत्र आणले जात आहे. मुंबई, पुणे, नागपूर, सोलापूर, अहमदनगर, औरंगाबाद, नाशिक इत्यादी मोठ्या शहरांतून कामगार चळवळीची केंद्रे प्रभावी आहेत. औद्योगिक क्षेत्र विकासासोबत कामगार संघटनांचा जन्म अनिवार्य घटक आहे.

४.२.६ महाराष्ट्रातील कामगार चळवळींतील अडसर

कामगार चळवळ हवी तेवढी प्रभावी झाली नाही. 'भारतीय प्रबोधन' ग्रंथातील 'भारतीय कामगार चळवळीचे अर्धशतक' या लेखात गो. द. साने लिहितात की, 'स्वातंत्र्य संग्रामात लढाऊ कामगार चळवळीने प्रमुख स्थान न मिळविल्यामुळे भारत स्वतंत्र झाला तेव्हा सत्तेच्या दरबारात संघटित कामगारांना प्रमुख स्थान तर मिळालेच नाही पण मागची जागाही मिळाली नाही.'

कामगार चळवळीला फुटीचा अभिशाप आहे. यात महाराष्ट्रात जातीय संघटनाही उदयाला आल्या आहेत. अशिक्षितपणा, अज्ञान, उदासीनता यामुळे ही चळवळ प्रभावी झाली नाही. कामगार तात्काळ होणार कायदा बघतात, पण दीर्घकालीन दृष्टी ठेवत नाहीत. यामुळेच त्यांना एकत्र आणणे, संघटित करणे अवघड असते. फायदा मिळेपर्यंत संघटनेकडे येतात. फायदा नाही असे वाटताच संघटनेपासून दूर जातात. शेतमजूर नगद वेतनासाठी शहरातील कामगार होऊ पाहत आहेत. काही काळ शेतीत, काही काळ कारखान्यात कामाला जातात. ते स्वतःचा स्वार्थ पाहतात. संघटनेचे नियम पाळत नाहीत. साखर कारखाने हंगामी काम देतात. त्यामुळे स्थलांतर चालूच राहते व लोकांचे दारिद्र्य संपत नाही. महात्मा फुले यांनी कामगारांचा आपापसांतील बेबनाव, व्यसनाधीनता, याचा तीव्र विरोध त्यांच्या काळात केला होता. संघटनांचे वेगळे अस्तित्व व स्पर्धा, उद्योगपतींची प्रतिकूल धोरणे, शासनाची उदासीनता, संघटनेबाहेरील नेतृत्व यामुळेही चळवळ दुबळी राहिली. कामगारांच्या वस्तीत निवासाच्या जागी आवश्यक सोयी नसणे, कायदेशीरपणे मालकांनी सोयी न पुरविणे यामुळेही त्यांची स्थिती हलाखीची दिसते. याशिवाय संघटनेचे रचनात्मक कार्याकडे दुर्लक्ष, कामगार संघाची अपुरी सदस्य संख्या, अल्प उत्पन्न, एकाच उद्योगात अनेक कामगार संघ असणे, परस्पर वैमनस्य, सौदा शक्तीची कमतरता यामुळेही कामगार चळवळीला दुबळे केले आहे. अशा प्रकारे कामगार चळवळीतील अनेक अडसर दिसून येतात.

४.२.७ कामगार चळवळ प्रखर करण्यासाठी काही उपाययोजना

कामगार चळवळ प्रखर करावयाची असल्यास नवे नेतृत्व निर्माण केले पाहिजे. तसेच राजकीय प्रभावापासून संघटना मुक्त ठेवणे, उद्योगनिहाय एकच संघ ठेवणे, विधायक कामावर भर देणे इत्यादी उपाययोजना केल्यास कामगार चळवळ प्रभावी बन शकेल. कामगार नेत्यांनी कामगार शिक्षण, आरोग्य, स्त्री कामगारांचे वेगळे प्रश्न जसे प्रसुती रजा, बोनस, दैनंदिन कामाचे नियम, बाल श्रमिकांवर आळा याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. योग्य वेतन, निश्चित कालावधीत वेतनाची प्राप्ती, विशिष्ट प्रसंगी फायदे मिळवून देणे यांकडे लक्ष पुरवले पाहिजे. तसेच कामगार चळवळींची सामुदायिक शक्ती वाढविली पाहिजे.

१९८२ मध्ये कापड गिरणी कामगारांचा (मुंबई) संप दीर्घकाळ चालला. सर्वसाधारणपणे महाराष्ट्रातील औद्योगिक कामगारांत निरुत्साह वाढला. एकूण उत्पादन, त्यावरील कर, यांचे नुकसान, मुंबईत पसरलेली मंदीची लाट इत्यादी परिणाम दिसून आले. त्यामुळे सरकारने यावर उत्तर शोधून १३ गिरण्यांचे राष्ट्रीयीकरण केले. त्यांच्या आधुनिकीकरणावर १४० कोटी रुपये खर्च मान्य केला. त्यांचे व्यवस्थापन हळूहळू कामगार प्रतिनिधींकडे

देण्याचेही ठरले. १९८५ पासून नवे वस्त्रोद्योग धोरण लागू करण्यात आले. कृत्रिम धाग्यावर भर, आधुनिकीकरण, स्वयंचलीकरणावर भर दिला; म्हणून परंपरागत सुती उद्योगाला फटका बसला. संगणकीकरण, स्वयंचलीकरण व आधुनिक स्वरूपामुळे खाजगी क्षेत्रातील नोकरभरती ठप्प होऊन बेकारी मोठ्या प्रमाणावर वाढत आहे.

४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

कामगार चळवळी : उद्योगधंद्यात काम करणाऱ्या विविध कुशल-अकुशल कामगारांच्या जीवनाचे अंतर्गत व बाह्य प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणारी चळवळ

ऑल इंडिया युनियन : अखिल भारतीय स्तरावर व्यापार क्षेत्रातील कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी १९२० मध्ये स्थापन झालेली संघटना.

फॅक्टरी ॲक्ट : मुंबईत व इतरत्र कापड गिरण्या सुरू होऊन विकास सुरू झाला. इंग्लंडमध्ये मँचेस्टर कापड गिरण्या सुरू होऊन विकास सुरू झाला. इंग्लंडमध्ये मँचेस्टर कापड गिरण्यांवर त्याचा वाईट परिणाम झाला म्हणून ब्रिटिशांनी मुंबई औद्योगिक विकास रोखण्यासाठी, कामगार प्रश्नासाठी हा कायदा १८९२ मध्ये मंजूर केला. यानंतर अनेकवेळा फॅक्टरी ॲक्ट झाले.

बॉम्बे पोस्टल युनियन : पोस्ट खात्यातील कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी १९०७ मध्ये उभी झालेली संघटना.

ऑल इंडिया ट्रेड युनियन कार्पोरेशन : अखिल भारतीय कामगार चळवळीला गती देण्यासाठी १९२० मध्ये स्थापन झालेली संघटना.

ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस : कम्युनिस्ट व कम्युनिस्टेतर यांच्या वैचारिक संघर्षामुळे ही डाव्या पक्षाची संघटना बनली.

नॅशनल ट्रेड फेडरेशन : कम्युनिस्टेतरांची कामगार संघटना

शेतकरी कामगार पक्ष (शेकाप) : शेतकरी व कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी १९४८ मध्ये महाराष्ट्रात हा राजकीय पक्ष स्थापन झाला.

४.२.३ महाराष्ट्रातील दलित चळवळी

महाराष्ट्राच्या समाज जीवनात स्थित्यंतर घडवून आणण्यात सत्यशोधक चळवळीबरोबर दलित चळवळीचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. दलित चळवळीचा विचार करण्याआधी दलित म्हणजे कोण? याचे उत्तर देताना मुख्यतः तीन दृष्टीकोण लक्षात घेता येतात.

१. 'सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिकदृष्ट्या शोषित-पीडित असणाऱ्या सर्व समाज घटकांचा अंतर्भाव असलेला समाज म्हणजे दलित समाज.'

२. 'जो समाज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेल्या चळवळीत सहभागी झाला; त्यांच्या सांगण्यावरून नवबौद्ध झाला तो समाज दलित समाज होय.'

३. वर्ण व्यवस्थेनुसार 'शूद्र' वर्णास अस्पृश्य किंवा दलित समाज म्हणतात.

याचा अर्थ दलित चळवळीत सहभागी असलेला दलित समाज, ज्याचे सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक दृष्ट्या शोषण होत होते. त्यातून मुक्त होण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेल्या चळवळीत क्रियाशील असणारा समाज घटक होय. महाराष्ट्रात अस्पृश्योद्धाराचे कार्य ज्ञानोबा-चोखोबा पासून ते तुकोबांपर्यंत वारकरी संप्रदायाने सुरू केलेले असले तरी एकोणिसाव्या शतकातील सुधारकांनी ऐहिक निष्ठा, व्यक्तिस्वातंत्र्य व समानता ही मूल्ये प्रमाण मानून समाज सुधारणा घडवून आणण्यासाठी सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत दलित चळवळ एक महत्त्वपूर्ण बनली आहे.

दलित चळवळीच्या उदयाची कारणे

१. तत्कालीन सामाजिक परिस्थिती : १९ व्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रातील समाज जीवनावर वर्णव्यवस्थेचा फार मोठा पगडा होता. समाजामध्ये वर्णव्यवस्था खोलवर रुजली होती. त्यातूनच जातिसंस्था फोफावली होती. समाजाची विभागणी अनेक जातींमध्ये होऊन जाती-जातीतही श्रेष्ठ-कनिष्ठ असा सामाजिक भेदभाव वाढला होता. परिणामी जातिव्यवस्थेत एक विशिष्ट प्रकारची सामाजिक उतरंड तयार होऊन प्रत्येक जातीला एक विशिष्ट स्थान प्राप्त झाले होते. त्या स्थानानुसार प्रत्येक जातीला सामाजिक हक्क, विशेषाधिकार व कर्तव्य लाभली होती. जातिव्यवस्थेची बंधने इतकी कडक होती की, त्याचे उल्लंघन करणेही कोणाला शक्य नव्हते. ही बंधने मोडणाऱ्या व्यक्तीस समाज बहिष्कृत किंवा जातिबहिष्कृत करण्यात येत असे त्यामुळे जातिव्यवस्था समाजात दृढमूल झाली होती. व्यक्तीचा व्यवसाय त्याच्या जातीवरून ठरत असे. विवाह देखील जाती अंतर्गतच होत. श्रेष्ठ-कनिष्ठ, उच्च-नीच, स्पृश्य-अस्पृश्य, सवर्ण-दलित अशा सामाजिक विषमततेत कनिष्ठ जातीतील लोकांची स्थिती अतिशय शोचनील बनली होती. अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातीतील लोकांना अत्यंत वाईट अवस्थेत जीवन जगावे लागत होते. अस्पृश्यांना हिंदू धर्मातील उच्चवर्णीयांनी साधे माणुसकीचे हक्क नाकारले होते. त्यांना कसलेही अधिकार नव्हते. सवर्ण जातीतील लोकांना त्यांच्या स्पर्शानेही विटाळ होत असे. महार, मांगांना गळ्यात मडके आणि कमरेस झाडाची फांदी बांधून फिरावे लागे. झाडाची फांदी त्यांची पावले पुसून टाकी, गळ्यातील मडके थुंकीचा विटाळ टाळी. अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश करण्याचा अधिकार नव्हता. सवर्ण जातीतील असलेल्या विहिरी, तळी, घाट यांचा वापर त्यांना करता येत नव्हता. शिक्षणाचा लवलेशही त्यांच्या ठिकाणी नव्हता. शास्त्राप्रमाणे शुद्रांना विद्येचा अधिकार नाही असे उच्चवर्णियांचे मत होते. त्यामुळे अनेक वर्षांपासून हा समाज अज्ञानाच्या अंधकारात खितपत पडला होता. अस्पृश्यांचे जीवन पशुहूनही हीन बनले होते. अस्पृश्यता म्हणजे सामाजिक विषमतेचे अत्यंत दर्शन होते. समाजातील सर्व प्रकारची हीन व घाणेरडी कामे अस्पृश्यांना करावी लागत असत. ही कामे करत उपेक्षित जीवन जगणे हे त्यांच्या वाट्याला आले होते. अस्पृश्यांवर होणारे अत्याचार थांबवून त्यांना मानवतेचे हक्क बहाल करून त्यांचा सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय विकास घडवून आणण्यासाठी त्यांच्या ठिकाणी सामाजिक जाणीव-जागृती घडवून आणणे गरजेचे होते.

२. पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रभाव

ब्रिटिशांनी शासन सुव्यवस्थेसाठी आवश्यक असणाऱ्या कारकून वर्गाची निर्मितीसाठी इंग्रजी शिक्षणाच्या शाळा भारतात सुरू केल्या असल्या तरी इंग्रजी शिक्षण हे आधुनिक जगात प्रवेश करण्याचे महाद्वार ठरले. पाश्चिमात्य ज्ञानामुळे स्वातंत्र्य, समता या मूल्यांची माहिती झाली. काही क्षेत्रात का होईना समानतेचे तत्त्व नव्या राज्यकर्त्यांनी लागू केल्यामुळे पूर्वास्पृश्यांना आपल्या हक्कांची जाणीव यातून झाली. माणसासारखे जीवन जगता येण्यासाठी संघर्ष करण्याची प्रेरणा शिक्षणातून मिळाली. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी जे तंत्रविज्ञान व ज्या उत्पादनपद्धती सोबत आणल्या त्यातून उद्योग संस्कृतीला व उदारमतवादी तत्त्वे समाजात रुजली. उपजीविकेचे नवे मार्ग उपलब्ध झाल्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेशी जखडलेला अस्पृश्य मजूर अंशतः मुक्त झाला. वर्णव्यवस्थेच्या चौकटीला हादरे बसू लागले. स्वाभिमानाने जगण्याची जी संधी, साधन व अधिकार इथल्या धर्माने व सत्तेने अस्पृश्यांना कधीच दिले नव्हते. ते त्यांना यामुळे प्राप्त झाले. आपल्या सांस्कृतिक दास्यत्वाची त्यांना जाणीव झाली. वर्णव्यवस्था, जातिभेद, धार्मिक अंधश्रद्धा यांचे खरे आणि शोषणपर अंतरंग त्यांच्या लक्षात आले आणि यातून बाहेर पडण्याची आकांक्षा त्यांच्या मनात मूळ धरू लागली.

३. ब्रिटिश राजवटीचा परिणाम : दलित चळवळीच्या उभारणीची आवश्यक पार्श्वभूमी ब्रिटिश राजवटीनेच केली. महाराष्ट्रात पेशवाईच्या काळात महार समाज सैन्यात सहभागी होत असे; त्यांच्या अंगी असलेला लढाऊ बाणा कंपनी सरकारने ओळखून आपल्या सैन्यात मोठ्या प्रमाणावर महारांची भरती केली व त्यांच्या मदतीने पेशवाईचा पराभव केला. यामुळे ब्रिटिशांना भारतात आपले आसन स्थिर करता आले असले तरी लष्करात नोकरी मिळाल्यामुळे या समाजाला वक्तशीरपणा व शिस्तीतले काम, वेळेवर पगार, पराक्रमाबद्दल बक्षिसे, बऱ्यापैकी राहणीमान या अननुभूत गोष्टी मिळाल्यामुळे दारिद्र्य व गुलामगिरीने गांजलेल्या या समाजाला उन्नतीचा मार्ग गवसला व नव्या प्रकारे जगण्याची संधी मिळाली. कवायतीमधील शिस्त, सहकार्य, इंग्रजी भाषेचे ज्ञान, यंत्राचा वापर यामधून आधुनिक औद्योगिक युगाची मूल्ये सैन्यात भरती झालेल्या समाजाच्या अगदी खालच्या थरापर्यंत पोहोचली. ते गावगाड्याच्या चौकटीतून बाहेर पडले. त्यांना शिक्षण व प्रतिष्ठायांचा लाभ झाला. यातून त्यांच्या आकांक्षा वाढल्या. परंपरागत चालीरितीतून मुक्त होऊन ते मनाने आधुनिक बनले. यातून त्यांना आपल्या हक्कांची जाणीव झाली. १८९९ साली अस्पृश्यांना सैन्य प्रवेश जेव्हा बंदी केली तेव्हा दीर्घकाळ संघर्ष करून या समाजाने आपला हक्क परत मिळविला. आपल्या हक्कांसाठी संघर्ष करण्याचे तंत्र ब्रिटिश राजवटीच्या प्रभावातून या वर्गाने आत्मसात केले.

महायुद्धाच्या काळात ब्रिटिश शासनाला मोठ्या प्रमाणावर लष्कराची आवश्यकता भासली. तेव्हा त्यांनी लष्कर भरतीचे निर्बंध शिथिल केले. परिणामी शेकडो मराठी महार तरुण सैन्यात सहभागी झाले. युद्धाच्या निमित्ताने परदेशात वास्तव्य केलेल्या या सैनिकांच्या विचारात, मनोवृत्तीत बदल झाला. जन्मानुसार ठरणारी उच्च-नीच, श्रेष्ठ-कनिष्ठ, स्पृश्य-अस्पृश्य विषमता त्यांना जाचक वाटू लागली. दलितांच्या हक्कासाठी झालेल्या पहिल्या चळवळीला सेवानिवृत्त महार अधिकाऱ्यांचे नेतृत्व लाभले. रणांगणावरून परत आलेल्या सैनिकांनी सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीला नवे नेतृत्व दिले.

४. सुशिक्षित मध्यम वर्गाचा उदय

इंग्रजी शिक्षण हे आधुनिक जगात मानाने प्रवेश करण्याचे एक महाद्वार होते. परंतु प्रत्येक जातीला मिळणारी शिक्षणाची संधी जातिव्यवस्थेतील तिच्या स्थानावर अवलंबून होती. ज्यांना शिक्षणाची व सरकारी नोकरीची दीर्घ परंपरा होती अशा उच्चवर्णियांनी प्रथम इंग्रजी शिक्षण घेतले आणि त्यांनी एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सामाजिक सुधारणेच्या चळवळींची मुहूर्तमेढ रोवली. त्या शतकाच्या अखेरीस बहुजन समाजातील वरिष्ठ वर्गात इंग्रजी विद्येचा प्रसार झाला व त्यामधून ब्राह्मणेतर चळवळीचा उदय झाला. दलित जातीतील जे तरुण इंग्रजांच्या सैन्यात सामील झाले होते त्यांना तेथे शिक्षणाची संधी मिळाली. त्यांच्यामधून दलित शिक्षितांची पहिली पिढी पुढे आली आणि त्यांच्या नेतृत्वाखाली सामाजिक व राजकीय हक्कांसाठी दलितांचा लढा सुरू झाला. स्वातंत्र्योत्तर काळात दलित, भटके, विमुक्त, आदिवासी व इतर मागास जाती आणि स्त्रिया यांच्यामध्ये शिक्षणाचे लोण पसरून प्रत्येक जातीतून एक उच्चशिक्षित मध्यमवर्ग पुढे येत आहे आणि सामाजिक परिवर्तनाच्या या चळवळीत तोच अग्रभागी आहे. या प्रत्येक गटाच्या जाणिवा, आकांक्षा आणि हितसंबंध यांचे या चळवळीत प्रतिबिंब पडले.

५. सुधारकांचे प्रयत्न (कार्य) :

पाश्चिमात्य शिक्षणाच्या प्रभावातून अनेक समाजसुधारक पुढे आले. त्यांनी मानवनिर्मित विषमतेवर प्रखर हल्ला चढविला. दलित उद्धार चळवळीचा प्रारंभ १८५२ मध्ये पुण्यात महात्मा फुले यांनी काढलेल्या शाळेने झाला. अस्पृश्यांचा उद्धार करावयाचा असेल तर वर्षानुवर्षे त्यांना नाकारण्यात आलेले हक्क परत देण्यासाठी त्यांना सुरुवातीला शिक्षण देऊन अज्ञान दूर केले पाहिजे. याच भावनेतून महात्मा फुले यांनी महार, मांग आणि अस्पृश्य समाजाला शिक्षण देण्यासाठी १८५२ मध्ये वेताळ पेठ येथे अस्पृश्य जातींच्या मुलांसाठी दोन शाळा सुरू केल्या. १० सप्टेंबर, १९५३ रोजी 'महार, मांग इत्यादी लोकांस विद्या शिकविण्यासाठी मंडळ' स्थापन केले. १८५८ मध्ये या संस्थेच्या तीन शाळा पुण्यात सुरू करण्यात आल्या. अस्पृश्यांसाठी शाळा स्थापन करण्याबरोबर अस्पृश्यांची समाजातील स्थिती सुधारण्यासाठी आणि त्यांच्यात जागृती निर्माण करण्यासाठी लहुजी मांग, राणबा महार, मांग, चांभार, धेड इत्यादी अस्पृश्य जातींमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण केली. १८६८ मध्ये 'ब्राह्मणांचे कसब', १८७३ मध्ये 'गुलामगिरी', १८८३ मध्ये 'शेतकऱ्याचा आसूड' यांसारख्या ग्रंथातून व २४ सप्टेंबर, १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना करून जनजागृती घडवून आणण्याचे महान कार्य केले. याचबरोबर दादोबा पांडुरंग यांनी 'मानवधर्म सभा', लोकहितवादींची एकनिष्ठ उदारमतवादी विचार मांडणारी 'शतपत्रे', आगरकर यांचा 'सुधारक' या सर्वांनी सामाजिक विषमतेचा धिक्कार व सुधारणेचा पुरस्कार केला. महात्मा फुले, छत्रपती शाहू, महाराजा सयाजीराव गायकवाड, कर्मवीर भाऊराव पाटील, इत्यादींनी अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी वेगवेगळ्या पद्धतीने प्रयत्न केले. यामागे शुद्रातिशुद्रांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे, उच्च वर्णीयांच्या सहानुभूतीवर अवलंबून न राहता दलित शोषितांना स्वतःच्या बळावर आपले स्वतःचे न्याय्य हक्क मिळावेत हे त्यांच्या कार्याचे सूत्र होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी 'निराश्रित साह्यकारी मंडळा'च्या कार्यातून अस्पृश्यांच्या शिक्षणाबरोबर त्यांना नोकऱ्या मिळवून देणे, त्यांच्या सामाजिक अडचणी दूर करणे, त्यांच्या

आरोग्याची व सर्वांगीण सुधारणेची काळजी घेणे सहभोजनाद्वारे अस्पृश्यता निवारणाचा प्रयत्न करणे असे विविध खटाटोप केले. त्यानंतर महात्मा गांधी, श्री. म. माटे, ल. ब. भोपटकर, स्वा. सावरकर, न्या. चंदावरकर, जयकर, जावडेकर इत्यादींनीही अस्पृश्यता निवारण्याच्या कार्यात महत्त्वपूर्ण भूमिका निभावली. या सुधारकांच्या प्रयत्नांतून दलित, अस्पृश्य वर्गात सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय जाणीव-जागृती निर्माण होण्यास फार मदत झाली.

दलित चळवळीच्या कार्याचे स्वरूप

दलित चळवळीच्या कार्याचा विचार करताना तिचा प्रारंभ जर १८५२ पासून लक्षात घेतला तर जवळजवळ १४० वर्षांपासून चाललेल्या या दलित चळवळीचे चार टप्पे होताना दिसतात. ते पुढीलप्रमाणे आहेत –

१. १८५० ते १९०० चा पहिला कालखंड

२. १९०० ते १९२४ चा दुसरा कालखंड

३. १९२४ ते १९५६ चा तिसरा कालखंड

४. १९५६ ते आजतागायतच कालखंड

१. १८५० ते १९०० चा पहिला कालखंड

या पहिल्या टप्प्यात दलित चळवळीचे नेतृत्व अस्पृश्यतेर समाजाकडे होते. विष्णुबुवा ब्रह्माचारी, महात्मा ज्योतीराव फुले, भिकोबा दादा चव्हाण, भांडारकर, न्यायमूर्ती रानडे, न्यायमूर्ती चंदावरकर, नामदार गोखले, कर्मवीर शिंदे, महाराजा सयाजीराव गायकवाड, छत्रपती शाहू महाराज या सुधारकांनी दलितांच्या उद्धारासाठी निरनिराळ्या संस्था स्थापन केल्या. त्यांना शिक्षणासाठी शिष्यवृत्त्या व अनुदाने दिली. तसेच सहभोजनाद्वारे समतेची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

२. १९९० ते १९२४ चा कालखंड

दलितेतर कार्यकर्त्यांपासून प्रेरणा घेऊन १९व्या शतकाच्या शेवटच्या दशकात गोपाळबुवा वलगंकर, शिवराम जानबा कांबळे, किसन फागूजी बनसोड, फत्तुजी बापूजी शेडे, जाणोजी खंडारे हे दलित समाजातील कार्यकर्ते पुढे आले. यापैकी काही कार्यकर्त्यांची थोडक्यात माहिती करून घेऊया. नंतर या काळातील चळवळींचे कार्य पाहू.

(अ) गोपाळबुवा वलगंकर

ब्रिटिश सरकारने महाराष्ट्राला मिळवून दिलेला दलित चळवळीचा पहिला नेता असे रास्त वर्णन गोपाळबुवा वलगंकरांचे केले जाते. गोपाळबुवा वलगंकर यांनी 'अनार्य दोष परिहार' या संस्थेची स्थापना केली. या संस्थेद्वारे अस्पृश्यांमध्ये सामाजिक जागृतीचे काम सुरू केले. लष्करात अस्पृश्यांच्या भरतीवर ब्रिटिश सरकारने निर्बंध घातले. त्याविरुद्ध पहिला आवाज त्यांनी उठवून दीर्घकाळ संघर्ष करून आपला हक्क परत

मिळविण्याचे श्रेय त्यांच्याकडे जाते. दलितांच्या दुःखाला फोडलेली जगातील पहिली वाचा असे वलगंकरांचे वर्णन केले जाते.

(ब) शिवराम जानबा कांबळे

विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात पुणे शहरात अस्पृश्योद्धाराची चळवळ त्यांनी जोमाने चालवली होती. अस्पृश्यांच्या शिक्षणाची सोय व्हावी, त्यांना सैन्यात, पोलिसात व सरकारी नोकऱ्यांत प्रवेश मिळावा इत्यादी मागण्या लावून धरण्यासाठी त्यांनी अनेक संस्थांची स्थापना केली. २४ डिसेंबर, १९२२ रोजी 'महार विद्यार्थी संस्था' स्थापन करून शिक्षण घेण्याची तीव्र इच्छा असूनही मदतीअभावी शिक्षण घेणे दुरापास्त असलेल्या विद्यार्थ्यांना मदत करणे हा उद्देश होता. तसेच दलित समाजाची जागृती घडवून आणण्यासाठी मासिक-पुस्तके यासारख्या माध्यमांचा वापर त्यांनी केला. मुरळीच्या चालीविरुद्ध आवाज उठवण्याचे श्रेय त्यांच्याकडे जाते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी सुरू केलेल्या 'निराश्रित साह्यकारी' मंडळाच्या पुणे शाखेचे ते अध्यक्ष होते.

(क) किसन फागुजी बंदसोडे

आजच्या महाराष्ट्रातील नागपूर, भंडारा, वर्धा व चांदा हे जिल्हे, मध्य प्रांताचा भाग व अकोला, अमरावती, यवतमाळ व बुलढाणा या जिल्ह्यांना वऱ्हाड म्हणत. अस्पृश्यांच्या समाजोन्नतीची चळवळ पश्चिम महाराष्ट्रात जशी महारांनी सुरू केली तशीच ती मध्य प्रांत वऱ्हाडात सुरू झाली होती. सुरुवातीला विठोबा रावजी मनुसंतपांडे, मुकुंदा शेट्ये, करणुजी विठ्ठल मालगुजार, गोमा गणेश सावकार, कालीचरण नंदागवळी, नानासाहेब गवई या नेत्यांच्या बरोबर किसन फागुजी बंदसोडे हे आघाडीचे कार्यकर्ते होते. त्यांच्या रोमारोमात सामाजिक तळमळ व निष्ठा भिनलेली होतीच. बनसोडे यांनी चोखामेळा कन्या शाळा सुरू केली. अनेक विद्यार्थी वसतिगृह काढली. सामाजिक प्रश्नांच्या विचार विनिमयार्थ परिषदा भरविणे, गावोगावी हिंडून तरुणांमध्ये आत्मोद्धाराची भावना जागृत करण्याचे काम केले. त्यासाठी विपूल लेखन करून मराठी मुलूखातील महार समाजामध्ये स्वाभिमान जागविण्याचे काम दलित चळवळीद्वारे केले.

१९०० ते १९२४ या काळातील दलित चळवळीचे काम

(अ) प्रांतिक असेंब्लीत अस्पृश्य सदस्यांचे कार्य

१९१८ च्या माँटेग्यू चेम्सफर्ड सुधारणेनुसार प्रांतातून विधानमंडळे बनविली गेली. या विधानमंडळातील प्रतिनिधी लोकांनी निवडून दिलेले असून पण मतदानाचा अधिकार वरिष्ठ शैक्षणिक अथवा सांपत्तिक पात्रता असणाऱ्यांनाच असल्यामुळे अडाणी, अशिक्षित व गरीब लोकांना या मंडळात प्रतिनिधित्व नव्हते. परंतु अस्पृश्य समाजाने चालविलेल्या लढ्याचा परिणाम म्हणून अस्पृश्यांच्या प्रतिनिधींना नियुक्त करण्याचा निर्णय सरकारने घेतला. त्यानुसार कालीचरण नंदागवळी व नानासाहेब गवई यांची सरकारतर्फे नेमणूक करण्यात आली. १९२३ पर्यंत ते मध्य प्रांत वऱ्हाड लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सदस्य होते. त्यांनी अस्पृश्यांच्या चळवळीची सूत्रे आपल्या

हाती घेऊन आपापल्या कुवतीप्रमाणे सामाजिक, शैक्षणिक व राजकीय सुधारणा करण्याचे प्रयत्न केले. १६ मार्च १९२१ रोजी विधानमंडळात खालील ठराव मांडून चौकशीची मागणी केली.

१. अस्पृश्यांची सरकारी नोकरीतून नेमणूक करावी.

२. अस्पृश्यांना तांत्रिक व औद्योगिक शिक्षणाच्या सवलती देण्याची व्यवस्था करावी.

३. अस्वच्छ वातावरण, गुन्हेगारी प्रवृत्ती यापासून अस्पृश्यांना मुक्त करण्यासाठी विशेष प्रयत्न करून त्यांचे अज्ञान दूर करावे.

४. कोतवाली हक्कांसंबंधी चौकशी करणे.

५. खेड्यातील अस्पृश्य वस्तीवर टाकलेल्या बहिष्काराची चौकशी करणे.

६. अस्पृश्य वर्गाला स्वतंत्र वसाहती निर्माण करण्याकरिता अरण्यातील जागा राखून ठेवाव्यात.

वरील ठरावाशिवाय १० ऑगस्ट १९२१ रोजी अस्पृश्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नियुक्त करण्यासंबंधीचा ठराव विधान परिषदेत मांडण्यात आला. त्यांच्या मते जर अस्पृश्य वर्गातील माणसे लोकल बोर्ड, डिस्ट्रिक्ट कौन्सिल, सॅनिटेशन कमिटी, स्कूल कमिटी, डिस्पेन्सरी कमिटी, म्युनिसिपल कमिटी आणि धान्य पंचायती यातील निवडणुकीत मध्य प्रांताच्या जिल्ह्यात निवडून आले नाहीत तर त्यांना शासनाने वरील कमिट्यांवर नियुक्त करावे. याशिवाय सार्वजनिक विहिरी, बावडी, तीर्थक्षेत्रातील घाट आणि सराई यांचा वापर करण्यास अस्पृश्यांना मज्जाव करण्यात येऊ नये. असाही ठराव १८ मार्च १९२३ रोजी त्यांनी मांडून माँटेग्यू चेम्सफर्ड सुधारणांद्वारे सवलतींचा जो फायदा इतर समाजाला मिळणार होता त्यात दलित समाजाला वाटा मिळावा म्हणून संसदीय मार्गाने पहिला प्रयत्न या नेत्यांनी केला.

(ब) महार परिषदांचे कार्य

वरील कार्यकर्त्यांचे दलित चळवळीतील योगदान तर खूप महत्त्वपूर्ण असून त्या काळात महार समाजाचया एकूण आठ परिषदा झाल्या. त्या सर्व परिषदांचे योगदानही अस्पृश्यता निर्मूलन करणे व समाजामध्ये प्रगती घडवून आणणेसाठी शिक्षणाचा प्रसार करणे यासाठी महत्त्वपूर्ण होते. त्या प्रमुख परिषदा पुढीलप्रमाणे :

१. पहिली वतनदार महार परिषद, सोलापूर, १६ डिसेंबर १९२१.

२. निराश्रित साह्यकरी मंडळीतर्फे २३ जानेवारी १९२२, महार-मांग सभा.

३. पश्चिम महाराष्ट्रातील १२ मार्च १९२२ ची अस्पृश्यांची सभा (नाशिक जिल्हातील देवळा या गावी)

४. सांगली इलाखा बहिष्कृत परिषदेचे पहिले अधिवेशन १४ एप्रिल १९२२

५. मोल्याड रोड येथील २४ सप्टेंबर व १९ ऑक्टोबर १९२२ च्या अस्पृश्य परिषदा.

६. औचितपाडा येथील : डिसेंबर १९२२ व भायखळा येथील ६ डिसेंबर १९२२ व १० डिसेंबर १९२२ रोजी कामाठीपुरा येथील सोमवंशीय गुरूदत्त प्रासादिक मंडळातर्फे झालेल्या परिषदा.

७. पुण्याच्या सोमवंशीय सन्मार्गदर्शक समाजाच्या १९ मार्च १९२३ च्या पाचव्या वार्षिकोत्सवाप्रसंगी झालेली परिषद.

८. मंचर जि. पुणे येथील ९ एप्रिल १९२ ची बहिष्कृत लोकांची सभा.

वरील सर्व परिषदामधून अस्पृश्यांत समाजोन्नती करण्यासाठी शिक्षणावर प्रमुख भर देण्यात आला होता.

(क) विदर्भातील दलित चळवळी

महाराष्ट्रात मागासलेल्या समाजाच्या उन्नतीसाठी अस्पृश्यांच्या अनेक परिषदा भरविल्या गेल्या. त्यात मुख्यतः डिसेंबर १९१२ मध्ये मागासलेल्या जातीची मुंबईत भरलेली परिषद होय. त्यात जवळपास ४० विभिन्न जातींनी भाग घेतला होता. विदर्भातही १९१३ मध्ये नागपूर येथे महार परिषद भरविण्यात आली होती. त्यानंतर १९१७ मध्ये प्रांत वऱ्हाड महार परिषदेची अमरावती येथे सातवी परिषद भरली. या परिषदेत नामदार जोशी यांनी अस्पृश्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा उपदेश केला तर विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्यांनी राजकीय चळवळीत पडू नये असा सल्ला दिला. या चळवळीत ग्रामपंचायतीत अस्पृश्यांचे फौजदारी खटले चालवू देऊ नये, अमरावती येथील शाळेत अस्पृश्य मुलीस प्रवेश नाकारल्याबद्दल निषेध व वतनदारी सोडणाऱ्या महारांना कमी लेखू नये असे ठराव पास करण्यात आले. १९२० साली विदर्भात अखिल भारतीय अस्पृश्य परिषद नागपूर येथे भरविण्यात आली. या परिषदेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर हजर होते. ही परिषद अखिल भारतीय म्हणून संबोधण्यात आली असली तरी त्यास उपस्थित कार्यकर्ते महाराष्ट्रातीलच होते. या कार्यकर्त्यांत ब्राह्मणेतर कार्यकर्त्यांचा विशेष भर होता. परिषदेचे अध्यक्ष पद राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी भूषविले होते.

विदर्भातील मध्य प्रांत वऱ्हाड महार परिषदेची स्थापना १९०७ साली. १९१३ मध्ये नागपूर येथे या सभेची पहिली परिषद भरली. त्यानंतर पुन्हा २९ जानेवारी १९२२ रोजी या परिषदेचे नागपूर येथे ११ वे अधिवेशन झाले.

महार समाजाच्या परिषदा विदर्भात वारंवार होऊ लागल्या. त्यामध्ये १९२२ अमरावती जिल्ह्यातील अचलपूर येथील परिषद २९-३० डिसेंबर १९२३ नागपूर येथील राष्ट्रीय सामाजिक परिषद या परिषदा महत्त्वाच्या होत्या. यामधून अस्पृश्यता निवारण्यावर भर देण्यात आला. या परिषदेचे वैशिष्ट्य म्हणजे दलित समाजातील महिला कार्यकर्त्या सौ. भटकर यांचा सहभाग व त्यांचे ध्येय वाखाणण्यासारखे होते. त्यानंतर २३ व २४ फेब्रुवारी १९२४ रोजी मोहिमा येथे मध्यप्रांत वऱ्हाड परिषदेचे तेरावे अधिवेशन झाले.

(ब) मध्यप्रांत वऱ्हाडातील दलित चळवळीचे कार्यकर्ते

मध्यप्रांत वऱ्हाडात विठोबा रावजी मूनपांडे, कालीचरण नंदागवळी, नानासाहेब गणेश आल्काजी गवई, मुकुंदा शेटये, गोमा गणेश सावरकर, ज्ञानोबा खंडारे यांनी दलित उद्धाराला जोरात चालना दिली. त्यांनी आपापल्या कुवतीप्रमाणे सामाजिक, शैक्षणिक व राजकीय सुधारणा घडविण्याचा प्रयत्न केला. नंदागवळी व नानासाहेब गवई यांनी प्रांतिक विधीमंडळ असेंब्ली व राजकीय हक्कांबद्दलची आपली प्रगल्भता सिद्ध केली होती. नंदागवळी यांनी १९११-१२ साली स्वखर्चाने मुलींची पहिली शाळा गोंदियात सुरू केली होती. १९१३

मध्ये नागपूर येथे भरलेल्या महार परिषदेमध्ये ते उपाध्यक्ष होते. नगरपरिषदेचे सदस्य असताना त्यांनी अस्पृश्यांकरिताच नव्हे तर दुर्लक्षित भंगी समाजाकरिता विशेष कार्य केले होते. १९३० पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दलितवर्ग परिषदेचे अध्यक्ष होते. समग्र अस्पृश्य वर्गात आत्मोन्नतीची जाणीव निर्माण करण्यास या कार्यकर्त्यांनी आपले आयुष्य वेचले होते.

(३) १९२४ ते १९५६ चा कालखंड

दलित चळवळीचा हा कालखंड डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाचा कालखंड म्हणून ओळखला जात असला तरी अस्पृश्यांच्या न्याय हक्कांसाठीचा संघर्ष १९२० पासून सुरू केला होता. त्याचे विस्ताराने विवेचन खालीलप्रमाणे करता येईल.

दलित चळवळीतील आंबेडकर पर्व

दलित चळवळीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उदय झाला तेव्हा परिस्थिती बरीच पालटलेली होती. प्रश्नाचे स्वरूप अतिशय क्लिष्ट झाले होते. राष्ट्रसभेची चढती कमान, ब्रिटिश राज्यकर्त्यांचा प्रतिसाद, बदलते जागतिक राजकारणाचे संदर्भ, एकापाठोपाठ एक मंजूर होत असलेले सुधारणा कायदे, हिंदू-मुस्लीम तणावाचा वाढत चाललेला गुंता, अस्पृश्यांच्या प्रश्नांचे स्पष्ट होत चाललेले सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक व मानसिक पदर आणि त्या अनुषंगाने सामाजिक सुधारणा चळवळीची कक्षा व्यापक करावी लागणार होती. ती डॉ. आंबेडकर यांनी दलित चळवळीच्या रूपाने या कालखंडात व्यापक केली असे दिलीपसिंह निकुंभ यांनी आपल्या 'महाराष्ट्रातील दलित चळवळ' शोध प्रबंधामध्ये म्हटले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अस्पृश्य समजल्या गेलेल्या महार जातीत जन्मलेले असल्यामुळे त्यांना अगदी बालपणापासूनच अस्पृश्यतेचे चटके बसले होते. १९१७ मध्ये इंग्लंडमधून परत आल्यानंतर त्यांनी बडोदा संस्थानात नोकरी सुरू केली. त्यावेळी अस्पृश्य जातीमुळे त्यांना इतरांकडून जी मानहानीकारक वागणूक मिळाली. त्यामुळे त्यांचे मन पेटून उठले. त्यामुळे साहजिकच त्यांनी अस्पृश्यांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी सर्वाधिक महत्त्व दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य बांधवांना अन्यायाचा प्रतिकार करण्यास आणि आपल्या न्याय्य हक्कांसाठी संघर्ष करण्यास व त्यांचा स्वाभिमान जागृत करण्याचा प्रयत्न सुरू केला. १९२० मध्ये कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रोत्साहनाने 'मूकनायक' हे मासिक सुरू केले. अस्पृश्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देताना ''अस्पृश्य देखील याच देशाचे नागरिक असून इतरांइतकाच त्यांचा देखील या देशावर हक्क आहे. अस्पृश्यांनी इतरांच्या मेहरबानीवर व सहानुभूतीवर जगण्याचे कारण नाही. त्यांनी अन्यायाविरुद्ध झगडून आपले न्याय हक्क मिळवले पाहिजेत.'' अशी शिकवण त्यांनी आपल्या बांधवांना दिली. दलितांना आपले हक्क मिळवून देण्यासाठी लढाऊ कार्यक्रम देऊन त्यांच्या जाणीव-जागृती घडवून आणण्यासाठी अस्पृश्यांच्या हक्कांसाठी संघर्ष केला.

(अ) बहिष्कृत हितकारिणी सभा

अस्पृश्यांचा आर्थिक व राजकीय विकास घडवून आणण्यासाठी व त्यांना सामाजिक दास्यातून मुक्त

करण्यासाठी तसेच भारतीय समाजापुढे जातिसंस्थेने उभा केलेले भीषण आव्हान समूह मोडून काढण्यासाठी २० जुलै, १९२४ रोजी बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना केली. या संस्थेमार्फत अस्पृश्य समाजात सुधारणा, जागृती, व शिक्षण प्रसारावर भर देऊन दलित समाजात शिक्षणाचा प्रसार केला. अस्पृश्यांना शिक्षण मिळाल्याशिवाय त्यांची उन्नती होणार नाही. अशी त्यांची खात्री निर्माण झाल्यामुळे प्रथमपासूनच शैक्षणिक कार्याकडे त्यांनी लक्ष केंद्रीत केली. शिक्षणामुळेच अस्पृश्यांना आपल्या हक्काची जाणीव होऊन जे प्राप्त करून घेण्यासाठी ते प्राप्त करून घेण्यासाठी ते प्रयत्नशील राहतील. जे बाबासाहेबांना वाटत होते. म्हणून या संस्थेमार्फत त्यांनी दलित समाजातील तरुण व प्रौढ व्यक्तींसाठी रात्रीच्या शाळा चालविल्या तसेच वाचनालये सुरू केली. शिक्षणासारख्या पवित्र व मानवतावादी कार्याची जबाबदारी, दलित विद्यार्थ्यांकडून सहानुभूतीने पाहू शकतील व त्याचा तेजोभंग करणार नाहीत, अशा शिक्षकांवरच सोपवली पाहिजे. यासाठी त्यांनी कसोशीने प्रयत्न केले. सोलापूर, पनवेल, ठाणे इत्यादी ठिकाणी विद्यार्थी वसतीगृहे सुरू करून दलितांच्या शैक्षणिक कार्याची मुहूर्तमेढ रोवली गेली.

(ब) समता सैनिक दल

१९२६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित-शोषितांची एक गैरराजकीय व सांस्कृतिक संघटना म्हणून समता सैनिक दलाची स्थापना केली. युवकांचे ऐक्य, कल्याण आणि उत्कर्ष, तसेच त्यांचे जीवित, प्रतिष्टा व मालमत्ता यांच्या संरक्षणासाठी 'शीलावर आधारीत शक्ती' असे बोधवाक्य देऊन समता सैनिक दल उभे केले. या दलाद्वारे दलित, शोषित तरुणांच्या मानसिक, शारीरिक व आर्थिक सामर्थ्यात भर टाकण्यास त्यांनी शिक्षण अनुशासन, आत्मनिर्भरता व रचनात्मक कार्यासाठी शक्तीचा वापर करण्याची प्रेरणा मिळाली.

(क) महाडचा सत्याग्रह

महाड या गावामध्ये चवदार तळ्यावर अस्पृश्यांना पाणी घेण्याचा अधिकार नव्हता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लढा उभारला. वास्तविक पाहता तेथील नगरपालिकेने एक ठरा करून ते तळे अस्पृश्यांसाठी आधीच खुले केले होते. पण अस्पृश्य बांधव स्पृश्यांच्या भितीमुळे त्यापासून लांबच राहिले होते. म्हणून अस्पृश्यांना आपला हक्क बजावण्यासाठी संघटित करून २० मार्च १९२७ रोजी सत्याग्रह करून महाडचे चवदार तळे अस्पृश्यांसाठी खुले करून घेतले. पूर्वास्पृश्य आपल्या हक्कांची आता भीक मागणार नाहीत तर ते आपले हक्क स्वतःच्या बळावर मिळवतील असा इशारा लढ्याने देऊन महाडच्या चवदार तळ्यावर अस्पृश्यांचाही हक्क आहे हे आपल्या कृतीने पटवून दिले.

(ड) मनुस्मृतीचे दहन

मनुस्मृती हा हिंदू समाजाचा एक धर्मग्रंथ आहे. पण याच ग्रंथाने जातिव्यवस्था व अस्पृश्यतेसंबंधीचे निर्बंध यांचे समर्थन करून हिंदू समाज पद्धती व जातिसंस्था यांना बळकटी प्राप्त करून देण्याचे काम केले आहे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत. तेव्हा सामाजिक विषमता व उच्च-नीच भेदभाव यांचे समर्थन करणाऱ्या या ग्रंथांविरुद्ध प्रतिकात्मक कृती करण्यासाठी २५ डिसेंबर १९२७ रोजी त्यांनी मनुस्मृतीचे दहन केले.

(इ) मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रह

हिंदू धर्मातील उच्चवर्णीयांनी अस्पृश्य जातीतील लोकांना अनेक हक्कांपासून वंचित ठेवले होते. मंदिरामध्ये प्रवेशाचा हक्कही त्यांना नाकारण्यात आला होता. अस्पृश्यांना हा हक्क मिळवून देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह करण्याचे ठरविले. या संदर्भात ते म्हणाले की, ''आम्हाला ही गोष्ट सिद्ध करावयाची आहे की, आमच्या प्रवेशाने देवालये भ्रष्ट होत नाहीत किंवा स्पर्शाने मुर्तीचे पावित्र्य कमी होत नाही. देवळे जरी स्पृश्य हिंदूनी बांधली तरी ती हिंदू धर्माची असून हिंदू धर्माकरिता बांधलेली आहेतच. हिंदुत्व जितकी स्पृश्यांची मालमत्ता आहे तितकीच अस्पृश्यांचीही आहे.'' मंदिर प्रवेशाच्या सत्याग्रहासाठी नाशिक येथील काळाराम मंदिराची निवड करून सत्याग्रह केला. त्यानंतर महाराष्ट्रात इतर ठिकाणी अशा प्रकारचे सत्याग्रह करून अस्पृश्यांसाठी मंदिर प्रवेशासाठी सुरुवात करण्यात आली.

(ई) धर्मांतर

हिंदू धर्मात राहूनच अस्पृश्यांचे हक्क मिळवून घेण्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रयत्न केले. पण सवर्ण हिंदूंची अस्पृश्यासंबंधीची अनुदार वृत्ती अनुभवल्यानंतर हिंदू धर्मात राहून अस्पृश्यांना स्वाभिमानाने जगता येणार नाही. म्हणूनच १९३५ मध्ये येवला येथे भरलेल्या अस्पृश्य परिषदेच्या अध्यक्षपदावरून बोलताना त्यांनी असे म्हणाले की, ''दुर्दैवाने मी हिंदू म्हणून अस्पृश्य जातीत जन्माला आलेलो असलो तरी मरताना मात्र मी हिंदू म्हणून मरणार नाही.''

हिंदू धर्मात अस्पृश्यांना न्याय द्यावा म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व प्रकारचे प्रयत्न केले. तरीही हिंदूंच्या वृत्तीत फरक न पडल्याने १४ ऑक्टोबर १९५६ रोजी विजयादशमीच्या मुहूर्तावर लाखो दलित बांधवांसह नागपूर येथे बौद्ध धर्माची दीक्षा घेतली.

अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांसाठी कार्य

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक हक्कासाठी जसा लढा दिला तसेच राजकीय क्षेत्रातही अस्पृश्यांचे नेतृत्व केले. १९२७ मध्ये सरकारने त्यांना विधिमंडळाचे सदस्य म्हणून नियुक्त केले. तेव्हापासून त्यांनी दलितांच्या न्याय्य हक्कासाठी जे वेगवेगळे लढे दिले व अस्पृश्यांच्या राजकीय व शैक्षणिक हक्कांसाठी कार्य केले ते खालीलप्रमाणे –

(अ) स्वतंत्र मतदारसंघाची मागणी व पुणे करार

१९३० ते १९३२ च्या दरम्यान इंग्लंडमध्ये ज्या तीन गोलमेज परिषदा घेण्यात आल्या त्यात अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपस्थित होते. यापूर्वी मुस्लिमांना स्वतंत्र मतदारसंघ देण्यात आले होते. अस्पृश्यांनाही राजकीय न्याय मिळवून देण्यासाठी त्यांच्यासाठी स्वतंत्र मतदारसंघाची तरतूद नव्या घटनेत करावी अशी मागणी डॉ. आंबेडकर यांनी गोलमेज परिषदेत केली. परिणामी १९३२ मध्ये इंग्लंडचे पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी जातीय निवाडा जाहीर करून अस्पृश्यांची स्वतंत्र मतदारसंघाची मागणी मान्य केली. पण

महात्मा गांधी यांचा अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ देण्यास विरोध होता. त्यामुळे त्यांनी येरवडा तुरुंगात उपोषण सुरू केले. काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी यांच्यात तडजोड घडवून आणण्याचे प्रयत्न केले. महात्मा गांधींचे प्राण वाचावेत म्हणून डॉ. आंबेडकरांनी तडजोडीस मान्यता दिली. महात्मा गांधी व डॉ. आंबेडकर यांच्यात एक करार झाला. हा करार 'पुणे करार' म्हणून ओळखला जातो. या करारानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र मतदारसंघाचा आग्रह सोडून अस्पृश्यांसाठी राखीव जागा असाव्यात हे मान्य केले.

(ब) स्वतंत्र मजूर पक्ष

पूर्वास्पृश्यांच्या प्रतिनिधीत्वासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जसा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे शेतकरी-कष्टकरी वर्गाच्या आर्थिक दुरावस्थेची कारणमीमांसा करून श्रीमकांची जातीनिरपेक्ष तत्त्वावर संघटना बांधण्या-साठी प्रयत्न केले. भारतीय श्रमिकांची जातिबंधनापासून मुक्तता करण्यासाठी, सामाजिक क्रांतीला राजकीव व आर्थिक आधार देण्यासाठी १९३६ मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. त्यांच्या मते 'येथील कामगार चळवळीची उद्दिष्टे केवळ आर्थिक असून भागणार नाही; ती शोषणमुक्ती जातीमुक्ती अशा दुहेरी असली पाहिजे.' १९३७ च्या प्रांतिक विधिमंडळाच्या निवडणुकीत या पक्षाला चांगले यश मिळाले. मुंबई विधिमंडळात विरोधी पक्ष म्हणून महत्त्वाची भूमिका स्वतंत्र मजूर पक्षाने पार पाडली. यावेळी खोती निर्मूलन विधेयक, महार-वतने नष्ट करणारे विधेयक, शेतकऱ्यांचा मोर्चा, गिरणी कामगारांचा संप अशी कित्येक कामे विधिमंडळात व बाहेर या पक्षाच्या वतीने दलित-कामगार-शेतकरी समाजात केली गेली. स्वतंत्र मजूर पक्षाचे सामाजिक, आर्थिक ध्येय धोरण हा दलित चळवळीला लाभलेल्या आंबेडकरी वारशाचा अत्यंत मोलाचा भाग आहे.

(क) शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन

देशातील अमानुष आणि विषम समाजव्यवस्था, लोकांच्या हाडी मुरलेली जातिप्रथा आणि समाजातील स्पृश्यास्पृश्यता यांच्या परिणामातून स्वतंत्र मजूर पक्षाऐवजी अनुसूचित जातींच्या विशिष्ट हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी स्वातंत्र्यानंतर दलितांची उपेक्षा होऊ नये, त्यांना विशेष सोयी-सवलती व संरक्षण प्राप्त करून घेता यावे यासाठी त्यांची स्वतंत्र अस्मिता प्रस्थापित करण्यासाठी १९४२ मध्ये 'शेड्यूल्ड कास्टस् फेडरेशन'ची स्थापना केली. या फेडरेशनने पूर्वास्पृश्यांना हिंदूपासून वेगळा अल्पसंख्यांक गट म्हणून मान्यता मिळावी आणि त्यांचे हित व हक्क सुरक्षित रहावेत याकरिता विशेष संविधानिक तरतुदी करण्याचा फेडरेशनचा आग्रह धरला. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सहकार्य मिळविण्यासाठी पंडित नेहरूंनी पुढाकार घेतला. नवस्वतंत्र राष्ट्राच्या संविधानिक जडणघडणीमध्ये डॉ. आंबेडकरांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरल. त्यांना संविधान परिषदेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी अपार परिश्रम घेतले. संविधानामध्ये दलितांसाठी काही हक्क, संरक्षण व सवलती नमूद केल्या. त्याआधारे दलिताला नवी प्रतिष्ठा व सन्मान प्राप्त करून दिला. अनुसूचित जाती-जमातींसाठी राखीव जागा व सवलती देऊन हजारो उच्चशिक्षित, दलित तरुणांना सनदी अधिकार पदावर व विधानसभांतील जागावर जाण्याच्या वाटा खुल्या केल्या. याच काळात पंडित नेहरूंच्या मंत्रिमंडळात कायदा

मंत्री असताना डॉ. आंबेडकरांनी हिंदू धर्मातील जाती-जमातीत एकात्मता निर्माण करण्याकरिता हिंदू कोड बिल केले. या बिलाला विरोध झाल्याने डॉ. आंबेडकरांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला.

(ड) रिपब्लिकन पक्ष

संविधानामध्ये दलितांच्या राखीव जागांचा समावेश केला असला तरी प्रत्यक्षात त्याचा लाभ सधन व साधनसंपन्न दलितांनीच घेतल्यामुळे सर्वसामान्य दलित लाभापासून वंचित राहिले. १९५२ च्या निवडणुकांमध्ये शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनला अपयश आले. विधानसभांच्या ५५२ जागा लढवलेला हा पक्ष फक्त १६ जागांवरच विजयी झाला. या निवडणुकीमध्ये स्वतः बाबासाहेबांनाही हार पत्करावी लागली. म्हणून नव्या राजकारणाच्या संदर्भात दलितांच्या संघटनांना उभा करून भागणार नाही तर स्पृश्यांमधील एखाद्या मोठ्या गटाचे सहकार्य मिळावे लागेल हे डॉ. आंबेडकरांनी ओळखले. स्पूर्श्यास्पृश्य, गरीब स्पृश्य, अनुसूचित जाती व जमाती यांची एकत्र ताकद उभी करून काँग्रेसला तुल्यबळ ठरू शकेल व याचबरोबर दलितांच्या हितसंबंधांच्या संरक्षण-संवर्धनाच्या दृष्टीनेही हे संघटन उपयोगी ठरेल याची तयारी डॉ. आंबेडकरांनी सुरू केली. पण ६ डिसेंबर १९५६ रोजी त्यांचे महानिर्वाण झाल्यामुळे हे संकल्प तडीस गेला नाही. परंतु दलित चळवळीतील अन्य कार्यकर्त्यांनी डॉ. आंबेडकरांचा हा संकल्प पूर्ण करण्यासाठी शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन विसर्जित करून नवा पक्ष काढण्याचा निर्णय घेतला. १९५७ च्या निवडणुकीत महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र समितीचा घटक पक्ष म्हणून शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनचे अनेक उमेदवार विधानसभेसाठी, लोकसभेसाठी निवडून आले होते. पण दलित चळवळीचा उद्देश तेवढ्याने साध्य होणार नव्हता म्हणून दलित चळवळीच्या नेत्यांनी ऑक्टोबर १९५७ मध्ये शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन विसर्जित करून रिपब्लिकन पक्षाची स्थापना केली. य पक्षाची मूख्य भूमिका जाती-पोटजातींच्या मर्यादांमध्ये न अडकता इतर जातींनाही, ज्यांची लोकशाही समाजवादावर निष्ठा आहेत त्यांना प्रवेश द्यावा अशी होती. पक्षाच्या सुरुवातीला तीन मागण्या होत्या त्या म्हणजे -

१. दलितांच्या सवलती नव बौद्धांनाही मिळाव्यात.

२. महार वतन रद्द व्हावे.

३. नागपूरची दिक्षाभूमी आंबेडकर स्मारकासाठी मिळावी.

४. १९५७ ते आजपर्यंतचा दलित चळवळीचा कालखंड

१९५६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महानिर्वाण झाले. यानंतर दलित चळवळीतील व पक्षातील नेतृत्वाची पोकळी भरून काढण्यासाठी सामुदायिक नेतृत्वाचा निर्णय घेतला. पण पक्षाची घटना तयार करण्याचा व अनुसूचित जातींच्या नेतृत्वाबाबत एकमत न झाल्यामुळे सामुहिक नेतृत्व टिकले नाही. जुन्या नव्यात संघर्ष होऊन पक्षात दोन गट पडले. त्यांनी आपापल्या परीने दलित उद्धाराचे प्रयत्न केले.

१. कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखालील गट

दलित चळवळीच्य जुन्या गटाचे नेतृत्व कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्याकडे होते. १९५९ मध्ये त्यांच्या नेतृत्वाखाली औरंगाबाद येथे अधिवेशन घेण्यात आले. त्यात खालील ठराव करण्यात आले.

१. जमिनीचे राष्ट्रीयीकरण करावे.

२. जातधर्मनिरपेक्ष पद्धतीने सामुदायिक शेती करता यावी या दृष्टीने जमिनीचे वाटप करावे.

त्याचबरोबर १९५९ च्या सुमारास पूर्वास्पृश्यांमधील जाती-पोटजातीच्या भिंती जमीनदोस्त करण्यासाठी तसेच सरकारी मालकीच्या जमिनी भूमिहीनांना मिळाव्यात यासाठी धुळे, जळगांव, नाशिक जिल्ह्यात सत्याग्रह करण्यात आला.

२. आवळे-कांबळे व रूपवते यांच्या नेतृत्वाखालील गट

दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखालील दलित चळवळीच्या गटाने सत्याग्रह, धरणे, मोर्चा यासारख्या मार्गांनी अस्पृश्योद्धार व उन्नतीचा मार्ग म्हणजे संघर्षातून सामाजिक पुनर्रचना करण्याचे ठरविल्यामुळे त्यांना विरोध करून संविधानिक मार्गाने आत्मोन्नती साधणाऱ्या तत्त्वावर भर असणारा दुसरा विरोधी गट आवळे, कांबळे, रूपवते यांच्या नेतृत्वाखाली अस्तित्वात आला. त्यांनी नागपूर येथे स्वतंत्र अधिवेशन होऊन नवीन रिपब्लिकन पक्षाची स्थापना करण्यात आली. या पक्षाने आर्थिक कार्यक्रमापेक्षा बौद्ध समाजाच्या वेगळेपणावर भर देऊन त्यांचे स्वतंत्र अस्तित्व टिकविण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी १९६६ मध्ये बी. सी. कांबळे यांनी 'भारतीय बौद्धांची कैफियत' शासनासमोर मांडली. त्यात पुढीलप्रमाणे मागण्या करण्यात आल्या होत्या.

१. बौद्धांकरिता वेगळा बौद्ध कायदा असावा.

२. बौद्ध सांस्कृतिक केंद्र व बौद्ध विहारांची स्थापना करण्यास शासनाने मदत करावी.

३. रेडिओ, आकाशवाणी यासारख्या प्रसारमाध्यमांद्वारे भगवान बुद्धांच्या शिकवणुकीचा प्रचार करण्यासाठी बौद्धांना सवलती देण्यात याव्यात.

४. बौद्ध लेण्यांचे संरक्षण करून बौद्धांकरिता तेथे सुख-सोयी उपलब्ध करून द्याव्यात.

वरील दोन गटांनी दलित चळवळीच्या कार्यात्मक भूमिकेबाबत वेगळे धोरण स्वीकारल्यामुळे रिपब्लिकन पक्षात सुरुवातीपासूनच अस्तित्वात असलेली गटबाजी आणखी वाढत गेली. १९७० मध्ये या फुटीरतचा उद्रेक होऊन रिपब्लिकन पक्षाची अनेक शकले पडून त्याची वाताहात झाली. दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखालील गटाने काँग्रेस पक्षाशी निवडणूक समझोता करून महाराष्ट्राच्या शासकीय राजकारणात प्रवेश मिळविला पण त्यामुळे त्यांचे स्वरूप राजकीय पक्षापेक्षा दबाव गटाला अधिक जवळचे झाले. तर खोब्रागडे व कांबळे गटाने १९७७ च्या निवडणुकीत जनता पक्षाशी सहकार्य केले. पण १९७८ च्या सुरुवातीला काँग्रेसमध्ये फूट पाडल्यानंतर खोब्रागडे व कांबळे गट जनता पक्षाच्या बाजूला व गवई गट इंदिरा काँग्रेसच्या बाजूला गेले. डॉ. भा. ल. भोळे म्हणतात, ''रिपब्लिकन पक्षातील नेत्यांची आत्मकेंद्रीत वृत्ती व संधिसाधू राजकारण हे पक्षाच्या ऱ्हासाला कारणीभूत ठरले.'' अंतर्गत फुटीमुळेच रिपब्लिकन पक्षाची ताकद कमी होऊन दुर्बल झालेला दिसतो.

(ब) दलित पँथर

रिपब्लिकन पक्षाला आलेले अपयश, त्या पक्षातील व्यक्तिवाद, पोटजातिवाद व त्यावर आधारित गटबाजी, त्यांची दिवाळखोरी आणि संघटनात्मक विस्कळीतपणा, दलित समाजाची पुढील आव्हाने पेलण्यास अपुरे पडणारे त्यांचे डावपेच आणि निवडणुककेंद्री राजकारण, कचखाऊ नेतृत्व आणि ग्रामीण व झोपटपट्टीतील दलितांपासून दुरावा व सर्व कारणांमुळे हवालदिल झालेल्या दलित समाजाला आश्रय देऊन स्वार्थ, तडजोडी, लाचारी, गटबाजी टाकून देऊन अनटचॅबिलिटीवर स्वतंत्र संघटना व जातिअंताच्या प्रश्नावर प्रखरपणे लढणारी संघटना निर्माण करण्याकरिता नामदेव ढसाळ (प्रजा समाजवादी), राजा ढाले (दलित युवक आघाडी), भाई रंगारे (काँग्रेस), गंगाधर गाडे, टी. एम. कांबळे (रिपब्लिकन विद्यार्थी संघटना) या दलित चळवळीतील विविध संघटनातील नेत्यांना एकत्र येऊन ९ जुलै, १९७२ रोजी दलित पँथर, 'परिवर्तनवादी उसळत्या रक्ताची संघटना' असे नामाभिधान डॉ. भोळे देतात, ती स्थापन केली. साठोत्तर दशकात दलित साहित्याची चळवळ चालविणाऱ्या विद्रोही लेखकांनी दलित पँथरची निर्मिती केली. ते लढाऊ व आक्रमक भूमिका घेऊन सामाजिक व राजकीय मैदानात उतरले. सवलतीच्या व निवडणुकीच्या नेभळट राजकारणात तसेच हिंदूंमधील पुनरुज्जीवनवादी शक्तींना स्पष्टपणे विरोध करून सर्वांगीण क्रांतीची जहाल भाषा उच्चारू लागले. नामदेव पवार, ज. वि. चेंदवणकर, अर्जुन डांगळे, भाई संगारे, अनिल कांबळे, अरुण कांबळे, रामदास आठवले, गंगाधर गाडे, प्रीतमकुमार शेगांवकर, टी. एस. कांबळे या आघाडीच्या कार्यकर्त्यांनी दलित पँथर चळवळीचा विस्तार केला. दलित समाजाविषयी अपार जिव्हाळा, सामाजिक विषमतेविरुद्ध पेटून उठलेल्या तरुणांचा सहभाग यामुळे ही संघटना थोड्याच काळात नावारूपास आली.

दलित पँथरच्या उदयाची कारणे

१. नागेश चौधरी यांच्या मते, जातिव्यवस्था व दलितांवरील अत्याचाराविरुद्धची चीड या अंतर्विरोधातून पँथरचा जन्म झाला.

२. नलिनी पंडित यांच्या मते, दलितांवरील वाढत्या अत्याचारामुळे दलित तरुणांमध्ये पसरलेला भ्रमनिरास यामधून दलित पँथरचा उदय झाला.

३. शरद पाटील यांच्या मते, 'सर्व रिपब्लिकन पक्ष विद्रोही आंबेडकरवादाशी बेईमान झाले म्हणून दलित युवकांच्या पँथरसारख्या विद्रोही संघटना जन्माला आल्या.'

वरील विचारवंतानी दलित पँथरच्या उदयाच्या संदर्भात आपापली मते व्यक्त केली आहेत ती बरोबरच आहेत. पण दलित पँथरच्या उदयाचे तात्कालिक कारण म्हणजे गावोगावच्या दलित स्त्री-पुरुषांवर होणाऱ्या अत्याचाराचे वाढते प्रमाण हे एक प्रमुख कारण आहे. गावगुंडशाहीपासून दलित समाजाला संरक्षण देण्यासाठी व दलितांवर स्थानिक वरचढ मार्गाने आणलेले दहशतीचे सावट ठोशास ठोसा देऊन प्रतिकार करण्यासाठी, मनगटशाहीचा प्रतिकार अधिक जोरदार मनगटशाहीने करून देण्यासाठी, नव बौद्ध समाजाची ससेहोलपट थांबवण्यासाठी, तसेच तरुणांच्या वाढत चाललेल्या बेकारीला आळा घालून आरक्षण धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी दलित पँथरची स्थापना करण्यात आली.

दलित पँथर म्हणजे दलितांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्धची जळजळीत प्रतिक्रियाच होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या निधनानंतर मरगळ आलेल्या दलित समाजाला पँथर एक नवीन ठिणगी व मुक्तीची आशा वाटू लागली. दलित पँथरच्या उदयामुळे दलित तरुणांच्या मनात व्यवस्थेविषयी असलेल्या संतप्तपणाला एक नवे व्यासपीठ मिळून दलित समाजात चळवळीचे चैतन्य निर्माण झाले.

भारतीय दलित पँथर

दलित पँथरमध्ये 'मार्क्सवाद की आंबेडकरवाद' वैचारिक संघर्ष सुरू झाला. त्याचबरोबर नेतृत्वाचा हव्यास, व्यक्तिवाद, हेवेदावे, आरोप-प्रत्यारोप यामुळे पँथर फुटीच्या मार्गाने जाऊ लागली. नागपर येथे भरलेल्या पँथरच्या पहिल्या अधिवेशनात राजा ढाले यांनी नामदेव ढसाळ यांना पँथरमधून काढून टकले. त्यामुळे दलित पँथरमध्ये फूट पडली. ढाले आणि ढसाळ दोन गट पडले. त्यानंतर राजा ढाले आणि पँथरचे नाव बदलण्याचे ठरविले. त्यामुळे पँथर बरखास्त करून टाकली. त्यामुळे दलित सामाजिक कार्यकर्ते हवालदील झाले. संघटना बरखास्त झाल्यामुळे दलित चळवळीची गती मंदावली. दलितांना स्वतःचा आत्मोद्धार, उन्नती करण्याची आशा या चळवळीने निर्माण केली होती ती नष्ट झाली. त्यामुळे सारा समाज सैरभैर झाला. म्हणून त्यांच्यामध्ये पुन्हा जिवंतपणा आणण्यासाठी पँथर संघटित करण्यासाठी प्रा. अरुण कांबळे, रामदास आठवले, दयानंद म्हस्के, बापूसाहेब उकीरडे, रामचंद्र परमार, गंगाधर गाढे, प्रीतमकुमार शेगांवकर, भाई रंगारे यासारख्या नेत्यांनी भारतीय दलित पँथर असे नामकरण करून दलित पँथरची पुनर्बांधणी करून तिला भक्कम पायावर उभे केले. महाराष्ट्रामध्ये भारतीय दलित पँथरने मंडल आयोग व नामांतराचा लढा अतिशय निकराने लढविला. मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे यासाठी आंदोलन सुरू केले. धरणे, निषेध, मोर्चा, घेराव, मंत्र्यांच्या कारपुढे आडवे पडणे, विधानसभेत उडी मारणे अशा अनेक मार्गांनी त्यांनी लढा तीव्र केला. या आंदोलनामुळे दलित समाजामध्ये खूप मोठे मानसिक ऐक्य निर्माण झाले. भारतीय दलित पँथरने सर्वसमावेशक भूमिका स्वीकारून दलित म्हणजे केवळ नवबौद्ध नव्हे तर जो सामाजिक व आर्थिकदृष्ट्या शोषित आहे तो आमचा आहे ही विचारप्रणाली स्वीकारली.

४.२.४ महाराष्ट्रातील आदिवासींच्या चळवळी

आदिवासी चळवळ अर्थ व कारणे

बहुतांश आदिवासी लोकांचा सहभाग असणारी आणि आदिवासी लोकांच्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी सुरू असणाऱ्या चळवळींना 'आदिवासी चळवळ' असे संबोधले जाते. सर्वसाधारणपणे अशा चळवळींचे नेतृत्व देखील आदिवासी व्यक्तीकडेच असते. तसेच आदिवासी चळवळीत गैर आदिवासी लोकांचाही सहभाग असतो. मात्र त्यांचा सहभाग अत्यंत कमी असण्याची शक्यता असते. काही स्थानिक शास्त्राचे अभ्यासक आदिवासी चळवळीचा उल्लेख आदिवासींचा विद्रोह, आदिवासींचा असंतोष, आदिवासींची बंडाळी अथवा आदिवासींचा सशस्त्र उठाव यासारख्या नावानेही करतात.

आदिवासी चळवळीची कारणे किंवा घटक

आदिवासी चळवळीचा अभ्यास करताना असे दिसून येते की, आदिवासींच्या जोपर्यंत चळवळी झाल्या नव्हत्या तोपर्यंत त्यांचा सभ्य समाजाशी संपर्क नव्हता. भारतात इंग्रजी राजवट आली व आदिवासी क्षेत्रामध्ये ख्रिश्चन मिशनऱ्यांनी सामाजिक सेवेच्या माध्यमातून धर्मप्रचाराचे काम सुरू केले. त्यामुळे आदिवासींमध्ये लहान-मोठ्या चळवळी निर्माण झाल्या. या चळवळीची तीव्रता वेगवेगळ्या आदिवासी जमातीमध्ये वेगवेगळी राहिली आहे.

बी. के. राय, बर्मन यांनी आदिवासींमध्ये चळवळी का निर्माण झाल्या? याविषयी काही आधार सांगितले असून ते पुढीलप्रमाणे आहेत.

१. नैसर्गिक आवाजाची गोपनियता भंग होण्याच्या भितीने निर्माण झालेली चळवळ.

२. नैसर्गिक साधनांवर आपले स्वतःचे नियंत्रण नष्ट झाल्याच्या भितीने निर्माण झालेली चळवळ.

३. संपूर्ण सामाजिक आंतरक्रियांच्या संरचनेमध्ये त्याची परंपरागत परिस्थिती व भूमिकेस धक्का लागण्याच्या भितीने निर्माण झालेली चळवळ.

४. आपला समाज व सरकार यांच्यातील संबंधाचा नवीन धर्म शोधण्याच्या संदर्भातील चळवळ.

५. व्यक्ती व समाज यांतील संबंधंचा नवीन अर्थ शोधण्याच्या संदर्भातील चळवळ.

६. टापला समाज व समुदायाची स्वतंत्र ओळख कायमस्वरूपी टिकवून ठेवण्याच्या प्रयत्नांच्या संदर्भातील चळवळ.

७. आपल्या क्षेत्राच्या साधनांवर आपल्या समुदायाचे नियंत्रण कायमस्वरूपी ठेवण्याबाबतची चळवळ.

८. प्रत्येक पातळीवर आपल्या समुदायावरील अधिकाधिक सत्ता किंवा स्वायत्तता प्राप्त करण्याबाबतची चळवळ.

कोणतीही चळवळ ही सहज निर्माण होत नाही. चळवळ निर्माण होण्यासाठी काही विशिष्ट घटक किंवा कारणे जबाबदार असतात. आदिवासींची चळवळ निर्माण होण्यासाठी काही घटक व कारणे जबाबदार आहेत. ती पुढीलप्रमाणे सांगता येतील.

आदिवासींच्या चळवळीची महत्त्वाची कारणे

१. नवीन शासन व्यवस्था

इंग्रजांच्या शासनकाळापूर्वी भारतात प्रत्येक आदिवासी क्षेत्रामध्ये स्थानिक स्वशासन होते. आदिवासी लोक त्या स्थानिक स्वशासनाचे प्रमुख होते. ते आपल्या प्रथा परंपरेनुसार आपले शासन चालवित. त्यांच्यावर बाहेरच्या शासकांचा दबाब किंवा नियंत्रण नव्हते. परंतु ब्रिटिशांची सत्ता भारतात स्थापन झाल्यानंतर आदिवासींची स्थानिक स्वायत्तता संपुष्टात आली. इंग्रज शासनाने कागदे करून प्रशासन व्यवस्थेने आदिवासी

समाजावर वेगवेगळे निर्बंध लादले. त्यामुळे परंपरेने निसर्गाच्या सानिध्यात राहणाऱ्या आदिवासी लोकांना इंग्रजांचे नियंत्रण असह्य वाटू लागले. त्यातून आदिवासींच्या चळवळींचा उदय झाला.

२. आर्थिक शोषण

आपल्या देशातील आदिवासी चळवळीचे प्रमुख कारण शासकीय व गैरशासकीय स्तरावर होत असलेले आदिवासी लोकांचे आर्थिक शोषण होय. आदिवासी लोकांच्या उपलब्ध नैसर्गिक संसाधनांवर शासकीय नियंत्रण आहे. शासकीय संस्था व साधनांचा उपयोग आदिवासींच्या विकासासाठी न करता व्यावसायिक लाभासाठी मोठ्या प्रमाणावर करतात. त्यामुळे आदिवासी समाजाच्या आर्थिक परिस्थितीमध्ये विशेष सुधारणा झाली नाही. त्यांना सतत गरिबी, उपासमार यांसारख्या समस्या भेडसावत राहिल्या आहेत. व्यापारी, सावकार, जमीनदार व ठेकेदार आदिवासींच्या अज्ञान, भोळेपणाचा फायदा घेऊन त्यांचे आर्थिक शोषण करीत राहिले. मात्र कालांतराने हा वर्ग आपले आर्थिक शोषण करीत आहे याची जाणीव आदिवासींना झाल्यामुळे त्यांच्यात हळूहळू असंतोष निर्माण झाला. त्या असंतोषातूनच आदिवासी चळवळ उभी राहिली.

३. ख्रिश्चन मिशनऱ्यांशी संबंध

भारतीय आदिवासी अज्ञानी, साधे-भोळे, गरीब व मागासलेले असल्यामुळे ख्रिश्चन मिशनऱ्यांनी, धर्मप्रसाराच्या दृष्टीने या लोकांकडे आपले लक्ष केंद्रित केले. आदिवासी भागात दवाखाने उघडण्यात आले. मुलांना शिक्षण देण्यासाठी शाळा उघडल्या. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी आदिवासींची सेवा करून त्यांच्या मनात आपल्याविषयी व येशू विषयी आदर निर्माण केला व हळूहळू आदिवासी लोकांचे धर्मांतर घडवून आणणे सुरू केले. विविध आदिवासी जमातीच्या लोकांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला. शिक्षणामुळे त्यांच्या जागृती निर्माण झाली. या जागृतीतून चळवळी निर्माण झाल्या. काही आदिवासी जमातींनी ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या धर्मप्रसाराच्या कार्याला विरोध करण्यासाठी देखील चळवळी केल्याचे दिसून येते.

४. शासनाचे वनधोरण

केंद्र व राज्यशासनाद्वारे चुकीचे वनधोरण लागू केल्यामुळे देखील आदिवासींमध्ये चळवळी निर्माण झाल्या. आदिवासी लोक हे जंगल किंवा जंगलाच्या आसपास निवास करतात. वनसंपत्ती हेच त्यांचे उदरनिर्वाहाचे महत्त्वाचे साधन आहे. तीच त्यांची खरी संपत्ती आहे. वनसंपत्तीचे महत्त्व फक्त आर्थिक नव्हे तर भावात्मक देखील आहे. आदिवासी लोक आपल्या क्षेत्रातील प्रत्येक झाडे व पशुपक्ष्यांना ओळखतात. त्यांच्यावर ते मनापासून प्रेम करतात. ते जंगलातील वृक्षाची पूजा करतात. परंतु शासनाच्या वनधोरणाने आदिवासी लोकांचा जंगल संपत्तीवर असणारा अधिकार संपुष्टात आला. त्यामुळे त्यांना शासनाच्या कायद्याप्रमाणे जीवन जगणे कठीण झाले. जंगल संपत्तीवरील आपल्या नैसर्गिक अधिकारापासून वंचित झालेल्या आदिवासी लोकांमध्ये विद्रोहाची भावना निर्माण झाली.

५. संस्कृतीकरण

संस्कृतीकरण हे देखील आदिवासी चळवळीचे महत्त्वाचे कारण आहे. आदिवासी लोकांचा संपर्क

एकीकडे हिंदू संस्कृतीशी व दुसरीकडे ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या धर्मप्रसारामुळे पाश्चात्य संस्कृतीशीही आला. या दोन्ही संस्कृती परस्परांच्या विरोधी आहेत. आदिवासी जमातीतील काही लोक हिंदू धर्मामध्ये व काही लोक पाश्चात्य ख्रिश्चन धर्म स्वीकारलेले. तेव्हा एकाच आदिवासी जमातीमधील दोन संस्कृतींमुळे लोकांपुढे, समाजापुढे सामाजिक व सांस्कृतिक समस्या निर्माणझाल्या. अशा समस्यांमुळेही नव्या चळवळीचा जन्म झालेला दिसून येतो.

आदिवासी चळवळीचे प्रकार

भारतात १८७८ ते १९७१ या सुमारे २०० वर्षांच्या कालखंडात आदिवासींच्या ७० चळवळी निर्माण झाल्या. असे आदिवासी चळवळींचा अभ्यास करणारे राघवैया यांचे म्हणणे आहे. आदिवासी चळवळीचा अभ्यास करणारे पुस्तक त्यांनी १९७१ मध्ये लिहून प्रकाशित केले. म्हणून १९७१ पर्यतच्याच काळाचा विचार केला आहे. मात्र १९७१ नंतरच्या कालखंडातही अनेक आदिवासी चळवळी सुरू झाल्या. त्यांचे कार्य सुरूच आहे. आदिवासींचे सर्व प्रश्नही सुटलेले नाहीत. यामुळे आपल्या प्रश्नांसाठी आदिवासी चळवळी यापुढेही सुरू राहणार यात शंका नाही. ब्रिटिश शासन काळापासून आजपर्यंत झालेल्या आदिवासी चळवळींची नेमकी संख्या सांगणे अवघड आहे. भारतातील आदिवासी चळवळींचे स्वातंत्र्यपूर्व म्हणजे ब्रिटिश काळातील आदिवासी चळवळी व स्वातंत्र्योत्तर काळातील आदिवासी चळवळी अशा दोन भागात वर्गीकरण करता येईल.

ब्रिटिश काळातील आदिवासींच्या चळवळी

ब्रिटिश काळात आदिवासींनी अनेक चळवळी उभारल्या होत्या. जमीनदार आणि सावकारांशी इंग्रज सरकारच्या सहकार्याने बिहारमधील राजमहल टेकड्यांच्या प्रदेशातील आदिवासींचे मोठ्या प्रमाणात शोषण केले जात होते. म्हणून येथील आदिवासींना जागृत करण्यासाठी व इंग्रजांकडून सुरक्षिततेची हमी मिळविण्यासाठी आदिवासींनी ही चळवळ उभारली होती. ही चळवळ देशभर पसरू नये म्हणून बिहारमध्ये आदिवासींमध्ये वेगळा प्रदेश, वेगळा कायदा करण्यात आला. या प्रदेशाला वन्य जमातीचा प्रदेश असे नाव देण्यात आले. हा प्रदेश सामान्य कायद्याच्या कक्षेतून वगळून त्यासाठी स्वतंत्र कायदा करण्यात आला. त्या कायद्याप्रमाणे या भागाचा कारभार चालावा असे ठरले.

ईस्ट इंडिया कंपनीत सरकारने भारतातील एक-एक प्रांत हस्तगत केला. त्यानंतर त्या त्या प्रांतातील आदिवासी जमातींनी वेगवेगळ्या कारणांसाठी चळवळी उभारल्या. ईस्ट इंडिया कंपनीला देशातील जमीनदार, श्रीमंत लोकांनी मदतीचा हात देऊन इंग्रजांची मर्जी संपादन केली. त्यांच्यावर इंग्रजांचा वरदहस्त निर्माण झाला. इंग्रजांनी मिळते-जुळते घेऊन जमातीवरील आपले वर्चस्व कायम टिकवून ठेवले. आदिवासींचा जमिनींवर त्यांनी बेकायदेशीर ताबा मिळवला होता. त्यामुळे आदिवासींमध्ये जमीनदार व इंग्रजांविषयी चीड व असंतोष निर्माण झाला होता. १७८६ ते १७९५ या काळात छोटा नागपूर या विभागात 'संथाल' जमातीने लढा उभारला तर १७९५ ते १८०० या काळात बिहारमधील 'चेरा' जमातीने लढा उभारला. इंग्रजांच्या वर्चस्वाखाली राजस्थान मधील भिल्ल जातीच्या जमिनी राजपूत जमीनदारांनी बळकावल्या होत्या. त्या मिळवण्यासाठी १८१२ मध्ये

गुजरात व राजस्थान सीमाभागातील भिल्लांनी एकत्र स्वसन्मानाची चळवळ सुरू केली. १८१९ मध्ये ओरिसातील कोल्हान प्रदेशात आदिवासीनी सामाजिक चळवळ उभारली. या चळवळीला छोटा नागपूर विभागातील अनेक जमातींनी साथ दिली. चळवळीचे स्वरूप हिंसक बनले. पुढील अनर्थ टाळून आपल्यावर आदिवासींचा विश्वास बसावा म्हणून इंग्रजांनी या प्रदेशासाठी सामान्य कायद्याच्या कक्षेतून वगळलेल्या प्रदेशासाठी वेगळा कायदा करून तेथील आदिवासींना प्रथमच संरक्षण दिले.

ईशान्य पूर्व भारतातील आदिवासी प्रदेशाकडे १८२० ते १८३२ या काळात इंग्रजांचे लक्ष वेधले होते. या प्रदेशातील अनेक जमाती स्वतंत्र होत्या. या जमातीच्या लोकांचे स्वतंत्र प्रशासन होते. मात्र इंग्रजांनी त्या प्रदेशात प्रवेश करून त्यांच्या कारभारात हस्तक्षेप सुरू केला. तेव्हा सिंगपो, मिशीपी, लुशाई, डफला, खम्या, नागा, खासी, मिझो इत्यादी जमातींना इंग्रजांना कडाडून विरोध केला. त्यामुळे त्यांचा संघर्ष वाढला. इंग्रजांच्या हस्तक्षेपाविरुद्ध १८२५ ते १८४३ मध्ये शिंगपो जमातीने, १८२८ मध्ये मिशिपी जमातीने, १८२९ मध्ये खासी जमातीने, १८३२ मध्ये अंगामा नागांनी, १८३५ मध्ये हफला आणि जंतिया टेकड्यांवरील जमातींनी, १८५५ मध्ये मिशिमी जमातीने, १८४२ ते १८६० मध्ये लुशाई जमातीने, १८७१ मध्ये सेमा नागांनी चळवळी उभ्या केल्या. इंग्रजांनी आपल्या प्रदेशात प्रवेश करू नये. जमातींची स्वायत्तता कायम टिकून रहावी यासाठी या प्रदेशातील आदिवासींनी चळवळी उभारल्या होत्या.

इ.स. १८३० ते १८३५ चा काळ मध्य भारतातील आदिवासींनी उभारलेल्या चळवळीच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जातो. या काळात बिहारमध्ये कोल मुंडा व खारवार जमातींनी इंग्रजांच्या सत्तेविरुद्ध व जमीनदारांविरुद्ध अनेक दिले. १८३२ मध्ये 'संथाल' जमातीचे नेतृत्व 'गंगा नारायण' नावाच्या 'संथाल' आदिवासी नेत्यांकडे होते. बिहारमधील मानधूम व बाराधूम जिल्ह्यातील आदिवासी लोक जमीनदारांचे पाईक म्हणून जमिनी कसत असत. त्यातून त्यांना मालगुजरी कर भरावा लागत नसे. इंग्रजांनी सत्ता आल्याबरोबर जमीनदार व मालगुजार लोकांच्या 'पाईकान जमिनी' जप्त केल्या. त्यावर कर बसविण्यात आले. त्यामुळे गरीब आदिवासी लोकांची उपासमार होऊ लागली. त्यातूनच भूमीज चळवळीचा उदय झाला. इंग्रजांच्या या दडपशाहीच्या विरोधात गंगा नारायण यांनी 'भूमीज सेना' उभारली. परंतु १८३२ मध्ये भूमीज सेनेचे प्रमुख गंगा नारायण इंग्रजांकडून मारले गेले. त्यामुळे ही चळवळ संपुष्टात आली.

१८९० च्या सुमारास आंध्र प्रदेशात गोदावरी जिल्ह्यातील 'पहाडी रेड्डी' या जमातीने मालकी हक्काचे पट्टे मिळविण्यासाठी चळवळ उभी केली होती. १८९७ मध्ये बिहारमधील बिरसा मुंडाची चळवळ देशभर गाजली. इंग्रज जमीनदार व ख्रिश्चन मिशनरी यांच्या विरोधातील ही चळवळ होती. या वळवळीतून बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाला नवीन शिकवणच दिली. आजच्या छत्तीसगड राज्यातील बस्तर जिल्ह्यातील 'गोंड' जमातीने १९१० मध्ये स्वायत्त राज्याच्या मागणीची चळवळ सुरू केली. उराँव जमातीने १९१३-१४ साली ताना भगताच्या नेतृत्वाखाली ब्रिटिशांकडून सन्मानजनक न्याय मिळावा म्हणून अहिंसक चळवळ उभारली. याच चळवळीतून पुढे संथाली धर्मगुरूंच्या नेतृत्वाखाली छोटा नागपूर विभागात झारखंड प्रदेशाच्या स्वायत्त राज्याच्या मागणीसाठी चळवळ निर्माण झाली. आंध्र प्रदेशात १९२२ मध्ये अल्लूरी सीताराम राजू यांच्या नेतृत्वाखाली

'रम्पी चळवळ' व १९४०-४१ मध्ये आदिलाबाद जिल्ह्यात भीमू कुमरा गोंड यांच्या नेतृत्वाखाली गोंड व कोलाम जमातीची शेतकरी चळवळ उभारली गेली.

महाराष्ट्रातील आदिवासींच्या चळवळी

भारतात ब्रिटिशांची सत्ता स्थापन झाल्यानंतर पूर्वीच्या मुंबई राज्यातील भिल्ल, गोंड, महादेव कोळी या जमातीचे हक्क काढून घेण्यात आले. त्यांच्यावर बंधने घालण्यात आली. त्यामुळे आदिवासी जमातीमध्ये असंतोष निर्माण झाला. त्यातून आदिवासी जमातीने ब्रिटिशांविरुद्ध बंड पुकारले. यातून आदिवासी चळवळीचा उदय झाला. या आदिवासींवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध निर्माण झालेल्या चळवळींपैकी महाराष्ट्रातील प्रमुख चळवळी किंवा उठाव पुढीलप्रमाणे :

१. उमाजी नाईक

भारतातील आद्य क्रांतीकारक असे उमाजी नाईक यांना म्हटले जते. त्यांनी इंग्रजांविरुद्ध सर्वप्रथम सशस्त्र लढा दिला. उमाजी नाईक हे तलवार, दांडपट्टा चालविण्यात तरबेज होते. सन १८१८ मध्ये इंग्रजांनी सर्वशक्तीनिशी पुण्यावर स्वारी केली. त्यात पेशव्यांचा पराभव झाला व पुण्याचा मुलूख ताब्यात घेतला. त्यामुळे पुरंदरच्या रामोशी समाजाचा दबदबा होता. पेशव्यांनी पुरंदर ताब्यात घेण्याचा आदेश किल्लेदारांना दिला. मात्र रामोशी किल्लेदारांनी त्यास नकार दिला व पेशव्यांच्या सैन्याशी दोन हात केले. मात्र त्यांना अपयश आले. पेशव्यांना या रामोश्यांच्या कृतीबद्दल राग आला. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी रामोश्यांना दिलेली वतने, इनामे व ताम्रपत्रे रद्द केली. पेशव्यांच्या या कृतीला इंग्रजांनीही आपल्या राज्यात कायम केले. त्यातून विद्रोहाची पहिली ठिणगी पडली. या दोन सत्तांमुळे आपला मानसन्मान, उदरनिर्वाहाची साधने, अधिकार नष्ट झाले असे उमाजी नाईकांना वाटले. याचा उद्रेक त्यांच्या मनात झाला होता.

आपल्या जमातीला पुन्हा गुन्हेगारीला व लूटमारीला लावणाऱ्यांची सत्ता संपवायची व छत्रपती शिवरायांचे रयतेचे राज्य पुन्हा स्थापन करण्याची शपथ क्रांतीवीर उमाजी नाईक यांनी घेतली. उमाजींनी प्रथम टोळ स्थापन केली. व्यापारी व सावकार यांच्या लुटालुटीचे सत्र सुरू केले. लुटीत मिळालेल्या पैशाचा वापर ते गरीबांच्या कल्याणासाठी करत असत. मात्र त्यातच उमाजींना इंग्रजांनी पकडले. त्यांना सक्त मजुरीची शिक्षा देण्यात आली.

तुरुंगातून सुटून आल्यानंतर उमाजी नाईक गप्प बसले नाहीत. त्यांनी पुन्हा क्रांतिकारकांची संघटना उभारली. पुण्याच्या भांबुर्डी येथील इंग्रजांच्या सहा हजाराचा खजिना आणि प्रचंड प्रमाणात शस्त्रास्त्रे लुटली. त्यामुळे इंग्रजांची झोप उडाली. त्यांनी गावोगावी इंग्रजांविरुद्ध लढण्यासाठी कर बसविला. जनताही उमाजींच्या पाठीश खंबीरपणे उभी राहिली. इंग्रजांची जुलमी राजवट नेस्तनाबूत करणे हे उमाजींचे एकमेव ध्येय होते.

क्रांतीवीर उमाजी नाईकांच्या चळवळीचा विस्तार नाशिक, नगर, सातारा, पुणे व तळकोकणापर्यंत होता. उमाजींचे वाढते प्राबल्य पाहून इंग्रज अस्वस्थ झाले. त्यांनी उमाजींना पकडून देणाऱ्या १००० रुपये व ४०० बीघे जमीन इनाम बक्षीस म्हणून जाहीर केली. यामुळे उमाजी नाईक इंग्रजांच्या जाळ्यात सापडले. त्यांच्यावर पुण्यात

जानेवारी १९३२ च्या पहिल्या आठवड्यात खटला सुरू झाला. अखेर ३ फेब्रुवारी, १८३२ मध्ये उमाजींना फाशी देण्यात आली. परंतु उमाजींच्या विचाराने व प्रेरणेने भविष्यात अनेक लढे उभे राहण्यास मदत झाली.

२. भागोजी नाईक

भागोजी नाईक यांचा जन्म भिल्ल कुटुंबात १८०४ मध्ये झाला. त्यांचे वडील नाशिक जिल्ह्यातील नांदूर शिंगोटे (ता. सिन्नर) येथे कोतवाल होते. घरची गरिबीची परिस्थिती असल्यामुळे लहानपणीच शिक्षणाला मुकलेले भागोजी गुरे, शेळ्या राखण्याचे काम करत असे. जनावरांच्या भटकंतीतच नेमबाजी, गलोल चालविणे, काठी फिरविणे, तिरकमान चालविणे इत्यादी कला त्यांनी आत्मसात केल्या. एकदा जंगलात वाघाचा प्रतिकार करून कुऱ्हाडीने त्यांनी त्याला ठार मारले. हा त्यांचा पहिला पराक्रम होता.

भागोजी नाईक यांनी नगर जिल्ह्यातील भिल्लांना संघटित करून इंग्रजांविरुद्ध १८५० ते १९५९ या दरम्यान चळवळ उभारली. टोळी करून इंग्रजांचा खजिना लुटणे, सैन्याचे नुकसान करणे, जमिनी व वतनदाऱ्यांवरील हक्क प्रस्थापित करणे ही या चळवळीची मुख्य उद्दिष्टे होती.

भागोजी नाईक यांची लढा देण्याची पद्धत इतकी वेगळी होती की, इंग्रजांना त्याचा मागमूसही सापडत नसे. परंतु भागोजी नाईकांचा बंदोबस्त करणे इंग्रज सत्तेला गरजेचे होते. ऑक्टोबर १९५७ मध्ये लेफ्टनंट हेन्री भागोजी नाईकांवर चाल करण्यास सिद्ध झाला. 'हत्यारे खाली ठेवून शरण या' असा आदेश त्याने भागोजीला दिला. मात्र भागोजीने त्याला दाद दिली नाही. हेड्रीने भागोजीवर चाल केली. पहिल्याच माऱ्यात हेन्ड्रीच्या पाठीमागचा पोलीस ठार झाला. दुसऱ्या गोळीने हेन्ड्री ठार झाला. भागोजीचा हा प्रतिकार पाहून बाकी पोलीस ऑफिसरांनी माघार घेतली.

भागोजीनी हेन्ड्रीचा पराभव केला ही बातमी ऐकून भिल्ल व महादेव कोळी बंडखोरात उत्साह निर्माण झाला. १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामाच्या काळात भागोजी नाईक व त्यांच्या सवंगड्यांनी ठिकठिकाणी उठाव करून इंग्रज सत्तेला घाम फोडला. भागोजीला जंगलाचा खडान्‌खडा माहिती होती. १८ फेब्रुवारी १८५८ रोजी येवला येथील किल्ल्यात भागोजीच्या टोळीवर मेजर पाँटीजर व कॅप्टन नट्टल यांनी अचानक हल्ला केला. या धुमश्चक्रीत भागोजीने इंग्रजांच्या ४० सैनिकांना ठार केले व मोठ्या हिमतीने आपली सुटका करून घेतली.

५ जुलै १८५९ मध्ये संगनेर जवळील 'दरा' येथे इंग्रज सैनिकांबरोबर भागोजीची मोठी धुमश्चक्री झली. त्यावेळी त्यंचा मुलगा यशवंत मारला गेला. त्यामुळे भागोजी नाईक अधिक आक्रमक झाले. या लढाईत मुलगा गेल्याचे दुःख व हरजी नाईक यास इंग्रजांनी कैद करून नेल्याचे दुःखही मनात होते. अपमानाचा बदला म्हणून २६ ऑक्टोबर १९५९ रोजी भागोजीने अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुक्यातील कुऱ्हाळे गाव लुटून इंग्रज सत्तेवर सूड उगवला.

भागोजी सापडत नाही म्हणून इंग्रजांनी भागोजीस पकडून देणाऱ्यास व किंवा खास बातमी देण्यास मोठ्या रकमेचे व जमीन इनामाचे बक्षीस जाहीर केले. १८५९ मध्ये नाशिकमध्ये नवीनच सुपरिडेंट म्हणून आलेल्या

शाऊटरने भागोजीवर करडी नजर ठेवली. भागोजीचे वय होत चालले होते मात्र जिद्द तीच होती. उठाव, चकमक, धावपळ यातून विश्रांतीसाठी त्यांनी सांगवी ता. सिन्नर येथील संगमावरील बेटात राहत असलेल्या खंडेराव काळे या मराठा समाजाच्या माणसाकडे मुक्कामाची जागा निवडली. मात्र मिठसागरे येथील एक ब्राह्मण भागोजीवर नजर ठेवून होता. त्याने पाळत ठेवून १० नोव्हेंबर १९५९ च्या रात्री भागोजी आल्याचे पाहून पोलिसांना बातमी दिली. शाऊटरने रातोरात बेटास वेढा दिला. सकाळी मार्गक्रमणासाठी भागोजी बाहेर पडताच त्यांच्यावर पोलिसांनी गोळीबार सुरू केला. बंदुकीच्या दोन्ही बाजूंनी फैरीवर फैरी झडू लागल्या. अखेर ११ नोव्हेंबर १९५९ रोजी एका गोळीने भागोजीचा बळी घेतला. त्यामुळे भागोजीच्या साथीदारांना आपला उठाव मागे घ्यावा लागला.

३. १८५७ चा पेठ येथील उठाव

सन १८५७ मध्ये आताच्या नाशिक जिल्ह्याच्या माळेगाव येथे राऊत घराणे पाटीलकी करत होते. त्यावेळी पेठ येथे भाऊराजा (देशमुख-दिंडोरी) राज्य करीत होता. राजा देशमुख असला तरी खरी सत्ता इंग्रजांची होती. इंग्रजांची सत्ता असणे कोणालाच मान्य नव्हते. त्यावेळी माळेगाव, पेठ, हरसूल, कोहोर अशी प्रमुख ठाणी होती. पेठ येथील भाऊराजाने इंग्रजांविरुद्ध उठाव करण्याचे ठरवून सर्व प्रमुख ठाणेदारांना निरोप कळवला. सर्व गावांच्या लोकांनी मदत करावी असे ठरले. या वातावरणाचा फायदा घेऊन डांगहून भिल्ल मंडळी पेठ येथे आली. पेठे येथे जाताना माळेगावच्या अरतन पाड्यातील एका वाणी दुकानदाराला लुटले. नंतर ते पेठला आले. पेठ येथे भाऊराजा व इंग्रज या दोघांचे खजिने होते. त्यापैकी भाऊराजाचा खजिना वगळून इंग्रज सरकारचा खजिना लोकांनी लुटला. त्यामुळे गोरा साहेब चिडला. त्यामुळे ठाण्या-ठाण्यातील मुख्य लोकांबद्दल त्याला संशय आला. त्यामुळे त्यात कुंभाळे, माळेगाव या बाऱ्हे येथील लोकांना त्या-त्या ठिकाणीच फाशी दिली.

सन १८५७ च्या सुमारास माळेगाव येथे देवाजी रामजी राऊत हे पाटीलकीचे काम करत होते. माळेगावचे देशमुख हे त्यावेळी पाहुचीबारीचे जहागीरदार होते. पेठचा खजिना लुटीनंतर इंग्रजसाहेब पोलिसांची तुकडी घेऊन माळेगाव येथे आले. त्यांनी देवाजी पाटलांना बोलावून घेतले. देवाजी पाटलांना याची काहीच कल्पना नव्हती. तेथेच देवाजी पाटलांना अटक करण्यात आली. त्यांच्या घरातील अन्न व गोराढोरांची जप्ती केली. या अकस्मात घडलेल्या घडामोडींमुळे देवाजी पाटलांच्या घरातील मंडळी गोंधळून, घाबरून गेली. देवाजी पाटलाला दुसऱ्या दिवशी फाशी देण्याचे ठरविले. मुले रडू लागली तेव्हा घरातील माणसांना त्याने सांगितले की, धान्य, गुरे गेली मात्र घर राहिले आहे. तुम्ही घराच्या आधाराने जगाल. आपल्या घराच्या माळ्यावर टोकरात (बांबूत) पैसे आहेत ते वापरा. हे बोलणे इंग्रज अधिकाऱ्याने ऐकले. त्यामुळे घरही जप्त केले. चांदीचे ३००० पैसे होते तेही जप्त केले.

दुसऱ्या दिवशी देवाजी पाटलाला उंबरपाड्यात फासावर चढविले. त्यावेळी फाशीचे दोर तुटून देवाजी पाटील जिवंत राहिला. त्याला पुन्हा फासावर चढवून ठार करण्यात आले. त्याचबरोबर राऊत घराण्याची पाटीलकी काढून घेऊन माळेगावचे वतनही जप्त करण्यात आले. दिंडोरीचे राजे देशमुख यांना प्रमुख पाटील मंडळीचा पाठिंबा होता. इंग्रजांनी सारा मुलुख बळकावला याची त्यांना खंत होती. राजे लोकांची राज्ये गेली. आपल्यावरही तीच पाळी येणार म्हणून तेही बंडात सहभागी झाले. त्यांनी प्रमुख मंडळींना सांगितले की, साहेब

आता सर्वांना बाटवून ख्रिस्ती करणार आहेत. त्यामुळे लोक बंडात सहभागी झाले. डांगहून आलेल्या भिल्लांनी देशमुखांना मदत केली. पेठचा भाऊराजा बंडात सामील झाला. त्याला इंग्रजांनी फाशी दिली.

नाशिक व डांग भागातील आदिवासींनी इंग्रज सत्तेविरुद्धचा आपला संताप पेठ येथील बंडातून व्यक्त केला. यादृष्टीने महाराष्ट्रातील आदिवासींच्या इतिहासात पेठ येथील बंड महत्त्वाचे आहे.

४. होन्या केगले

सन १८५७ नंतर सावकारांनी आदिवासी क्षेत्रात आपला सावकारकीचा धंदा सुरू केला. त्यांनी कर्जबाजारी आदिवासींच्या जमिनी ताब्यात घतेल्या. आदिवासी शेतकऱ्यांकडून कर्जापोटी शेतीचे उत्पन्न सावकारच घेऊ लागले. त्यामुळे आदिवासींची अतिशय वाईट अवस्था निर्माण झाली. त्यांची उपासमार होऊ लागली. म्हणून सावकारशाहीचा बंदोबस्त करण्यासाठी पुणे जिल्ह्यात १८७४ मध्ये होन्या केंगले या आदिवासी नेत्याने महादेव कोळी जमातीचे लोक संघटित केले. इतकेच नाही तर त्यांनी हातात शस्त्र घेऊन पुणे, ठाणे, रायगड जिल्ह्यात सावकारांवर चांगलाच वचक निर्माण केला. होन्या केंगले आणि त्यांच्या साथीदारांचा हा उठाव मोडून काढण्यासाठी सरकारने बंदोबस्त वाढविला. शेवटी १८७६ मध्ये सावकारांचा कर्दनकाळ होन्या केंगले व त्याच्या साथीदारांना नांदगांव (रायगड) येथे पकडून फाशी देण्यात आली. मात्र या चळवळीच्या माध्यमातून आदिवासी समाजामध्ये सावकार व इंग्रज शासनविरुद्ध तीव्र चीड निर्माण करण्यात होन्या केंगले यांचा उठाव यशस्वी झाला.

के. पी. सिंग यांनी "Tribal Sociey in India' या पुस्तकात स्वातंत्र्यापूर्वी म्हणजेच ब्रिटिश राजवटीतील आदिवासींच्या चळवळींचे तीन कालखंडात विभाजन केले आहे.

१. १७९५ ते १८५७ हा आदिवासींच्या चळवळीचा पहिला कालखंड होय. भारतात ब्रिटिश सत्तेचा उदय व त्यांच्या सत्तेचा विस्तार होण्याचा हा कालखंड आहे.

२. १८५७ ते १९२० या आदिवासींच्या चळवळीचा दुसरा कालखंड होय. हा इंग्रजी सत्तेचा जम बसविण्याचा काळ होता. याच काळात सावकारांच्या भांडवलाने आदिवासी अर्थव्यवस्थेमध्ये प्रवेश केला होता. ज्यामुळे आदिवासींच्या जमीन व जंगलाशी असलेल्या अधिकार प्रभावित झाला होता.

३. १९२० ते १९४७ हा आदिवासी चळवळीचा तिसरा कालखंड होय. या कालखंडात आदिवासींनी पृथ्वकतावादी चळवळीबरोबरच त्यांनी राष्ट्रीय आणि शेतकऱ्यांच्या चळवळीत सहभाग घेतला होता.

वरीलप्रमाणे ब्रिटिश काळातील आदिवासी चळवळीचा आलेख सांगता येईल. ब्रिटिश काळातील आदिवासी चळवळीमधील काही जमातीच्या चळवळी महत्त्वपूर्ण आहेत. त्या पुढीलप्रमाणे आहेत –

४. संथाल चळवळ

संथाल लोक प्रामुख्याने बिहार व पश्चिम बंगालमध्ये आहेत. आसाम, मेघालय, ओरिसा, नेपाळ व बांगला देशात देखील संथाल जमातीचे लोक आहेत. संथाल लोक जंगलांना साफ करणे व शेती कार्याल निष्णात होते. म्हणून ते इतर क्षेत्रात जाऊन राहू लागले.

बिहारमध्ये संथाल परगणा निर्माण होण्यापूर्वी या क्षेत्रात पहाडिया आदिवासी जमातीचे शासन अस्तित्वात होते. पहाडिया जमातीचा राजा, सरदार रावबहादूर हे सर्व मंडळी आपल्या मातृभूमीचे संरक्षण करण्यासाठी व आपले स्वातंत्र्य टिकविण्यासाठी स्वतःच प्राणाची आहुती देण्यासाठी तयार झाले होते. बिहारच्या राजमहल टेकड्यांमधील मोगलांचे शासन दुबळे झाले होते. पहाडिया जमातीने मोगलास जेरीस आणून सोडले होते. या दरम्यान पहाडिया जमातीने मोठे युद्ध केले. पहाडिया जमात स्वातंत्र्य जपण्यासाठी सतत संघर्ष करीत होती. इंग्रजांशी लढा देत होती. १७७० मध्ये पहाडिया सरदार, जमीनदार, जहागीरदारांना सकारागढ भागातून पळवून लावले होते. राजमहल टेकड्यांच्या मार्गांनी तेलीयागढ वरून जो सरकारी खजिना जात येत होता त्याची पहाडिया सरदार लुटमार करीत होते. तर सुलतानगंज राजशाही व वीरभूममध्ये संथाल लोक सरकारी खजिन्याची लूटमार करीत होते.

१७७४ ते १७७८ पर्यंत पहाडी प्रदेशाचा गव्हर्नर कॅप्टन जेम्स ब्राऊन होता. त्याने पहाडी प्रदशातील लोकांवर शासन करण्यासाटी एक योजना बनवली. ही योजना क्लीवलँडने १७७६ मध्ये पूर्ण केली. क्लीलँडने चलाखीने पहाडिया जमातीचा विश्वास संपादन केला. पहाडिया सरदारांच्या मदतीने मुस्लिम जमीनदार शासकांना दडपण्याची धोरण अवलंबले होते तर पहाडिया क्षेत्रात त्यांना शह देण्यासाठी संथाल लोकांना मदत देऊन त्यांना बसविण्याचे काम इंग्रजांनी केले. सुरुवातीला पहाडिया व संथाल यांच्या चकमकी झाल्या. या क्षेत्रात संथालांची वस्ती वाढली. कालांतराने संथालांच्या लक्षात आले की, इंग्रज आपल्या शासनाचा विस्तार वाढविण्यासाठी पहाडिया व संथाल आदिवासींना आपसात लढवित आहेत. अशा वेळी या परिसरात 'तिलकाबांझी' हा संथाल जमातीचा तरुण नेता इंग्रजांविरुद्ध लढण्यासाठी समोर आला. तिलकामांझीने सर्वप्रथम सर्व जाती-धर्मातील लोकांना संघटित करून त्यांचा विश्वास संपादन केला व ब्रिटिश सत्ता संपुष्टात आणण्याचा संकल्प केला.

मांझीने साम्राज्यवादी ब्रिटिश सत्तेला समूळ नष्ट करण्याचा दृढ निश्चय केला होता. आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी त्यांनी सर्वत्र विद्रोह सुरू केला. गंगा आणि ब्रह्मपुत्रा नद्यांच्या मधल्या जंगल तराई म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशात ब्रिटिशांसोबत मांझीने अनेकवेळा धुवांधार लढाया केल्या होत्या. एका बाजूला सेनापती क्लीवलँड, सर आयरपूट यांचे नेतृत्व व दुसऱ्या बाजूला तिलका मांझी व त्याची संघटित सेना असा संघर्ष होत होता. सुरुवातीला प्रत्येक लढाईत तिलका मांझी ताडाच्या उंच झाडावर जाऊन बसला व घोड्यावर स्वार होऊन जाणाऱ्या क्लीवलँडच्या छातीवर त्यांनी क्षणार्धात उंचावरून धनुष्यबाणाने मारा केला. त्यामुळे ब्रिटिश सेनेचा सेनापती मृत्यू पावला. त्याच रात्री अंधाराचा फायदा घेऊन आयरफूट व सेनापती जाऊराह यांनी तिलका मांझीच्या लोकांवर हल्ला केला. त्यात अनेक लोक मारले गेले. परंतु तिलका मांझी हाताला लागला नाही. अनेक वर्षे तो इंग्रजांशी व पहाडियांच्या सैन्याशी टक्कर देत होता. ज्या सुलतानगंजच्या पहाडाचा मांझीने आश्रय घेतला होता त्याला इंग्रजांनी घेराव घातला. शेवटी पहाड सोडून मांझी व त्याच्या सेनेला मैदानात येऊन इंग्रजांच्या सैन्याशी लढावे लागले. लढाई सुरू असताना धोक्याने तिलका मांझीला पकडण्यात आले आणि त्याला अतिशय क्रूरपणे मारण्यात आले. तिलका मांझी हा स्वातंत्र्य लढ्यातील पहिला सेनानी होता.

इंग्रजांनी जंगल जमिनीचा बंदोबस्त केल्यामुळे संथाल लोक जमिनीपासून वंचित होते. त्यावेळी वेठबिगारी पद्धत प्रचलित होती. संथाल वेठबिगारी काम करत होते. ते महाजनांच्या शेतात काम करीत असत. मात्र त्यांना मजूरी दिली नसे. हटवादी जीवनभर कर्जातच रहायचे. जमीनदार, ठेकेदार, व्यपारी, महसूल अधिकारी संथालांचे शोषण करीत होते. या लोकांना संथाल लोक 'डिकू' म्हणत असत. संथालांनी ब्रिटिश शासनाकडे तक्रार करूनही त्या तक्रारीकडे दुर्लक्ष केले जात. त्यामुळे संथाल आदिवासी जमातीने विद्रोह केला. महेशलाल दरोगा याने संथाल लोकांवर प्रचंड अन्याय केला होता. त्याच्या विरोधात सिद्धा व कान्ह या दोन बंधूंच्या नेतृत्वाखाली १८५५ मध्ये ३० हजार संथालांनी कलकत्ता येथे सशस्त्र मोर्चा काढला. त्याचा सूड म्हणून त्यांनी त्याचे डोके धडापासून वेगळे केले. जमीनदार, सावकार व महाजन पळून गेले. संथालांचा भागलपूर व राजमहाल या भागात विजय झाला. सर्व भूभाग ताब्यात घेतला गेला. इंग्रज अधिकारी व मेजर पळून गेले. शेवटी ब्रिटिशांनी 'मार्शल लॉ' घोषित केला. ९ ऑग्ट, १८५५ पर्यंत ब्रिटिश व संथाल यांच्यामध्ये घनघोर युद्ध झाले. त्यात ५० हजार संथाल मारले गेले. या चळवळीचे दूरगामी परिणाम झाले आहेत. २२ डिसेंबर, १८५५ रोजी 'XXXVII' अधिनियम पास झाला व संथाल-परगणा नावाचा नवा जिल्हा निर्माण केला गेले. वेठबिगारी प्रथेत सुधारणा व पोलिसांच्या वर्तनामध्ये परिवर्तन करण्यात आले. १८५६ मध्ये कान्हू व इतर संथालांना कैदेत टाकले. संथालांचा पराभव झाला तरी ब्रिटिशांना धोरणात बदल करावा लागला हे खूप विशेष महत्त्वाचे आहे. इंग्रजांनी संथालांची चळवळ निर्घणपणे दडपून टाकली. परंतु या चळवळीला राष्ट्रीय दृष्टीने खूप महत्त्व होते.

६. खारबार चळवळ

संथालांच्या चळवळीचा विस्तार नंतरच्या काळात असमान्य संथाली नेत्यांच्या रूपाने झाला. सुधारलेल्या संथाल लोकांची चळवळ म्हणजे खारवार चळवळ होय. त्याचे भगीरथ मांझी हे प्रमुख नेते होते. भगीरथ मांझी हे बाबाजी नावाने प्रसिद्ध होते. ही चळवळ १८७१ मध्ये एकदम प्रकाशात आली. संथाल लोकांनी एकाच देवाची पूजा करावी. मी स्वर्णयुगाची पुर्नस्थापना करीन अशाप्रकारचा संदेश भगीरथ मांझीनी लोकांना दिला. त्यांनी जमिनीचा कर भरण्यास मनाई केली. खारवार चळवळीचा प्रभाव वाढू लागला. भगीरथ मांझीचा वाढता प्रभाव लक्षात घेता इंग्रजांनी त्यांना तात्काळ पकडून कैदेत ठेवले. जेलमध्येच त्यांचा मृत्यू झाला.

भगीरथ मांझीचा मृत्यू झाला तरी चळवळीचे विचार लोकांमध्ये पेरले गेले होते. त्यांच्यानंतर अनेक गुरूंची परंपरा निर्माण झाली. त्यापैकी जराईराम बाबा हे महत्त्वाचे गुरू होत. संपूर्ण जमीन मूळ निवासी संथालांची आहे. या जमिनीवर इंग्रजांचा अधिकार नाही अशी घोषणा या चळवळीच्या नेत्यांनी केली. त्यामुळे इंग्रज सरकारने ही चळवळ दडपून टाकून प्रमुख नेत्यांना अटक केली.

नेत्यांनी अटक केल्यानंतरही या चळवळीची आग आतल्या आत धुमसतच होती. १८८० मध्ये दुबिया गोसाई या नेत्याचा उदय झाला. या नेत्याने चळवळीला व्यापक स्वरूप दिले. त्यामुळे इंग्रजांनी १८८१ मध्ये दुबिया गोसाईलाही अटक केली.

त्यानंतर १८९१ मध्ये चळवळीने पुन्हा जोम धरला. चळवळीचे स्वरूप आक्रमक होते. येथील माती

काळीभोर आहे. त्यामुळे जमीन काळ्या खारवारांची आहे. ती गोऱ्या लोकांची नाही अशी भावना लोकांमध्ये निर्माण झाली. पुढे या चळवळीला धार्मिक स्वरूप प्राप्त झाले. सफाहीर, सामरा, बाबाजीऊ अशा तीन धार्मिक संप्रदायांच्या रूपात ही चळवळ सुरू होती. या संप्रदायाचे अनुयायी महादेवास इष्ट मानत. ईश्वर चिंतन, शाकाहारी जेवण, पांढरे वस्त्र परिधान करणे इत्यादी गोष्टींना सांप्रदायाचे महत्त्व दिले.

१९३० मध्ये बंगम मांझी यांनी 'सफाहोर' चळवळ सुरू केली. १९०७ नंतर खारवार चळवळीद्वारा संथालांचे हिंदुकरण करण्याच्या प्रक्रियेस विशेष महत्त्व देण्यात आले. १९४२ च्या स्वातंत्र्य चळवळीत संथाल परगण्यातून ७६ लोकांनी आपले बलिदान दिले. त्यापैकी २५ लोक सफाहोर संप्रदायाचे होते. यावरून स्पष्ट होते की, संथाल आदिवासींनी देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत इंग्रजांविरुद्ध आपली चळवळ सुरू ठेवली होती.

७. बिरसा मुंडांची चळवळ

आदिवासींच्या चळवळीमध्ये बिरसा मुंडा ही चळवळ महत्त्वाची आहे. तत्कालीन बिहार प्रदेशातील छोटा नागपर भागातील मुंडा लोकांची ही स्वाभिमानाची व स्वसन्मानाची चळवळ होती. मुंडा आदिवासींची स्वतंत्र सामाजिक, आर्थिक व राजकीय व्यवस्था होती. मुंडाची स्वतंत्र शेतीव्यवस्था होती. त्यांची अर्थव्यवस्था ही शोषणमुक्त होती. इंग्रजांची राजवट आल्यानंतर मुंडाची शेतीव्यवस्था नष्ट करून शेती व वनासाठी नवे नियम व कायदे करण्यात आले. यामुळे आदिवासींची परंपरागत सामाजिक, आर्थिक व राजकीय व्यवस्था पूर्ण नष्ट झाली

या नव्या व्यवस्थेचा परिणाम प्रामुख्याने आदिवासी समाजावर झाला. त्यांच्या जमिनी सावकार, जमीनदार व ठेकेदार यांनी हडप केल्या. इंग्रजांच्या या व्यवस्थेविरुद्ध मुंडा आदिवासींनी अनेकदा उठाव केले होते. १७८९ मध्ये मुंडांनी उठाव केला होता. १८३१-३२ मध्ये कोलांचा उठाव झाला. १८५८ मध्ये जमीन व आपल्या अधिकाराच्या रक्षणार्थ पुन्हा एकदा आदिवासी चळवळ उभी राहिली. ही चळवळ 'सरदारी चळवळ' म्हणून प्रसिद्ध आहे.

बिरसा सरदारी चळवळीत सहभागी झाले. इंग्रज व ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या विरुद्ध त्यांनी लोकांना संघटित केले. मात्र घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. अनेकदा घरातील सर्वजण उपाशी झोपायचे. म्हणून एके दिवशी बिरसाने थडगे खणून प्रेतावरील दागिने काढले. ते दागिने विकून तांदूळ, डाळ, घेऊन आले. परंतु ही बातमी गावातील लोकांना कळाली. बिरसाचे आई-वडील त्याच्यावर रागावले. त्याला स्वतःबद्दलची तुच्छतेची भावना वाटली. म्हणून तांदूळ, डाळ फेकून देत तो सुसाट पळत सुटला. लोक त्याला वेडा बिरसा म्हणू लागले. यानंतर बिरसा जंगलात गेला. तेथे बारा-तेरा दिवस राहिला. वणवण भटकणाऱ्या बिरसाला आपले आयुष्य, समाजाची झालेली दशा, काळाची गरज यावर सांगोपांग विचार करायला वेळ मिळाला. येथेच त्याला स्वप्न पडले. स्वप्नानंतर एक धार्मिक पुरुष म्हणून तो लोकांसमोर आला. बिरसाजवळ अद्‌भूत शक्ती आहे असे लोकांना वाटू लागले. आजारी, रोगी, कष्टी झालेल्या रोग्यांना तो बरे करू लागला. बिरसा लोकांना सांगायचा, 'मी आता लवकरात लवकर मुंडांना परकीयांच्या तावडीतून मुक्त करीन'. कुणीही मुंडाने यापुढे कंपनी सरकारचा

आदेश पाळू नये. पोलीस, जमीनदार यांचा अपमान करा, त्यांची आज्ञा मोडा. यापुढे कुणीही वेठबिगारी करू नका. बिरसाजवळ प्रचंड स्वविश्वास होता. १८९५ मध्ये बिरसाने स्वराज्याचा उद्‌घोष केला. बिरसाने राजकीय चळवळीबरोबरच आदिवासी समाजातील अंधविश्वास व वाईट चालीरितीविरुद्ध आंदोलन उभारले होते.

इंग्रजांच्या विरुद्ध चळवळीचा पहिला टप्पा म्हणून बिरसाने असहकार चळवळ सुरू केली. बिरसाला पकडण्यासाठी पोलीस ८ ऑगस्ट १८९५ रोजी चालकाडला पोहोचले. पण ते त्याला पकडू शकले नाहीत. इंग्रजांची हिंसात्मक प्रवृत्ती पाहून बिरसाने आपल्या विश्वासू सहकाऱ्यांशी चर्चा करून रक्त सांडण्याची व लढाई करण्याची योजना आखली. ही बातमी इंग्रज अधिकाऱ्यांना मिळताच कमिशनरने २३ ऑगस्ट, १८९५ रोजी एक बैठक घेऊन बिरसाचे बंड मोडून काढण्याचे ठरविले. त्यानुसार पोलिसांनी गुपचूप गावाला वेढा देऊन बिरसाला पकडले व बेड्या घातल्या. बिरसाला अटक झाल्याची माहिती कळताच आदिवासी दुःखी झाले. लोक अनवाणी पायांनी रांची तुरुंगासमोर जाऊन पोहोचले.

बिरसाची ३० नोव्हेंबर १८९७ रोजी सुटका झाली. त्यामुळे पुन्हा आदिवासींमध्ये चैतन्य निर्माण झाले. फेब्रुवारी १८९८ मध्ये बिरसाने आपल्या अनुयायांची एक मोठी सभा घेतली. आपल्या विश्वासू सहकाऱ्यांना सेनापती, मंत्री केले. त्यांना त्यांच्या गावात फौजा तयार करण्यासाठी पाठविले. त्यामध्ये ४००० मुंडांची सेना निर्माण केली. बिरसाच्या फौजेने ख्रिश्चन मिशन, लोलिस चौक्यांवर हल्ले केले. एकामागून एक हल्ले करीत असताना बिरसाच्या अनुयायांना इंग्रजांनी अटक करण्यास सुरुवात केली. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी बिरसाच्या लोकांना पकडून देण्यास मदत केली. जे धर्मांतर करून ख्रिस्ती होत त्यांना सोडून दिले जात असे. अटकेच्या भितीने अनेक आदविासींनी धर्मांतर केले. बिरसा इंग्रजांना सापडला नाही. बिरसा आपली फौज संघटित करण्यासाठी पुन्हा हिंडू लागला. शासकीय हेर बिरसाचे शिष्य म्हणून त्याला भेटले. त्यांनी ऐंशी साथीदारांसह त्यांना अटक केली. त्यांना रांची येथील तुरुंगात ठेवण्यात आले.

रांची येथील तुरुंगात बिरसाला वेगळे ठेवण्यात आले. त्याच्या कमरेभोवती व पायामध्ये मोठमोठ्या लोखंडी साखळ्या बांधण्यात आल्या होत्या. ९ जून १९०० रोजी बिरसाचे निधन झाले. ब्रिटिश सत्तेविरुद्ध बिरसाने विद्रोह केला. आपल्या मातृभूमीला स्वतंत्र करण्यासाठी पुढे आला. आदिवासींना शोषणमुक्त करण्याची त्याने शपथ घेतली. सशस्त्र सेना उभारली. आदिवासी समाजाला हक्काची जाणीव निर्माण करून दिली. जंगलावर पहिला अधिकार आमचा आहे. तो अधिकार मिळालाच पाहिजे असे त्यांनी आदिवासींना आवाहन केले. त्या विचाराने प्रेरित होऊन आदिवासी समाज जागृत झाला. त्यामुळे बिरसा मुंडाचे नाव अजरामर झालेले दिसून येते.

८. झारखंड चळवळ

झाडखंड स्वातंत्र्याच्या चळवळीबरोबरच छोट्या नागपूरच्या आदिवासीमध्ये एक नवीन राजकीय चेतना निर्माण झाली. या राजकीय चेतनेस 'झारखंड चळवळ' या नावाने ओळखले जाते. संथाल आदिवासींच्या आशा-आकांक्षाशी या चळवळीची विचारधारा मिळतीजुळती होती. परंतु सुरुवातीला संथाल लोक चळवळीत सहभागी नव्हते. नंतर लवकरच ते या चळवळीत सहभागी झाले. झारखंड चळवळीचा मुख्य उद्देश म्हणजे गैर

आदिवासी लोक ज्यांना आदिवासी डेकू किंवा डिकू म्हणतात त्यांना आदिवासी क्षेत्रातून काढणे हे होते. छोटा नागपूरमधील आदिवासी लोकांमध्ये असंतोषाचे महत्त्वाचे कारण म्हणजे डिकू लोक आहेत. चळवळीच्या इतर कारणामध्ये त्या क्षेत्रात ख्रिश्चन मिशनऱ्यांचा प्रवेश होय. त्यांनी आदिवासी लोकांमध्ये नव्या जाणिवा निर्माण केल्या. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी शिक्षणाचा प्रसार केला. दवाखाने उघडले व अनेक सामाजिक कल्याणाची कामे केली. त्यामुळे एकीकडे ख्रिश्चन असलेल्या आदिवासींमध्ये आर्थिक सुधारणा होऊ लागल्या व दुसरीकडे राजकीय जागृती निर्माण झाली.

सुशिक्षित व ख्रिश्चन धर्म स्वीकारलेल्या लोकांना एक संयुक्त आदिवासी संघटनेची आवश्यकता वाटू लागली. म्हणून त्यांनी १९२० मध्ये छोटा नागपूर उन्नती संघ या संघटनेची स्थापना केली. त्यानंतर आदिवासी लोकांच्या हिताच्या रक्षणासाठी 'आदिवासी आमसभेची' निर्मिती केली. या संघटनेचा मुख्य उद्देश हा 'डिकू' शोषणकर्त्यांच्या विरुद्ध संघर्ष करणे, आदिवासींच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा करणे व आदिवासींकरिता एका वेगळ्या राज्याची निर्मिती करणे हे होते. त्यानंतर १९३९ मध्ये जयपालसिंग यांच्या चमत्कारिक नेतृत्वामुळे ही चळवळ छोटा नागपूरच्या संपूर्ण भागात पसरली.

स्वातंत्र्योत्तर काळातील आदिवासी चळवळी

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सर्वांना समान अधिकार देण्यात आले. इंग्रजांविषयी आदिवासींच्या मनातील असंतोष संपला. परंतु स्वातंत्र्यानंतरही आदिवासींच्या समस्या संपलेल्या नाहीत. सावकारशाही, वेठबिगारी, कमी मजूरी, जमीन बळकावणे या समस्या स्वातंत्र्यानंतरदेखील तशाच राहिल्या. म्हणून त्यांच्या चळवळीचे हे प्रमुख मुद्दे राहिले. १९६० मध्ये पश्चिम बंगाल व आंध्र प्रदेशात नक्षलवादी चळवळ ही आदिवासींच्या शोषणाविरुद्ध निर्माण झाली होती. नक्षलवाद्यांनी आदिवासींची शोषणातून मुक्तता व्हावी म्हणून ही सशस्त्र चळवळ उभारली. न्यूनतम वेतन मिळावे, कर्ज माफ करावे, तसेच जमीनदारांच्या शोषणातून विरोधात बिहार, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र व गुजरातमध्ये आदिवासींनी चळवळी केल्या आहेत.

महाराष्ट्रात १९७० च्या दशकात शहादा व भूमीसेना चळवळीत आदिवासी लोकांचा सहभाग सर्वांत जास्त होता. छोटा नागपूर क्षेत्रातील जमातींनी डिकूंच्या विरोधात स्वातंत्र्यपूर्व काळात चळवळ केलेली होती. परंतु स्वातंत्र्यानंतरदेखील सावकार, जमीनदार यांच्या विरोधात आदिवासींना संघर्ष करावा लागला. स्वातंत्र्योत्तर काळातील आदिवासींचे अध्ययन केल्यानंतर जाणवले की, शासनाच्या वनधोरणाचा विरोध, आरक्षण, प्रादेशिक स्वायत्तता व स्वतंत्र राज्याची निर्मिती हे त्यांच्या चळवळीचे प्रमुख मुद्दे आहेत.

गुजरातमधील डांग भागातील आदिवासींनी १९८० ते १९९० पर्यंत वन कायद्याच्या संदर्भात वनविभागाच्या विरोधात संघर्ष केला. वनविभागाने त्यांना त्यांची जमीन व वनोत्पादनाचे संकलन करण्याच्या अधिकारांपासून वंचित केले होते. हा संघर्ष तब्बल दहा वर्षे सुरू होता. स्वातंत्र्यानंतर अनेक आदिवासी जमातींनी स्वायत्तता प्राप्त राज्य किंवा जिल्हा बनविण्याच्या मागणीसाठी चळवळी केल्या आहेत. पूर्वीच्या द्विभाषिक मुंबई राज्यात एक वेगळा जिल्हा बनविण्याच्या मागणीसाठी डांग आदिवासी जमातीने चळवळ उभारली होती. छोटा नागपूरच्या

आदिवासींनी १९८३ पासून स्वतंत्र राज्याची मागणी सुरू केली. पुढे या मागणीसाठी झारखंड चळवळीने उग्र स्वरूप धारण केले. २००० मध्ये झारखंड व छत्तीसगड या नव्या दोन राज्यांची निर्मिती होणे हे स्वातंत्र्योत्तर काळातील आदिवासी चळवळीचा परिणाम आहे. तसेच ख्रिश्चन मिशनऱ्यांचा प्रभाव, शिक्षण, राजकीय जागृती इत्यादी कारणांमुळे भारतातील अनेक आदिवासी क्षेत्रात चळवळी निर्माण होत राहिल्या. यासंदर्भात गारो, खासी, मिझो, नागा, उल्फा, बोडो इत्यादीचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल

स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासी आदिवासींच्या झालेल्या आंदोलनांची एकूण संख्या सांगणे अवघडत असले तरी काही आंदोलने मात्र ऐतिहासिक ठरली आहेत. त्या काही महत्त्वाच्या आदिवासी चळवळी पुढीलप्रमाणे आहेत.

१. झारखंड चळवळ : झारखंड व आदिवासींचे एक स्वतंत्र घटकराज्य निर्माण करावे अशी मागणी स्वातंत्र्यपूर्व काळातच समोर आली होती. या मागणीच्या समर्थनासाठी स्वातंत्र्यानंतर आदिवासी महासभा ही संघटना १९५० नंतर राजकीय पक्षाच्या स्वरूपात पुढे आली. या संघटनेने १९५० मध्ये जमशेटपूर येथे अधिवेशन भरविले. या अधिवेशनात 'झारखंड पक्षा'ची स्थापना केली. या पक्षाचा मुख्य नारा, 'झारखंड आमचा आहे, डाकू बिकू (बाहेरचे लोक) जातील बाहेर!' १९५२ च्या विधानसभा निवडणुकीत झारखंड क्षेत्रातील सर्व म्हणजे ३२ जागा या पक्षाने लढविल्या. सर्व जागांवर दणदणीत विजय झाला. ओरिसामध्ये देखील पक्षाला समाधानकारक यश मिळाले. त्यानंतर लगेच तीन वर्षांनी राज्य पुनर्रचना आयोगासमोर वेगळे झारखंड हे घटकराज्य निर्माण करण्याची मागणी मांडली. मात्र ही मागणी आयोगाने धुडकावून लावली.

सप्टेंबर १९६३ मध्ये झारखंड पक्षाचे सत्ताधारी काँग्रेस पक्षात विलीनीकरण करण्यात आले. वेगळ्या झारखंड राज्यासाठी काँग्रेस सहकार्य करेल हा यामागचा उद्देश होता. १९६७ च्या सार्वजनिक निवडणुकीत झारखंड पक्ष तीन वेगळ्या पक्षात विभक्त झाला. त्यामुळे ताकद कमी झाली. एक सशक्त झारखंड पक्ष आपापसातील क्षुल्लक भेदामुळे विभाजित झाला. त्यामुळे मागणीचा जोर कमी झाला.

१९६८ मध्ये बिरसा सेवादलाने स्वतंत्र झारखंडची मागणी केली. बिरसा सेवादलाची चळवळ जमीन बळकाविणाऱ्याविरुद्ध व सावकार, महाजन यांच्याविरुद्ध जोर धरू लागली. त्यातच पुढे १९७३ मध्ये शिबू सोरेन यांनी झारखंड मुक्ती मोर्चाची स्थापना केली. त्यांनी ही चळवळ अधिक तीव्र केली. १९५८ च्या निवडणुकीत झारखंड मुक्ती मोर्चाला १४ जागा मिळाल्या.

झारखंड पक्षाने वेगळ्या झारखंड राज्याच्या मागणीसाठी १६ मार्च १९९३ पासून आर्थिक नाकेबंदीचे अभियान सुरू केले. झारखंड मुक्ती मोर्चाचे नेते शिबू सोरेन यांना संसदेत सरकारद्वारे असे आश्वासन देण्यात आले की, वेगळे झारखंड राज्य बनविण्याचा अखेरचा निर्णय घेण्यापूर्वी बिहार, मध्यप्रदेश, ओरिसा व पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्र्यांना विश्वासात घेतले जाईल. १९९५ ते ९६ मध्ये झारखंड मुक्ती मोर्चाचे नेते सतत राजकीय चर्चेत राहिले. यावेळी बंड, मोर्चे, आंदोलने आदींच्या माध्यमातून या मागणीला पाठिंबा देणाऱ्या लोकांच्या संख्येत वाढ होत गेली. सर्व पक्षांनी झारखंड हे घटक राज्य निर्माण करण्याच्या मागणीला एकमताने समर्थन दिले.

त्यामुळे शेवटी १५ नोव्हेंबर २००० मध्ये स्वतंत्र झारखंड राज्याची स्थापना करण्यात आली. या स्वतंत्र झारखंड राज्यात १८ जिल्हे आहेत. राज्याची राजधानी रांची ठेवण्यात आली आहे. स्वतंत्र झारखंड राज्याचे पहिले मुख्यमंत्री मा. बाबुलाल मरांडी हे बनले.

२. बोडो चळवळ

बोडो म्हणजे कछाटी लोक होत. हे मध्य आशियातून ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यात इ.स. ५००० वर्षांपूर्वी येऊन राहू लागले. एका दंतकथेनुसार त्यांची अडिंबापूर सध्याचे दिनापूर ही राजधानी होती. १३व्या शतकात अहोम लोकांनी त्यांना या क्षेत्रातून हाकलून लावले. या लढाया तीन शतके चालल्या. नंतर बोडो आदिवासींनी कछाटच्या पहाडावर आपले राज्य स्थापन केले. त्याची राजधानी गुवाहाटी होती. तेथून पुन्हा त्यांना मैदानात जाण्यास भाग पाडले. ब्रिटिशांच्या राजवटीतच बोडोंनी आपल्या वेगळ्या राज्याची निर्मिती केलेली होती. १९२७ मध्ये कछाटी युद्धाच्या संघटनेने सायमन कमिशन समोर स्वतंत्र राज्याची मागणी केलेली होती. बोडो लोकांचे स्वतंत्र राज्य करावे ही त्यांची मागणी आहे. त्यासाठी त्यांनी 'अखिल बोडो विद्यार्थी परिषद' स्थापन केली. बोडो भाषेला आठव्या अनुसूचित टाकणे, नोकऱ्यांत आरक्षण इत्यादी त्यांच्या मागण्या होत्या.

आसाममध्ये एकूण २ कोटी ६५ लाख विविध आदिवासी जमातीचे लोक आहेत. त्यापैकी ४२ लाख ९६ हजार केवळ बोडो आदिवासी लोक आहेत. ते राहत असलेल्या क्षेत्राला स्वायत्तता द्यावी यासाठी बोडो चळवळ आहे. त्यांची ही मागणी ७८५२३ चौ.कि.मी. क्षेत्रासाठी आहे. त्यामध्ये कोकटाझार, ध्रुवी, गोलपाडा, बारापेठा, नळबारी, कामरू दरांग, शांतीपूर, लखीलपूर, उंजली व शेंदिया या क्षेत्राचा समावेश होतो. 'बोडो पिपल ॲक्शन कमिटी' आणि 'ऑल बोडो स्टुडंटस् युनियन' या बोडोच्या वेगवेगळ्या संघटनांनी वेगळ्या 'बोडालँड' राज्याची मागणी केली. अखिल विद्यार्थी बोडो संघटनेने आपली मागणी पूर्ण करण्यासाठी चळवळीला हिंसात्मक रूप दिले. त्यांनी आसाम बंद व रेल रोको आंदोलन केले. त्यांनी जाळपोळही केली. त्याचा नेता उपेंद्रनाथ ब्रह्मा याने 'करो वा मरो' असा नारा दिला. त्यांच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे –

१. ब्रह्मपुत्रेच्या वरील किनाऱ्यापलीकडे मैदानात राहणाऱ्या आदविासींसाठी स्वतंत्र राज्याची निर्मिती.

२. ब्रह्मपुत्रेच्या दक्षिण किनाऱ्यावरच्या आदिवासी क्षेत्रातील जिल्ह्यांना स्वायत्तता.

३. कारबी, एकलांगच्या बोडो कछाडी वंशाच्या आदिवासींना सातव्या अनुसूचित टाकणे.

बोडो आदिवासींनी आपल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी विविध प्रकारच्या दहशती कारवाया केल्या. १९९० मध्ये दहा जिल्ह्यात लहान-मोठ्या बॉम्ब स्फोटात ७५ जणांचा मृत्यू तर २४० जण जखमी झाले. ऑक्टोबर १९९२ मध्ये त्यांनी २२ लोकांची हत्या व ५० लोक जखमी केले. त्यानंतर बॉम्बस्फोटात ४४ लोक मारले गेले. फेब्रुवारी १९९३ मध्ये आसाम राज्यात शासनाने 'बोडा लँड स्वायत्तता परिषद' स्थापन केली. आसाममधील १५ हजार चौ.कि.मी भूप्रदेशात ३८ विशेष विभागांचा विकास करण्याची पूर्ण स्वायत्तता या परिषदेस देण्यात आली. त्यानंतर देखील बोडो चळवळ सुरूच आहे. त्यांना 'बोडो लँड' स्वतंत्र राज्य हवे आहे.

३. नागा चळवळ

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ब्रिटिश सत्ता संपुष्टात आली. स्वतंत्र भारतात आपले अस्तित्व राहिले की नाही याची चिंता नागा लोकांना भेडसावत होती. त्यांना त्यांची सांस्कृतिक ओळख टिकवून ठेवायची होती. नागा व्यतिरिक्त इतर लोक आपले शोषण करतात. आपल्या संस्कृतीवर अतिक्रमण करतात ही भिती त्यांच्या मनात निर्माण झाली. त्यामुळे नागा जमातीमध्ये एकता निर्माण होऊन ते संघटित झाले.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नागा चळवळ अधिक वेगाने पुढे आली. सुरुवातीला नागा लोकांनी १९१८ मध्ये कोहिमा येथे 'नागा क्लब' स्थापन केला. त्यावेळी ही पहिली व एकमेव संघटना होती. नंतर १९४५ पर्यंत आदिवासी परिषदा स्थापन झाल्या. एप्रिल १९४५ मध्ये सर्व आदिवासी परिषदेचे एकत्रीकरण एकत्रीकरण झाले. १९४६ मध्ये नागा परिषदेचे नाव बदलून ते 'नागा नॅशनल कौन्सिल' असे ठेवण्यात आले. हा नागा जमातीचा एक राजकीय कोरम होता. या कौन्सिलच्या माध्यमातून 'नागा'च्या स्वतंत्र राज्याची संकल्पना पुढे आली.

सन १९४७ ते १९४९ पर्यंत नागा लोक शांत राहिले. त्यांनी कोणतेही हिंसात्मक कृत्य केले नाही. मात्र १९४९ च्या शेवटी नागा नॅशनल कौन्सिलच्या धोरणात बदल होऊन नागाच्या स्वातंत्र्याच्या दृष्टीने उद्दिष्टे ठेवली. १९५१ मध्ये कौन्सिलच्या अध्यक्षाने नागाच्या स्वातंत्र्याबद्दल मत घेतले. तेव्हा ७००० स्त्री-पुरुषांनी आपल्या अंगठ्याचे ठसे दिले. नागाच्या स्वातंत्र्यासाठी शपथ घेऊन लढण्याचा निर्धार केला. नागा जमातीने आम्हाला भारतीय राज्यघटना मान्य नाही. भारतीय सत्ता आमच्यावर नको म्हणून निदर्शने केली. १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकांवर नागांनी बहिष्कार टाकला. कोणीही मतदान केले नाही. हा नागाच्या चळवळीचा विजय होता.

१९५६ मध्ये नागा शांतता समिती स्थापन करण्यात आली. १९५७ मध्ये नागा लोकांची पहिली सभा बोलावण्यात आली. १९५९ मध्ये नागाची तिसरी सभा संपन्न झाली. या सभेत भारताच्या संघराज्यात परराष्ट्र मंत्रालय अंतर्गत नागालँड हे स्वतंत्र राज्य राहील असा प्रस्ताव मांडण्याचे ठरविले. १९६० मध्ये पंडित नेहरू व नागा शिष्टमंडळ यांच्या १६ मुद्यांवर करार झाला. १ ऑगस्ट १९६० रोजी पंडित नेहरूंनी संसदेत स्वतंत्र नागालँड राज्याचा निर्णय जाहीर केला. १ डिसेंबर १९६३ मध्ये नागालँड राष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी प्रयत्न करत होता. ते गनिमी काव्याने सैनिकांशी लढत होते. पुढे १९७५ च्या सुमारास या गटातील बहुतांश नागा बंडखोर शरण आले. आपापली शस्त्रे सरकारच्या स्वाधीन केली. त्यानंतर स्वतंत्र व सार्वभौम नागालँड राष्ट्र निर्माण करण्याची नागा आदिवासींची चळवळ संपुष्टात आली.

४. नर्मदा बचाओ आंदोलन / चळवळ

मेधा पाटकर या नर्मदा बचाओ आंदोलनाच्या प्रणेत्या आहेत. त्यांचा जन्म मुंबई १९५५ मध्ये झाला. मेधा पाटकरांना समाजसेवेचा वारसा आई-वडिलांकडून मिळाला. त्यांनी रुईया कॉलेजमध्ये बी.एस्सी. केमिस्ट्री विषय घेऊन प्रथम वर्ग प्राप्त केला. समाजसेवेची आवड असल्याने त्यांनी टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल

सायन्समधून 'मास्टर ऑफ सोशल वर्क' ही पदवी प्रथम वर्गात प्राप्त केली. टाटा इन्स्टिट्यूटमध्ये फॅकल्टी मेंबर म्हणून दोन-तीन वर्षे काम केले. मात्र फिल्डवरती काम करण्याची प्रचंड इच्छा असल्यामुळे समाजसेवा संस्थेत अधिकार पदाची नोकरी केली. पण आदिवासी क्षेत्रात काम करण्याच्या प्रबळ इच्छेमुळे नोकरी सोडली व अहमदाबाद येथील 'सेतू' या संस्थेत प्रवेश मिळविला. काही वर्षे काम केल्यानंतर ही संस्था सोडून सरदार सरोवराच्या विरोधात नर्मदा धरणग्रस्त सहायक समितीची धुळे येथे स्थापना केली. धुळे जिल्ह्यातील सरदार सरोवर धरणाखाली जाणाऱ्या ३३ गावांना अनेकदा पायी चालून भेटी दिल्या. विस्थापितांची संपूर्ण माहिती, जागतिक बँक व संबंधित लवादाकडून देऊन तेथील लोकांमध्ये जागृती झाली. १९८९ मध्ये हरसूल (मध्यप्रदेश) येथे २५ हजार लोकांचा धरणविरोधी मेळावा आयोजित केला. बनवाई येथे मध्य प्रदेशासाठी केंद्र स्थापना करून व बरोडा येथे गुजरात येथील जनतेत सरदार सरोवर विरोधी जागृतीचे काम केले.

मेधा पाटकर यांच्या चळवळीतील पहिला कार्यक्रम म्हणजे लोकांशी संबंध जोडण्याचा होता. १९८५ ते १९८७ पर्यंत त्यांचा हा कार्यक्रम अव्याहतपणे चालू होता. महाराष्ट्रातील ३३ गावे या प्रकल्पामुळे उद्धवस्त झाली. रोज त्या ३०-३० कि.मी. फिरत असत. आदिवासी लोकांशी संवाद साधत असत व जे शब्द समजले नाहीत ते वहीन लिहून घेत असत. भाषण करताना वहीचे पान समोर ठेवून आदिवासींच्या भाषेतील शब्द वापरायचे ज्यामुळे त्यांच्याशी पटकन जवळीक साधली जाईल. विस्थापित होणाऱ्या गावात तडवी, वसावा, पावरा या जमाती होत्या. मेधाताईंना गाव पातळीपासून ते थेट दिल्लीपर्यंत आदिवासींचे प्रश्न मांडताना शहरीपणा, इंग्रजीचे ज्ञान, टाटा इन्स्टिट्यूटचे बँकग्राऊंड उपयोगी पडले.

मेधाताईंनी आदिवासींशी संवाद साधून त्यांच्या धरणापर्यंत जनजागृती करून त्यांनी महाराष्ट्रातील ३३ गावे, मध्यप्रदेशातील १९६ गावे, गुजरातमधील १९ गावे यांना पायी भेटी दिल्या. त्यांनी प्रत्यक्ष गावांना भेटी देऊन त्यांना प्रकल्पाविषयीच्या भूमिका व धरणामुळे होणारे संभाव्य धोके समजावून सांगून त्यांच्याशी योग्य प्रकारे संवाद साधून जवळीक साधली. त्याचबरोबर राज्य सरकार, केंद्र सरकार, जागतिक बँक प्रतिनिधी यांना प्रकल्पातील त्रुटी, प्रकल्पामुळे निर्माण होणारे संभाव्य धोके, आदिवासींचे विस्थापन, पर्यावरणाला प्रकल्पामुळे होणारा धोका, वेळोवेळी होणाऱ्या अभ्यासपूर्ण चर्चेतून शासनाला जाणीव करून दिली. मात्र तरीही प्रकल्पना मंजुरी मिळणार अशी बातमी १९८७ मध्ये गुजरातच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. या धोरणामुळे कोणाचा फायदा होणार, कोणाचे नुकसान होणार, कोणाचे कसे पुनर्वसन करणार, कोठे करणार, पर्यावरणाची, नैसर्गिक साधनसंपत्तीची जी हानी होईल ती कशी भरून काढणार अशा सर्व प्रश्नांची समाधानकारक उत्तरे मिळाली तरच विस्थापनाला अनुमती द्यावयाची अन्यथा नाही अशी नर्मदा आंदोलनाची भूमिका होती. त्यावेळी सातपुड्याच्या खेड्यापाड्यातून मेधा पाटकर आल्या होत्या. त्यामुळे त्यांना सर्व प्रश्नांची जाण होती. धुळ्यात जेव्हा त्यांनी पहिली बैठक घेतली तेव्हा सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनाही बोलावले. पण बैठकीला राजकीय स्वरूप येणार नाही याची काळजी घेतली. बैठक बराच वेळ चालली. रात्री दीड वाजता निवेदन तयार करण्यात आले. आंदोलकांनी गावपातळीपासून ते दिल्लीपर्यंत गाठीभेटी घेऊन निवेदने देऊन त्यांची बाजू मांडली होती. हे प्रतिनिधित्व करण्यासाठी त्यांनी आदिवासींची तयारी करून घेतली होती.

मेधाताईंनी धुळ्याच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार मांडण्यासाठी काही आदिवासी नेले होते. लोक आदिवासी भाषेत त्यांची बाजू मांडत होते. जिल्हाधिकारी जरा घाईत होते ते म्हणाले, ताई, तुम्हीच मराठीत पटकन सांगून टाका. तेव्हा मेधाताई खरेतर चिडल्या. 'त्यांची बाजू मांडण्यासाठी ते ६० कि.मी. पायी चालत आलेले आहेत. त्यांचे म्हणणे आपल्याला ऐकून घ्यावे लागणार. त्याशिवाय तुम्हाला जाता येणार नाही.' अशामुळे सरदार सरोवर प्रकल्पाच्या बैठका नेहमी उशीरापर्यंत चालत. सरदार सरोवर प्रकल्पाला विरोध करताना मानवी व पर्यावरणीय बाबींवर मेधा पाटकरांचा विशेष भर होता. सरदार सरोवर प्रकल्प हा महाराष्ट्र, मध्य प्रदेश व गुजरात या तिन्ही राज्यांना सामावणारा प्रकल्प असल्यामुळे प्रकल्पग्रस्तांमध्ये या तिनही राज्यांचा समावेश होता. यापैकी गुजरातची फक्त १९ गावे पाण्याखाली जात असून महाराष्ट्रातील ३३ तर मध्यप्रदेशातील १९६ गावे प्रकल्पामध्ये बुडणार आहेत. याउलट सर्वाधिक लाभ गुजरात राज्याला होता. त्यामुळे 'नर्मदा बचाव' आंदोलनाला महाराष्ट्र व मध्यप्रदेशातील प्रकल्पग्रस्तांचा पाठिंबा गुजरातच्या मानाने अधिक होता.

पूर्वी नर्मदा बचाव आंदोलनाला गुजरात येथील विस्थापितांचा पाठिंबा मिळत नव्हता. परंतु सौराष्ट्र व कच्छ या प्रदेशांना फारसा लाभ मिळणार नाही याची विस्थापितांना खात्री झाल्यानंतर या आंदोलनाला पाठिंबा वाढत गेला.

आंदोलकांचा आत्मसमर्पण गट नर्मदातीरी बसविल्यानंतर काही दिवस पैलतीरी येण्यासाठी आंदोलकांना फार अडचणी येत होत्या. हे जाणून कच्छच्या विस्थापितांनी नर्मदा बचाव आदोलकांना एक नाव बक्षिस म्हणून दिली. एका वेळी २० लोकांना तारून नेईल अशी ती नाव होती. एकीकडे धरणाचे काम सुरू होते व दुसरीकडे आंदोलन अधिक व्यापक व गंभीर होत चालले होते.

महाराष्ट्र व गुजरात सीमेवर बांध बांधला असून त्यात ५७३ गावे बुडणार होते. त्यात ४ लाख लोक विस्थापित होणार होते. एकूण ५१ टक्के विस्थापित होणाऱ्यात ९ टक्के आदिवासी होते. नर्मदा सरोवरामुळे शेतीखालची शेतजमिनीची ४० हजार एक जमीन पाण्याखाली जाणार होती. तत्पूर्वी या भागातील जंगलेही कापली जाणार होती. त्यात अनेक उपयुक्त वृक्षांच्या प्रजाती व प्राणीही नष्ट होणार होते. मेधा पाटकराबरोबर इतरही पर्यावरणवादी नेते सहभागी होऊ लागले. त्यात बाबा आमटे, श्रीपाद नंदिनी, सिल्वी, अरूंधती रॉय आदींचा समावेश होता. एकीकडे राज्यसरकार व त्यांचे सरकारी आकडे, दुसरीकडे आंदोलनकर्ते व स्थानिक रहिासी अशी ही चळवळ सुमारे १० ते १५ वर्षे चालली. धरणाची उंची कमी करण्याचा आग्रह मेधाताईंच्या नेतृत्वाखाली आंदोलनकर्त्यांनी धरला व सरकारला शेवटी त्यांची सूचना स्वीकारावी लागली. विस्थापितांना चांगल्या पद्धतीने पुर्नस्थापित करण्यावर त्यांचा भर होता. अनेकांना जमिनीच्या मोबदल्यात पैसे देऊन नुकसान भरपाई तर जिथे शक्य झाले तिथे जमिनी देण्यात आल्या. महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेशातील विस्थापितांच्या समस्यांचे शक्य होईल तितके निराकरण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र धरणाविरुद्ध जी आंदोलने होतात त्यांच्याविषयी असे म्हटले जाते की, धरणामुळे जी हानी होते त्यापेक्षा त्यापासून होणारे लाभ हे जास्त प्रमाणात असतात.

४.३ स्वयं अध्ययन प्रश्न

स्वयं अध्ययन प्रश्न १

एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. शेतकरी संघटनेच्या नेतृत्वाखाली कोणती तीन महत्त्वाची आंदोलने झाली ?

२. किसान पक्षाची स्थापना केव्हा झाली ?

३. स्वाभिमानी शेतकरी संघटनेची स्थापना कोणी केली ?

४. भूमिसेना या संघटनेने कोणत्या जिल्ह्यात आंदोलन केले ?

५. शेतकरी संघटनेच्या विचारप्रणालीतील मुख्य मुद्दे कोणते ?

स्वयं अध्ययन प्रश्न २

एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. भारतातील पहिली कामगार संघटना कोणी स्थापन केली ?

२. फॅक्टरी ॲक्ट केव्हा करण्यात आला ?

३. 'रॉयल कमिशन ऑन लेबर' ची स्थापना केव्हा करण्यात आली ?

४. राज्य कामगार विमा कायदा केव्हा लागू करण्यात आला ?

५. भारतीय मजदूर संघाची स्थापना केव्हा झाली ?

स्वयं अध्ययन प्रश्न ३

एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना कोणी केली ?

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाडचा सत्याग्रह केव्हा केला ?

३. पुणे करार केव्हा करण्यात आला ?

४. काळाराम मंदिर कोणत्या जिल्ह्यात आहे ?

५. दुसरी गोलमेज परिषद केव्हा व कोठे झाली ?

स्वयं अध्ययन प्रश्न ४

एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. भारतातील आद्य क्रांतिकारक कोणास म्हटले जाते ?

२. नर्मदा बचाव आंदोलनाच्या प्रणेत्या कोणास म्हटले जाते ?

३. सरदारी चळवळ म्हणून कोणत्या चळवळीचा उल्लेख केला जातो ?

४. नागा क्लबची स्थापना केव्हा झाली ?

५. छोटा नागपूर उन्नती संघ या संघटनेची स्थापना केव्हा झाली ?

४.४ सारांश

महाराष्ट्रातील पारंपरिक सामाजिक चळवळी म्हणून शेतकरी, कामगार, दलित व आदिवासी चळवळीचा अभ्यास आपण या घटकामध्ये केला. शेतकरी चळवळी प्रामुख्याने स्वातंत्र्योत्तर काळात जोमाने सुरू झाल्या. परंतु त्याची सुरुवात ही ब्रिटिश राजवटीतच झाली. शेतकऱ्यांचे प्रश्न आणि त्यांच्यावर सावकार, भांडवलदार, मोठे जमीनदार यांच्याकडून होणारी पिळवणूक कमी करण्याच्या उद्देशाने शेतकरी चळवळी अस्तित्वात आल्या. त्यामुळेच काही प्रमाणात शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणे शक्य झाले.

कामगारांना कामाची शाश्वती, कामाचा योग्य मोबदला, त्यांना संरक्षण व सहाय्य मिळावे याय हेतूने कामगार चळवळी अस्तित्वात आल्या. त्यासाठी कामगार संघटनांची निर्मिती झाली. ब्रिटिश राजवटीपासून आजपर्यंत या कामगार संघटना चळवळी कामगारांच्या हितासाठी कार्यरत असल्याचे दिसते.

दलित चळवळीच्या साह्याने दलित वर्गाला त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे, त्यांना जागृत व संघटित करणे, शिक्षणातून त्यांच्यावर सुसंकार घडवून आणणे, चळवळीत सक्रिय सहभागी होण्यास प्रवृत्त करणे व त्यासाठी संघटना बांधून सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक व राजकीय विकास घडवून आणण्याचे कार्य घडवून आणण्यास मोठा हातभार लावला आहे.

आदिवासींच्या चळवळी प्रामुख्याने आदिवसींच्या प्रश्नाशी संपर्क आल्यानंतर अस्तित्वात आल्या. आदिवासी चळवळींचा मागोवा घेतला असता असे लक्षात येते की, त्यांच्यातील जास्तीत जास्त चळवळी या आर्थिक शोषण आणि बाह्य संस्कृतीतील घटकांनी त्यांच्या निवासस्थानावर म्हणजे जंगलावर केलेले अतिक्रमण, जंगलतोड आदिवासींचे विस्थापन यांच्या विरोधातच झालेल्या आहेत.

थोडक्यात, चळवळी पारंपारिक असोत वा नवीन त्या प्रामुख्याने समाजात निर्माण होणाऱ्या अवास्तवी परिस्थितीमुळे अस्तित्वात येत गेल्याचे दिसून येते.

४.५ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे

स्वयं अध्ययन प्रश्न १

१. (अ) कांदा आंदोलन (ब) ऊस आंदोलन (क) दूध आंदोलन

२. १९५१

३. राजू शेट्टी

४. ठाणे

५. (अ) प्रगत औद्योगिक शहरी क्षेत्र आणि अप्रगत शेतीचे ग्रामीण क्षेत्र यांच्यात समतोल आहे.

(ब) शेतीमालाला रास्त भाव दिला पाहिजे.

स्वयं अध्ययन प्रश्न २

१. नारायण मेघाजी लोखंडी २. १८९२ ३. १८९१

४. १९४८ ५. १९५५

स्वयं अध्ययन प्रश्न ३

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर २. २० मार्च १९२७ ३. २४ सप्टेंबर १९३२

४. नाशिक ५. ७ सप्टेबर १९३१ लंडन येथे झाली.

स्वयं अध्ययन प्रश्न ४

१. उमाजी नाईक २. मेधा पाटकर ३. बिरसा मुंडाची चळवळ

४. १९१८ रोजी ५. १९२०

४.६ सरावासाठी स्वाध्याय

१. शेतकरी संघटनांच्या चळवळीची चर्चा करा.

२. स्वातंत्र्योत्तर काळातील शेतकऱ्यांच्या चळवळीची माहिती द्या.

३. महाराष्ट्रातील कामगार चळवळीचा प्रारंभ कसा झाला ते स्पष्ट करा.

४. दलित चळवळीतील नारायण मेघाजी लोखंडे यांचे कार्य स्पष्ट करा.

५. दलित चळवळीच्या उदयाची कारणे स्पष्ट करा.

६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दलित चळवळीतील योगदान स्पष्ट करा.

७. आदिवासीच्या चळवळीची कारणे स्पष्ट करा.

८. महाराष्ट्रातील आदिवासी चळवळीमध्ये उमाजी नाईक यांच्या कार्याचे महत्त्व स्पष्ट करा.

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

१. Desai A. R., Peasants Struggle in India, Bombay, Oxford University Press, 1979.

२. Desai A. R., Peasants Struggle in India after Independence, Bombay, Oxford University Press, 1979.

३. Dhanagare D. N., Peasant Movements in India, Bombay, Oxford University, Press, 1983.

४. जोशी शरद, शेतकरी संघटना : विचार आणि कार्यपद्धती, अलिबाद (रायगड), शेतकरी प्रकाशन, १९८२.

५. पाध्ये रमेश, शेतकरी आंदोलन, मुंबई, एल्गार प्रकाशन, १९८५.

६. महात्मा फुले, शेतकऱ्यांचा आसूड

७. बेडेकर / भणगे, भारतीय प्रबोधन

८. कदम मनोहर, नारायण मेघाजी लोखंडे यांचे चरित्र

९. प्रो. चक्रवर्ती दिनेश, नारायण मेघाजी लोखंडे यांचे चरित्र .

१०. महाराष्ट्राचा सामाजिक व राजकीय विकास (संपा.) विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

११. सामाजिक परिवर्तन आणि सामाजिक चळवळी – यशवंतराव चव्हाण, महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नोट्स.

१२. फुले, आंबेडकर चळवळ – श्री. धनराज दहार

१३. लिंबाळे शरणकुमार, दलित चळवळ (संपा.) कोल्हापूर १९९१.

१४. चव्हाण रामनाथ, भटक्या विमुक्तांचे अंतरंग.

१६. कुलकर्णी शौणक, महाराष्ट्रातील आदिवासी, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००९.

१७. लोटे रा. ज., आदिवासींचे समाजशास्त्र, नागपूर २०१०.

१८. पुरी चंद्रकांत, आदिम समाजाचा विकास, एक चिकित्सक अभ्यास, मुंबई, २०१०.

१९. गोरे गोविंद, महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, पुणे, २०००.

❋❋❋